म. ग्रं. सं. ठाणें

विषय

लेखक

सन

ग्रहालय क्रमांक

पुस्तकाचें नांव

# बाळमित्र,

## भाग १

सदाशिव काशीनाथ छत्रे ह्यांनीं

इंग्रजीवरून मराठीभाषेंत केला

तो,

मेजर क्यांडीसाहेब ह्यांनीं शोधिला.

---

आवृत्ति तिसरी,

केशव सखाराम शास्त्री ह्यांनीं तपासली

ती,

गणपत कृष्णाजी यांचे छापखान्यांत छापिली.

मुंबई

इसवी संन १८५७

शके १७७८

---

किंमत एक रुपया.

# सूचना

पूर्वी सदाशिव काशीनाथ छत्रे ह्यांनीं हें भाषांतर केलें, हें फार चांगलें आहे. ह्यांत व्यवहारिक भाषेच्या रीतीनें जागोजाग रस आणले आहेत, परंतु त्यांच्या रचनेंत कोंकणी शब्द फार, व कोठें कोठें दूरान्वय, व कोठें कोठें विराम चिन्हांची अव्यवस्था, व कितीएक ठिकाणीं व्याकरणाचे दोष होते, ह्यामुळें ह्या आवृत्तीचे वेळेस प्रत शोधिली. शोधितेवेळेस मूळ पुस्तक तर पाहिलें नाहीं, पण जें छापलेलें मराठी पुस्तक होतें तेंच शोधून नीट केलें. तें असें,

कोंकणी शब्द कोठें कोठें होते ते काढून देशभाषे प्रमाणें शब्द घातले.

कोठें दूरान्वित शब्द होते ते जेथील तेथें समीप केले. विरामचिन्हें ह्मणजे कामा, फूल्स्ताप्, इत्यादिक ह्यांची व्यवस्था केली.

कितीएक ठिकाणीं व्याकरण दोष होते ते काढून नीट केले.

ग्रंथांत कोठें कोठें हिंदुस्थानी भाषा आली आहे ती शुद्ध नव्हती, ती हिंदुस्थानी भाषेच्या रीतीप्रमाणें नीट केली.

# सूचना

मी शब्द तृतीयांत जेथें आला तेथें त्यावर अनुस्वार देऊन मीं असें केलें, किंवा म्यां असें शब्दरूप लिहिलें.

कर्मणिप्रयोग, भावीप्रयोग, ह्यांची व्यवस्था व्याकरणाच्या रीतीप्रमाणें नीट केली.

जेथें दुर्बोध शब्द होते तेथें प्राय:सुबोध शब्द घातले. ह्यांशिवाय जें न्यूनाधिक आढळलें तें नीट करून प्रत शोधिली असे.

# अनुक्रमणिका.


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| धाकटा भाऊ | १ | आवडी आणि मोरू | १६९ |
| वर्षाचे तीन काळ | ९ | कोंकरूं | १७२ |
| लक्ष्मण | १२ | द्राक्षीखुंट | १७५ |
| चिमणी | १७ | खोत | १७८ |
| लहानकिनऱ्या | १८ | बापांची समजी | १९१ |
| मैना | ५२ | धाकटीमुलगी जी कुळंबिणीनें ठकविली | २२८ |
| मुलें, जीं स्वतंत्र व्हावयास इच्छितात | ६० | म्हातारा भिकारी | २४२ |
| कांटे झाडें | ६९ | समागमसुख | २४७ |
| शिवाजी | ७३ | थोरांचें व्हदय | २४९ |
| दाणे टिपणारीपोर | ७८ | जुनाचाकर | २८८ |
| सखी आणि मनी | १०९ | परशुराम, आणि कृष्णी | २९८ |
| लहान जगू | १२५ | हट्टीमुलगी | ३०० |
| गवंडी व मजूर | १४३ | आशाभंग | ३०४ |
| तरवार | १४७ | अंतिक | ३०६ |

# प्रस्तावना.

मुलांचे शिक्षारूप ग्रंथांविषयीं जे परिश्रम करितात त्यांस यद्यपि इतर ग्रंथकर्त्यांसारिख्या कीर्तीचा लाभ होत नाहीं, तथापि वास्तविक पाहातां असें वाटतें कीं, असल्या कर्वींचे ग्रंथ मोठमोठे काव्यांहून अधिक उपयोगी व अधिक उपकारक आहेत. लाहान मुलांस मर्यादा व सद्गुण लावणें, त्यांस कुमार्गापासून संरक्षणें, त्यांस ज्ञानाचें खाजें देणें ,आणि त्यांची बुद्धि विचारक्षम करणें, ह्यां विषयीं उद्योग करणें महापंडितांसही योग्य होय. अल्पमति आहेत ते मुलांची प्रवृत्ति निवृत्ति, त्यांचें खेळणें रुसणें, त्यांचे हर्ष विषाद, पाहून तें अज्ञान आपल्या मनास आणावयास योग्य नाहीं, ह्मणून ह्मणोत; परंतु ज्यांची लोकहितावर दृष्टि आहे; जे दीर्घ दृष्टीनें जाणतात कीं, एका मनुष्याच्या सत्कर्मा दुष्कर्मानें सगळ्या सृष्टीचा फेरफार होत असतो, ते मुलांचे ठायींही सद्गुण दुर्गुण पाहून त्यांचे विचाराविषयीं अनास्था करीत नाहींत. पाहाणारे होते त्यांनीं शिकंदर बादशाह मूल होता तेव्हांच त्याचे बुद्धींत व्यापकता पाहिली. पुढें त्यानें सर्व पृथ्वीचीं राज्यें उलटीं पालटीं केलीं. शरीर तर सर्वांचें तेवढेंच, पण त्यांतल्या राहाणा-

त्याची योग्यता भिन्न भिन्न आहे, ती बहुत करून लाहानपणापासून बऱ्या वाईट शिक्षेप्रमाणें परिणामास पावते. ह्मणून मनुष्यांचें भावी स्वरूप शिक्षेवर आहे. ह्यासाठीं जो मनुष्य मुलांचे शिक्षेविषयीं आपल्या गुणांचा उपयोग करितो, त्याचा परिश्रम किती स्तुत्य ह्मणावा.

ह्या ग्रंथकर्त्यानें दोन गोष्टी मनांत आणून ग्रंथ केला आहे; एक तर मुलांचें रंजन; दुसरी, त्यांस सद्गुण सहज लागावे. प्रति गोष्टींत सदाचरण व सुजनता ह्यांची प्रशंसा आहे; ह्यांत मोठ्या मोठ्या अघटित घटनेच्या गोष्टी सांगितल्या नाहींत; ज्या गोष्टी प्रायः मुलांचे नित्य परिचयांतल्या आहेत त्याच सांगितल्या आहेत. त्यांस जे सद्गुण लागावे ह्मणून योजिले आहेत ते त्यांचे सामर्थ्याच्या बाहेर नाहींत. ज्या गोष्टी सांगितल्या आहेत, त्या त्यांचेसारिख्या मुलांच्या, त्यांचे खेळगड्यांच्या, त्यांचे आईबापांच्या, त्यांचे बहीणभावंडांच्या, ज्यांशीं त्यांस नित्य प्रसंग असतो अशा चाकरांच्या, आणि जे त्यांचे नित्य पाह्मण्यांतले पशु त्यांच्या आहेत. भाषाही बाळबोध योजिली आहे. हर्ष विषादांचीं कारणें जीं जीं दाखविलीं आहेत त्यांमुळें जे त्यांचे मनांत विकार उत्पन्न होतात ते स्पष्ट केले आहेत; त्यांच्या अन्यायांचे जे वाईट परिणाम ते त्यांचे बुद्धीस आणून देऊनहींच त्यांचीं पारिपत्यें ह्मणून सुचविलीं आहेत; आणि सदाचरणानें जें मनास समाधान उत्पन्न होतें तेंच त्यांचे सत्कर्माचें फळ ह्मणून सुचविलें आहे. एथें जें जें सांगितलें आहे तेणें-

करून त्यांनीं सदाचरण हें सर्व सुखाचें साधन ह्मणून त्याजवर प्रीति करावी; आणि दुराचरण हें सर्व दुःखांचें आणि पश्चात्तापाचें उत्पत्तिस्थान ह्मणून तें वर्जावें, असा ग्रंथाचा अभिप्राय आहे.

हा ग्रंथ मुली मुलगे ह्या उभयतांसही उपयोगी आहे, आणि हा दोघांस उपयोगी पडावा ह्मणून दोघांचे प्रसंग एकत्र आणून गोष्टी योजिल्या आहेत; प्रति गोष्टींत भिन्न भिन्न प्रकार दाखविले आहेत; अनेक सद्गुणांची प्रशंसा व दुर्गुणांची निंदा गोष्टींचे प्रसंगानें आणिली आहे. बहुतेक गोष्टींचे अनुभव मुलांचे ठायीं घडलेले पाहिले आहेत. कोठें कोठें नाटकें योजिलीं आहेत, तेणें करून मुलांस हावभाव युक्त निर्भीडपणें चौघांत बोलतां यावें, व लज्जेनें तोंड मुरडतात तें मुरडूंनये. पात्रांत आईबापें ही मिश्रित केलीं आहेत, तेणें करून त्यांस मुलांचे आनंद भोगावयासही सवड दिली आहे

हा ग्रंथ मुलांस पढविल्यानें त्यांस लाहान पणापासून अनायासानें बोलावयाचा अभ्यास होईल; त्यांचा शब्दसंग्रह वाढेल; त्यांस अनेक व्यवहार, अनेक रीति, अनेक नीति, समजतील; बुद्धि सदसद्विचारक्षम होईल; त्यांचें ह्रदय कोमल होईल; मातापितरांच्या ठायीं त्यांचा प्रेमा वाढेल; बहीण भावांच्या ठायीं त्यांची प्रीति वाढेल; ईश्वरभक्ति वाढेल; पुढें मोठमोठाल्या विद्या शिकावयास सुगम होतील. सांप्रत मुलांच्या हातीं जे ग्रंथ पडतात ते त्यांचे बुद्धींत भरावयास अवघड आहेत,

# प्रस्तावना

ह्या ग्रंथापासून जसा उपदेश मनांत भरेल, तसा अन्य ग्रंथांपासून भरणार नाहीं. ते समजुतीस खोल, अभिरुचीस रूक्ष, उपदेशास तीक्ष्ण, मुलांचे चित्तांत वाचण्याविषयीं तशी प्रीति उत्पन्न करणारे नव्हत. ह्या ग्रंथीं तसें नाहीं; एथें त्यांची भाषा, त्यांचे खेळ, त्यांचे उद्योग, त्यांच्या आवडीच्या गोष्टी सांगितल्यामुळें त्यांस वाचतां वाचतां प्रीति उत्पन्न होऊन, इकडे त्यांस नकळत सहज चांगले गुण लागावे, ह्मणून ह्यास बाळमित्र नांव योग्य आहे.

ह्या ग्रंथाचा कर्ता बर्किन ह्मणून कोणी महाविद्वान् फ्रेंच मनुष्य होऊन गेला, ज्याचे उपकार विलायतेंत सर्व आठविताहेत; ज्याचे वाणीनें आज्ञापित जो रस ह्मटला तो उभा राहातो; ज्याचें वर्णन यथातथ; बाळपणांतील मानसिक विकार, रुचिवैचित्र्य, इत्यादिक धर्मांच्या यथास्थित स्वरूपवर्णनाविषयीं जो प्रशंसनीय; ज्याचा लेख अचेतनास चेतना आणितो; कोणताही विषय ज्यानें आदरल्यामुळें श्रवणयोग्य होतो.

हा बाळमित्र ग्रंथ पूर्वीं फ्रेंच भाषेंत होता; तींतून इंग्रेजींत आला, तिजवरून मराठींत आणिला आहे. फ्रेंच भाषा व इंग्रेजी भाषा ह्यांचा विचार करितां, ज्या भाषा आज शेंकडों वर्षें सुधारत आल्या आहेत; ज्यांत सर्व विषयांवर ग्रंथ आहेत; ज्यांत सर्व मनांतील अभिप्राय शब्देंकरून दाखवितां येतात इतके शब्द आहेत; ज्या महान् महान् बुद्धिमानांस परिचित आहेत; तर असल्या भाषांत जो रस झाला आहे तो रस मराठी भाषेंत कसा

होईल ! ज्या भाषेस आज दिवसपर्यंत व्याकरण, कोश, कोणीं केलेच नाहींत; जींत विद्वान लोकांचें चित्त रमलेंच नाहीं; जींत शब्दसंग्रह थोडा; जिची बोलावयाची शैली प्रौढ नव्हे. ह्यावर आणखी माझें भाषांतरही यथा मति आहे; ह्मणून सर्वांनीं कृपा करून ह्यांतील दोषांकडे लक्ष नदेतां गुणमात्र घेऊन माझी सेवा स्वीकारावी, ही माझी प्रार्थना आहे.

# बाळमित्र.

## धाकटा भाऊ.

एके दिवशीं, सुप्रभातीं, बागांत जाऊन फुलें मिळवावीं, आणि आई जागी झाली नाहीं तंव, त्यांच्या माळा करून तीस द्याव्या, ह्मणून वेणू उठली आहे, आणि माडीवरून खालीं यावयास सिद्ध झाली आहे, इतक्यांत तिचा बाप, गोविंदशर्मा, तिच्या खोलींत आला, आणि तिला कडेवर घेऊन हांसत ह्मणतो, "बेटा, तूं माझे बरोबर लवकर चल, मी तुला कांहीं मौज दाखवितों, ती पाहून तुला फार हर्ष होईल." वेणूनें मोठे उत्कंठेनें पुसलें, "बाबा, ती काय ती मला सांगशील?"

बाप ह्मणतो, "मुली, देवानें तुला गेले रात्रीं धाकटा भाऊ दिला आहे." ती ह्मणाली, "भाऊ! कोठें आहे तो मला पाहूंदे; मला त्याजकडे लवकर ने." मग बापानें तिला तिची आई बाळंत झाली होती त्या खोलीचें दार उघडून आंत नेलें; तेथें बाजेजवळ एक परकी बायको होती, तिला वेणूनें पूर्वीं कधीं घरांत पाहिलें नव्हतें; ती त्या नुकत्या उपजलेल्या लेंकरास बाळवंत्यांत गुंडाळीत आहे, तें पाहून वेणूनें बापास नानापरींचे प्रश्न केले, त्यांचीं उत्तरें तीस देऊन बापास वाटलें कीं, आपण तिचें कोड पुर-

विलें. तेवेळीं ती आणखीही त्यास पुसूंलागली, " बाबा, ही म्हातारी कोण आहे? पाहा, ती कशी माझे धाकट्या भावास चिरगुटांत बांधिते आहे! त्याला ती दुखवील म्हणून तुला भय वाटत नाहीं, बाबा?"

गोविंद– तूं भिऊंनको, मुली, ही म्हातारी भली आहे; हिला मीं बाळाची जतन करावयाकरितां बोलाविलें आहे.

वेणू– पण, बाबा. हें बाळ माझे बयेचें, तिनें ह्याला अझून पाहिलें आहे कीं नाहीं?

गंगाबाई– ( बाजेचा पडदा सारून म्हणते ) होय, मुली, मीं त्याला पाहिलें आहे. मला सांग, बरें, त्याला पाहून तुला हर्ष झाला कीं नाहीं?

वेणू– होय, बये, मला मोठा हर्ष झाला; त्वां मला चिमणासा चांगला संवगडी खेळावयास दिला, त्याचें तोंड पाहा कसें ठक आहे तें! आणि तांबडेंच, जसें कोणी म्हणेल तो कोठून धांवत आला आहे! बाबा, मी त्याचे संगतीं खेळूं?

गोविंद– तें कसें होईल, बेटा? त्याच्यानें उभें राहवत नाहीं; तूं पाहा, त्याचे पाय किती सुकुमार आहेत ते!

वेणू– अरेरे! पाय चिमकुले आहेत खरे! आतां मी समजलें, ह्यास मजबरोबर धांवावयास अझून फार दिवस पाहिजेत.

गोविंद– तें सगळें व्हावयाच्या वेळीं होईल. पहिल्यानें हा चालूं शिकेल, मग तुम्ही दोघें बागांत उड्या

माराल, आणि खेळाल.

वेणू– खरेंचकाय? अरे बाळा, मी तुला कांहीं देतें, ह्मणजे तूं माझी माया करशील. हें माझ्याजवळ चित्र आहे हें तुला खेळावयास–हें काय, बाबा? हा लबाड घेत नाहीं! त्यानें मुठी बळकट मिटून धरिल्या.

गोविंद– घेतांना हात कसे करावे हें त्याला अझून ठाऊक नाहीं; त्यास तें कळावयास कांहीं महिने पाहिजेत.

वेणू– असें आहे? आहारे माझ्या लाहान्या! मी तुला आपलीं सगळीं खेळणीं देईन; सांग आतां तूं खुशाललास? मला उत्तर कर. बाबा, तो हांसतो! मला वेणू ह्मण, वेणू! काय, तूं बोलत नाहींस?

गोविंद– तो बोलेतों अझून दोन वर्षें पाहिजेत. पण, वेणे, तूं टकळी लावून आईस कंटाळा आणशील हो.

वेणू– पाहा, बाबा, त्यानें मुद्रा अगदीं फिरविली, तो रडतो आहे; मला वाटतें कीं, त्याला भूक लागली आहे. रे माझ्या लाहानग्या, उगी, तूं उगी! मी तुला कांहीं चांगलें खावयास आणतें.

गोविंद– माझे लाडके, त्याचे खाण्याचे खटपटींत तूं पडूं नको; अझून त्यास दांत आले नाहींत; तो खाईल कसा?

वेणू– त्याच्यानें खाववत नाहीं? तर तो वांचेल कसा? त्यानें काय उपाशीं मरावें?

गंगाबाई– नाहीं, मुली, त्याकरितां देवानें माझे मामूंत दूध केलें आहे. तो आतां अशक्त आहे, पण कांहीं

दिवस गेल्यावर तूं पाहाशील, तो भुईवर कसा लोळूं लागेल तो.

वेणू– तें मी कधीं पाहीन! पण, आई, पाहा तूं त्याचें डोकें कसें चांगलें गुळगुळीत दिसतें, त्यास हात लावावयास मला भय वाटतें.

गोविंद– तूं हात लाव व्हावा तर, पण हळूच लावहो.

वेणू– होय होय! फार हळू लावतें! ( हात लावून पाहाते ) आहाहा! किती मऊ आहेहें! जसा कापसाचा गोळा!

गोविंद– मुली, लाहान मुलांचीं डोकीं अशींच असतात.

वेणू– बाबा, जर तो पडला, तर डोकें फुटून तुकडे तुकडे होतील नाहीं बरें?

गंगाबाई– ह्यांत काय भ्रांत! पण आह्मी ह्यास जपून धरीत जाऊं, ह्मणजे तो पडणार नाहीं.

गोविंद– मुली, तुला ठाऊक आहे, पांच वर्षांमागें तूं अशीच लाहान होतीस ती?

वेणू– ह्याचे इतकी लाहान! नाहीं बाबा, तूं माझी थट्टा करितोस.

गोविंद– थट्टा नाहीं, मुली, मी हें खरेंच सांगतों.

वेणू– तर मला आठवत नाहीं तें?

गोविंद– तें खरेंच, पण हा हिंदोळा, मीं दारीं कधीं टांगला ह्याची तुला आठवण आहे?

वेणू– कां? तो सदा आहे तसाच आहे.

गोविंद– तसें कसें होईल मुली? तूं ह्या लाहाने बाळा-

एवढी होतीस तेवेळेपासून हा हिंदोळा टांगला आहे.

वेणू– खरेंच काय! तर तें माझ्या लक्षांत कसें राहिलें नाहीं?

गोविंद– बाळें लाहानगीं असतात तेव्हां जवळ काय होतें तें त्यांस समजत नसतें. हा तुझा लाहान भाऊ तुझ्याएवढा होईल तेव्हां तूं ह्यास आजच्या गोष्टी पूस कीं, "मी त्या दिवशीं तुला नांव घ्यावयास शिकवीत होतें, त्याची तुला आठवण आहे?" मग तुला समजेल, ह्याला आठवतें कीं नाहींतें.

वेणू– काय? आणि मीहीं असें आईचें थान पीत होतें?

गोविंद– होय, ह्यांत काय संशय? तुजकरितां काय काय श्रम पडले आहेत, मुली! तूं अशी अशक्त होतीस कीं, तुला कांहीं खाववत नसे. आह्मी प्रतिक्षणीं भिऊं, कीं ही आतां मरेल; तुझी आई ह्मणे, "अगे माझे बापडे, तुझे प्राण घाबरे होतील." असें ह्मणून तिनें तुला मोठे श्रमानें थोडथोडें थानचें दूध प्यावयास शिकविलें.

वेणू– आहागे माझे बये, तर मला खावयास तूं प्रथम शिकविलें, नाहीं बरें?

गोविंद– होय, माझे लेंकरा, तुझे आईनें तुला थान प्यावयास शिकविलें, तेव्हां तूं तुष्ट आणि पुष्ट झालीस. असे श्रम तिनें तुजकरितां दोन वर्षेंपर्यंत रात्रंदिवस केले. कोणेसमयीं भागवट्यामुळें तुझे आईस

अंमळ नीज लागली असतां, तूं उठून गोंधळ करावा, मग तिनें गलबलून उठून तुझ्या पाळण्यापाशीं येऊन ह्मणावें. “ वेणे वेणे, बेटा, उगी राहा, तुला भूक लागली असेल, माझे बये,” मग तिनें तुला थानाशीं धरावें.

वेणू– आणि बाबा, माझेंही डोकें ह्याच्या डोक्यासारिखेंच तेव्हां मऊ होतें ?

गोविंद– असेंच होतें माझे लाडके.

वेणू– काय! माझें हें डोकें! जें आतां इतकें कठिण आहेहें! अहो! तसें असतें तर केव्हांच फुटून गेलें असतें.

गोविंद– तें खरें, मुली, पण आह्मीं तुला फार संभाळिलें आहे. किती दिवसपर्यंत तुझे आईनें सर्व सुखें एकीकडे टाकिलीं, आणि तूं दृष्टीवेगळी होशील ह्मणून कोठें जाणें सोडिलें. जेव्हां जेव्हां तिला कामामुळें तुला सोडून जावयाचें पडे, तेव्हां तेव्हां ती तुझी मोठी काळजी करी. दाईचे स्वाधीन तुला करावें, आणि तिला ह्मणावें. “शेवंताऊ, मी हिला तुझे स्वाधीन करितें; तूं पोटचे लेंकराप्रमाणें हिला सांभाळ बरें,” आणि तुझी चांगली जतन करावी ह्मणून तिनें दाईस वेळोवेळीं देणगी द्यावी.

वेणू– आहागे माझे भले आई! पण, बाबा, मला धांवतां येत नव्हतें, अशी मी कधीं होतें? जी मी आज अर्धकोश धांवेन ह्मटलें असतां धांवेन. पाहा, मी तीन

चार पावलांनीं खोलीपार होतें; हें काय कोणीं मला शिकविलें होतें !

गोविंद— तुझे आईनें आणि म्यां तें तुला शिकविलें. तूं पडलीस असतां डोक्यास लागूं नये ह्मणून, आह्मीं मखमालीचा पट्टा करून तुझ्या डोकीस बांधावा; मग तुला मऊ दोरी धरवून चालवावें. कोणतेवेळेस आह्मीं बागांत चारीवर एकासमोर एकानें बसावें, तुला मध्यें निराधार उभें करून "मजकडे ये" असें ह्मणून एकदा मीं एकदा तुझे आईनें हात पुढें ओढवावे; तेसमयीं तूं किंचित् मात्र कलल्लीस, कीं आमचा जीव घाबरा व्हावा. आधीं आह्मीं तुजकडून पांगुळगाडा हातांनीं धरवावा, आणि तुला चालवावें. अशा युक्तींनीं आह्मीं तुला चालावयास शिकविलें आहे.

वेणू— मजविषयीं तुह्मांस इतके श्रम पडले आहेत, हें मला ठाऊक नव्हतें. तर मला बोलावयासही तुह्मींच शिकविलें असेल !

गोविंद— त्यासही आह्मीच कारण. मी तुला मांडीवर घेऊन, बाबा, आई, हे शब्द तुला क्षणोक्षणीं ऐकवीं; नंव तूं ते मला उलटून ह्मणून दाखवीस. आज जो जो शब्द तूं बोलत आहेस, तो तो आह्मीं तुला शिकविला आहे; आणि तुला वाचावयासही आह्मींच शिकविलें; ह्याची तर तुला आठवण असेलच.

वेणू— होय, तें मला चांगलें आठवतें. तूं मला पाटीवर अक्षरें काढून देईस आणि शिकवीस, तसें मी शिकलें

ह्मणजे तूं मला खारीक खाऊ देईस; तो घेऊन मला फार हर्ष होई.

गोविंद– जर आह्मीं तुजकरितां इतका श्रम केला नसता, आणि जर तुजवरच हें काम ठेविलें असतें, तर तुझी अवस्था काय झाली असती बरें ?

वेणू– तर मला मरून आज फार दिवस झाले असते. आहा माझे चांगले आई! आणि आहारे माझे चांगले बाबा! तुमची उतराई मी कशी होईन ?

गोविंद– इतकें आह्मीं केलें असतांही तूं एकादे वेळेस बापास कंटाळा आणितेस, आणि आईचें ऐकत नाहींस.

वेणू– माझा जीव आहेपर्यंत आतां मी असें कधीं करणार नाहीं, तुह्मीं मजकरितां इतके श्रम घेतले, हें मला ठाऊक नव्हतें, बाबा.

गोविंद– आतां तुझे भावाकरितां आह्मी किती श्रम भोगूं, ते तूं पाहात जा, ह्मणजे त्यावरून तुला वाटेल, कीं मजकरितांही ह्मांस असेच श्रम पडले असतील.

असें भाषण झालें तेणें करून व पुढल्या वर्तणुकेवरून वेणूचे मनांत सगळ्या गोष्टी पक्क्या ठसल्या. आपले धाकटे भावाकरितां आईस श्रम किती पडतो! तो अंमळ बरा नसला ह्मणजे तीस काय वेदना होती! त्याचे पोटांत अन्न जावें ह्मणून ती किती कष्ट पावते! तो रडतो तेव्हां तेव्हां तिला किती गहिंवर येतो! आईस वि

सांवा घ्यावयाकरितां किती ममतेनें आपला बाप मुलाला सांभाळितो! आणि दोघेंही त्यास चालावयास किंवा बोलावयास शिकविण्याविषयीं किती परिश्रम घेतात! हें सर्व पाहून ती आपले मनांत ह्मणे, "माझे आईबापांनीं, मजकरितांही असेच श्रम घेतले असतील." मग तिची त्यांजवर ममता फारच जडली; व आईबापांची मी सर्व प्रकारें उपकारी, असें तिचे मनांत बाणलें. नंतर तिनें कधीं त्यांची आज्ञा मोडिली नाहीं; आणि त्यांला तिळप्राय दुःख होई असें कधीं जाणून केलें नाहीं.

---

## वर्षाचे तीन मुख्यकाळ.

बाळा नुकताच शेकून आणि ओले गव्हांच्या ओंब्या खाऊन आला होता; तो ह्मणतो "आहाहा! असा सदा हिंवाळाच असता तर बरें होतें; ह्याचें सुख काय सांगूं! ह्यांत नद्यांचें पाणी किती स्वच्छ आणि किती मिष्ट! लोंकरीचीं वस्त्रें किती सुख देतात! पोटांत भूक, अन्नास रुचि, आणि निद्रा तरी काय गाढ येते ती!" तें ऐकून गोविंदशेट, त्याचा बाप, त्यास ह्मणाला, "बरें तर, ह्मणतोस असेंच माझे स्मरणवहींत लिहून ठेव." बाळानें तसें केलें. पुढें हिंवाळा निघून गेला, आणि उन्हाळा आला; तेव्हां संपूर्ण वृक्ष पालवी फुटून फलपुष्पयुक्त झाले आहेत; वायु मंद सुगंध शीतळ वाहात आहे; लोक चंदनाच्या उट्या घेऊन, गळ्यांत पुष्पांच्या माळा घालून,

फिरत आहेत, व नानाप्रकारचे शीतळ उपचार करीत आहेत; बागामध्यें कारंजीं उडवीत आहेत; त्यांचे तुषार अंगास लागून अत्यंत सुख देत आहेत; तसेंच पिकलेलीं फळें, आंबे, फणस, जांब, अंजीर, द्राक्षें, इत्यादिक जिव्हेस अमृतासारिखी रुचि देत आहेत. तें सर्व सुख पाहून बाळा ह्मणतो, "आहाहा! असाच सदा उन्हाळा असता तर बरें होतें." गोविंदशेट ह्मणाला, "मुला, ह्मणतोस असेंच माझ्या स्मरणवहीवर लिहून ठेव." बाळानें तसें केलें. नंतर पावसाळा आला; त्यासमयीं जिकडे तिकडे हिरवीं चार गवतें, व नानाप्रकारचीं झाडें, उगवलीं आहेत; नद्यांचे प्रवाह चालले आहेत; शाक भाज्या पुष्कळ झाल्या आहेत; जिकडे तिकडे पाणी जमलें आहे; त्यांतून कागदाचीं तारवें करून मुलें पोंहवीत आहेत; छत्र्या, सखलादीच्या टोप्या, डोईवर घेऊन पावसांतून लोक चालले आहेत; पुढें शेतें पिकलीं, त्यांत नानाप्रकारचीं धान्यें झालीं आहेत. तें पाहून बाळा ह्मणाला, "बाबा, काय चमत्कार हा! हा पावसाळा सदा असाच असता तर बरें होतें!" बाप ह्मणाला, "मुला, हें त्या वहींत लिहून ठेव." बाळानें तसें केलें. पुढें कांहींका दिवसांनीं हिंवाळा येणार तों बाळा बापास ह्मणतो; "हा हिंवाळा नयेता आणि पावसाळाच राहाता तर बरें होतें." बाप ह्मणाला, "असें होईल तर तुला संतोष होईल मुला?"

बाळा — फारच संतोष होईल, बाबा.

गोविंद – (ती स्मरणवही काढून बाळास दाखवितो, आणि ह्मणतो.) हें येथें काय लिहिलें आहे? हें वाच.

बाळा– (वाचतो) आहा! असा हिंवाळा सदा असता तर बरें होतें.

गोविंद– बरें, आतां पुढें चार पानें उलटून पाहूंया. हें वाच.

बाळा– (वाचतो) आहाहा! हा असा उन्हाळा सदा असता तर बरें होतें.

गोविंद– (आणखी चार पानें उलटून पुसतो.) बाळा, हें अक्षर कोणाचें तें ओळखतोस?

बाळा– हें माझें अक्षर.

गोविंद– तें काय लिहिलें आहे तें वाच.

बाळा– (वाचतो.) हा पावसाळा असाच वर्षभर असेल तर चांगला.

गोविंद– हें मला विचित्र दिसतें. हिंवाळ्यांत तूं ह्मणालास, सदा हिंवाळा असेल तर बरें; तोच तूं उन्हाळ्यांत ह्मणतोस, उन्हाळा चांगला; आणि पावसाळ्यांत ह्मणतोस, पावसाळा चांगला; आतां ह्यावरून काय समजावें?

बाळा– कां? सर्वही काळ चांगलेच आहेत.

गोविंद– खरें, मुला, त्यात्याकाळीं त्या त्या काळच्या अनेक पदार्थांच्या समृद्धि होताहेत; आणि प्राणिमात्रास अनेक प्रकारचीं सुखें होतात. हें विश्व कसें चालवावें, हें ईश्वरास चांगलें ठाऊक आहे. ह्याचा विचार करावयास आपली बुद्धि किती? जर

तूं ह्मणालास तसें होतें, तर ह्यापुढें आपणांस हिंवाळा आणि उन्हाळा हे नाहींसे होते. सदा सर्वकाळ पाऊस पडून जिकडे तिकडे जळमय होतें; लोक घरांत अडकून राहाते; धान्यें कुजून जातीं; दुष्काळ पडून लोकांचा संहार होता. इतका नाश होऊन तुझा स्वार्थ किती होता ह्मणावें तर तुला आणखी कितीक दिवस पर्यंत कागदाचीं तारवें पाण्यांत खेळवावयास सांपडतीं. ह्मणून पाहा बरें! देवानें ही गोष्ट केवढी चांगली केली आहे, कीं काळांची वांटणी आपले हातीं ठेविली आहे. ह्या गोष्टी आह्मां जीवांच्या हातीं असत्या तर, कोठेंही सुख नाहींसें होऊन अनर्थ होता.

---

## लक्ष्मण.

संताजी नांवाचा एक अति दरिद्री मोलकरी होता, त्याला लाहान लाहान साहा मुलें होतीं. ह्यांचें पोषण कसें होईल ह्मणून त्यास एके समयीं मोठी काळजी पडली; आणि त्यांत दुसरें असें झालें होतें कीं, त्यावर्षीं पीक चांगलें आलें नव्हतें ह्मणून आदले वर्षापेक्षां दाणा दुप्पट महाग झाला होता. संताजी रात्रंदिवस खपे तरी मुलांस जाडी भरडीही भाकर पोटभर घालावया पुरते पैसे त्याला मिळत नसत. असा तो पराकाष्ठेच्या क्लेशांत पडला. एके दिवशीं त्यानें आपल्या सगळ्या मुलांस जवळ बोलाविलें, आणि डोळ्यांत आसवें आणून ह्मणतो,

"अरे माझ्या जिवलगांनो, यंदा महागाई फार आहे; मी इतका खपतों तरी तुमचें पोट भरावयापुरता दाणा मला मिळत नाहीं, अशी माझी अवस्था आहे. तुह्मी पाहा कीं, सगळे दिवसाची माझी मजूरी एवढयाशा एका भाकरीसाठीं खर्च होती; ह्मणून मला जें मिळतें तितक्यांत तुह्मीं निर्वाह केला पाहिजे, दुसरा उपाय नाहीं. इतक्यानें तुमचें पोट भरणार नाहीं खरें, पण प्राणतर वांचतील." इतकें बोलून तो उगा राहिला त्या बापड्याच्यानें पुढें बोलवलें नाहीं. तो वर देवाकडे डोळे करून रडूं लागला, तें पाहून मुलेंही रडूं लागलीं, आणि आपापल्या मनांत ह्मणूं लागलीं, "हे देवा, हे ईश्वरा, आह्मी गरीब, आह्मी लाहान, आह्मी भाग्यहीन आहों, आह्मांवर करुणा कर, आमच्या बापास सहायहो, आह्मांस उपाशीं मरूंदेऊं नको."

संताजीनें मग त्या भाकरीचे सात तुकडे सारिखे केले, त्यांतला अगदीं लाहान आपण घेऊन बाकीचे तुकडे मुलांस वांटून दिले. त्यांत एक लक्ष्मण ह्मणून मुलगा होता, त्यानें आपला भाग घेतला नाहीं. तो ह्मणाला, "बाबा, मला नको; आज माझ्यानें खाववत नाहीं; मला बरें वाटत नाहीं; माझा वांटा तूं खा; नाहींतर माझे भावंडांस वांटून दे." संताजी लक्ष्मणास पोटाशीं धरून विचारितो, "बाळा, तुला काय होतें?" तो ह्मणाला, "बाबा, मला बरें वाटत नाहीं, फार बरें वाटत नाहीं, मी

निजावयास जातों." संताजीनें मुलास नेऊन खाटेवर निजविलें. दुसरे दिवशीं, प्रातःकाळीं, संताजी मोठा कष्टी होऊन तलाव वैद्याचे घरीं गेला, आणि त्याचे पायांपडून ह्मणाला, "वैद्यबावा, माझा मूल घरीं दुखण्यास पडला आहे; मज दीनावर दया करून त्याला पाहाल, आणि औषध द्याल, तर मी तुमचा उपकार जन्मवर विसरणार नाहीं." तो वैद्य मोठा सज्जन होता; आपणास संताजी कडून कांहीं मिळावयाचें नाहीं हें त्यास पक्कें ठाऊक होतें, तरी तो त्याचे घरीं गेला; आणि खाटेजवळ जाऊन त्यानें लक्ष्मणाची नाडी पाहिली, तों रोगाचें लक्षण कांहींच दिसलें नाहीं; परंतु अशक्त फार झाला आहे इतकें मात्र दिसून आलें. नंतर कांहीं औषधांची याद लिहितो आहे, इतक्यांत लक्ष्मण ह्मणतो, "वैद्यबावा, मी तुमचे पायां पडतों, मजकरितां कांहीं औषध आणवूं नका; मी तें साफ घेणार नाहीं."

**वैद्य**– कांवरें घेणार नाहींस?

**लक्ष्मण**– तें मला विचारूंनका; माझ्यानें सांगवत नाहीं.

**वैद्य**– तें सांगावयास तुला काय अडचण आहे? तूं तरी मला भला हट्टी पोरगा दिसतोस.

**लक्ष्मण**– वैद्यबावा, मी हट्टामुळें सांगत नाहीं असें नव्हे.

**वैद्य**– बरें तर, मी तुला आग्रह करीत नाहीं; तुझ्या बापास विचारितों; मला वाटतें कीं, तो इतकें गुप्त ठेवणार नाहीं.

**लक्ष्मण**– नको, नको, वैद्यराज; तुह्मांला शपथ आहे,

ही गोष्ट बाबाला कळवूं नका.

**वैद्य**– मुला, तुला काय ह्मणावें! असो पण जर तूं मला सांगत नाहींस, तर मला ही गोष्ट तुझे बापास जाणविणें प्राप्त आहे.

**लक्ष्मण**– नको, बावा नको! त्यापेक्षां आतां मींच होऊन तुह्मांला सांगावें हें बरें; पण दया करून माझ्या भावांला आणि बहिणींला आधीं बाहेर घालवा.

वैद्यानें दुसऱ्या मुलांस बाहेर घालविल्यावर लक्ष्मण त्यास ह्मणतो, "वैद्यबावा, ह्या दुष्काळांत माझे बाबास मोठे श्रमानें एके भाकरीपुरते पैसे मिळतात. तिचा एकेक तुकडा एकेकाच्या वांट्यास येतो, आणि अगदींच लाहान तो बाबा आपण घेतो. माझे भाऊ आणि बहिणी भुकेनें व्याकुळ पाहून मला भारी वाईट वाटतें. सर्वांत मी वडील, सर्वांपेक्षां मला अधिक शक्ति आहे, त्या अर्थीं मला वाटतें कीं, माझा वांटा भावां बहिणींनीं खावा; मी खात नाहीं ह्याचें कारण हें आहे, ह्यासाठीं मी दुखणें घेतलें आहे, आणि माझ्यानें खाववत नाहीं असें सांगतों, परंतु मी फिरून तुमच्या पायां पडतों, ही गोष्ट बाबाला सांगूं नका." हें ऐकतांच वैद्याला गहिंवर येऊन त्याच्या डोळ्यांस पाणी आलें, आणि ह्मणतो, "पण बाळा, तूं भुकेनें व्याकुळ होत नसशील?"

**लक्ष्मन**– नसेन असें कसें होईल? मला भुकेपासून व्यथा होती, पण त्यांची भूक पाहून जशी मला व्यथा होती तशी माझ्या भुकेनें होत नाहीं.

वैद्य— पण जर तूं कांहींच खाणार नाहींस, तर लौकर मरशील.

लक्ष्मण— हें तर मी जाणून आहें, पण मी संतोशानें मरणार. माझ्या बाबाला तितकें एक पोट तरी कमी होईल; मी मरून देवाजवळ जाईन, आणि प्रार्थना करीन कीं, ईश्वरा, माझ्या भावांला आणि बहिणींला अन्नावांचून मारूं नको.

त्या मुलग्याचे असे शाहाणपणाचे बोल ऐकून वैद्यास मोठा चमत्कार वाटला; त्यास अंतःकरणांत करुणा येऊन त्यानें लक्ष्मणास दोहों हातीं उचलून उराशीं धरिलें, आणि ह्मणतो, "भिऊंनको, माझ्या सख्या, तूं मरणार नाहींस; सर्वांचा बाप जो ईश्वर तो तुझें आणि तुझ्या कुटुंबाचें संरक्षण करील; मला त्या ईश्वरानेंच येथें आणिलें असें समज; तर मी आतां घरीं जाऊन लौकरच येतों," असें बोलून वैद्य आपले घरीं धांवत गेला, आणि चाकराचे डोईवर नानाप्रकारचीं अन्नें देऊन लागलाच त्यास घेऊन परत आला. त्यानें संतानीस आणि त्याचे मुलांस पंक्तीनें बसवून त्यांस पोटभर जेवावयास घातलें. त्या गरीब मुलांचा यथेष्ट जेवतांना उत्साह पाहून, तो धार्मिक वैद्य फार फार समाधान पावला. जातेवेळीं लक्ष्मणास ह्मणतो, "मुला, तूं कांहीं काळजी करूं नको; मी तुम्हांस लागेल तें पुरवीत जाईन." ती प्रतिज्ञा त्यानें मोठे आवडीनें पाळिली. तो नित्य त्यांस शिजविलेलें अन्न पाठवून देई. त्या गांवीं

दुसरे कितीएक त्या वैद्यासारिखे धार्मिक पुरुष होते त्यांस ती गोष्ट समजली, तेव्हां तेही त्या मुलांचा समाचार घेऊं लागले. कोणी अन्न, कोणी पैसा अडका, कोणी वस्त्रें, असें त्यांस देत ह्याप्रमाणें थोडकेच दिवसांत तें लाहान मुलांचें कुटुंब दरिद्रांतून मुक्त झालें.

ह्याप्रमाणें आपले बापाकरितां आणि आपले लाहान भावांकरितां त्या उदार मुलानें जें आचरण केलें तें त्या देशच्या राजानें ऐकिलें; तेव्हां त्यास मोठा चमत्कार वाटला, आणि संताजीला आपणाजवळ बोलावून ह्मणाला, “ तुझा मूल मोठा साधु आहे; मी त्याला लेंकाप्रमाणें पाळीन. मी भांडारी ह्यास सांगून ठेविलें आहे, तो तुला दर वर्षीं पांचशें रुपये देईल. लक्ष्मण आणि दुसरे तुझे मुलगे आहेत त्यांनीं इच्छेस येईल तो धंदा शिकावा; त्यांचा शिकविण्याचा खर्च मी देईन; आणि ते जर चांगल्या मार्गानें चालले, तर मी त्यांस भाग्यास चढवीन. ”

संताजी मोठा हर्षित होऊन घरीं आला, आणि दंडासारिखा भूंवर पडून आपणास इतका योग्य पुत्र देवानें दिला ह्मणून देवाचा स्तव करूं लागला.

---

## चिमणी.

गोदावरी नाई ह्मगून एक शाहाणी, भली, आणि मायाळू बायको होती. तिची वडील मुलगी गंगा

ह्मणून होती; तिनें एके दिवशीं कांहीं अन्याय केला, ह्मणून आईनें तीस ममतेनेंच धमकाविलें; ते आईचे मायाळू शब्द ऐकून, आणि आपला अन्याय स्मरून, गंगा रडूं लागली. तें पाहून तिची लहान बहीन चिमणी तीन वर्षांची होती, तिनें हळूच मागून जाऊन एका हातानें परकराचा पदर घेऊन आपल्या बहिणीचीं असवें पुसलीं, आणि दुसरे हातानें आपलें तोंडांतला खडेसाखरेचा खडा तिचे तोंडांत घातला.

मला असें वाटतें कीं, कोणी चांगल्या चितान्यानें ह्याविषयीं चित्र काढिलें असतां काय चित्तवेधक होईल!

---

## लहान किनऱ्या.

### नाटक एक अंकी.

#### पात्रें.

मालोजी .................. कोणीगृहस्थ.
चांगू .................. मालोजीचा मुलगा.
सगुणी .................. मालोजीची मुलगी.
गोविंदा .................. मालोजीचा भाचा.
यमुना. }
चिमणी. } सगुणीच्या संवगड्या, रंगरावाच्या मुलग्या.
दौलतशिग .................. लाहान किनऱ्या.
भिव्या .................. पोरगा.

# स्थळ

## मालोजीचें घर.

---

### प्रवेश १.

### लहान किनऱ्या.

### चांगू आणि गोविंदा.

चांगू– ( गोविंदास, ) ऐकिले गड्या भाऊ, माझें एक काम त्वां केलें पाहिजे.

गोविंदा– बरें, सांग पाहूंतर खरें काय काम आहे तें. तुझी सदां कांहींनां कांहीं वेठ असतीच.

चांगू– ह्याचें कारण हेंचकीं, तूं मजपेक्षां बुद्धिमान् आहेस, गड्या, आज मला गुरूनें पंचतंत्रांतली गोष्ट संस्कृताची प्राकृत करूं सांगितली आहे, तें काम तूं चांगलें जाणतोस.

गोविंदा– काय ? ती त्वां अझून पुरती केली नाहीं ?

चांगू– पुरती कोठून होईल ? तिचा आरंभ तरी करावयास अझून कोणास फावलें आहे ?

गोविंदा– काय ? सकाळचे प्रहरदिवसापासून संध्याकाळचे प्रहरदिवसपर्यंत तुला वेळ सांपडला नाहीं ?

चांगू– तूं पाहा बरें, मला फावेल कसें तें. मी आठ घटिका दिवसास तोंड धुऊन मोकळा होतों; पुढें चांगली भूक लागली पाहिजे ह्मणून मला दाहा घटकांपर्यंत बागांत इकडून तिकडे धांवावें लागतें; नंतर

चार घटका जेवणाखालीं मोडतात. जेवलें आणि लागलेंच उद्योगास बसलें तर बाबाचा वैद्य सांगतो कीं, रोग होतो, ह्मणून पोट भरून जेवलों तें जिरवावयास कांहीं वेळ मला निजलें पाहिजे, व कांहीं फिरलें पाहिजे; त्यापासून नुकता कोठें मोकळा होतों आहें.

गोविंदा– बरें, आतां तर व्यायाम पुष्कळ झाला आतांपासून संध्याकाळपर्यंत कां करीनास तर?

चांगू– आतां मला गावयास बसलें पाहिजे, तें तुझ्या लक्षांत आहेच.

गोविंदा– पण गवई अझून कोठें आला आहे? तो येईपर्यंत करीत बसलास तर काय होईल?

चांगू– तोंपर्यंत मला त्याची वाट पाहात बसलें पाहिजे; ज्यावेळीं जें काम करावयाचें त्यांत दुसरें तिसरें घेतलें ह्मणजे माझें चित्त गोंधळतें बाबा

गोविंदा– बरें, तर गाणें होऊन कांहीं दिवस राहील; करणार झालास तर रात्रीस निजेपर्यंत वेळ आहे.

चांगू– मला एक क्षणभरही अवकाश सांपडणार नाहीं. माझी बहीण सख्यांस बोलावणें करून त्यांची वाट पाहात बसली आहे.

गोविंदा– त्यांशीं तुझा काय संबंध? त्या आल्या तर तुझे बहिणीकडे येतील.

चांगू– खरें, त्यांसंगातीं खेळावयास मला बहिणीनें बोलाविलें आहे.

गोविंदा— बरें तर, त्या गेल्यावर मग तुला कसूची अडचण आहे?

चांगू— वाहावारेवा: मग दिव्याउजेडीं काम करा आणि डोळ्यांस उपद्रव यरून घ्या, चांगली गोष्ट सांगतोस? आणि तसें केलें तरी, सकाळाला गोष्ट तयार झाली पाहिजे ती कशी होईल?

गोविंदा— बरें, नाहीं झाली तर माझें काय गेलें?

चांगू— तर काय, बाबानें आणि गुरूनें मला रागें भरावें असें तुझ्या मनांत आहे?

गोविंदा— मला फुसलावयाचें तुला बरें ठाऊक आहेरे, चांगू. पाहूंबरें कोठें आहे ती गोष्ट.

चांगू— माडीवर माझे खोलींत आहे; मी जाऊन आणितों. नाहीं तर, तूंच माझे बरोबर कां येईसना.

गोविंदा— तूं पुढें जा; मी मागून हाच आलों. ती तुझी बहीण मजकडे कांहीं बोलावयास येत आहे.

चांगू— पण तूं ह्यांतली गोष्ट तिला कांही सांगूनकोहो, समजलात?

---

## प्रवेश २.

### सगुणी आणि गोविंदा.

सगुणी— काय, भाऊ, दादाचें तुझें काय चाललें होतें? मला वाटतें कीं नित्याप्रमाणें त्यानें तुझी कांहीं तरी कुचेष्टा केली असावी.

गोविंदा— नित्याप्रमाणें कुचेष्टा तर नाहीं; पण नित्याप्रमाणें कांहीं प्रार्थना आहे, कीं मी उद्यांसाठीं त्याचे वांटचें कांहीं काम करून ठेवावें.

सगुणी— आणि काय हा त्याचा आळशीपणा बाबाला कळवावयास नको ?

गोविंदा— तो मी तर कळविणार नाहीं. कांकीं, तुला ठाऊकच आहे कीं, तुझी आई वारल्यापासून माझ्या मामाची प्रकृति अशी जर्जर झाली आहे कीं, अंमळ त्याचें मन खवळलें तर तो दुखण्यास पडतो. आणखी दुसरेंही, मी त्याचें अन्न खातों; कदाचित् त्यास असें वाटेल कीं, हा माझे मुलावरून माझी ममता काढवून आपलेकडे वळवावयास पाहातो.

सगुणी— बरें तर, माझी गांठ पडली ह्मणजे मीच दादाला छडीन; पण मी काय बोलावयाला आलें आहें तें समजलास ? रंगरावाच्या मुली माझ्याकडे येणार आहेत, त्यांच्या आदर सत्कारास त्वां मला साह्य केलें पाहिजे.

गोविंदा— बरें, ताई, माझ्यानें होईल तितकें मी करावयास सिद्ध आहें.

सगुणी— अगाई ! ह्या त्या आल्या. चला, माडीवर जाऊं.

---

## प्रवेश ३.

गोविंदा, सगुणी, यमुना, आणि चिमणी.

सगुणी— या माझ्या सख्यांनो ( त्या परस्पर भेटतात;

गोविंदास नमतात, तोही त्यांस नमतो. )

चिमणी— आपली भेट होऊन वर्ष लोटलेंसें वाटतें, बाई!

यमुना— खरेंच पुष्कळ दिवस झाले.

सगुणी— मला वाटतें, कीं एक सगळा महिना झाला असवा. ( गोविंदा बसावयास सतरंजी टाकितो )

चिमणी— तूं कशाला एवढी मेहेनत घेतोस ?

गोविंदा— मला जें उचित तें मला केलें पाहिजे.

सगुणी— माझी खातरी आहे कीं भाऊ हर्षानें करितो. माझ्या दादाच्या अंगांत इतका विनय असता तर मग काय पाहिजे होतें.

---

## प्रवेश ४.

### गोविंदा, सगुणी, यमुना, चिमणी आणि चांगू.

चांगू— ( मुलींचें कांहींच आगतस्वागत नकरितां, ) हें त्वां फार चांगलें केलें, गोविंदा! आपण एथें खेळावयास बसून, आणि मला तिकडे वाट पाहावयास लाविलें.

गोविंदा— मला वाटलें होतें कीं तूं पहिल्यानें मुलींचा सत्कार करशील, तों आधीं माझीच पूजा त्वां केली.

चांगू— (चमकून.) ओहो! मुलींनो, मी प्रार्थना करितोंकीं, तुमचा सत्कार म्यां केला नाहीं ह्मणून राग आणूं नका. मी आतां तुमचे सेवेस येतों.

यमुना— तूं आमच्या सेवेविषयीं काळजी वाहूं नको; आ-

पलें काम कर.

चांगू– (गोविंदास एकीकडे नेतो, आणि मुलींचें लक्ष गोष्टींकडे पाहून हळूच खिशांतून संस्कृत कागद काढून देतो.) हें घे, समजलास; आणि ह्याचें प्राकृत लवकर करून दे.

गोविंदा– साहा ओळी! वाहवारे! भारी मेहनत! तुला लाज वाटत नाहींरे?

चांगू– चूप, बोलूंनको, त्या ऐकतील.

गोविंदा– मुलींनो, आज्ञा द्याल तर मी क्षणभर जाऊन येतों.

चिमणी– लवकरये, आह्मी वाट पाहात आहों.

सगुणी– तं जातोस तर, भाऊ, ती मिठाई आणि कांहीं मुरंबा भिव्यास वर आणूं सांग.

---

## प्रवेश ५,

चांगू. सगुणी, यमुना आणि चिमणी.

चांगू– (सतरंजीवर बसून, लोडाशीं टेंकून, हात पाय पसरून, ह्मणतो) मी आपला एथेंच बसतों.

सगुणी– मला वाटतें कीं त्वां आमचे आधीं, आह्मांस पुसल्यावांचून, बसूं नये; हें गृहस्थाईचें लक्षण नव्हे.

चांगू– कोणास पुसावें, तुला?

सगुणी– मी एथें एकटीच नाहीं.

चिमणी– आतां मी समजलें, तुझ्या दादाच्या लक्षांत

आह्मीहीं कांहींच नव्हों.

**यमुना**— त्याला असें वाटतें कीं, मी एथें बसलों ह्मणजे तेवढ्यानेंच ह्या धन्य झाल्या.

**चांगू**— हः हः हः ! मला पक्कें ठाऊक आहे, बायांनो, कीं मजवांचून तुमचें चालेल, पण तुह्मांवांचून माझें चालणार नाहीं.

**सगुणी**— बरें बाबा, इतकें तरी सत्कारासारिखें बोललास.

**चांगू**— पण मी खरेंच सांगतों, ताई, तूं समजूंनको कीं, मी येथें तुजकरितां बसलों आहें.

**सगुणी**— ह्याचा तर मला निश्चांत आहे. मी ह्मणजे काय पदार्थ! कांहींच नाहीं; पण असले शाहाणे भावाची मी बहीण, इतकें मनांत आणून खुशाल आहें, (इतक्यांत भिव्या येतो, आणि पेढेबरफी तबकांत मांडून जातो.)

**चांगू**— आतां ही मिठाई मींच वांटली असतां बरें, नव्हे?

**सगुणी**— नको, नको, बाबा, तें मी करीन. तूं असल्या कामांत आडाणी आहेस. तूं जर कांहीं करणारच तर मुलींपुढें वाट्या ठेव.

**यमुना**— मला, बाई, इतके पेढे नकोत.

**सगुणी**— पाहिजेत तितकेच घे.

(सगुणी तिजपुढें बरफी करिते. चांगू तिच्या हातचें तबकाग झोंबतो.)

**सगुणी**— (चांगूस) तुला अगोदरच म्यां तीन मोठाले तुकडे दिले नव्हते काय?

**चांगू**— तरी मला पुरले नाहींत, ताई. अगे, गोडपदार्थां-

वर माझी भारी भक्ति. ( तो एकामागें एक दोन तीन चार तुकडे घेतो. सगुणी तबक ओढिते. )

**सगुणी**— दादा, तुला लाज नाहींरे वाटत? तूंच सगळी घेतली तर मग आह्मीं काय करावें, बरें?

**चांगू**— बरफीची वरणी कोठें आहे ती तुला ठाऊक नाहीं. काय? तेथून आणखी आण ह्मणजे झालें.

**सगुणी**— ( दुसरे मुलींस ) ताईस श्रम दिल्यावांचून आमचे दादास चैन पडत नाहीं.

**चांगू**— पुरे आतां, तूं अंमळ आंत जाशील तर ह्या मुलींची सेवा मी एकटाच करीन.

**यमुना**— ऐकिलेंना सगुणे? आतां तुझ्या दादास कोणी दांडगा ह्मणेल?

**सगुणी**— ( वाट्यांत मुरंबा वाढिते, आणि चांगूस ह्मणते, ) दादा, ही वाटी यमनीसदे ( चांगू हातांत वाटी घेतो, आणि यमुनेस देतांना तिचे साडीवर उपडी करितो, तें पाहून त्या दोघी चमकून उठतात. )

**सगुणी**— हें पाहिलेंना ह्याचें चरित्र! ( हळूच चांगूस ) मी शपथ करीन, त्वां हें दाटून दुष्टाईनें केलें.

**यमुना**— अरेरे! माझी नवी साडी, हिला चिकट लागलें, आतां माझी बये मला काय ह्मणेल? आणि मी तिला काय सांगूं?

**चिमणी**— अगाई! ही आज पहिल्यानेंच नेसली होती. लौकर लौकर लोटींत पाणी घेऊन ये.

**सगुणी**— नको, नको, त्यापेक्षां सुक्या चिरगुटानें पु-

सावी तें चांगलें. हा घे धुवट फडका, पूस ह्यानें. बरें तर मलाही वाटतें, कीं धुवावी तेंच चांगलें. ( सगुणी पाणी आणिते, चिमणी आणि ती यमुने पाशीं जातात. एक जण तिची साडी धरिते आणि एकजण वर पाणी घालिते. तितक्यांत त्यांची दृष्टि चोरून भांड्यांतला सगळा मरंबा देऊन चांगू लोडाशीं स्वस्थ बसतो, आणि खुशालीनें खातो. )

**चिमणी**— पुरे पुरे धुतलें; आतां वाळवूंया.

**यमुना**— इतकें तरी माझ्या दैवानें चांगलें झालें कीं रस निऱ्यांवरच पडला.

**चांगू**— ( आपणाशीं, कुशीस वळून, ) हा कांहीं माझा अन्याय नाहीं.

**सगुणी**— हें घे वाळलें, आतां मला वाटतें कीं, कोणाचे समजण्यांत येणार नाहीं.

**चिमणी**— बरें झालें डाग गेला, नाहीं तर आज घात झाला असता.

**यमुना**— चांगोबा, झालें तें झालें; पण आतां आपण फिरून माझी सेवा करावयाचे श्रमांत पडूंनये.

**सगुणी**— गड्यांनो, आपण मातकुयानें बसूं( सगुणी मुरंबा वाढावयाकरितां भांडें हातीं घेते, तें रिकामें पाहून चांगूवर रागानें डोळे वटारून त्यास ह्मणते. अशी अमर्यादा कोठें पाहिली नाहीं, बायांनो, आपण सगळीं घाबरीं झालों होतों, त्यावेळेस हा असें करील हें माझ्या लक्षांत नव्हतें. असो, अंमळ थां-

बा मी दुसरा मुरंबा आणवितें.

**चिमणी–** पुरे बाई आतां, मला आणखी नको.

**यमुना–** माझी साडी नासली, त्यानें माझें मन खट्टू झालें, बाई.

**चांगू–** पण इच्छा असून आग्रहाची वाट पाहूं नका. बाजारांत जें ह्मटलें तें मिळतें. लागेल तें ताई आणवील, चिंता करूं नका.

**यमुना–** सगुणे, तुझा दादा एथें येणार हें तुला ठाऊक नव्हतें गे?

**सगुणी–** नाहीं बाई, पण न बोलावितां जो आला त्यानें दुसरा आपणास देईपर्यंत तरी वाट पाहावी; दांडगाईनें घेऊंनये.

**चिमणी–** आतां त्यास बोलून दुखवूं नको; मला कांहीं त्याचा खेद नाहीं.

**सगुणी–** बरें तर, आतां आपण काय करावें? हां! तो आपला गडी गोविंदा येतो आहे. तो कांहीं तरी चांगला खेळ काढील.

**चांगू–** (वेंकावल्या दाखवून, आणि त्यांसारिखा स्वर काढून) तो आपला गडी गोविंदा येतो आहे! बायांनो, पण तुमच्या अगोदर माझें त्याशीं कांहीं बोलावयाचें आहे. (चांगू गोविंदाकडे जातो. मुली आपल्यांत गोष्टी करितात)

## प्रवेश ६.

### सगुणा, यमुना, चिमणी, गोविंदा आणि चांगू.

चांगू— (हळूच कुसफुसून गोविंदास.) कायरे, तें झालें?

गोविंदा— (हळूच) होय, हें घे, आणि तुझ्या आळसाची तुला कांहीं तरी लाज वाटूंदे. (मोठ्यानें मुलींस,) बायांनो, तुह्मी काय खेळणार तें कांहीं ठरलें?

यमुना— ठरवावयासाठीं तुझी वाट पाहात आहों.

गोविंदा— मी एक चिमणासा किनऱ्या खालीं बसविला आहे, तो तुमच्या सेवेंत सिद्ध आहे. सांगाल तर वर बोलावितों. कांहीं गाणें वाजविणे करील.

सगुणा— चिमणा किनऱ्या! कोठें आहेतो? कोठें आहे तो लवकर बोलाव.

यमुना— संवगड्यांस कसें रमवावें, हें गोविंदभाऊ चांगलें जाणतो.

गोविंदा— ह्या करमणुकींत धर्मही घडेल; कांकीं त्याजवळ किनरीवांचून दुसरें कांहींच नाहीं.

चांगू— पण त्याला पैका कोण देईल गोविंदाजी? (मुलींकडे पाहून,) हा बोलतो चालतो जसा जगत्शेटीचा नातू; पण जवळ फुटकी कवडी तीही नाहीं.

सगुणा— असा कोणाचा उपहास करितां तुला हलकेपणा नाहीं दिसत, दादा?

गोविंदा— बोलूंदे, गे ताई, मला त्याचा राग येत नाहीं. गरिबी हा कांहीं दोष नाहीं. मी चिमण्या किनऱ्या-

सारखा आहे. तो गरीब असून कसा चांगला मुलगा आहे! माझ्याजवळ एक पावला आहे तो मी त्यास देईन. तेवढ्यावर त्यानें सांजपर्यंत गावयाचा वाजवावयाचा करार केला आहे.

चिमणी— आपण सगळीं मिळून त्यास वर्गणी देऊं.

यमुना— आपण त्याची पट्टी करूं.

गोविंदा— मी त्याला बोलावूं? तो खालीं दरवाज्यावर बसला आहे.

सगुणी— होय, भाऊ, लवकर बोलाव. (गोविंदा जातो, इतक्यांत भिव्या तबकांत एक कालिंगड घेऊन येतो.)

---

## प्रवेश ७,

## यमुना, चिमणी, सगुणी आणि चांगू.

चांगू— (भिव्याच्या हातून तबक ओढावयास जातो, सगुणी त्यास घेऊं देत नाहीं.) ताई, मी वांटावयाकरितां ह्मणून घेतों.

सगुणी— मी तुझी मेहनत वांचवितें; तुझ्या वांटचें तें मी करितें. कोणजाणे, तूं तें असें आवडीनें वांटशील कीं जशी बर्फी वांटली. (ती कालिंगडाच्या फांका करिते, आणि मुलींस देते.)

चांगू— (इतक्यांत त्यांतल्या दोन तीन फांका घेऊन,) आतां तूं ह्या बाकीच्या फांका कोणास देणार?

सगुणी— आपला गोविंदा खालीं गेला आहे, त्याला कांहीं नकोत काय ?

यमुना— मी त्याला माझा वांटा देईन.

चिमणी— मीही माझा देईन.

चांगू— ( वाईट वाटून, ) काय त्याचें दैव आहे पाहा !

सगुणी— काय ! कालिंगडाचा एक तुकडा त्याला मिळतो तें तुला साहत नाहीं ?

---

## प्रवेश ८.

### यमुना, चिमणी, सगुणी, चांगू, गोविंदा आणि किनऱ्या.

( गोविंदा सारंग्यास हातीं धरून आणितो. )

गोविंदा— माझा चिमणा किनऱ्या तो हा, मी तुह्मांला भेटवितों, हो.

यमुना—, चिमणी— } मुलगा तर फार भला दिसतो.

सगुणी— तुझें नांव काय, बाळा ?

किनऱ्या— ( हात जोडून, ) जी, गुलामको दौलतसिंग कहतेहैं.

सगुणी— तूं कोठचा राहाणारा ?

दौलतसिंग— जी, मैं तो हिंदुस्थानका रहनेवाला हूं.

यमुना— तुला आपला देश सोडावयाचें काय कराण झालें ?

दौलतसिंग— जी, बाईसाहेब, यिह बात तो जरा लंबी है, लेकिन आपकी मर्जी होगी तो नौकर थोडेमें कहेगा.

यमुना— होऊंदे.

दौलतसिंग— मेरा बापतो कासीका रहनेवाला; मेरी मा मरगयी; जदसें वुह बहुत दुःखी होगया है. उसको साथ लेकर मैं पेटके मारे भटकता फिरताहूं, अने यिह किनरी बजाकर पेट भरताहूं.

सगुणी— तुझें कांहीं कसब दाखीव, पाहूं.

दौलतसिंग— मैं मोठा कसबी नहीं हूं, तोभी आपके आगे चाकरी करके दिखाऊंगा, गुना माफ होना.

गोविंदा— जसें तुला येत असेल तसें होऊंदे, आह्मी त्यांत समाधान पावूं. त्वां बेसूर गाणें गाइलें तरी आह्मांस कबूल आहे.

( किनऱ्या किनरी लावितो कूं कूं कूं कूं आँ. यमुना गोविंदास कालिंगडाचा तुकडा देते, तो हातांत घेऊन किनऱ्याकडे लक्ष देतो. )

( किनऱ्या किनरी लावून गाणें गातो. )

इसतनधनकी कोनबढाई, देखतनयनमेंमट्टीमिलाई. ध्रु०
हाडजलेजैसी लकडेकीमोली, बालजलेजैसीघासकीपोली १
आनेखातरमेहेलबनाया, आपहीजाकरजंगलसोया २
कहतकबीरासुनमेरेभैया, आपमुवेपिछेडुबगईदुनिया ३

गोविंदा— आहाहा! काय गोड गाइलें! बापड्या, तूं फार विपत्तींत आहेसना?

दौलतसिंग— मैंहूं खरा, पण अबतो मेरी किनरी मेरे तें पेटको देतीहै. आजारी पडूंगा तब भगवान् है, ने मरूंगा तब धरत्रीमाई मेरेको थोडेशी जग्गा देगी, औ-

र मुझे क्या च्याहिये ?

**गोविंदा**– पण, बिचाऱ्या, तूं आतां उपाशी असशील, नव्हे ? ही माझी बर्फी आणि कालिंगडाचा तुकडा घे आणि खा.

**दौलतसिंग**– नहीं मेरे खावंद, वुह, तुमच खाओ, मेरेको जरा रोटीका तुकडा देओ, सो बस होगा.

**गोविंदा**– नाहीं, हें तूं घेच; आणखी तुला भाकरीचा तुकडाही देतों. ( तो घरांतून भाकर आणून त्यास देतो. )

**दौलतसिंग**– मेरे उपर आपनें बहुत एहसान किया, लेकिन मै यहां खानेवाला नहिं. घरमें मेरा बुढ्ढा बापहै वह और मैं मिलकर खायेंगे. उननें सारे जनममें बर्फी नहीं चख्खी होगी.

**सगुणी**– तुझे म्हाताऱ्याकरितां हा माझा वांटा मी तुला देतें.

**चिमणी**– आणि हा माझाही घे.

**यमुना**– माझा पण घे.

**दौलतसिंग**– नहीं नहीं, बाईसाहेब, तुह्मारी बर्फी तुमने रखना. हमलोगको मीठा खानेकी आदत नहीं है. ( त्या फारच आग्रह करितात, तेंव्हां तो बर्फी घेऊन एके बाजूस ठेवितो. )

**चांगू**– ( थट्टेनें ) तो खरें ह्मणतो, तिनें त्याचा गोड गळा बिघडेल.

**सगुणी**– तूं कां रे उगीच मध्यें बोलतोस ? तुझी बर्फी त-

र कोणी मागत नाहीं, ना?

चांगू– मागून फळ काय? मी ती केव्हांच गट्ट केली.

गोविंदा– (किनऱ्यास) मुला थोडीशी बर्फी तोंडांत कां टाकीसना?

दौलत ०– ओहो! नहीं नहीं आपने इत्ती मेहेरबानी करके मेरेको दियाहै, तो मेरेको रजा होना. मैं रुमालमें लपटके जातेबखत घरको लेजाउंगा (तो एक मळका रुमाल काढतो.)

सगुणी– थांब अंमळसा, तुला त्याहून धुपट फडका देतें, तंवपर्यंत थोडकीशी भाकर खाऊन हुशार हो.– (ती फडका आणून देते.)

दौलत०– नहीं मेरी माई, मै यहां गानेंको आयाहूं,खानेको नहीं आया.

यमुना– मी गोविंदासंगती नाचतें, तूं गत वाजविशील?

दौलत ०– तुम चाहो वुह बजाऊंगा.

यमुना– चांगू ये, आपण सगळींच नाचूं.

चांगू– ॲहँ, गड्या आज माझे पाय दुखताहेत.

(तीं नाचतात, चांगू बाहेर जातो.)

सगुणी– गेलास तर पीडा गेली.

चिमणी– आतां आपण कांहीं पैसे जमवूं.

यमुना– होय मी सिद्ध आहें, ही घे चवली.

सगुणी– ही माझी चवली.

गोविंदा– पहिल्यानें मी आपली देणगी देईन.

(तो दौलतशिंगास पावली देतो.)

दौलत०—इतना मैं नहीं लेऊंगा. मेरी बोली दो आनेकी है.

गोविंदा— मुला, नको ह्मणूं नको, आह्मी खुशालीनें देतों तें घे.

दौलत०— भगवान् तुमकों सौगणा देगा.

सगुणी— हें घे तुझे बापासाठीं जुनें अंगवस्त्र.

दौलत०— भगवान् तुह्मारा कल्याण करो. (तो बर्फीचे तुकडे बाजूस ठेविले होते ते पाहातो, आणि खंती होऊन ह्मणतो. अरे इतनेमें कोण लेगया.)

सगुणी— काय लबाड तरी चांगू! मला वाटतें ह्याची बर्फी त्यानेंच नेली असावी.

दौलत०— बाईसाहेब, लेगया तो कुंछ फिकर नहीं. मैं पिताजीकेवास्ते जरा दिलगीर हुवा.

गोविंदा— जर चांगू तुझा भाऊ नसता तर आज त्याची कशी फजीती केली असती तें समजतें. असो, मी ह्यास आणखी एक पावली कोठून तरी उसनी आणून देतों, ह्मणजे तो आपले बापाकरितां तिची बर्फी घेईल.

सगुणी— तो खर्च मी तुजवर पाडीत नाहीं. मीच देतें. (किनऱ्यास) ही घे मुला एक पावली. (चिमणी आणि यमुना आपल्या पिशव्या चांचपतात.)

चिमणी— हे घे आणखी चार पैसे.

यमुना— हे घे माझेजवळ दोन आहेत.

दौलत०— नहीं, नहीं, बहुत हुवे. तुम मेरेपर जुलूम करतेहो.

गोविंदा— कायकरूं, बाबा, माझेपाशीं दुसरे पैसे नाहींत. तुझेसारखा मी एथें दुसऱ्याच्या धर्मावर पोट भरतों.

दौलत०— ( गोविंदास ) तुम हमको इधर नहीं लेआयाहोता तो अछा होता. तुम मेरेपर एती लगट करतेहो कीं मेरेसे ना नहीं कही जाती.

गोविंदा— तूं खंती होऊंनको. आतां जा, आणि दुसरे कोठूनहीं कांहीं मिळीव.

दौलत०— ( जातांना सर्वांस ) तुह्मारी अलाबला लेताहूं. भगवान् तुह्मारी तनदुरुस्त राखो, और तुमको बहुत दौलत देओ.

---

## प्रवेश ९.

### सगुणी, चिमणी, यमुना आणि गोविंदा.

सगुणी— पाहिलेंना आज चांगूनें काय लाजिरवाणें काम केलें तें!

यमुना— मी जर त्याची बहीण असतें तर त्याला कसेंतें समजलें असतें.

चिमणी— आपण धर्म करीत होतों त्या आनंदांत त्यानें आपणास विरस केलें.

यमुना— असो, किनऱ्याचें तितक्यांत काम बरेंच होईल.

गोविंदा— तें खरें, तुमचें देव बरें करो, पण किनऱ्याचें

काम झालें ह्मणून चांगूचा अपराध उणा होत नाहीं. (कोणीं दार उघडिलें.) हा पुनः तुमचा किनऱ्या आला, कां बाबा? काय झालें?

दौलत०— (रडत) रे मेरी खराबी हुई.

(तीं सगळीं त्याभोंवतीं मिळतात.)

सगुणी— तुला काय झालें बाबा?

दौलत०— मेरा सबकुछ गया. देखो, देखो, मेरी किनरी तोडडाली. मेरे पैसे लूट लिये; और मेरे पाससे सब लेगया.

गोविंदा— तुझी किनरी कोणीं फोडिली? तुझे पैसे कोणीं नेले?

दौलत०— जो मेरी बर्फी लेगया उसीनें.

सगुणी— काय! माझ्या दादानें! असें कसें होईल?

गोविंदा— काय! चांगूनें!

चिमणी— असें होणार नाहीं.

यमुना— अरे दुष्ट!

दौलत०— उसीनें, उसीनें यिह काम किया. मैं दरवाजे बाहेर निकलताहूं इतनेमें वुह आया, और मुझको कहने लगा, कीं तूं अपनी बिदाई नहीं पाया होगा, तो मैं तुझेतई देऊंगा. मैं बोला, मैने पाई. वुह बोला, उनलोगोकें पास इतने पैसे कहांके? मुझको दिखलाव क्यादियासो. मैं बावरा, वुह बर्फी

लेगया यिहबात पैसे मिले इस आनंदसे मैं भूलगया, और पैसे कितीथे यिह मैने गिनेभी नहीं थे, सो मेनें किनरी जमीनपरधरके रुमाल काढा, और बोला, देख येहै. पीछे, मैं गांठ छोडताहूं इतनेमें उसनें रुमालको हात डाला, तब उसकी लुच्चाई मेरे नजरमें आई. फेर रुमालको एक तरफ वुह खेंचने लगा और एक तरफ मैं. इतनेंमें उसने अपने दो पगसें मेरी किनरी दाबी, सो फूटगई. मैंने घाबरा होके रुमाल छोडदिया, और किनरी पकडनेको गया. इतनेमें वुह रुमाल लेको दौरा. मेरी किनरी तूटगई, पैसे गये, रुमालभी गया. अब मेरा पिता मुझको क्या कहेगा! अरे मेरे पिताजी! अब तूं भूका मरेगारे! हायरे हाय!

**सगुणी**— भाऊ, माझेजवळ आतां दमडीच्याही कवड्या राहिल्या नाहींत.

**चिमणी**— ह्या घे कांहीं नासऱ्या. माझे पाशीं इतक्याच होत्या.

**दौलत०**— मेरी खावंदनी, मुझपर बहुत एहसान हुवा; पन उसमें किनरी बेचती नहीं मिलेगी. हायरे मेरे बाबा! वुह उनकेपास पंधरा बरसलग थीं.

**यमुना**— ह्या दोन दमड्या घे. ह्यांवेगळें मजपाशीं कांहीं राहिलें नाहीं.

**सगुणी**— (आपले पेटीकडे धांवते.) हें घे माझे अंगुस्तन, हें सोन्याचें आहे, जा आणि वीक. माझेजवळ दुसरें हस्तिदंती आहे, त्याजवर माझें काम चालेल.

गोविंदा— ताई, नकोगे तें अंगुस्तन देऊं. तें तुला असूंदे. थांबरे मुला, मी तुझें साहित्य करितों. (तो करांगळींतली आंगठी काढितो, आणि त्याला देतो.) माझेजवळ दुसरी मुलाम्याची आंगठी आहे, तिजवर मी चाल करीन. हिचे तुला पांच रुपये येतील; ही माझी आहे ह्मणून द्यावयास मला कोणाचें भय नाहीं. मावशीनें माझे वाढदिवशीं ही मला दिली होती. (तिकडून सगुणा अंगुस्तनाविषयीं आग्रह करिते, हिकडून गोविंदा आंगठी घ्यावयाविषयीं प्रार्थितो, तो दौलतसिंग घेतनाहीं.)

दौलत०— नहीं, मैं उसमेंसे एकभी नहीं लेऊंगा. मेरा बाबा कहेगा की तूं चोरी करकर लाया.

सगुणा— माझें अंगुस्तन तेवढें घेच.

गोविंदा— तूं माझी आंगठी घेत नाहींसना? तर मी तुजवर रागें भरेन. घे मी ह्मणतों, घे,

दौलतसिंग— तुह्मारा यिह भूखण मैं कैसा लेऊं? (मोठे जुलमानें घेतो.)

गोविंदा— त्याविषयीं तूं कांहीं चिंता करूंनको, भगवान् मला आणखी देईल; ह्याहून दुप्पट देईल. तुला तुझे बापाचें पोट भरलें पाहिजे; मला बापच नाहीं, ह्मणून तुला हें फार उपयोगी पडेल.

सगुणा— जा, जा, आतां संभाळून जाहो.

दौलत०— इतना अंगुस्तन तो पीछे ले, ओमेरीमा.

सगुणा— नाहीं, आतां तें माझें नव्हे.

चिमणी– ( किनऱ्यास ) कधीं तूं आमचे दारावरून आलास तर मजकडे ये, मी तुला कांहीं देईन.

यमुना– आमचें घर आदिवार पेठेंत दौलतरावाचे घरापाशीं आहे, तेथें कोणालाही पुसलें तर रंगरावशेटीचें घर कोणी दाखवील.

दौलत०– बडे लोगके घरमें जानेकी हमसरीखेको बहुत मुशकिल है. कभी मैं गया होगा तो कोईवखत दो धक्के मारकर दरवाजे बाहेर घरवालेनें निकाल दिया होगा.

सगुणी– आतां पुरे हें. तुझा बा तुझी वाट पाहात असेल, आणि आमच्याही बाबाची घरीं परत यावयाची वेळ झाली.

दौलतसिंग– क्या बाईसाहेब? तुह्मारा बाबा जलदी घरको आवेगा?

सगुणी– होय, पण तूं आतां येथून लवकर जा, नाहीं तर ज्यानें तुझा रुमाल नेला तो येईल, आणि तुला पुनः नागवील.

दौलत०– पण तुह्मारी निशा है की मेरे वास्ते तुमको गाली नहीं मिलेगी?

गोविंदा– नाहीं, नाहीं, जा तूं, भिऊंनको, रामराम, ये आतां.

दौलत०– ( जातांना ) आहाहा! काय भलीं मुलें.

## प्रवेश १०

### सगुणी, चिमणी, यमुना आणि गोविंदा.

चिमणी— गोविंदा, तुझी आंगठी गेली त्याचें मला फार वाईट वाटलें.

यमुना— त्वां आह्मांस आज चांगल्या मार्गाची शिक्षा लावली.

गोविंदा— मला ह्याविषयींची शिक्षा सगुणीनें लाविली. चांगूचे नीच कर्माचा माझे चित्तास खेद झाला. एरवीं एकादें धर्मकृत्य करावयास मला मोठा उत्साह वाटतो. आतां माझे मुलाम्याचे आंगठीकडे पाहून मी किती समाधान पावेन!

---

## प्रवेश ११,

### मालोजी, सगुणी, यमुना, चमणी, गोविंदा आणि दौलतसिंग.

( तीं मुलें जवळ जवळ झालीं आहेत, सगुणी आणि गोविंदा चोरून दौलतसिंगाकडे पाहाताहेत, आणि एकमेकांचे कानीं लागताहेत. )

मालोजी— ( यमुनेस आणि चिमणीस. ) सुखी असा मुलींनो, माझे सगुणीकडे येऊन तुह्मीं तिला मान दिला, तेणेंकरून मी तुमचा उपकारी आहें. आतां हा किनऱ्या काय सांगतो आहे, हें मी तुमचे समक्ष ऐकणार, तर ह्याविषयीं मला तुमची सल्ला असावी. हा

जिन्यांत माझी वाट पाहात होता; मी येतांच मला ह्मणालाकीं, तुह्मी आणि मी समक्ष असतां आपणांसीं कांहीं बोलावयाचें आहे. (दौलतसिंगास) ये मुला, तूं काय ह्मणतोस?

दौलत०— (सगुणी आणि गोविंदा ह्यांस.) तुम किरपा करके मेरेपर घुसा नहीं होना, यिह तुमसे मांग लेताहूं. मुझको बोलना जरूर हुवा क्यूंकी तुमने जो मेरे पाससे लेवाया, वुह मैंने तुह्मारे बाबाके सलाबिना रखा; वुह दुरस्त नहीं है. मै खुब जाणनताहूं, की छोकरे लोगके पास आपसकी ऐसी कुछ जिनस रहती नहीं है.

मालोजी— हा हें काय ह्मणतो आहे?

दौलत०— नौकर बोलता है की यिह छोटे महाराजने मुझको हाक मारी की आकर ये बीबी लोगके सामने किनरी बजाना; इनकेसाथ दुसरेभी एक छोटे महाराजथे; खूब सूरत, लेकिन बडे लुच्चे.

मालोजी— काय माझा मुलगा?

दौलत०— महाराज, मुझे माफ करना. वुह सकुन मेरे मूंसे आगया. पीछे मैं आया, और जो मुझको आताथा सो मैंने हजर किया. ये सखी लोगोंने मुझे कुछ बर्फी, एक रुमाल, और मुट्ठी भरके पैसे दिये; कितनेथे सो मुझे मालूम नहीं.

मालोजी— मग?

दौलतसिंग— वुह बर्फी मैं मेरे अंधे बाबाको लेज-

बालाथा, सो वुह दंडीला महाराज चोर लेगया, उसकीपरवा मैं नहीं करता, लेकिन वर्फी लेकर बाहेर भागा, और रस्तेपर छुपकर बैठा.

मै बडे खुशीसे बाहेर निकलकर जाने लगा. तद ओचता मेरेपास आया, और उन्ने जोरावरीसें मेरेपाससे रुमाल और सब पैसे छीनलिये, और मेरी किनरी फोडडाली, यिह देखो. ( रडतो ) मेरी सब दौलत, जिससे मेरा ओर मेरे बावाका पेट भरताथा.

**मालोजी—** अशी गोष्ट कशी होईल ? असें दुष्ट अधम कर्म माझे मुलाचे हातून ?

**चिमणी—** तो जिकडे तिकडे असेंच करितो. सगुणीस पुसांना ?

**मालोजी—** जा मुला, रडूंनको, मी तुझें भरून देईन, पण गोष्ट सगळी इतकीचना ?

**दौलत०—** ( मराठी बोलावयास लागतो. ) नाहीं महाराज, माझा थोडासुन. मैं तिंकरे अशा दुःख पावला. तें बरतमान ह्या छोकरे साहेबापाशीं सांगायासाठीं आला; त्याचे पाशीं माझा तोटा साधाया पुरते पैसे नहींथे; तवां ह्या बाईसाहेबांनीं मला आपलें सोन्याचें अंगुथान दिलें; आणि ह्या भाऊसाहेबानें सोन्याची अंगुठी वुह मुझेदी, अरे ! मैं चुकला. तोंडाशीं हिंदुस्थानी आवती ! तवां ते मी कशी घेऊन जाऊं ? माझा बाप मला सांगेलकी वुह चोरी करकर मैं आणला, तवां मला मोठा विचार पडला.

अवड्यामर्दी मुजला समजलाकी तुह्मारी सवारी वरीं लवकर येईल. तवां इकडेच उभा राहिला, की ते जिनसा तुमचे सवाधीन करावी. एघे ते, पण मला किनरी नहीं.— हायहायरे मेरी किनरी! ओ मेरे बाबा!

मालोजी— आज काय आनंदाची गोष्ट त्वां मला सांगितली! आतां मी तुला, किंवा, माझे उदार मुलांनो, तुह्मांला अधिक वाखाणूं? तूं मुळींच मोठे दारिद्रानें पीडिलेला, त्यांत आणखी तुझें सर्वस्व गेलें, असें असतांही आपले पासून अन्याय कर्म घडूंनये ह्मणून तुझी वासना! मुला, तुझी शाबास आहे, तूं धन्य आहेस.

दौलतसिंग— हाँ! खोटा काम नहीं करना. उसमें इतना फायदा हैना? यिह सच हैकी बुरे काममें मिलाया उसको बरकत कभूं नहीं होती. मेरी मा और बाबा मुझको यिही कहते आये हैं, की बेटा, जानगया तो खूब, पर बूरा काम मतकर, इसमें भगवान् राजी. अभी महाराजनें मुझको किनरीकी मेहरबानी करना. दुसरा मुझे कुछ चहीये नहीं. सांजसुधी मैं इधर उधर फिरकर रोटी मिलाऊंगा.

मालोजी— ह्याप्रमाणें मला दिसतें कीं तुझा बाप आणि तूं कोणी मोठे साधु आहां. चिंता करूं नको, ईश्वर माझे हातानें तुझें कल्याण करील. तूं आह्मांजवळ राहा. प्रथम कांहीं दिवस गोविंदाजवळ ऐस, नंतर

माझ्यानें तुझें जें बरें करवेल तें मी करीन.

दौलत०— क्या! यिह छोठे साहिबके खिदमतमें? क्या आनंदकी बात है! (गोंविदास नमतो) पण, नहीं, (खेद पावून) मुझसे मेरे बाबाको अकेला नहीं रखा जाएगा. मेरेबिना वुह बचेगा कैसा? क्या, मैं मीठा मीठा खाऊं और वुह भुके मरेगा? मैं नरम बिछाने-पर सोऊं और उसको चटाईभी नहीं मिलेगी? जिनसे मैं पैदा हुवाहूं, जिने मेरे तईं बढाया, जिने मेरे वास्ते आपकी सब कमाई खर्ची, जो मेरे सुखसे सुखी और मेरे दुखसे दुखी, उसको आज बुढ्ढेपनमें मैं डाल देऊं? मैं जब छोटा और नाकुवतथा, तद जिने मेरा गू मूत उठाया; मनमें कुछ बीट लाया नहीं, उसकी सेवा डालके आज मैं, महाराज, तुह्मारेपास सुख भोगनेको कैसा रहूं; मुझको लोक क्या कहेंगे; भगवान् क्या कहेगा; मेरा मनभी क्या कहेगा; और ऐसा करके मुझे सुख कैसा होवेगा? नहीं नहीं, यिह बात कभी होनेकी नहीं.

मालोजी— गुणाच्या मुला, तुझा बाप कोण, कोठला आहे?

दौलत०— मेरा बाबा हिंदुस्थानका रहनेवाला, अभी बुढ्ढा और अंधा हुवाहै. आगे वुह बडा गानेवाला था. उसको मैं किनरी बजाके पोसताहूं. वुह थोडासा खाताहै, और मैं भी बहुत खाता नहीं. जरासी रोटी और कुछ तरकारी यिह हमारा खाना, इतना हम-

को भगवान् रोजके रोज देताहै, कलकी चिंता हम रखते नहीं, वुह भगवानूपर सोपते हैं.

मालोजी— बरें तर, मी तुझे बाबाचीही सोय करितों. त्याला धर्मशाळेंत आणून ठेवितों, तेथें दुसरे अशक्त म्हातारे आहेत त्यांजबरोबर ह्याचेंही संगोपन होईल. तुला हावें तेव्हां तूं त्यास भेटावयास जात जा.

(दौलतसिंग तें ऐकून टिरी पिटून अति हर्षानें घर भर धांवतो.)

दौलत०— क्या धर्मात्मा ये है! क्या मेरा बाबा! नहीं; यिह सुनकर वुह हरखसे मर जायेगा, मुझसे अभी इधर रहा नहीं जाताहै, अभी मैं जाकर उसको लेकर आताहूं. (धांवून बाहेर जातो. सगुणी आणि गोविंदा ह्यांनीं मालोजीचा हात धरिला आहे, त्याचे डोळ्यांत प्रेमानें आसवें आलीं आहेत, तीं तीं उभयतां पुसतात.)

---

## प्रवेश १२,

### मालोजी, सगुणी, यमुना, चिमणी आणि गोविंदा.

मालोजी— माझे लाडके मुलांनो! काय सुखाचा दिवस आजचा होता! जर पोराचे द्वाड गुण ह्याला विरजण नसते! पण नाहीं; मला त्याचा खेद होऊंनये. ईश्वरानें मला तूं हा एक दुसरा लेंक दिला आहे. माझ्या गुणाच्या गोविंदा, तूं पोटचा नाहींस खरा, पण तुझा

थोरपणा पाहून माझे मनानें तुला पोटच्याहून अधिक केलें आहे. होय, तूंच माझा लेंक.— चांगू कोठें आहे तो? जा त्याला मजकडे असाच घेऊन ये. ( गोविंदा बाहेर जातो. )

सगुणी— त्याला मी चार घटका झाल्या कोठें पाहात नाहीं. किनऱ्या वाजवूं लागला तेव्हांचा तो त्याची बर्फी घेऊन नाहींसा झाला आहे.

गोविंदा— ( मागें येतो ) तो जवळचे मिठाईवाल्याचे दुकानाकडे जातांना पाहिला. मी गोपाळ्याला पाठविलें आहे त्याला बोलवावयाकरितां.

मालोजी— मुलांनो, माझे खोलींत जाऊन बसा, तो आला ह्मणजे मला काय उत्तर करितो तें पाहूंद्या. तुमचे साक्षीचें काम पडेल तेव्हां मी तुह्मांस बाहेर हाक मारीन.

रुक्मिणी आणि यमुना— तर आतां आपण निरोप घेऊं या.

मालोजी— नाहीं, माझे आवडत्यांनो! आज तुह्मी आमचे एथेंच राहा; मी तुमचे बाबास आणि बयेस सांगून पाठवितों; आतां दौलतसिंग आणि त्याचा बाप, मला वाटतें कीं, एथें येतील, आपण त्यांस मेजवानी करूं; चांग्यानें मला आज मोठे दुःखाचा घाय लाविला, त्यामुळें जी माझी वेदना ती तुमचे संगतीवांचून उणी होणार नाहीं.

सगुणी— ( कानवा घेते ) मला वाटतें चांगू येत आहे.—

( मालोजी खोलीचें दार उघडतो, मुलें आंत जातात.)

## प्रवेश १३.

### मालोजी.

मला फार दिवस भय होतेंच कीं, एकादे दिवशीं कांहीं पोराचें वाईट वर्तमान ऐकूं येईल, तरी हा असा अधमपणा करील हें मला वाटलें नव्हतें. असो, अझून वेळ आहे; उपाय केला असतां त्याचे दुर्गुण टाकवितां येतील.

## प्रवेश १४.

### मालोजी आणि चांगू.

चांगू— बाबा काय आज्ञा आहे?

मालोजी— तूं कोठें गेला होतास? तूं घरीं नव्हतास काय?

चांगू— गुरुजी बाहेर गेले होते; गोविंदा खालीं होता; मी वेळभर वर पढत होतों, तों एकट्याला कंटाळा आला.

मालोजी— तर गोविंदा मुलींसंगातीं खेळावयास गेला तसा तूं कां नाहीं गेलास?

चांगू— मीही गेलों होतों, परंतु त्या मजशीं चांगल्या चालल्या नाहींत.

मालोजी— ह्याचें मला आश्चर्य वाटतें.

चांगू– पहिल्यानें त्यांनीं बर्फी खाल्ली, मला बलाविलें नाहीं; नाहीं तर नाहीं, पण माझा तिरस्कार केला. मुरंबा, कालिंगड, खाल्लें तेंही मला दिलें नाहीं. नंतर गोविंदानें रस्त्यांतला एक हेंदरा किनऱ्याचा पोर आणिला, त्याला शेर दोन शेर त्यांनीं बर्फी दिली, पण मला एक तुकडाही दिला नाहीं. तीं नाचलीं बागडलीं, पण आपले मंडळींत मला घेतना; तेव्हां मी तेथें काय करावें? ह्मणून दरवाज्यांत लोकांची मौज पाहात उभा होतों.

मालोजी– दरवाज्याजवळच होतास? दुसरे कोठें गेला नव्हतास? तर रस्त्याचे नाक्यावर तुजशीं आणि त्या किनरीवाले पोराशीं काय झालें? मला वर्तमान लागलें कीं, त्वां त्याला मारलें, त्याची किनरी फोडली, आणि तो रडत गेला.

चांगू– होय तें खरें बाबा, आणि दुसरा कोणी असता तर शिपाई आणून त्याला चौकींत नेता. ऐक बाबा, मी त्याला बाहेर निघतांना पाहिलें, तेव्हां मी आपल्या मनांत ह्मटलें कीं, आपण ह्या गरिबास कांहीं द्यावें, कांकीं मला ठाऊक होतें कीं, गोविंदापाशीं कांहीं नाहीं, आणि एवढीशी बर्फी ह्याचे श्रमाप्रमाणें फार थोडी देणगी आहे, असा विचार करून मी आपले पिशवींतून कांहीं पैसे काढिले, ते मी त्याला दिले, ते बांधावयाकरितां त्यानें रुमाल काढिला. तो

पाहातों तों माझे ताईचा, हा पाहा प्रत्यक्ष. मी त्याला सामोपचारानें सांगितलें कीं, तो मला परत कर; तो मशीं शिवीगाळीवर आला, रुमाल देईना. तेव्हां मला राग येऊन मी त्याची गचोंडी धरिली, आणि माझी त्याची धक्काबुकी होतांना न समजून माझा पाय त्याचे किनरीवर पडला.

मालोजी– (क्रोधास चढून) चुप् राहा, लुच्चा! माझ्यानें तुझें ऐकवत नाहीं.

चांगू– ( त्याजवळ येऊन त्याचा हात धरावयास जातो, ) कां बाबा! माझे जिवलगा बाबा, तुला एवढा राग कां आला?

मालोजी– ( त्याचा हात झटकावतो, ) जा दुष्टा, मला तोंड दाखवूं नको! त्वां मला लाज आणिली. (तो मुलांस खोलींतून बाहेर बोलावितो. )

---

## प्रवेश १५,

### मालोजी, सगुणी, यमुना, चिमणा, चांगू आणि गोविंदा.

मालोजी– माझे मुलांनो, इकडेया. जीं माझे ममतेस योग्य त्यांवांचून मी दुसऱ्याचें तोंड पाहाणार नाहीं. चांग्या, तूं काळें कर, पुनः माझे दृष्टीस पडलास तर चिरीन; पण, थांब, पहिल्यानें तूं आपलें पारिपत्य माझे मुखानें ऐक, मग जा. ( सगुणी आणि गोविंदा ह्यांस ) तुह्यांविषयीं काय हा बोलला तें तुह्मी ऐ-

किलेंच असेल.

सगुणी– होय, बाबा, आणि जर आमचा चोखपणा दाखवावयाचें प्रयोजन नसतें, तर बाबा, तूं अधिक संतापशील ह्मणून तुजपाशीं आह्मी कांहीं सांगतोंना.

चांगू– बाबा, तिचें तूं एक, खरें मानूंनको.

मालोजी– (डोळे वटारून) उगीच ऐस! तूं लबाड आहेस ह्याविषयीं माझी अगोदरच खातरी झाली आहे. चोरी, खून, हे लबाडीचे परिणाम. त्यांतून चोरी तर त्वां केलीच. अंमळ अंगांत शक्ति आली ह्मणजे कोणाचा जीवही घेशील, ह्यांत कांहीं संशय नाहीं. होऊंदे, सगुणे.

सगुणी– प्रथम, तर आज दोन प्रहरांपासून त्यानें कांहीं एक काम केलें नाहीं. ह्यास भाषांतर गोविंदानेंकरून दिलें.

मालोजी– हें खरें गोविंदा?

गोविंदा– माझ्यानें नाहीं ह्मणवत नाहीं.

सगुणी– नंतर ह्यानें मुरंब्याचे रसाची वाटी यमुनेचे साडीवर सांडिली; आणि आह्मी ती धुऊन काढावयाचे खटपटींत, असतां ह्यानें मुरंब्याची बरणी रिकामी केली; आह्मांला एक तुकडाही राहूं दिला नाहीं.– नंतर बर्फीचें काय झालें तें (यमुना आणि चिमणी ह्यांजकडे हात करितें.) ह्या सांगतील.

मालोजी– आतां पुरे. (चांगू कडे पाहातो.) तुझी लुच्चाई सगळी माझे ध्यानांत आहे. जा आतां, रात्रीचा आपले खोलींत जाऊन बैस; उद्यां सकाळीं मी तुला

घराबाहेर हांकून देईन. त्यांत तूं ठिकाणीं आलास तर बरें झालें; नाहीं तर मग दुसरे पुष्कळ उपाय आहेत. तुझेसारिखीं द्वाड पोरें लोकांस उपद्रव करितील त्यांस ह्मणतोस काय उपाय नाहींत? गोविंदा, गोपाळ्यास सांग कीं, हा आपले खोलींत असतो कीं नाहीं, तें मला येऊन सांग. आणखी सांग कीं तुमचा गुरु बाहेरून आला ह्मणजे त्याला मजकडे पाठीव.

सगुणी आणि गोविंदा– (चांगूसाठीं रदबदली करितात,) माझे बाबा! माझे मामा! आह्मांकडे पाहून त्याला इतका अन्याय क्षमा कर.

मालोजी– मी त्याविषयीं एक शब्द कोणाचाही ऐकणार नाहीं. जो गरिबानें आपले कष्टानें जोडलेलें त्याजवर बलात्कार करून घेतो, त्याचें पोट भरावयाचें साधन फोडितो, आणि मातक्यानें आपण केलें तें नीट केलें ह्मणून बोलून दाखवितो, असा प्राणी ह्या सृष्टींत ठेवूंनये. मी ईश्वराचा मोठा उपकार मानितों कीं अझून तुह्मांसारिखीं दोन मुलें मजजवळ आहेत. ह्यापुढें मी तुमचे सुखानें सुखी असेन. त्या द्वाड पोराचें मला दर्शन नको.

(सर्व निघून जातात.)

---

## मैना

मैना घ्याहो मैना! कोणाला मैना पाहिजेत? आहा!

काय चांगल्या मैना आहेत ! असें बोलत एक मनुष्य यमनीचे दारावरून चालला होता. यमनी तें ऐकून दारीं गेली, आणि पाहाते तंव एक पांखरेंविक्या डोईवर मैनांचा पिंजरा घेऊन चालला आहे; त्या आंत उड्या मारीत आहेत, ह्या काठीवरून त्या काठीवर बसत आहेत, आणि मधुर मधुर शब्द करीत आहेत; तेणेंकरून यमनी मोहित होऊन, केव्हां त्याजवळ जाईन अशा उत्कंठेनें धांवली. तें थोडक्यांत चुकलें, नाहीं तर ती जोत्यावरून पडलीच असती. मुली, तुला मैना पाहिजेत? असें पांखरें विक्यानें तिला पुशिलें. ती ह्मणाली, पाहिजेत, पण थांब अंमळ, मी आंतून बाबाला पुसून येतें. त्यानें, बरें ह्मणून, पिंजरा ओसरीवर ठेविला. यमनी धांवत धांवत बापाकडे जाऊन ह्मणते, बाबा! बाबा! लवकर ये!

**त्र्यंबकशेटी**— एवढी घाई कसूची आहे, यमने?

**यमनी**— बाबा, ओटीवर एक पांखरेंविक्या आला आहे, त्याजवळ मैना पुष्कळ आहेत, आणि त्या फार चांगल्या आहेत.

**त्र्यंबकशेटी**— मग, ह्याचा तुला इतका हर्ष कसूचा झाला?

**यमनी**— बाबा, जर तूं सांगशील तर, मी त्यांतली एक मैना विकत घेईन.

**त्र्यंबकशेटी**— विकत घ्यावयास तुझ्याजवळ पैसे आहेत काय?

**यमनी**— हो, आहेत हे माझ्या पिशवींत.

**त्र्यंबकशेटी**— पण त्या पांखराला चारा कोण घालील?

यमनी– मी, बाबा मी, मी आपल्या हातीं चारीन, आणि तूं पाहाशील कीं, ती माझी ह्मणवावयास फार खुशी होईल.

त्र्यंबकशेटी– होय, पण मला तुझें भय वाटतें.

यमनी– कसूचें, बाबा?

त्र्यंबक०– कीं तूं तिला भुकेनें किंवा ताहानेनें एकादे दिवशीं मारशील.

यमनी– मी तिला भुकेनें किंवा ताहानेनें मारीन! तें कधीं होणार नाहीं. पहिल्यानें तिला खाऊं घातल्या शिवाय मी अन्नाला शिवणारही नाहीं.

त्र्यंबक०– मुली, तूं गयाळ आहेस, एकादे दिवशीं तरी तुला विसर पडेल.

यमनीनें बापापाशीं मैनेस पाळावयाचा असा करार करून, आणि त्याचा पदर धरून अशी कांहीं आळ घेतली, कीं शेवटीं त्यानें मैना घेऊन देतों असें ह्मटलें. आणि तिला घेऊन ओटीवर आला; आणि चांगले रंगाची एक सुंदर मैना निवडून काढिली. मग यमनीचा हर्ष त्रैलोक्यांत माईना! तिनें पांखरेंविक्यास पैसे द्यावयाकरितां आपली पिशवी झटकन बापाकडे केली, तींतील पैसे पांखरें विक्यास देऊन त्र्यंबकशेटीनें आपल्या जवळचे पैशांचा एक चांगला तारांचा पिंजरा आणविला, ज्याला खालीं खण होते, आणि ज्यांत पाणी घालावयाचें बिलोरी भांडें होतें. मग यमनी मैनेस पिंजऱ्यांत घालून घरभर फिरून आईस, बहिणीस, आ-

णि चाकरांस हाका मारमारून दाखवूं लागली. कोणी इष्ट मित्र मुलें तिला भेटावयास येत, त्यांजकडेही तिची पहिली गोष्ट मैनेची. आणि ती सांगे कीं, माझे मैनेसारिखी मैना त्रैलोक्यांत नाहीं. तिचे पांखांचा रंग काय! पिसें किती मऊ! बोल काय गोड! चल मी ती तुला दाखवितें. तिचें नांव मी छबेली ठेविलें आहे. ती मैना यमनीपाशीं फार सुख पावली. यमनी पाहांटेस उठली ह्मणजे तिचें पहिलें काम हें कीं मैनेस ताजे दाणे आणि निर्मळ पाणी द्यावें; मग तिनें तोंड धुवावें. पोळी तुकडा घरांत झाला असेल तो पहिल्यानें मैनेकडे यावा. कांहीं गोड गोड तिनें मैनेसाठीं करून वरणींत घालून ठेविलेंच असे. तिचे पिंजऱ्यावर नित्य हिरवा पाला लावी, कीं तिला उन्हाचा उपद्रव होऊंनपावे. छबेलीही ते तिचे उपकार जाणे. ती लवकरच यमनीस ओळखूं लागली. यमनीचे पाय वाजले ह्मणजे तिनें पांख उडवावे; शब्द करावे. यमनी मुके घेऊन तिचा अर्धा जीव करी. आठ दिवस झाले नाहींत तंव ती मैना गावयास शिकली, आणि मधुर स्वर काढूं लागली. एकादे वेळेस तिनें टिपेचा सूर फार लांबवावा, तेव्हां असें वाटावें कीं, हिचा श्वास जाऊन ही मरेल. तिनें मोठे सुरानें गावें, तेवेळीं सगळ्या घरचे मनुष्यांचा आत्मा प्रसन्न व्हावा. यमनी तिचे शब्द ऐकत चार चार घटिका तिच्या पिंजऱ्याजवळ बसे. कोणे वेळेस तिला पाहात असतां यमनीनें हातांतलें काम विसरावें. यमनी तिला नित्य प्रहर प्रहर

गावयास शिकवी. असें तिला त्या पांखराचें वेड लागलें. असें चाललें असतां एके दिवशीं बापानें तिला चित्रांची वह्री दिली; तीं चित्रें फार सुंदर होतीं, त्यांकडे तिचें चित्त वेधलें. मग ती त्यांस नित्य पाहात बसे, तेव्हांपासून तिला मैनेविषयीं अंमळ विसर पडत चालला. मग तीस मैना साद घाली, तो तिनें ऐकूं नये. शेवटीं असें झालें कीं मैनेस हिरव्या शेंगा किंवा भाकर जी नित्य मिळत असे ती आठ दिवसांत मिळाली नाहीं. ती यमनीनें शिकविलेलीं गोड गोड रागिणीवर गाणीं ह्मणे, परंतु व्यर्थ. यमनीचा वाढदिवस आला तेव्हां बापानें तीस एक बाहुली दिली, ती मिळाल्यापासून तर यमनी मैनेस अगदींच विसरली. त्या बाहुलीचें नांव तिनें आवडी ठेविलें. तिला नेसविण्याखालीं, शृंगारण्याखालीं, तिच्या संगतीं बोलण्याखालीं, आणि तिला हातीं घेऊन इकडे तिकडे नाचविण्याखालीं, सकाळपासून संध्याकाळपर्यंत यमनीचा सगळा वेळ जाई. मग कोठें संध्याकाळीं इवलेंसें खाणें मैनेस मिळे. एखादे दिवशीं तिला अगदींच उपास पडे. एके दिवशीं त्र्यंबकशेटीची दृष्टि पिंजऱ्याकडे गेली, आणि पाहातो तों मैना आंत उपडी पडली आहे; तिचीं पिसें विखुरलीं आहेत; मान पाय आंखडून गोळा झाला आहे. किंचित् धुकधुकी मात्र राहिली होती; श्वास घ्यावयासही शक्ति नव्हती. तें पाहून तो ह्मणतो, “यमने, अगे ह्या तुझे मैनेस काय झालें?” तें ऐकून तिचें तोंड खरकन उतरलें. ती ह्मणाली, “नाहीं बाबा,

कसें झालें तें कोण जाणे, मला हिचा अगदींच विसर पडला. " असें ह्मणून ती घाबरून कांपत कांपत दाण्यांचा करंडा आणावयास घरांत धांवत गेली. त्र्यंबकशेटीनें पिंजरा खालीं काढला, आणि पाहातो तों दाण्यांच्या खणांत व पाण्याच्या पेल्यांत कांहीं नाहीं. मग ह्मणतो. " अरेरे ! ह्यांत धान्याचा एक दाणाही नाहीं ! पेल्यांत पाण्याचा एक थेंबही नाहीं ! हायरे बिचाऱ्या पक्ष्या ! अरे, तूं निर्दयाचे हातीं कसारे सांपडलास ! मला हें असें जर पुढचें समजतें तर मी तुला विकतच घेतलें नसतें. " घरांतील माणसें त्या पिंजऱ्याजवळ येऊन ह्मणूं लागलीं, " आहा ! गरीब बिचारी मैना ! गरीबेंर गरीब ! " मग त्र्यंबकशेटीनें कांहीं दाणे घातले, आणि निर्मळ पाणी पेल्यांत ओतलें. त्याला, त्या मैनेस सावध करावयास, मोठा प्रयास पडला. यमनी तोंड लपवून तेथून निघाली, ती आपल्या खोलींत जाऊन रडत बसली. तिनें रडून रडून आसवांनीं ओंचे सगळे ओले केले. दुसरे दिवशीं त्र्यंबकशेटीनें विचार केला कीं, ही मैना आपल्या शेजाऱ्याचा मुलगा मोरू आहे त्यास बक्षीस द्यावी; तो यमनीपेक्षां शंभरवांट्यांनीं हिचें पाळण पोषण चांगलें करील असा आहे. तें ऐकून यमनीनें मोठा अनर्थ मांडिला. मोठमोठ्यानें हेल काढून रडूं लागली, आणि दुःखाचे उद्गार टाकून ह्मणते, " अरे माझ्या पांखरा ! माझे छबेले मैने ! बाबा, मी तुझ्या पायां पडतें ! एकवेळ मला क्षमा कर, आणि ही मैना मजपाशीं असूं-

दे. आजपासून मी जीवंत आहें तोंपर्यंत कधीं हिला विसरणार नाहीं." त्र्यंबकशेटीस तिची दया आली, आणि त्यानें पुनः ती मैना तीस दिली; आणि तीस फार बजावून सांगितलें कीं, "पुढें असें झाल्यास क्षमा होणार नाहीं. तूं विचार कर कीं,ह्या बिचाऱ्या पांखरास आपण बंदिशाळेंत टाकल्यावर, ह्यानें आपल्या पोटास दाणा कसा मिळवावा. तुला भूक लागेल तेव्हां खावयास मागतां येतें, पण छबेलीस भूक लागली असतां तें आपले भाषेनें तिनें लोकांस कसें समजवावें? जर आतां कधीं तूं हीस उपाशीं किंवा तान्हेली ठेवशील तर मी—" ते शब्द ऐकून यमनीचे डोळ्यांस पाण्याचें भरतें आलें. तिनें बापास वेंग मारिली, पण खेदानें तिला एक शब्द बोलवला नाहीं. मग यमनी पुनः छबेलीशीं खेळूं लागली. पुढें एक महिना गेल्यावर त्र्यंबकशेटी बायकोस घेऊन कांहीं कामाकरितां दुसरे गांवीं जाऊं लागला; तेवेळीं यमनीस ह्मणाला, "यमने, छबेलीस संभाळहो." तीं उभयतां गाडींत बसून निघालीं नाहींत तंव, यमनी धांवत पिंजऱ्याजवळ गेली, आणि तिनें मैनेस दाण्यापाण्याची बेगमी केली. कांहींका घटकांनीं तिला कर्मेनासें झालें. तेव्हां ती सोबतिणींस बलावून त्यांबरोबर बाहेर फिरावयास गेली; संध्याकाळीं आपालिपा खेळली, नंतर तिनें फुगडी घातली; असें करितां मोठी रात्र झाली, तेव्हां तिचा खेळ संपला. नंतर ती थकली आणि निजावयास गेली; दुसरे दिवशीं ती उजेडतां उठली; तिचें

ध्यानमन सगळें खेळाकडे; ह्मणून ती तशीच शेजारवरीं वाराणसी आणि बजी ह्यांजकडे गेली. इकडे छबेलीस उपास पडला. असा दुसरा दिवसही तिचा खेळतांना गेला. छबेलीची आठवणही तीस झाली नाहीं. तिसरे दिवशींही तसेंच झालें. चौथ्या दिवशीं त्र्यंबकशेटी गांवाहून परत आला; तो त्या दिवशीं परत येणार हें यमनीच्या लक्षांत राहिलें नव्हतें. त्र्यंबकशेटीनें येतांच यमनीचा मुका घेऊन आधीं छबेलीचें वर्तमान पुसलें. यमनी अंमळ घाबरून ह्मणाली, ती बरी आहे, बाबा, आणि तेव्हांच पाणी घेऊन ती पिंजऱ्याकडे धांवली; पाहाते तों आंत मैना चोंच वासून. पांख पसरून, उलथी पडली आहे. तिचें प्रेत पाहून यमनीनें मोठ्यानें किंकाळी फोडिली, ती ऐकून घरांतील सर्व मनुष्यें धांवलीं. तेव्हां पक्ष्याची ती दशा पाहून त्र्यंबकशेटी ह्मणाला, "आहारे पक्ष्या! काय दुःखाचें हें मरण तुला आलें! जातेवेळेस मीच तुझी मान मुरगाळून गेलों असतों तर ह्यापेक्षां ती व्यथा तुला सुसह होती. हायहाय! भुकेनें आणि ताहानेनें व्याकूळ होऊन किती दुःखानें तुझा प्राण गेला असेल! असो, तूं दैवाचा, कीं असले निर्दय पोरीचे हातून तरी सुटलास" तेसमयीं यमनीस असें झालें कीं द्माय धरणी ठाय. जर त्यावेळेस धरणी फाटती तर यमनी आंत उडी टाकिती.

त्र्यंबकशेटीनें त्या मैनेचे पोटांत पेंढा भरून तीस कडीपाटास टांगून ठेविलें. तिजकडे यमनीच्यानें पाहावेना

जेव्हां जेव्हां तिजवर तिची दृष्टि जाई, तेव्हां तेव्हां तिचे डोळे आसवांनीं भरून येत. ती बापास नित्य विनवी कीं, बाबा, ती मैना माझे दृष्टीवेगळी काढ. तो ह्मणे, नाहीं. नंतर किती एक दिवस तिची प्रार्थना ऐकून त्यानें तो पक्षी तेथून काढिला. मग जेव्हां केव्हां यमनी कांहीं सांगितलेलें काम जपून करीत नसे, तेव्हां त्र्यंबकशेटीनें ती मैना पुनः तेथें टांगावी; आणि सर्वांनीं ह्मणावें, आहागे बिचारे छबेले! ह्या यमनीनें तुला कसेंगे हाल करून मारिलें! ह्मणजे यमनीस मोठा पश्चात्ताप होऊन तिनें आईबापांचे आज्ञेत चालावें.

---

## मुलें जीं स्वतंत्र व्हावयास इच्छितात.

काशू— आहा बाबा! मला वाटतें कीं मी मोठा असतों तर बरें होतें. पण मोठा तुझ्या इतका.

आबाजी— माझे लाडक्या, तुला असें कां वाटतें?

काशू— एवढ्या साठीं कीं मग मला कोणाचे आज्ञेंत राहावें नलगे; माझे मनास येईल तें मी करीन.

आबाजी— मला वाटतें कीं मग तूं मोठे चमत्कार करशील.

काशू— ह्यांत काय संशय? तसें झाल्यास मी दाखवीन.

आबाजी— आणि जाई? तुला पण स्वतंत्र व्हावेंसें वाटतेंगे?

जाई— होय, बाबा, मलाही तसेंच वाटतें.

कामू– आहा! जर आह्मी दोघें स्वतंत्र झालों तर मग काय पाहिजे?

आबाजी– बरें तर, मुलांनो, हें तुमचें कोड मी पुरवीन. उद्यां सकाळापासून तुह्मांस मोकळीक देतों, कीं जें तुमचे मनास येईल तें तुह्मी करा.

कामू– बाबा, तूं थट्टा करितोस.

आबाजी– नाहीं, मी खरेंच ह्मणतों. उद्यां तुमची आई मी, किंवा दुसरीं कोणी घरांतील मनुष्यें, तुह्मांस कांहीं आडकाठी करणार नाहींत.

कामू– आहाहा! तशीं झालों असतां आह्मी किती सुखी होऊं!

आबाजी– मुलांनो, तितकेंच नव्हे, मी ती मोकळीक उद्यांचेच दिवसापुरती देतों असें नाहीं; जंव तुह्मी होऊन माझे पाठीस लागाल कीं, "नको बाबा, आतां तुझा अधिकार तूं फिरून घे," तंवपर्यंत देईन.

कामू– आहा! असें झालें तर मग आह्मी फार दिवस स्वच्छंद वागूं.

आबाजी– बरें तर, तुह्मी आपलीं आपणास संभाळतीं झालां हें पाहून मला संतोष वाटला; तर आतां उद्यांपासून तुह्मीं मोठीं मनुष्यें व्हावयास सिद्ध व्हावें; आणि मनास येईल तें करावें.

असें बोलणें होऊन तीं मुलें निजावयास गेलीं. दुसरा दिवस उगवला, तंव तीं उजाडतां उठावीं तीं प्रहर

दिवस येईपर्यंत आंथरुणावरच होतीं. अधिक वेळ निजतात त्यांचें अंग जड होतें, कांहीं सुचत नाहीं, तसें कामूस आणि जाईस झालें. शेवटीं कोणी हाक नमारितां तीं आपले आपण कावरीं बावरीं झालेलीं उठलीं. मग त्यांचे मनांत आलें कीं, आपण सगळा दिवस हावेंतें करूं, तेणेंकरून त्यांचे जिवास अंमळ संतोष वाटला. मग कामू जाईस ह्मणतो, ताई, आपलीं जेवणें झाल्यावर आपण पहिल्यानें आज काय करावें बरें?

**जाई**— कां? खेळावें.

**कामू**— काय खेळावें?

**जाई**— आपण गंजिफांनीं खेळूं.

**कामू**— तो खेळ हिडीस, मला आवडत नाहीं, गडे.

**जाई**— बरें तर, आपालिपा खेळूं.

**कामू**— काय आपण दोघेंच?

**जाई**— तर विटी दांडू, नाहीं तर सुपाऱ्यांनीं.

**कामू**— मला असले खेळ आवडत नाहींत.

**जाई**— बरें तर, तुझे आवडीचे कोणते असतील ते सांग.

**कामू**— गडे, आपण काठीचा घोडा करून खेळूं.

**जाई**— आहारे! लहान मुलींस तो खेळ काय शोभेल!

**कामू**— तो नाहीं तर घोडा खेळूं. तूं घोडा हो, आणि मी हांकणारा होतों.

**जाई**— होय तर; चाबूक मारावयाला! ते दिवशींची मला अझून आठवण आहे.

**कामू**— तें मी काय दाटून करितोंगे? तूं उडत चालत

नाहींस ह्मणून मारावयाचें पडतें.

जाई–होय, पण मला लागतें, ह्मणून मी तसला खेळ खेळत नाहीं.

कामू– नाहीं, नाहीं, नाहींसना तूं खेळत? बरें तर, ससाकुतरा खेळशील? मी पारधी होतों, आणि तूं ससा हो. चल, धांवूं लाग, मी पाठीस लागतों.

जाई– छत्! मला तुझी पारध नकोती. माझे पाठीस लागून तूं मला घाबरें करणार.

कामू– तुला माझा कोणताही खेळ आवडत नाहीं; तर मी तुशीं कधीं खेळणार नाहीं, ऐकिलें?

जाई– मीही तुशीं कधीं खेळणार नाहीं; हेंपण ऐकिलें?

असें बोलून तीं दोघें दोहों कोंपऱ्यांस रुसून उभीं राहिलीं. तीं तशींच तेथें फार वेळ होतीं; एकमेकांशीं बोलतना; कीं एकमेकांकडे पाहतना; तों इतक्यांत दाहा घटिका दिवस आला. मग दोन प्रहर लवकरच भरतील ह्मणून कामू बहिणीजवळ येऊन ह्मणतो, बरें तर, तुला जें आवडतें तेंच मी करीन. चला आपण सुपाऱ्यांनीं खेळूं; एकेक डावास बाराबारा सुपाऱ्यांचा पण.

जाई– पण मजजवळ सुपाऱ्या नाहींत. तूं मला पन्नास सुपाऱ्या देणें आहेत, त्या माझ्या पहिल्यानें दे, ह्मणजे खेळावयास येतें.

कामू– होय, पण त्या मी कालचे दिवशीं देणें होत्या; आजच्या नव्हत.

जाई– असें! तर त्या देण्यापासून तूं सुटलासका?

कामू– जे स्वतंत्र आहेत ते कोणाचें कांहीं लागत नाहींत.

जाई– बरें तर, ही तुझी ठकविद्या मी बाबास सांगेन.

कामू– पण आतां मजवर बाबाची सत्ता नाहीं.

जाई– असें आहे तर मी तुशीं खेळत नाहीं.

कामू– तुझी इच्छा.

मातक्यानें तीं एकमेकांवर चडफडून दोघें दोहीं कोनांस गेलीं. कांहीं वेळ जाऊन कामू शेऊळ घालूं लागला; जाई गाऊं लागली; तो कुरकुरूं लागला; ती श्वास टाकूं लागली. एक तास पुनः गेला, आणि दोन प्रहर होत आले. पुढें कामूनें रागानें आपली छडी खिडकींतून बाहेर झोंकिली, जाईनें आपली बाहुली कोनांत आदळली. तीं एकमेकांकडे पाहात, पण काय बोलावें तें सुचेना. शेवटीं जाई बोलली, चल, कामू, मी तुझा घोडा होतें.

कामू– आतां ठीक, बरें, घोड्याला लगाम पाहिजे. मजकडे लांब दोरी आहे, ही पाहा. ही तूं आपले तोंडांत घाल.

जाई– मी ती तोंडांत नाहीं घालणार. माझे कमरेस बांध, नाहीं तर दंडास.

कामू– हें तूं वेड्यासारिखें काय बोलतेसगे? घोड्यास तोंडावांचून दुसरे कोठें का कोणी लगाम देतें?

जाई– पण मी कांहीं खरा घोडा नव्हें.

कामू– तरी पण आपणास घोडा असें मानून तुला तसें केलें पाहिजे.

जाई— त्याचें कांहीं कारण दिसत नाहीं.

कामू— जो मी अष्टौप्रहर घोडशाळेंत असतों त्या मजपेक्षां काय तूं ह्या कामांत अधिक समजतेस ?

जाई— तूं किती दिवसपर्यंत ती धुळींत मळविली आहे. ती मी तोंडांत नाहींच घालणार.

कामू— तर मी ती तुला दुसरे कोठें घालूं देणार नाहीं; त्यापेक्षां मी तुशीं खेळूंनये हें चांगलें.

जाई— जसें तुला वरें दिसेल तसें.

आतां तीं तिसऱ्यानें रुसलीं, तीं अशीं कीं, मागलेपेक्षां अधिक एकमेकांवर दांत ओंट खाऊं लागलीं. मग कामू छडी फेंकली होती ती आणावयास गेला, तों छडी कोणीं मोडून टाकिली. जाईनें भुईवरून बाहुली हातीं घेतली, तिचीं चिरगुटें फिटलीं आहेत. मग कामू उसासा टाकूं लागला; जाई रडूं लागली; इतक्यांत जेवणाचीं वेळ झाली. आबाजी त्यांस ह्मणावयास गेला कीं, व्हावें असलें तर पानें वाढितों. तो दोघेंही तशीं पाहून बोलतो, मुलांनो तुह्मांस, आज झालें तरी काय? तीं ह्मणालीं कांहीं नाहीं, बाबा, आणि डोळे पुशीत त्याच्या मागें जेवणघरांत गेलीं. त्या दिवशीं जेवायास नानाप्रकाचीं पक्कान्नें केलीं होतीं. तीं जेवावयास बसलीं तेवेळीं त्यांस बाप ह्मणतो, "मुलांनो, तुह्मी हीं पक्कान्नें फार खाऊं नका; ह्यांपासून तुह्मांला उपद्रव होईल; पण तुह्मी स्वतंत्र आहां, त्यापक्षीं तुमच्या इच्छेस येईल तें खा, प्या." असें बापाचे तोंडांतून निघतांच एकानें मोठमोठे लाडवांचे तुक-

डे करून गट्ट केले, दुसऱ्यानें चटण्या सांभारीं ह्यांची धण घेतली. तें पाहून आई, बापाचे कानाशीं लागून ह्मणते, “अहो आतां हीं मुलें दुखण्यास पडतील!” बाप ह्मणाला,“ पडतील तर खरीं, तरी पडूंदे. तसें होईल तरच त्यांची खोड मोडेल, आणि त्यांस समजेल कीं, स्वतंत्रपणापासून मुलांस असें भोगावयाचें पडतें, ह्मणून मी त्यांस अडथळा करीत नाहीं.” दादल्याचा कल पाहून आईही उगीच राहिली. मग तीं मुलें ओ येई तों जेवलीं; जेवून थोडावेळ गेला तंव, कामू जाईस ह्मणतो” चल माझे बरोबर. ” असें ह्मणून तिला तो वाडींत घेऊन गेला. आबाजी हळूच त्यांला नकळतां मागून जाऊन आडोशीं उभा राहिला. त्या वाडींत पाण्याचें एक मोठें टांकें होतें, त्याच्या कांठाशीं चिमणीशी एक नाव होती; कामूस तींत बसावेंसें वाटलें;जाईनें त्यास वारिलें;ती म्हणाली कीं “आपण आंत वसूंनये, बाबा रागें भरेल, ” कामू म्हणाला, “ बसूंनयेकां ? आपण स्वतंत्र आहों हें तूं विसरलीस वाटतें ? ” जाई म्हणाली, “ होयरेहोय खरें. ” मग ती भावाचा हात धरून नावेंत बसली. आबाजी अंमळ त्यांचेजवळ जवळ आला, पण त्यांचे दृष्टीस पडला नाहीं.त्यानें मनांत आणिलें कीं, टांकें उथळ आहे, जरी हीं आंत पडलीं, तरी काढावयास अवघड पडणार नाहीं; ह्मणून तो उगाच मौज पाहात आड उभा राहिला. नाव कांठाशीं बांधलेली होती ती सोडून मधलेकडे ढकलून न्यावी असें त्यांनीं मनांत आणिलें, परंतु ती दोरीनें

बळकट बांधली होती, ती सोडितां येईना; तेव्हां कामू ह्मणतो, "बरें तर, आपणांस आंत बसून फिरणें साधत नाहीं तर नाहीं; पण झोंकवून तरी पाहूंया." असें ह्मणून तो ह्या अंगीं त्या अंगीं तीस झोंकवितो आहे, तों तो कल जाऊन पाण्यांत पडूं लागला; त्यास जाई हातीं धरून सांवरावयास गेली, तंव दोघेंही पाण्यांत पडलीं. तें पाहून आबाजी वाऱ्याचे वेगानें धांवला, आणि पाण्यांत शिरून त्यानें उभयतांस बाहेर काढिलें. तीं अपधाकानें अर्धमेलीं झालीं, त्यांस घरीं आणून शेकलीं संवरलीं तों, अधाशीपणानें खाल्लें होतें तेणेंकरून त्यांचे पोटांत कळा उठूं लागल्या; मस्तक दुखूं लागलें; मूर्छा आली; कंप सुटला; श्वास गुदमुरला. अशा अशा विपत्तींत त्यांचा बाकीचा दिवस गेला. तीं रडतां कुंथतां थकलीं. त्यांस रात्रीस थोडी कांहीं झोंप आली न आली. प्रातःकाळीं आबाजी त्यांस पुसतो, "मुलांनो, तुमचा काय समाचार आहे?" तीं ओंड शब्दानें ह्मणालीं, "समाचार बहुत वाईट आहे, बाबा; रात्रीं आह्मांस स्वस्थ झोंप आली नाहीं. आमचें डोकें पोट अझून दुखत आहे," तो ह्मणाला, "बापड्यांनो, तुमची मला काकळूत वाटते. असो, पण आतां पुनः आजचे दिवशीं तुह्मी आपल्या स्वतंत्रपणाचें काय करणार आहां, तें मला सांगाल? आजही स्वतंत्रपणा तुह्मांकडेसच आहे, ही आठवण आहेना?" तीं ह्मणालीं, "आतां स्वतंत्रपणा पुरे, बाबा." तो ह्मणाला, "असें कां, माझ्या मित्रांनो,

ह्मणतां? कालचे दिवशीं तुह्मींच ह्मणालां होतां ना, दु-सऱ्याच्या आज्ञेंत वागणें हें बहुत खोटें आहे?" कामू ह्मणाला, "आमचे मूर्खपणाचें आह्मांस चांगलें पारिपत्य झालें." जाई ह्मणाली, "आह्मी ह्या गोष्टीची फार दिवस आठवण ठेवूं, बाबा."

**आबाजी**– तर अतःपर तुह्मी स्वतंत्रपणा इच्छीत नाहीं?

**कामू**– नाहीं, बाबा, नाहीं; तूं सांगशील तसें करावें, ह्यांत चांगलें आहे.

**जाई**– त्यांत आमचें बरें होईल.

**आबाजी**– ह्याचा पुरता विचार करा. कांकीं जर म्यां आपला अधिकार पुनः घेतला, तर तुह्मांस सांगतों कीं, मी जें सांगेन तें पहिल्यानें तुह्मांस वाईट वाटलें तरी करावें लागेल.

**कामू**– कांहीं चिंता नाहीं, बाबा, तुला जें बरें दिसेल तें आह्मी करावयास सिद्ध आहों.

**आबाजी**– बरें तर, मजजवळ ही हिरवी भुकी आहे, हिला सोनामुखी ह्मणतात, हिचा स्वाद वाईट आहे, पण ज्यास अजीर्ण होतें त्यास ही बहुत गुणकारी आहे. आतां जर तुह्मी माझें ऐकणार, तर ही भुकी ह्याक्षणीं घ्या. माझें कसें ऐकतां तें पाहूं बरें.

**कामू**– घेतों. बाबा, घेतों.

**जाई**– ती जरी विखासारिखी कडू असली तरी मी घेईन.

आबाजीनें त्यांला तें औषध दिलें. त्यांनीं अगोधर

करीत असत तशीं वेडींवांकडीं तोंडें नकरितां, तें घेऊं आदरिलें. तें अधिक संतोषानें कोण घेतो ह्याविषयीं त्यांचा पण चालला. त्या औषधानें गुण लवकरच आला, आणि तीं बरीं झालीं. त्यानंतर त्यांपासून कधीं अन्याय होई तेव्हां पारिपत्याचा धाक दाखविणें झालें तर, त्यांचीं आईबापें त्यांस ह्मणत कीं आह्मी तुह्मांस स्वतंत्र करूं; त्या शब्दांनीं त्यांस असें भय होई कीं, तुह्मांस बंदिशाळेंत टाकूं असें ह्मटल्यानें तसें भय व्हावयाचें नाहीं.

---

## कांटे झाडें.

ओगलजी नांवाचा कोणी एक गृहस्थ काश्मीरदेशीं राहात असे, तो वैशाखमाशीं, एके दिवशीं सायंकाळीं, आपला मुलगा आन्या ह्यास संगतीं घेऊन, एके लहान डोंगरीवर बसला आहे, आणि तेथून समोर दृष्टीस पडत आहेत ते रमणीय पदार्थ त्यास दाखवीत आहे. तेवेळीं सूर्य अस्तास जात होता, तेव्हां त्यांस असें वाटलें कीं, तो सर्व विश्वाला सोनेरी रंगाचें वस्त्र पांघरवून चालला आहे काय! किंवा हे डोंगर सोन्याचेच आहेत काय! अशा अशा कल्पना करीत ते सुख घेत बसले असतां, तितक्यांत तिकडून एक धनगर आपला कळप चारणीवरून घराकडे वळवून चालला होता; त्यानें सुस्वर गायन केलें, तें त्या बापलेंकांच्या कानीं पडून ते तिकडेच पाहूं लागले. तो चालला होता त्या वाटेनें

दोहों बाजूंनीं कांटें झाडें होतीं, ह्मणून जें मेंढरूं त्या झाडांच्या आंगून जाई त्याची कांहीं तरी लोंकर त्यांवर आडके; तें पाहून आन्यास संताप येऊन तो ह्मणतो, "बाबा, त्या गरिबां मेंढरांची लोंकर तीं झाडें कशीं चोरीत आहेत तें पाहिलेंना? अशीं दुष्ट झाडें देवानें कशास उत्पन्न केलीं? तर सर्व मनुष्यें एकमत होऊन ह्यांचा सृष्टींतून निःपात कां करीत नाहींत? मला वाटतें कीं, पुनः एकवेळ तीं मेंढरें तिकडून गेलीं असतां त्या गरिबांचे आंगावरील पांघरूण सगळें नाहींसें होईल; तर मी अतःपर असें होऊं देणार नाहीं. उद्यां, दिवस उजेडतां कोयता घेऊन येतों, आणि ह्या सर्वां झाडांचा फडशा उडवितों. बाबा, तूंही माझे बरोबर कुऱ्हाड घेऊन ये, ह्मणजे जेवणवेळ झाली नाहीं तों सगळा उद्योग उरकून टाकूं."

**ओगलजी**– मुला, मला तुझे मसलतीचा अंमळ विचार केला पाहिजे; तो होईपर्यंत तूं त्यांजवर उगीच रागें भरूं नको. तूं विचार कर कीं, आश्विनमासीं आपण माणसेंच काय करीत असतों?

**आन्या**– काय करीत असतों, बाबा?

**ओगलजी**– त्वां पाहिलें नाहींका, कीं धनगरलोक मोठमोठाल्या कातऱ्या घेऊन मेंढ्यांची सगळी लोंकर कातरून घेतात? त्यांचे आंगांवर थोडकी देखील ठेवीत नाहींत.

**आन्या**– तें खरें, पण, बाबा, ते ती धडुतें करावयास

ओपितात; आणि ह्या झाडांस तसें कांहीं प्रयोजन नसतां हीं उगीच दुष्टाईनें असें करितात.

ओगलजी– ह्या लोंकरीचा त्या झाडांस काय उपयोग आहे, हें तुला अद्यापि ठाऊक नाहीं; आणि त्यांस उपयोग असो किंवा नसो, पण मला तूं सांग कीं, आपणास पाहिजे एवढ्यासाठींच आपण दुसऱ्याचें घ्यावें हें योग्य कीं काय ?

आन्या– पण, बाबा, त्वांच मला सांगितलें कीं, आश्विनमास आला ह्मणजे ह्यांची लोंकर आपाप गळून पडत असते. तर ती उगीच इकडे तिकडे गळून फुकटावारी जाईल त्यापेक्षां कामीं लागली तर चांगलें कीं नाहीं ?

ओगलजी– तूं खरें ह्मणतोस, ईश्वरानें ह्या पशूंस लोंकरीचें पांघरूण दिलें आहे, तें त्यांपासून आपण माणसें घेतों. नाहीं घेतलें तर आपणांस थंडीचा उपद्रव फार सोसावयाचा पडेल.

आन्या– पण झाडांला पांघरुणाचें कांहीं काम नाहीं, ह्मणून हीं लबाड आहेत; तर आपण योजिलें आहे तें केल्यावांचून ह्यांस सोडूंनये. उद्यां मी हीं सगळीं कापून टाकणार; तूं माझ्या बरोबर येहो.

ओगलजी– खरोखर येईन, पण आतां तर घरीं जाऊं, चला; उद्यांचें उद्यां.

हीं चोरटीं झाडें आपण एकला तोडून टाकीन अशा कल्पनेनें आन्याचे अंगांत आवेश चढला, त्यामुळें

त्याला रात्रभर नीज आली नाहीं. दुसरे दिवशीं पराक्रम करावयाचा तो त्याच्या ध्यानांत खेळत होता. मोठ्या प्रातःकाळीं पांखरें शब्द करूं लागलीं नाहींत तंव, आन्यानें आपण सिद्ध होऊन बापास उठविलें; तो उठून तयार झाला. मनांतकीं, कांटेझाडांचें व्हावें तें होवो; परंतु प्रातःकाळाची शोभा मुलाचे दृष्टीस पडेल. मग ते उभयतां हातांत आउतें घेऊन चालते झाले. आन्या हौसेनें पुढें पुढें चालूं लागला, त्याला मिळवून घ्यावयास ओगलजीस फार श्रम पडे. ते जंव त्या झाडांजवळ जवळ आले तंव सहस्रावधि लहान लहान पांखरें झाडांकडे येत आहेत, जात आहेत, आणि भोंवतीं भोंवतीं फिरत आहेत, असें त्यांनीं पाहिलें. ओगलजी बोलला, "मुला, हळू हळू! आतां आपण अंमळ झाडें कापावयाची गोष्ट बोलूंनये, आणि ह्या विचारे पांखरांस उपद्रव करूंनये. पहिल्यानें आपण कालचे जागीं बसून पाहूं कीं, हीं पांखरें एथें इतकीं कां झटलीं आहेत." मग ते डोंगरीवर जाऊन बसले, आणि पाहूं लागले तों, अदले दिवशीं झाडांस लोंकर अडकली होती ती ते पक्षी धूम नेत आहेत. काळे, निळे, पिंवळे, हिरवे, चमत्कारिक चमत्कारिक रंगांचे सुंदर, सुस्वर शब्द करणारे, असे पक्षी आले आहेत; आणि त्यांनीं लोंकरीची मोठी लूट मांडिली आहे. तेवेळीं आन्या आश्चर्यानें चकित झाला, आणि बापास विचारितो, "बाबा, हे पक्षी ह्या लोंकरीचें काय करीत असतील बरें?" तो ह्मणाला, "मुला, तुला सम-

जलें कीं, भगवंतास मुंगीची देखील चिंता आहे, तो ज्या प्राण्यास जें पाहिजे तें अनेक युक्तींनीं पोहोंचवितो. आणि सर्वांचें संरक्षण करून त्यांस सुखी ठेवितो. हाच पाहा केवढा चमत्कार ! हे पक्षी पिलांकरितां कोटीं करितात, त्यांस मऊ आंथरूण पाहिजे तें त्यांस ह्या झाडांपासून प्राप्त होतें. ते लोंकर नेऊन ती कोट्यांत आंथरून आपले लहान लहान पिल्यांसहवर्तमान सुख पावतात. असलीं हीं भलीं उदार कांटे झाडें, ज्यांवर तूं काल उगीच रागें भरलास, तीं इतकीं उपयोगीं आहेत, पाहिलेंना ? हीं संपन्नांपाशीं अधिक आहे तें घेऊन गरिबांचें उणें पूर्ण करितात. तर आतां येतोसना ? आपण तीं कापूं?" आन्या ओशाळून ह्मणतो, "ईश्वर मजकडून तसें न करवो." ओगलजी ह्मणतो, "तूं खरें ह्मणतोस मुला, हीं आपली जोड अशा परोपकारास लावितात, त्या अर्थीं ह्यांचें सदा कल्याण असो, आणि हीं निरुपद्रव राहोत, असें इच्छिणें आपणांस योग्य आहे."

## निंबाजी.

पूर्वीं देवनगरामध्यें एक वेडा राहात असे, त्याचें नांव निंबाजी. तो एकावर एक पांच साहा पागोटीं डोईस घालून बाहेर निघे; व कमरेस चार पांच कांबळीं बांधी;

व दोन तीन फाटकीं कांबळीं खांद्यावर घेई. त्याचे बुद्धीस चळ झाला होता, परंतु त्यापासून कोणास उपद्रव होत नसे. त्याला कोणीं फारच कंटाळा आणिला तर मात्र त्यानें पिसाळावें. तो रस्त्यांत चाले त्या वेळेस कितीएक द्वाड पोरें त्याच्या पाठीस लागत, आणि ह्मणत, निंबाजी, अरे निंबाजी, तूं तीं पागोटीं, कांबळीं किती पैशांस देशिलरे? तो बोलला नाहीं ह्मणजे त्याची हुर्‍यो करीत. त्यांत कितीएक दुष्ट मुलें असत, तीं त्यावर दगडही टाकीत. निंबाजी बहुतकरून तें सर्व साही. एकादे वेळेस पिसाळे, आणि धूळ धोंडे मुठी भरून पोरांवर टाकी. एके दिवशीं तो दयारामशेट सावकार ह्याच्या दारावरून चालला आहे, आणि पोरें पाठीमागें लागून गोंगाट करीत आहेत, तें ऐकून दयारामशेट खिडकींतून पाहूंलागला तों, त्याचा मुलगा हरीही त्या मंडळींत होता; तें पाहून खिडकी लावून तो उगाच आंत गेला. जेवणाच्या वेळीं त्यानें हरीस पुसलें, मुला, तो कोण होतारे, ज्याचे मागें लागून तुह्मीं कुई करीत होतां?

हरी– बाबा, तो वेडा निंबाजी, तुला ठाऊक नाहीं?

दयाराम– गरीब बिचारा! तो कशानें वेडा झाला असेल बरें?

हरी– लोक ह्मणतात कीं, त्याचें मोठें वतन होतें, त्या वतनाचा वाद फार दिवस पडला होता, त्यांत तो हरला, तेव्हां पासून त्याचे बुद्धीस चळ झाला आहे.

दयाराम– मुला, त्याचें जेव्हां सर्वस्व गेलें तेव्हां तो

जर तुला ह्मणता कीं, "अगा माझ्या हरी, माझें दैव फुटलें; फार दिवस स्वस्थपणानें जें वतन मी भोगीत होतों, त्यास मी आजच मुकलों; माझें सर्व घरदार वादाचे भरीस पडलें; मला आतां गांवांत राहावयास ठिकाण नाहीं, गांवाबाहेरही नाहीं; कायकरूं, माझे पाशीं एक दमडीही राहिली नाहीं." तर त्यावेळीं तुझ्यानें त्याची थट्टा करवती ?

हरी– भगवान् असें मजपासून न करवे. असा कोण दुष्ट आहे कीं, दुसरा विपत्तींत पडला असतां त्यास हसेल. मी तर असल्याचें साहित्य करीन.

दयाराम– तर काय, तो तेव्हांपेक्षां आज तुला सुखी-सा दिसला ? ज्याचें सर्वस्व जाऊन आणि बुद्धिही गेली !

हरी– बाबा, आजतर त्याची अधिक करुणा यावी.

दयाराम– तर, जो शुद्धीवर असतां तुझ्या दयेस पात्र होता, त्याची अशी दशा झाल्यावर त्वां त्यास आज छळिलें कसें ? आणि त्यावर धोंडे कसे फेंकिले ?

हरी– बाबा, मी चुकलों, माझा अन्याय क्षमा करा.

दयाराम– तुला पश्चात्ताप झाला, त्याअर्थी मी क्षमा केली; परंतु माझ्याच क्षमेनें कार्य होत नाहीं; दुसरे कोणाची क्षमा मागितली पाहिजे.

हरी– मी समजलों तुझा अभिप्राय कीं निंबाजीपाशीं क्ष-मा मागावी ?

दयाराम– निंबाजीपाशीं कां ?

हरी– ह्यासाठीं कीं मी त्याचा अपराध केला.

दयाराम– तें खरें, निबाजी जर शुद्धीवर असता तर त्याची क्षमा तुला पाहिजे होती, परंतु क्षमा ह्मणजे काय हें आज त्याला समजत नाहीं; त्याअर्थी त्याकडे क्षमा मागून व्यर्थ आहे. पण, मुला, तुला वाटतें खरें, कीं ज्याचा आपण अपराध केला असेल त्यापाशीं क्षमा मागावी ?

हरी– तें त्वांच मला शिकविलें आहे, बाबा.

दयाराम– दीनावर दया करावी, अशी कोणाची आज्ञा ती तुला ठाऊक आहे ?

हरी– होय, अशी ही देवाची आज्ञा आहे.

दयाराम– तर त्वां ती मोडिली ह्मणून देव रागें भरला नसेल काय ?

हरी– भरला असेल, बाबा, ह्मणून मी आजरात्रीं त्याची प्रार्थना करीन आणि क्षमा मागेन.

हरीनें रात्रीं तसें केलें, देवापाशीं आपला अपराध सांगून पश्चात्ताप पावून क्षमा मागितली. त्यावर कित्तीएक दिवसपर्यंत तो निबाजीच्या वाटेस गेला नाहीं; आणि दुसरे मुलांसही निवारी. असें असतांही एके दिवशीं निबाजीच्या मागें पोरें लागलीं होतीं, त्यांत तो मिसळला. तो कांहीं त्यास छळावें ह्या बुद्धीनें गेला नाहीं, पण दुसरीं पोरें त्याच्या काय काय खोड्या करितात, ती मौज पाहावयाकरितां गेला. मग पोरांबरोबर हाही निबाजी निबाजी ! हुर्यो ! हुर्यो ! ह्मणून ओरडूं लाग-

ला; असें करितां करितां, सर्वांचा पुढारपणा ह्याकडेस आला; शेवटीं गलबा फारच झाला. तेवेळीं पिसाळून निंबाजीनें पोरांवर दगड टाकिले; त्यांतून एक मोठा दगड हरीच्या गालास चाटून कानास लागला. कान तुटावयाचाच, पण थोडक्यांत चुकलें. मग हरी घरीं आला. कान रक्तबंबाळ झाला आहे, आणि हरी धाये धाये रडतो आहे. त्यास बाप ह्मणतो देवानें तुला ठीक शासन केलें.

हरी— बाबा, पण दुसऱ्या मुलांनीं माझेपेक्षां अधिक त्याच्या खोड्या केल्या; असें असतां, देवानें त्यांस शासन थोडें कां करावें? आणि मलाच अधिक कां?

दयाराम— त्याचें कारण ऐक, मुला, दुसऱ्या मुलांपेक्षां तुला चांगलें समजलें होतें, कीं हें पाप होय. असें समजूनही, त्वां तें केलें, ह्मणून त्यांपेक्षां तुझा अन्याय मोठा, ह्याकरितां जो मूल देवाची किंवा आपले वडिलांची अवज्ञा करून त्यांच्या आज्ञा मोडितो त्यास अधिक पारिपत्य होतें, हें योग्यच होय.

# दाणे टिपणारी पोर.

## नाटक एक अंकी.

### पात्रें.

भीमराव.............. जमीनदार
मिरोबा .............. त्याचा मुलगा
हिराबाई.............. त्याची मुलगी
जनाबाई.............. गरीब बायको
यमनी .............. तिची मुलगी
हरजी .............. जमीनदाराचा चाकर

स्थळ एक शेत नुकतेंच कापलें आहे, त्यांत सजगुऱ्याचे पुष्कळ भारे पडले आहेत. त्या शेताच्या एके बाजूस भीमरावाचा वाडा आहे; दुसरे बाजूस किती एक झोंपड्या व दुसरी गांवढेगांवाची रचना आहे.

---

## प्रवेश १.

### यमनी.

**यमनी**— (दुसरे शेतांतून भरून आणलेली सजगुऱ्याच्या कणसांची टोपली हातांत घेऊन, भीमरावाचे शेतांत एका भाऱ्याजवळ बसली आहे.) चला बरेंच काम झालें. आहा! आज माझे आईस काय आनंद होईल! (टोपलीकडे पाहून समाधान पावते.) त्या

ह्यातान्या कापणी करणान्या बाबानें मला एकदाच टोपली भरून कणसें दिलीं, तो किती भला ह्मणून सांगू! आहाह्हा! मी दिवसभर जरी इकडे तिकडे हिंडतें तरी ह्याचें अर्धेंही मला मिळतेंना. ईश्वर त्याचें बरें करो! आतां मला वाटतें कीं आपण ह्या शेतांतलीं कांहीं कणसें टिपावीं. (ती टोपलींतलीं कणसें दोहों हातीं चेपिते.) हीं अंमळ दडपलीं तर ह्यांत एक दोन ओंजळी दुसरीं मावतील; कांहीं पदरांतही घेतां येतील. (ती उठते, पदराचीं दोन शेवटें एके हातानें धरून एके हातीं जमा केलेलीं कणसें त्यांत घालिते. इतक्यांत दुरून गोंगाट ऐकून ह्मणते,) अरे कर्मा! तो कोण माझे अंगावर येतो आहे? येवो बिचारा, मी कोणाचा अन्याय केला नाहीं.

---

## प्रवेश २,

## यमनी आणि हरजी.

**हरजी**– (तिचा हात धरून,) अगे चोरटे पोरी, म्यां तुला भलें चोरीवर धरिलें!

**यमनी**– काय तुह्मी ह्मणतां, महाराज? मी चोर न्व्हें, साव आहें.

**हरजी**– साव आहेस! तूं साव न्व्हस. (तो तिचे हातांतून टोपली हिसकून घेतो.) तर ह्या टोपलींत हें काय आहे?

**यमनी**– सजगुऱ्यांचीं कणसें, पाहाना ?

**हरजी**– तर हीं कणसें ह्या तुझ्या टोपलींत उत्पन्न झालीं काय ?

**यमनी**– आहा ! असें जर होतें तर मग मला शेतांत इतकी मेहनत घेऊन जमा करावयाचें काम नव्हतें.

**हरजी**– तर हीं चोरीचीं असें अर्थात झालें.

**यमनी**– महाराज, असें ह्मगूं नका. मी उपाशीं मेलें आणि माझी आईही उपाशीं मेली तरी, ह्मणतां ही गोष्ट आमच्या हातून घडणार नाहीं.

**हरजी**– मी शपथ करीन कीं हीं अपाप तुझे टोपलींत येऊन पडलीं नाहींत; पडलीं काय ?

**यमनी**– रेरे ! आपण शपथ घेऊन मला भिववितां; पण माझें ऐकाल तर खरें ? मी त्यासमोरचे शेतांत टिपावयास गेलें होतें, तेथें एक भला ह्मातारा बाबा होता, त्यानें मला टिपतांना पाहिलें; आणि तो ह्मणाला, गरीब बिचारी पोर ! पाहा ती काय श्रम घेत आहे ! मी तिला कांहीं धर्म करीन; तेव्हां, जवळ सजगुऱ्याचे भारे पडले होते त्यांतून दोन ओंजळी कणसें तोडून त्यानें माझ्या टोपलींत टाकिलीं, आणि तो ह्मणाला, जो दीनास देतो त्यास ईश्वर पुष्कळ देईल.

**हरजी**– होय, होय, तें मी समजलों. आमच्या शेतांतून कणसें तोडिलीं तीं तुला पलिकडच्या शेतांत ह्मातारा होता त्यानें दिलीं नव्हे ? आं ?

यमनी– असें नाहीं, तर तुह्मी जाऊन स्वतां त्याला पुसा.

हरजी– मी जाऊन स्वतां त्याला पुसूं! होय! वाट पाहा, मीं तुला एथें धरिलें इतकें मला पुरे.

यमनी– पण, मी सांगतेंकीं मी तुमच्या एकाही भाऱ्यास शिवलें नाहीं. हीं थोडींशीं कणसें माझ्या ओटींतलीं, हीं मात्र एथें टिपलीं आहेत, कांतर मला वाटलें कीं असें केलें असतां त्यांत कांहीं अन्याय होत नाहीं. असें असतां जर तुह्मास वाटत असेल कीं, तसें मी करूंनये, तर तीं परत द्यावयास मी सिद्ध आहें. घ्या हीं तुमचीं तुह्मी.

हरजी– नाहीं, नाहीं, आतां तसें होणार नाहीं. हीं टोपलींतल्यांत घाल, आणि ही टोपली जेथें जाईल तेथें चल. ये माझे बरोबर, आतां, चौकीवर.

यमनी– (भ्याली) काय होहें! असें काय ह्मणतां माझ्या दादा!

हरजी– होय, आतां माझ्या दादा, आं? मी तुला जाऊं दिलें तर तूं ह्याहूनही मला चांगलें ह्मणशील, नाहीं बरें? मी सांगतों तूं निमूट चौकीवर चल, चल लवकर.

यमनी– अहो बाबा! अहो, देवाकडे पाहा, असें करूंनका! तुह्मांस दाखविलें त्याहून अधिक मीं एथून घेतलें नाहीं; खरोखर सांगतें, मी सगळा दिवस घरीं गेलें नाहीं, तर माझी आई मला काय ह्मणेल बरें?

आणि मी चौकींत पडलें असें ऐकेल तर मग ती प्राणच टाकील.

हरजी– मग तर काय मोठा घात होईल! ती मेली तर गांवची पीडा गेली.

यमनी– ( रडूंलागते. ) तुह्मांस जर ठावें असतें कीं, ती किती चांगली आई आहे, आणि आह्मी किती दुर्बळ आहों, तर तुह्मांस करुणाच येती.

हरजी– मी एथें लोकांवर करुणा करावयासाठीं राहिलों नाहीं. माझ्या धन्याचा जे अन्याय करतील, त्यांस पकडून चौकींत घालावयासाठीं राहिलों आहें, कळलें?

यमनी– पण जर माझे सारिख्यानें अन्यायच केला नाहीं, तर?

हरजी– एक, सगळी टोपलीभर दाणा चोरून, आणखी दुसरा, आपला भलेपणा सांगते! काय नवल पाहा! चलचल, चालूं लाग माझ्या बरोबर.

यमनी– अहो बाबा! मजवर दया करा! पाहिजे तर माझी सगळी टोपली घ्या. घेतली तर एवढ्या दाण्यांनीं तुह्मी कांहीं मातबर होणार नाहीं; पण मला जाऊंद्या; मी तुमच्या पायां पडतें; माझ्या आईकडे दृष्ट देऊन तरी मला सोडा. माझे आईची कायती मीच एक आहें.

हरजी– मी तुला सोडिलें तर तुझे आईकरितां सोडणार नाहीं. ती मेली तर माझें काय गेलें. पण, पोरी,

तुझें रडें पाहून दया येते. आतां तूं जा. टोपलीची आशा धरूं नको. न्यायाचे दिवशीं न्यायाधीश तुला थोडें बहुत दंडील तितका दंड मात्र दे; नाहीं तर तूं चौकींत जाशील, अथवा तो तुला गांवाबाहेर हांकून देईल.

---

## प्रवेश २

### यमनी.

यमनी– ( एकटी भुईवर बसते, आणि एके भाऱ्यावर डोकें टेंकून कितीएक पळेंपर्यंत आंतलेआंत रडते. नंतर उठून चोहोंकडे पाहते. ) आहा! तो गेलाच द्वाड मेला! माझीं कणसें, टोपली, सर्व कांहीं घेऊन गेला; आणिखीही माझ्या आईस आणि मला काय करील तें कोण समजे? ( अंमळ विसांवा घेऊन. ) आहाहा! ते पक्षी कितीतरी दैववान्! त्यांस कांहीं दाणे तरी घेऊं देतात. आणि मी– पण कोण जाणे, येथें कोणी मेला द्वाड त्यांवर बंदूक घेऊन टपत नसेल हें कशावरून? मी त्या पांखरांस भेडावून उडवीन, मग मी जाईन; नाहीं तर ह्या भाऱ्यावर डोकें टेंकलें ह्मणून एकादी शिक्षा करूं लागतील. काय करूं. ( कोणी येत आहेत पाहून, ) तीं दोन मुलें येत आहेत; तीं कोण असावीं बरें?

---

## प्रवेश ४,

## मिरोबा, हिराबाई आणि यमनी.

( यमनी डोळे पुसते आहे. )

मिरोबा– अगे, त्वांच काय आमचीं कणसें चोरिलीं ? आणि तुलाच काय आमचे चाकरानें धरिलें ? ( यमनी उसासा टाकिते, तिच्यानें उत्तर देववत नाहीं. )

हिराबाई– ( तिजकडे न्याहाळून पाहाते, आणि भावास एकीकडे सारिते, ) ही मूल मला भली दिसते, मिरू, पाहा ती कशी रडत आहे ! तिला अधिक छळूं नको, मोठें दुःख होईल; आणि आपण इतके थोडेशे कणसांसाठीं असें करूंनये. ( ती तिचे जवळ जाते ) उगी, मुली, उगी, तूं कां रडतेस ?

यमनी– मजवर खोटी आळ घालितात. तुह्मांला वाटत असेल कीं मी अन्याय केला.

मिरोबा– तर काय, त्वां अन्याय केला नाहीं ?

यमनी– नाहीं, हें तुह्मी खरेंच माना. मी त्या शेतांत दाणे टिपावयास गेलें होतें, तेथें एके ह्मातारे बावानें माझे टोपलींत कणसें घातलीं, मग मी ह्या शेतांत आलें कीं भुईवर पडलीं असतील त्यांतून थोडींशीं टिपावीं, तों तुमच्या चाकरानें मला भाऱ्याजवळ उभें पाहून मजवर आळ घेतला; तो माझी टोपली घेऊन गेला; आणि त्यानें मलाही चौकींत नेलें असतें, पण मीं रडून त्याच्या काकुळती केल्या, ह्मणून सुटलें.

हिराबाई— अरेरे! त्यानें मजदेखतां तुला छेडावयाचें होतें, ह्मणजे कसें आहे तें त्यास समजलें असतें! आमचा बाबा भला आहे, गरिबांस दुःख देऊं देत नाहीं, तो येथें असता तर तुला त्यानें तेव्हांच जाऊं दिलें असतें.

मिरोबा— आणि अझून तरी तो तुझी टोपली तुला परत करवील. मी खरेंच सांगतों.

यमनी— (आनंद पावून,) तुला हें खचीत वाटतें, माझे लहानगे धन्या?

हिराबाई— मिरू आणि मी जाऊन त्याची प्रार्थना करितों, तूं स्वस्थ ऐस. देण्याची गोष्ट त्यास सांगितली ह्मणजे त्यास आनंद होतो. तुझी टोपली तर त्याला सांगितल्यावांचून आह्मी आणून देऊं.

यमनी— आहा माझे बये! काय तुह्मी दैववान्! तुह्मांस कोणाची गरज न लागतां तुह्मी उलटें दुसऱ्याचें साहाय्य करितां.

मिरोबा— तर तूं काय फार गरीब आहेस, मुली?

यमनी— येथें येऊन इतका श्रम घेऊन जी भाकरीकरितां दाणे टिपते ती गरीबच असेल, बाबा.

हिराबाई— काय, तूं भाकरीकरितां दाणे टिपतेस? मी समजलें कीं हुरडा भाजून खावयाकरितां. कोणे वेळेस जवळ कोणी नसलें ह्मणजे आह्मी तसें करीत असतों.

यमनी– अगे आई! तसें नव्हे. माझी आई ह्मणाली, कणसें सडून दाणे काढूं, आणि ते दळून त्यांचें पीठ करूं भाकरीकरितां.

हिराबाई– त्यांचे ते दाणे किती निघावयाचे होते? आणि तुमची किती बेगमी होणार होती?

यमनी– एक दोन दिवसांपुरते तर निघाले असते. ते खाऊन दोन दिवस गेले, मग पुढें परमेश्वर आहे.

मिरोबा– बरें तर, मी एक तुला पावली देतों, ह्मणजे तुह्मी एक दिवस अधिक काढाल. ही कोरी ह्मणून मौजेने आपल्याजवळ मी ठेविली होती, ही घे.

यमनी– आहा! इतके पैसे! माझ्यानें हे घेववत नाहींत.

हिराबाई– (हंसते.) इतके पैसे! घे ते, तूं कां भितेस? माझी पिशवी मजजवळ असती तर मींहीं तुला पुष्कळ दिले असते.

मिरोबा– (हातांत पावली धरून तिजकडे करितो.) चल, घे, मुली! (यमनी अंमळ लाजून त्याकडून पावली घेते, आणि त्याला दुवा देते.) इतक्यानें झालें नाहीं, मी आतां कारभाऱ्याकडे धांवत जातों, आणि त्याजकडून घेऊन तुझी टोपली तुला देतों. जर त्यानें दिली नाहीं तर मग त्यास–

यमनी– अगा बाबा! तुह्मी मजकरितां इतके खटपटींत पडूं नका. तुह्मी ह्मणतां कीं मी तुला सहाय होईन, इतकें मला पुष्कळ आहे.

हिराबाई– तूं राहातेस कोठें तें मला सांगशील?

यमनी— गांवाच्या तोंडींच.

मिरोबा— तर आह्मी अगोदर तुला कधीं पाहिलें नाहीं. कापणीचे दिवशीं आह्मी बाबा बरोबर वर्षास येथें येत असतों.

यमनी— गांवांत येऊन आह्मांस नुकतेंच आठ दिवस झाले आहेत. आह्मी एसाऊ ह्मातारीचे घरीं असतों. ती माझे आईवर फार ममता करिते.

हिराबाई— काय, एसाऊ ह्मातारीकडे तुह्मी असतां?

मिरोबा— आह्मी तिला ओळखितों. आमचा बाबा तिला कधीं कधीं बागांत बेणावयाकरितां बोलावीत असतो.

हिराबाई— तूं मला आपले आईपाशीं घेऊन चलशील?

यमनी— तुमचे सारिखीं थोर मनुष्यें आह्मां गरिबांचे घरीं! तर मग आमचें काय भाग्य!

हिराबाई— नाहीं, नाहीं, आमचा बाबा आह्मांस इतकें मोठें मानूं देत नाहीं; तो ह्मणतो कीं जशीं दुसरीं मनुष्यें तशींच आह्मी आहों. पण मी आलें असतां दुसरी तर तुह्मांला कांहीं अडचण नाहीं?

यमनी— कांहीं नाहीं. तुह्मी आलां असतां माझीं कणसें गेलीं आणि डोपली गेली, त्याविषयीं माझे बयेचें समाधान कराल, आणि त्या कारभाऱ्यानें भय घातलें आहे त्याचें—

मिरोबा— त्याचें तूं कांहीं भय धरूंनको. माझी ताई तुझे आईकडे जात आहे, आणि मी धांवत त्यामागें जातों. आणि मला वाटतें कीं,— तुह्मी ह्याठिकाणीं

परत येऊ, नाहीं वरें?

यमनी– जर तुमची मर्जी असली तर.

मिरोबा– तूं परत आली नाहींस तंव तुझी टोपली येथें ठेविलीच आहे असें समज.

यमनी– मी आईसही येथें आणीन. ती तुह्मांला दुवा देईल.

मिराबाई– चल लवकर मजबरोबर (ती यमनीचा हात धरून तिजबरोबर तिचे आईकडे जाते.)

---

## प्रवेश ५

### मिरोबा.

मिरोबा– (एकला) माझी वहीण आणि मी किती सुखी आहों! कीं आह्मांला ह्या मुलीसारिखें दाण्याचीं कणसें मिळवून अणून पोट भरावयाचें पडत नाहीं. मला ह्या मुलीचे मुद्रेवरूनच दिसतें कीं, ही कांहीं हीहून चांगली अवस्था भोगावयास उत्पन्न झाली आहे, ह्यांत कांहीं संशय नाहीं. गांवच्या दुसऱ्या मुली हेंदऱ्या दिसतात तशी ही दिसत नाहीं. बाबा माझें निश्चयें ऐकेल. आहा! बरेंच झालें, हरजीस बरोबर घेऊन तोच येत आहे, आणि टोपली ही येतआहे.

---

## प्रवेश ६

### मिरोबा, भीमराव, आणि हरजी.

मिरोबा– ( बापाकडे धांवत जातो. ) बाबा, बरें झालें तूं आलास. ( हरजीचे हातास झोंबतो ) दे मला ती टोपली.

हरजी– हळू, हळू, रावजी, माझा हात मोडाल.

भीमराव– मिरू, तुला ही टोपली कशास पाहिजे ?

मिरोबा– ही एका गरीब मुलीची ह्या द्वाडानें तिचे कणसांसुद्धां हिसकून घेतली आहे. आतां मी तुला तें सगळें सांगेन, बाबा.

हरजी– असें काय ! कोणी नीटपणें चाकरी करितो आणि चोरास सामील होत नाहीं, तो द्वाड झाला काय! तर मग चांगली गोष्ट आहे! मग देशमूख मला तैनांत कशाला देतात ?

भीमराव– हरजी, मी तुला जेव्हां तेव्हां सांगतों कीं, निरुद्योगी, लुच्चे लोक, शेतावर येऊन उपद्रव करितील त्यांचें निवारण कर; भणंगभिकऱ्यास पकड आणि चौकींत घाल असें सांगितलें नाहीं. कोणी भलीं मनुष्यें दारिद्रानें पिडून माझे संपत्तींतून घांसभर अन्न इच्छितात, किंवा इकडे तिकडे पडलेलीं कणसें टिपतात, त्यांस सर्वथा तुझा उपद्रव नसावा.

हरजी– आपण दाणा काढून आणल्यावर मग व्हावें तितकें कां तीं टिपीतनां; मी कशाला मना करूं. पण अझून सगळा एक भारा तेथें असतां –

मिरोबा— ( थट्टेनें ) दाणा घरीं आणून पुनः शेत नांगरल्यावर असें कां ह्मणेनास ? तेव्हां मग फार टिपावयास सांपडेल खरेंच !

हरजी— रावजी, ह्या कारभारांत तुह्मी समजत नाहीं. तुह्मी उगीच असा. ती चोर नव्हे कशावरून ?

मिरोबा— हांहां ! चोर ! चोर ! तिनें मला सांगितलेंकीं, मीं एक कणीस येथून घेतलें नाहीं. एक ह्मातारा पलिकडचे शेतांत होता त्यानें माझी टोपली कणसांनीं भरून दिली.

हरजी— ही गोष्ट फार चांगली ! तिनें तुह्मांस सांगितलें ! ती केवढी प्रामाणिक ! पण समजलां, मी तिला भाऱ्याजवळ धरिलें आहे, बरें ?

भीमराव— दाण्याचीं कणसें तोंडीत असतां ?

हरजी— तें मी नाहीं ह्मणणार. ती माझ्या अगोदर काय करीत होती तें मला ठाऊक नाहीं, पण पाहा तुह्मी कीं ती ह्मातान्यानें कणसें दिलीं ह्मणून ह्मणते, ती गोष्ट खोटी नव्हे बरें ? आणि तो गांवढेकर तिला इतका धर्म करील हें तुह्मी खरें मानितां ?

मिरोबा— तर, मी ह्मणतों कीं, तीं कणसें तिला ह्मातान्यानें दिलीं, तिनें असें मला निक्षूण सांगितलें. आणि अशी भली मुलगी लबाडी बोलणार नाहीं, ही माझी खातरी आहे.

हरजी— रावसाहेब, खरेंच सांगा बरें. आपण आजपर्यंत कधीं लबाडी बोललां आहां कीं नाहीं ? असें अस-

तो आह्मी तुह्मांस भलेच ह्मणतों.

मिरोबा— बाबा, तुह्मी ऐकतांना, हा हरजी मला कसें टाकून बोलतो आहे तें ? ( हरजीस रागानें. ) मी लबाडी केली असली तर मग मी द्वाड मुलगा खरा. पण मी कधीं केली नाहीं, आणि आज त्या लहाने मुलीनेंही केली नाहीं. तर आतां ह्यांत लबाड कोण तें उघड दिसतें.

भीमराव— मिरू, अंमळ हळू. तुझें भाषण ऐकून माझी खातरी झाली. कोणी चोरींत आढळला नाहीं तोंपर्यंत आपण आपले कडून त्यास साव ह्मणून मानावें. परंतु दुसरा कोणी त्यास चोर ह्मणून मानीत असेल त्यावर रागास येऊंनये. यत्न चालेल तंव नम्रतेनें त्याची खातरी करून द्यावी; आणि तो वास्तविकपणें त्याचें स्वरूप ओळखी असें करावें.

हरजी— तसें नव्हे, रावसाहेब. त्याहून मला हें चांगलें दिसतेंकीं, प्रथम सर्वांस लुच्चे असें मानावें, मग जितका भला ह्मणून प्रत्ययास आला तो भला ! रस्त्यावर बैल पाहिला असतां मी त्यास मारका ह्मणून समजून पलिकडून जातों, तो उपद्रविक असो कीं नसो. आपण चौकस असावें; त्यांत तोटा नाहीं. ज्यांत संशय नाहीं तो मार्ग चांगला.

भीमराव— चांगली गोष्ट ! तुझे सारिखेंच सगळे मानूं लागले तर मग समागम कोणाशीं करावा ? आणि मी तसें करितों तर तुशीं मशीं गांठ कशी पडती ?

मग तुझे सारिख्या ह्मातार्‍याचें चालावें ह्मणून मी तुला ह्या गांवावर विश्वासाची चाकरी कां देतों? तुला शिपायगिरीच्या चाकरीवरून सरकारानें दूर केलें होतें, आणि त्याचें पत्र तुजपाशीं नव्हतें, तितक्यावरच तुला लुच्चा मानून मीं कोतवालाच्या स्वाधीन केलें नसतें?

हरजी— तें खरें, आणि हेंही खरें कीं मी चोर नव्हें.

भीमराव— होयरे, म्या तुला भला असें अनुभविलें, ह्मणूनच तूं अझून माझे चाकरींत टिकला आहेस. पण प्रथम जेव्हां मी तुला ठेविलें तेव्हां तुझें तोंड पाहून आणि वचनावरच ठेविलेंना? तेवेळीं मला दुसरें कांहीं प्रमाण होतें?

मिरोबा— बाबा, जर तूं तोंडावरून आणि शब्दावरून परीक्षा करशील, तर मुलीचें खरें मानिशील. इतकें हरजीचें मानणार नाहींस.

हरजी— आं, रावजी! असें काय! तर माझे तोंडाकडे पाहून बाबाची खातरी झाली आहे, अशी तिजविषयीं होईल तर मग मी हें तुमचें सगळें खरें मानीन.

मिरोबा— हः हः, काय हा जांबुवंत चांगला दिसतो.

भीमराव— छत्, मिरु, असें ह्मणूंनये बरें. पण, हरजी, तूं त्या मुलीस ओळखतोस?

हरजी— होय, रावसाहेब. कांहीं ओळखतों कांहीं नाहीं. आज दाहा दिवस तिला मी तिचे आईबरोबर फिरतांना पाहातों. पण तीं येथें कशीं आलीं, आणि कां आलीं, हें

तुह्मांस गांवचे चौकसनीस आहेत ते नीटपणें सांगतील. मला जर स्वच्छ पुसाल तर ह्मांस गांवांत घेऊन भिकार वाढविलें, हें कांहीं चांगलें केलें नाहीं.

मिरोबा– बरें तर त्याविषयीं जो खर्च पडेल तो मी करीन; होय मी करीन, जा.

हरजी– रावजी, तुह्मांपाशीं स्वपराक्रमाचें कांहीं आहे!

मिरोबा– मजपाशीं नाहीं, पण माझे बाबापाशीं तर पुष्कळ आहे!

हरजी– रावसाहेब, मी खरेंच सांगतों. ह्या मायलेकींविषयीं सगळा गांव कुरकुरत आहे; आणि जर अमलदारांस असें अवदान मारूं दिलें, (आंगठा तर्जनीवर चोळून पैक्याची खूण करितो.) कांकीं माझी खातरी आहे, चौकसनिसांनीं, हो–

मिरोबा– बाबा पाहा तुह्मी! हा चौकसनिसांसही वाईट ह्मणतो. मी त्यांस हें कळवीन.

भीमराव– हळू, मुला. (हरजीस) हरजी, माझ्यामतें तुझी अशी संशयित प्रकृति चांगली नव्हे. तर आतां मलाही तुजविषयीं संशय घेणें प्राप्त आहे, कारण कीं तीस त्वां आपल्या शेतांत भाऱ्याजवळ पाहिलें ह्मणून अटकळितोस कीं तिनें टोपली येथें भरिली; आणि त्या गरिबांस गांवांत वस्तीस येऊं दिलें ह्यावरून कमावीसदारानें लांच घेतला असें ह्मणतोस. बरें तर, आतां मीही ह्मणतों कीं तिजपासून पैसे किंवा तमाखू तुला मिळाला नाहीं ह्मणून त्वां तिची

टोपली आटकाविली; नाहीं तर तिला तूं जाऊं देतास ?

हरजी— रावसाहेब, आपणास वाटतें कीं—

भीमराव— तुला लोकांविषयीं जसें वाटतें तसें लोकांस तुजविषयीं कां वाटूं नये ?

हरजी— बरें, तर, रावसाहेब, आतां आपण कांहींच बोलूं नये. सगळे भिकार येऊन तुमचें शेत, वाडी, गांव लुटून कां नेईना ? माझें काय गेलें. पण आतां मी ही टोपली कोठवाल्यापाशीं नेऊन देऊं ?

मिरोबा— नको नको बाबा, इतकी मजवर दया करा.

भीमराव— हरजी, तुला त्या ह्मातारीच्या घरीं जाऊन तिचे मुलीपाशीं क्षमा मागावयाची पडेल.

हरजी— क्षमा, रावसाहेब, क्षमा ! तुह्मींहि असें ह्मणावें ! काय मी जाऊं आणि क्षमा मागूं ? कशाकरितां ? मी तिचा अन्याय केला असें मला वाटत नाहीं.

मिरोबा— एवढ्यासाठीं, कीं हकनाहक त्वां तिला श्रमांत घातलें, आणि तिजवर चोरीचा आळ घेतला, ह्मणून तुला क्षमा मागणें प्राप्त आहे; समजलास ?

हरजी— आणि टोपलीही दिली नाहीं आणि क्षमाही मागितली नाहीं, तर काय झालें ?

भीमराव— म्यां जर तुला हकनाहक छळिलें तर मला तुजपाशींही क्षमा मागणें प्राप्त आहे. आतां तुला जर लाज वाटत असली तर मी स्वतः टोपली नेतों, आणि तुझ्यावांटची क्षमा मागतों.

हरजी— तर, मिरूरावजी, इतकें काम तुह्मीच करा?

मिरोबा— हो! मी सिद्ध आहें; पण, बाबा, आमची ताई तिचे आईची समजाविशी करावयाकरितां तिजबरोबर गेली आहे, ती तिला घेऊन लवकर परत येणार आहे, मी तिची अंमळ वाट पाहावीं.

हरजी— असें आहे, तर येथें माझें काम नाहीं. (तो पुटपुटत चालता होतो.) आतां ह्या गांवीं इतकें भिकार होईल कीं आह्मांस लवकरच भीक मागत जावयाचें पडेल.

---

## प्रवेश ७.

### भीमराव आणि मिरोबा.

मिरोबा— बाबा, तो काय बोलला तें ऐकिलेंना?

भीमराव— होय, लाडक्या, पण मी त्याचें कांहींच मनांत आणीत नाहीं.

मिरोबा— पण, असा वाईट माणूस त्वां कां ठेविला आहे?

भीमराव— तो वाईट नाहीं, मुला, तो आमचे हितास अतिशयच जपतो, त्यामुळें कोणेसमयीं असा भकतो. एरवीं तो मोठे सचवटीचा माणूस आहे, आणि एकनिष्ठ चाकर.

मिरोबा— पण तो वांकडा चालतो आहे तर?

भीमराव— त्वां ऐकिलें नाहीं; तो ह्मणाला कीं तिचा अन्याय केला असें मला वाटत नाहीं. तर त्याचा अ-

न्याय इतकाच, कीं तो हुकुमाप्रमाणें करावयास जातो तेव्हां मनुष्य पाहून व गोष्टीचें तारतम्य पाहून काम करावें तें तो करीत नाहीं.

मिरोबा— मी समजलों नाहीं. मला हें नीट समजाविशील ?

भीमराव— होय, मुला. तें असें कीं, त्याला जेव्हां ठेविलें, तेव्हां मी सांगितलें होतें कीं, गांवांतून लुच्चे लबाड हांकून काढ, त्यांला कोतवालाकडे नेऊन शिक्षा करीव. त्याचें तात्पर्य हेंच कीं, भिकाऱ्याचे वेषानें चोरीवर जे पोट भरितात, आणि गांवांत येऊन माझ्या कुळांस जे ठकवितात त्यांविषयी बंदोबस्त ठेव. असा हुकूम दिला होता.

मिरोबा— हांहां! आतां मी समजलों. तो खरे भिकाऱ्यासहीं चोरांत मोजितो. कोणास ह्मातारपणामुळें, दुखण्यामुळें, किंवा दुर्दैवामुळें, भीक मागणें प्राप्त होतें, तें तो लक्षांत आणीत नाहीं.

भीमराव— खरें, बाळा. एकच गोष्ट प्रयोजनवशात् तशी मानली ह्मणजे वेगळीच दिसते. आतां पाहा मीच तुला ह्मणतों कीं त्वां हरजीशीं भांडतांना चांगला विचार केला नाहीं; त्या मुलीची आई लबाड नव्हे; अथवा त्या मुलीनें तुला लटकें सांगितलें नाहीं, आणि आपले भाऱ्यांतून कणसें चोरिलीं नाहींत, हें तुझ्यानें कशावरून सांगवेल ?

मिरोबा— नाहीं, बाबा, तसें होणार नाहीं.

भीमराव– कां होणार नाहीं ? तीं कोण आहेत, आणि येथें काय येऊन आलीं आहेत हें तुला पक्केपणीं ठाऊक आहे ?

मिरोबा– बाबा, जर तिची ती आकृति, तिचे ते अश्रुपात, तिची ती गरिबी, तूं पाहातास; आणि तिचें तें भाषण जर तूं ऐकतास, तर तुझी खातरी होती; ह्याहून दुसरें अधिक काय जाणिलें पाहिजे ? तीं योग्य आहेत कीं नाहींत, हें पक्कें समजेपर्यंत त्यांस काय उपाशीं मरूं द्यावें ?

भीमराव– शाबास मुला, शाबास. गरिबांवर अशीच दृष्टि ठेवीतजा, ह्मणजे भगवान् तुजवर कृपा करील, तुजसारिखा गुणाचा मुलगा देऊन जशी त्यानें मजवर कृपा केली आहे. कठोरतेपेक्षां दयाळूपणा चांगला; निष्ठुर मनुष्य अनीतींत शिरतो. जेथें कोणी आपली कृपा इच्छितो, आणि ती त्यावर आपल्यानें करवत नाहीं अशी गोष्ट होते, तेथें त्याचा बांक, आपला नाहीं.

मिरोबा– पण, बाबा, हरजी सारिख्या मनुष्याच्या स्वाधीन अधिकार करावा हें मला ठीक दिसत नाहीं. तो एकादें दिवशीं अनर्थ करावयाचा.

भीमराव– तूं ह्मणतोस तें खरें. पण मी त्याकडें सगळी सत्ता दिली नाहीं, त्यापासून झालाच तर लाहानसा उपद्रव होईल, आणि तो झाला तरीं त्याचा

परिहार करितां येईल. त्याचे डोईवर आपला कोठीवाला आहे, तो चांगले समजुतीचा आणि भला मनुष्य आहे; तो न्याय अन्याय पाहून चांगलें तेंच करील. त्यानेंच मला त्या मायलेकींचें वर्तमान कळविलें, कीं त्या भल्या आहेत; आणि त्या ह्यातारे एसाऊचे घरीं असतात हें ही.

मिरोबा– पण, बाबा, हरजीनें त्यावेळींच जर त्या मुलीस मारिलें असतें तर कसें होतें ?

भिमराव– इतकें त्याच्यानें करवतेंना. मी त्याला निक्षूण ताकीद केली आहे कीं, तुला कोणी कसाही अन्याय करितांना आढळलें, तरी त्याच्या अंगावर हात टाकूं नको; त्यास कोठीवाल्यापाशीं घेऊन जा.

मिरोबा– ती, बाबा, त्या लाहानगे मुलीस घेऊन माझी ताई आली.

---

## प्रवेश ८

### भीमराव, मिरोबा, हिराबाई, आणि यमनी.

मिरोबा– ( टोपली घेऊन यमनीकडे धांवतो, ) ही घे, मुली, ही घे तुझी टोपली. तींतले तुझे एका कणसासही कोणीं हात लाविला नाहीं बरें ?

यमनी– अगे माझे टोपले ! अरे माझे लाहानगे धन्या, मी तुझी किती उपकारी झालें ? ( भीमरावास पाहून, ) हे कोण गृहस्थ आहेत ?

हिराबाई— ( बापाकडे धांवून त्याच्या कडेवर चढते. ) यमने, पाहा आमचा बाबा.

मिरोबा— मी तुला खरेंच सांगतों यमने, आमचा बाबा चांगला आहे. तूं कांहीं भिऊंनको. ये मी तुझी त्याची ओळख करितों. ( यमनी पुढें जाते. ) तुला दुखविलें ह्मणून बाबानें हरजीला चांगली शिक्षा केली, ऐकिलें ?

यमनी— (भिऊन भीमरावाजवळ जाते आणि त्यास नमते.) महाराज, मी इतकी सलगी करितें ह्मणून क्षमा असावी. आपलीं मुलें किती थोर ह्मणून सांगूं !

भीमराव— ( एकीकडे वळून हळूच, ) मिरोबा ह्मणत होता तें खरेंच. हिच्या तोंडाकडे पाहातां ही लबाड असा संशय कोणास येईल ? हिची रम्य मुद्रा, भाषणाची हातवटी, हीं हिचे थोरपणास सांगतात.

यमनी— ( मिरोबास आणि हिराबाईस हलके शब्दांनीं ) मी तुमच्या बाबास राग तर आणिला नाहीं ?

भीमराव— ( तें ऐकून ) नाहीं, माझे लाडके ! माझे मुलांनीं तुझा सत्कार केला, त्यांत कांहीं अधिक केलें नाहीं. तूं त्यास योग्यच आहेस.

हिराबाई— खरें, बाबा, ही अशीच आहे. पण जर त्वां हिचे आईस पाहिलें असतें तर ! —

भीमराव— तुझी आई कोण आहे, मुली ? ह्या गांवांत तुह्मी कोठून आलां ? आणि तुह्मी पोट कसें भरितां ?

यमनी— पोट कसें भरितों हें मी काय सांगूं ! कधीं भि-

ळतें कधीं उपाशीं असतों. आह्मी सगळा दिवस, कधीं सगळी रात्रही, सूत कांतितों, शिवतों, आणि पोट भरितों. एसाऊनें आपले घरीं आह्मांस राहावयास जागा दिली आहे. तिनें मला शेतांत कणसें टिपावयास आजच पाठविलें होतें; तों पहिले खेपेसच असें झालें.

मिरोबा– ( यमनीचे कानांत ) आज तुझें भाग्य चांगलें. ताई बाबाची आज्ञा घेऊन ठेवणार आहे; मग तुला टिपल्यावांचूनच दाणे मिळतील.

भीमराव– पण तुह्मी अगोदर कोठें होतां ?

यमनी– येथून थोडके कोशांवर रेणुकापुरीं होतों. तेथें फार महागाई ह्मणून एसाऊनें माझे आईस सांगितलें, कीं तूं आमचे गांवीं चल मी तुला जागा देईन.

भीमराव– ( एकीकडे होऊन ) गरीब लोक जेव्हां एकमेकांस असे सहाय होतात तेव्हां मग मातबरांनीं किती सहाय व्हावें ? ( यमनीस ) मुली, तुझा बाप जिवंत आहे ? तो काय धंदा करितो ?

मिरोबा– मी पैज मारितों कीं, तो मोलकरी नसावा.

हिराबाई– आणि हिचे आईस पाहिल्यावरून मीही पैज मारीन.

यमनी– ( अंमळ गडबडून ) माझा बाप ? मला बाप नाहीं. खरेंखुरेंच मी पाहिला नाहीं. मी उपजावयाच्या अगोदरच तो वारला. आहा ! जर तो आज जिवंत असता तर–

भीमराव– तो कोण होता हें तूं जाणतेस? आणि त्याचें नांव काय तें सांगशील?

यमनी– माझी आई तुह्मांस तें नीट सांगेल.

भीमराव– ती मशीं बोलेल?

हिराबाई– हो; ती आतां येथें येईल. मी अंमळ मागाहून येतें, असें ती आह्मांस ह्मणाली.

भीमराव– मुली, तुला शिकवणी कोणाची?

यमनी– तें सगळें माझे आईनें केलें. मला वाचावयास आणि लिहावयास तिनें शिकविलें; आतां ती मला देवाचा भजनमार्ग शिकवीत असते, आणि चित्रें काढावयासही शिकवीत असते.

भीमराव– चित्रें काढावयास! तर आतां माझी खातरी झाली, कीं हीं कोणी मोठे कुटुंबांतलीं दरिद्रानें अशे दशेस आलीं आहेत.

हिराबाई– आहा! ती! ती येते आहे.

मिरोबा– हीच ती?

भीमराव– (एकीकडे) ह्यांचें वर्तमान समजून घेण्यास मी मोठा उत्कंठित आहें. ह्या मुलीच्या आकृतीवरून मला हिचे बापाचें भान होतें, पण पक्कें आठवत नाहीं.

## प्रवेश ९,

## भीमराव, जिऊबाई, मिरोबा, हिराबाई, आणि यमनी.

यमनी– ( आईस भेटावयास धांवते. आई भीमरावास पाहून गडबडते ) ये, बये, ये, भिऊं नको. हे त्या दोघां मुलांचे बाप, ज्यांनीं आपणांवर फार लोभ केला, आणि जशीं ह्यांचीं मुलें तसेच हेही दयावंत आहेत. ( जिऊबाई हळू हळू पुढें येते, हिराबाई पुढें जाऊन आवडीनें तिचा हात धरून तिला बापाकडे आणिते. )

हिराबाई– माझे बापास सगळें वर्तमान ठाऊक झालें; आतां नवें सांगावें नलगे.

जिऊबाई– महाराज, माझी यमनी चोर असें तर आपले लक्षांत आलें नाहीं कीं ?

भीमराव– बाई, तुमचे मुलीस आणि तुह्मांस पाहूनच तुमचा भलेपणा स्पष्ट होतो.

मिरोबा– हिचें नांव यमनी ? हें नांवच सांगतें कीं, ही दाणे वेंचून पोट भरावयाकरितां झाली नाहीं.

जिऊबाई– काय करावें, दरिद्रावस्था फार कठिण आहे, पण जंवपर्यंत आमच्या हातून वाईट कर्म घडलें नाहीं तंवपर्यंत आह्मी–

भीमराव– गरिबीची लाज कोणीं धरूंनये; सद्गुण आहेत तेथेंही ती आढळते. बाई, आतां मी सलगी

करून विचारितों, क्षमा करा; तुमचें नांव काय?

हिराबाई– हिचें नांव जिऊबाई पोंवारीण.

जिऊबाई– आतां तुह्मांपासून माझी खरी हकीकत मी लपवीत नाहीं. मी असे दिवस काढितें येथें माझा उपाय नाहीं असें रावसाहेबांच्या मनांत यावें ह्मणून सांगतें. माझ्या मनांत आहे कीं, त्यांचा लौकिक होऊंनये. (मुलांकडे पाहाते.) गरिबीच्या लाजेमुळें नव्हें, पण जर माझें नांव प्रगट झालें, तर मग हलके जातींतले लोक, जे कोणी नीच असतील ते, माझा छळ करून संतोष पावतील; कांकीं कोणे समयीं मोठे मनुष्यापासून त्यांचे गरीबपणाचा तसाच तिरस्कार होत असतो.

मिरोबा– बरें तर मी ऐकत नाहीं.

हिराबाई– मी कोणाशीं चकारशब्द बोलणार नाहीं. मी खरेंच सांगतें कीं, तुह्मी कोणी असा, पण यमनीस मी माझी मैत्रीण करीन.

भीमराव– बाई, सांगतों हें खरेंच माना. माझ्या मनांत तुमचें कल्याण करावें असें पक्कें वागलें आहे, ह्मणून मी इतकें खोदून पुसतों.

जिऊबाई– मी गरीब, परंतु मोठे कुळांत उत्पन्न झालेली आहें. वर्षें आठ झालीं माझे बापानें मला सयाजी पोंवार सेनाखासखेल ह्यांस दिलें.

भीमराव– सयाजी पोंवार! सयाजी!

जिऊबाई– आमचें लग्न झाल्यावर मग आह्मी रतनपु-

रास आलों. तेथें पोंवारांचें वतन होतें.

भीमराव– होय, तोच ! तोच ! ह्या मुलीच्या चेहऱ्याव-रून तर उघड दिसतें कीं तोच.

जिऊबाई– तें कसें रावजी ?

भीमराव– पुढें बोला, बाई.

जिऊबाई– मी आतां थोडक्यांतच सांगतें, आह्मी सं-सार सुखाचा आणि परस्परांचे प्रीतीचा अनुभव नु-कताच घेत आहों, इतक्यांत, अरे कर्मा ! कठिण चाकरीमुळें त्यांची प्रकृत बिघडली, आणि माझें दैव फुटलें तें असें झालें ( ती रडते. )

हिराबाई– ( यमनीस ) बापडे, तूं लवकरच गे पोरकी झालीस !

यमनी– अरे दैवा ! उपजावयाचे अगोदरच.

जिऊबाई– घरकरी वारले तेव्हां ही मूल माझे पोटांत. माझ्या निर्दय दिरांनीं मला पोटीं मुलगा नाहीं पा-हून घरांतलें सर्व आटोपलें. मग त्यांनीं उचलून दिलें तें घेणें प्राप्त झालें.

भीमराव– ह्यावरून तुह्मांस फार थोडें दिलें असेलसें दिसतें.

जिऊबाई– त्यावर आह्मी थोडीं वर्षें रत्नपुरांत का-ढिलीं; नंतर सर्व विकून नांव छपवून रेणुकापुरास आलों, तेथें एसाऊची गांठ पडली, तिनें ह्या गांवीं आणिलें.

हिराबाई– रे, ती, आपली एसाऊ ती, बाबा.

जिऊबाई– पूर्वी माझे हातून तिजवर कांहीं उपकार घडले होते, ते आठवून तिनें मला आपले घरीं बोलाविलें. ती आमचा फार समाचार घेते. तिला दुसरें कोणी नाहीं, ती ह्मणते तुह्मी मला मूठमाती द्या, आणि ही माझी झोंपडी आहे ही माझे मागें तुह्मीच घ्या. अशी माझी कथा आहे.

भीमराव– पुरे बाई, आतां त्या एसाऊस कृतज्ञतेविषयीं मजपेक्षां अधिक मी होऊं देणार नाहीं. आजच्या दिवशीं, बाई, मला फार आल्हाद झाला, कीं तुमच्या भ्रतारानें मजवर जे उपकार केले आहेत ते फेडावयाचा योग देवानें आणिला.

जिऊबाई– तें कसें रावसाहेब? तुह्मी माझ्या घरधन्यास ओळखत होतां?

मिरोबा– ह्या यमनीचे बापास?

हिराबाई– अगे माझे यमने. आतां मला वाटतें कीं, तुला आह्मी आमचे घरीं ठेवूं. पण तुला काय झालें? तूं कां रडतेस?

यमनी– नाहीं, मला आनंदाश्रु आले.

भीमराव– तुमच्या भ्रतारानें तर माझा प्राण वांचविला आहे, आहाहा! मी आज केवढा सुखी तरी, कीं त्या पुरुषाचे बायकोची आणि मुलीची सेवा माझे हातून घडेल. मागें लढाईत मी त्यांचे हाताखालीं चाकरी करीत होतों. एकेसमयीं शत्रूंशीं हातपिटीस आलों होतों तेथें माझेवर एका बारगिरानें घोडा उ-

डविला, आणि मी तर श्रमानें अगदीं गळालों होतों, त्याक्षणीं जर पोंवार पुढें सरसावले नसते, तर मग मी आजला जीवंत कोठचा राहातों?

जिऊबाई– मीही त्यांचा शूरपणा ऐकत होतें.

भीमराव– त्यानंतर, एकेसमयीं मी आपले पागेबरोबर कामागिरीवर असतां शत्रूंनीं एकाएकीं आह्मांवर छापा घालून धरून नेलें, आमचें सर्वस्व लुटिलें, मला जखमा लागल्या. हें वर्तमान पोंवारांस कळतांच, त्यांनीं शत्रूंकडचे सेनापति जाधवराव होते, त्यांस शिफारसपत्र पोहोंचवून माझें तारतम्य राखिलें. तेथें माझ्या जखमा बऱ्या होत तंव दोन वर्षें लागलीं. नंतर मी तेथून सुटून घरीं आलों, आणि पोंवारांस भेटावें तंव,ताबडतोबीनें आमची रवानगी हिंदुस्थानांत झाली; तेथें मी लग्न केलें; आणि साहा वर्षें राहून स्वदेशीं आलों आणि शोध घेतला तंव ऐकिलें कीं, पोंवार कैलासवासी झाले. असले पुरुषाचे बायकामुलांस आणि विपत्ति, हें माझ्या लक्षांत नाहीं.– तींत आज तुह्मांस पाहिलें ह्यामुळें माझें व्हदय शतधा विदीर्ण झालें, बाई.

जिऊबाई– हे ईश्वरा! त्वां येथें मला आणून काय चमत्कार केला हा!

मिरोबा– (यमनीस) काय? तुझे बाबानें माझ्या बाबाचा प्राण राखिला?

हिराबाई– आतां आह्मी किती तरी अधिक ममता करावी?

भीमराव– यमने, बेटा, ये, इकडे, मी आहें तंव तूं आपला बाप जीवंत आहे असें समज बरें. माझे मुलांनो, तुमची आई वारली, तिचे जागीं तुह्मी ह्या बाईस आई ह्मणा. बाई, तुह्मी यमनीस शिकविलें (यमनी त्याजवळ जाते आणि त्याचा हात धरिते) त्यावरून मला वाटतें कीं, तुह्मी माझे मुलांस विद्याभ्यास करावयास योग्य आहां. मी तुमचा सांभाळ करीन. पुनः दरिद्राची पीडा तुह्मांस होऊं देणार नाहीं. (यमनी अझून त्याचा हात धरून आहे) होय, मुली, मी तुला आपले मुलीप्रमाणें पाहीन. तूं आपले उदार बापाची प्रतिमा आहेस ह्मणून माझे अत्यंत प्रीतिपात्र आहेस, तो मला जसा गुरुस्थानीं होता.

जिऊबाई– (उद्गार आला आहे.) रावसाहेब, तुमचे उपकार उच्चारावयास मला शब्द सांपडत नाहींत. माझे अंतर्यामीं जें होत आहे, तें हे माझे आनंदाश्रु सांगतील.

हिराबाई– (तिला आलिंगिते) माझे जिवलगे, माझे नवे आई! तर आतां तूं नित्य आह्मांजवळ असशील, नाहीं बरें? तूं पाहा आह्मी तुझे आज्ञेंत कशीं वर्तूं तीं.

मिरोबा– होय, आणि यमनीला दुसरी बहीणही झाली. आतां तिला दाणे टिपावयास जावयाचें काम नाहीं! अरे दुष्ट हरजी, आतां मी तुला वांकुल्या दाखवीन!

जिऊबाई– माझे लाडके लेंकरांनों! तुह्मी मला किती

आनंद करितां! आतां एकास तीन मुलें तुह्मी मला झालां, तर तुमचें तारतम्य मी आपल्या जिवापासून करीन. (भीमरावास) रावसाहेब, आज्ञा द्याल तर हें सुखसमाधानाचें वर्तमान मी एसाऊस जाऊन सांगेन; हें ऐकून तिला हर्ष वायूच होईल.

भीमराव— ठीक आहे, बाई, इतक्यांत मींही घरीं जाऊन तुह्मांकरितां एक खोली तयार करवितों.

हिराबाई— बाबा, मी माझे नवे आईबरोबर आणि यमनीबरोबर जाऊं?

मिरोबा— आणि मींही जाऊं, बाबा? मला ह्यांबरोबर जावेंसें वाटतें.

भीमराव— सुखेंजा, माझ्या लेंकरांनो. मग जिऊबाईस आणि यमनीस आपले घरीं घेऊन या, बरें. आणि एसाऊसही आज आपले घरीं जेवावयास आमंत्रण करा.

मिरोबा— (यमनी टोपली घ्यावयास चालली होती तीस) नको, नको, यमने, ती त्वां आतां उचलूं नये, तेथेंच राहूंदे.

यमनी— रावजी, मी ही टोपली कोटि रुपयांसही कोणाला देणार नाहीं. माझा आणि माझे आईचा जो आज भाग्योदय झाला त्यास मूळ ही आहे. नाहीं, चिमणे जिवलगे टोपले, तुला डोकीवर घ्यावयास मी लाजणार नाहीं.

(ती मोठें बळ करुन उचलते).

हिराबाई— इतकें तरी कर, कीं आंतलीं कणसें काढ, ह्मणजे ती हलकी होईल.

यमनी— कां काढीन? तीं कणसें माझीं आहेत. मला तीं त्या भल्या ह्मातान्यानें दिलीं आहेत. ह्याविषयीं तुमचा हरजी हावें तें कां ह्मणेना; तीं मी एसाऊस भेट देईन.

भीमराव— तिला मी विसरणार नाहीं. आजपासून जन्मपर्यंत मी तिला नित्य अन्न देईन.

जिऊबाई— भगवान् तुमचें कल्याण करो, आणि तुमचीं मुलें तुह्मांसारखीं धार्मिक होऊन तुह्मांस सर्वदा आनंद करोत.

( सर्व निघून जातात. )

---

## सखी आणि मनी.

वसंतऋतूमध्यें एके दिवशीं, मोठे प्रातःकाळीं, एका श्रीमंत पाटलाची मुलगी, सखी, न्याहारीस साकरपारा बरोबर घेऊन आपले बापाचे वाडींत गेली होती. तिचे मनांत होतें कीं चार घटिका इकडून तिकडे फिरून न्याहारी खाल्ली असतां ती रुचि अधिक देईल. ती तेथें सर्व विषयांपासून आनंद पावली. पदार्थमात्रानें चढते दिवसाच्या शोभेस अनुकूळ होऊन तिचे सर्वेंद्रियांस सुख

केलें; मंदसुगंध शीतल वायूच्या स्पर्शानें त्वचेस, मधुर फळांच्या रसानें रसनेस, पुष्पांच्या सुगंधानें घ्राणास, पक्ष्यांच्या मधुर शब्दांनीं कर्णास. अशी ती सखी तेथें सर्व विषयांपासून आनंद पावून सात्विक भाव पावली आहे, इतक्यांत तेथें कोणाचीं पावलें वाजलीं. तेसमयीं चकित होऊन पाहाते तंव समोरून एक पोरगी, हातांत बाजरीची कोरडी भाकर घेऊन मोठे रुचीनें खात खात आपणाकडे येत आहे; असें तिनें पाहिलें. तीही तेथें खेळावयास ह्मणून येत होती. तिची दृष्टि इकडे तिकडे पाहाण्यानें चंचळ होती, ह्मणून ती जवळ आली तेव्हां मात्र तिनें सखीस पाहिलें. पाहातांच ती खालीं पाहात स्तब्ध राहिली. मग जशी हरणी भय पावते तशी भिऊन मागचे पायीं पळूं लागली; तेवेळीं सखी ह्मणते, थांब, थांब, मुली, अंमळ थांब, अगे पळतेस कां? तें ऐकून ती अधिकच धांवली. सखीनें तिच्या मागें लागून मोठे कष्टानें आड वाटेनें जाऊन तीस धरिलें, आणि तिला ह्मणते, तूं शेवटीं माझ्या हातीं सांपडलीसना? आतां कोठें जाशील? मी तुला बळकट धरिलें आहे; तूं आतां सुटूं पावणार नाहींस. तेवेळीं ती पोरगी पळून जावें ह्मणून ओढाताण करूं लागली. तीस सखी ह्मणते, मुली, त्वां असें करूं नये; मी कांहीं तुला उपद्रव करीत नाहीं. हे ममतेचे आणि कोमळ शब्द ऐकून पोरगीला धीर आला; मग ती सखीबरोबर जवळच्या बंगल्यांत गेली. तेथें तिला आपले जवळ बसवून सखी

विचारिते, मुली, तुझा बाप जीवंत आहे?

मनी– होय, बये.

सखी– तो काय धंदा करितो?

मनी– पोटासाठीं कोणतेंही काम करितो. आजचे दिवशीं तो तुमचे बागांत खपत आहे. त्यानें मला आपले बरोबर आणिलें आहे.

सखी– हां! तो जाडगा खंडू तुझा बाप? पण तूं हीं न्याहारी कसूची करितेस? मला पाहूंदे काय खातेस तें. (ती तींतली थोडीशी भाकर खाऊन पाहाते.) आगाई! काय जाडी आणि भरडी आहे ही! माझे घशांत टोंचीतच गेली. तुझा बाप तुला हीहून चांगली कां देत नाहीं?

मनी– त्याजवळ तुमचे बाबाइतके पैसे नाहींत ह्मणून.

सखी– पण तो मजुरी करून मिळवितो कीं नाहीं? तितक्यांत त्याच्यानें तुला ताजी भाकर देववेना! हिजबरोबर कांहीं कोरड्याचें तरी–

मनी– होय, जर त्याला मी एकलीच असतें तर; पण आह्मी पांचजण आहों; सगळींच पुष्कळ खाणारीं. आणखीही कोणास झवलें पाहिजे, कोणास अंगरखा, कोणास टोपी, ह्यांचा खर्च आहे. कोणे वेळेस माझ्या बाबास, काय करूं? असें होतें. तो ह्मणतो, सगळी मेहनत करून व्यर्थ; माझ्यानें ह्यांस मोठें धोटेंही अन्नवस्त्र पुरवत नाहीं.

सखी– तर तुह्मी कधीं साकरपारा खाल्ला नसेल?

मनी— साकरपारा तें काय आहे ?

सखी— हा पाहा माझ्या हातांत प्रत्यक्ष.

मनी— अग आई! मी हा कधीं माझे जन्मांत पाहिलाही नव्हता.

सखी— थोडासा खाऊन पाहा, भिऊंनको, हा पाहा मी खातें

मनी— ( आनंदानें ) आहा बये! कायगे तरी चांगला आहे!

सखी— खरेंच, बरे, तुझें नांव काय. मुली ?

मनी— ( उठते आणि तिला नमते ) तुमची बटीक मनी.

सखी— बरें तर, अंमळ येथें थांब. मी आपले आई पाशीं तुजकरितां कांहीं मागून आणितें. हींच आलें. पण तूं पळूं नको हो ?

मनी— नाहींगे आई, आतां मी कांपळेन ?

( सखी धांवत गेली, आणि तिनें आईपाशीं कांहीं त्या मुलीकरितां कोरड्याशाला मागितलें. आई तिची धर्मवासना पाहून समाधान पावली. तिनें वाटींत कांहीं खीर आणि गव्हांची पोळी अशी तिजकडे दिली. सखी तें घेऊन धांवतच मनीपाशीं आली, आणि ह्मणते, कां मुलीं, तुला मी फार खोळंबविलें नाहींना ? हें घे; आतां तुझी जाडी भाकर परती ठेव, ती मग तूं व्हावी तितकी खा. )

मनी— ( खीर तोंडास लावून मिटक्या मारिते. ) अगाई हें अमृतासारिखें गोड आहे! असें मी कधीं खाल्लें

नव्हतें !

सखी– तुला आवडलें पाहून मला संतोष झाला. आधींच माझा निश्चय होता कीं तुला आवडेलच.

मनी– काय बये ! तुह्मीं हें असें नित्य खातां ! आह्मीं गरिबांनीं असलें कधीं चाखलें देखील नव्हतें.

सखी– ऐक तर; जेव्हां तेव्हां तूं मजकडे येतजा; मी तुला असें नित्य देत जाईन. पण, गडे, तूं कशीगे निरोगी दिसतेस ! गे, तुला कधीं दुखणें येतनाहीं ?

मनी– दुखणें, काय मला ? नाहीं कधीं नाहीं.

सखी– तुला कधीं पडसें येत नाहीं ? अथवा तुझें डोकें जड होत नाहीं ?

मनी– तो रोग कसागे असतो बये ?

सखी– कोणी खोकूं लागलें, आणि नाक शिकरूं लागलें, ह्मणजे समजावें कीं ह्यास पडसें खोकला झाला आहे.

मनी– हां हां! तसें मला कधीं होत असतें. पण तो काय रोग आहे ?

सखी– मग तूं काय करितेस ? खाटल्यावर पडून राहात असशील वाटतें.

मनी– खाटल्यावर पडून ! होय, मग झालें! मग माझी आई अनर्थ करील, मी आळशी झालें ह्मणून.

सखी– एरवीं तरी तुझ्यानें काय काम व्हावयाचें आहे, तूं केवळ लहान आहेस.

मनी– कां ? मला गाईकरितां गवत आणावयाचें नसतें

काय? आणि जाळावयाकरितां काटक्या? ह्याशिवाय शेत वेणण्याचें, दाणे टिपून आणण्याचें हें माझें काम आहे. आह्मा बये, आमच्यानें काम केल्यावांचून राहावत नाहीं.

सखी– आणि तुझ्या बहिणी तुजसारिख्याच निरोगी आहेत?

मनी– आह्मी सगळ्या निरोगी आहों; आणि उंदरासारिख्या उद्योगी.

सखी– बरें तर, मला ह्याचा फार संतोष झाला. पहिल्यानें मला वाटलें होतें कीं देव तुह्मांगरिबांचा समाचार घेत नसेल. पण तूं जेव्हां निरोगी आहेस, तेव्हां ईश्वर तुह्मांला विसरला नाहीं, हें मला पक्कें समजलें. मीही बरीच आहें, पण तुझेसारिखी बळकट नाहीं. पण, मुली, तूं अनवाणी कां चालतेस? जोडा कां घालीत नाहींस?

मनी– जर आह्मां सगळ्यांना आमचा बाबा जोडे देऊं लागेल तर तो खर्चाखालीं बुडेल.

सखी– तर तुझे पाय दुखवतील ह्मणून तुला चालतांना भय वाटत नाहीं?

मनी– तें एकवेळही माझ्या मनांत आलें नाहीं. देवानें माझे पायांचे तळवे जोड्याप्रमाणें कठिण केले आहेत.

सखी– माझा जोडा देववता तर मी तुला देतें. पण त्वां खावयाचें कां टाकलें?

मनी– गोष्टींतच वेळ निघून गेला, आतां मला गाईक-

रितां गवत मिळवून आणावयास गेलें पाहिजे. दारीं प्रहर दिवस आला. माझीं भावंडें घरीं न्याहारीकरितां वाट पाहात असतील.

सखी— बरें तर, तूं हें घरीं घेऊन जा.

मनी— बरें, हें मी घरीं नेऊन आपले बहिणींस देईन.

सखी— ही तुझी गोष्ट मला फारच आवडली.

मनी— मला जी जी चांगली वस्त मिळते तींतली मी त्यांना देत असतें, अशी माझी चाल आहे; आणि त्याही तसेंच करितात. येतें तर मी आतां. (ती लवून निघते.)

सखी— (लवते) पण उद्यां ह्यावेळेस येथें यावयास विसरूं नको बरें.

मनी— (खोळंबून) जर माझे आईनें मला कोठें पाठविलें नाहीं तर मी अगत्य येईन.

परोपकाराचे सुखाचा सखीनें हा पहिल्यानेंच अनुभव घेतला. मग ती अंमळ वाडींत फिरून मनांत ह्मणते, मी आज मनीस किती सुखी केलें! ती माझी किती उपकारी झाली असेल! तिच्या बहिणी खीर खाऊन काय खुशाल होतील! मी तिला जर परकर चोळी दिली तर तिला किती मोठा आनंद होईल! बयेनें मला थोडे दिवसांवर परकर चोळी दिलेली मजपाशीं आहे, ती फार चांगली आहे; पण मला तिचा आतां कंटाळा आला आहे; माझे पेटींत कांहीं जुनीं चिरगुटें असतील तीं मी सगळीं शोधून काढीन. ती माझे इतकीच उंच आहे.

माझी चोळी तिचे अंगास ठीक येईल. आहा! माझा जीव खुरखुरतो कीं मी मनी चांगलीं चिरगुटें नेसलेली कधीं पाहीन?

दुसरे दिवशीं मनी फिरून वाडींत आली, तेवेळेस सखीनें तिला बर्फी दिली. अशी ती मनी नित्य नित्य तेथें येई, आणि सखी तिला नित्य नित्य कांहीं नवा पदार्थ देई. तिजकडचे पैसे वेंचल्यावर तिनें कांहीं आईपाशीं मागितले, ते तिला आईनें मोठे आवडीनें दिले. एके दिवशीं आईनें तीस उत्तर केलें, त्याचें तिला मोठें वाईट वाटलें. ती आईस ह्मणत होती कीं मला पैसे दे; मनी अनवाणी चालते, ह्मणून मी तीस जोडा घेऊन देणार. आई ह्मणाली, मी पैसे देत नाहीं. सखी ह्मणाली, कां? आई ह्मणाली, ह्याचें कारण तुला मी सांगेन; तूं आपले आवडतीवर इतकी धीताल होऊं नको. तें सखीस वाईट वाटलें. त्या दिवशीं तिला जेवणही सुचेना. ती जेवीत असतां करंज्या वाढावयास आणिल्या; त्या निमित्तानें आईनें मनीची गोष्ट काढिली.

भिमाई— मला वाटतें कीं तुजपेक्षां ह्या करंज्या मनीस अधिक आवडतील.

सखी— होय आई, ह्या तिनें कधीं पाहिल्याही नसतील. ह्यांचे करवती कांठ पाहून तिला आश्चर्य वाटेल. बये, तूं सांगशील तर मी तिला ह्या घेऊन जातें, ह्या दोनच घेऊन जातें; जाऊं?

भिमाई— तें माझे मनास येत नाहीं.

सखी— कां बरें, आई ? तूं धर्मात्मा असून असें कां ह्म-णतेस ? सकाळीं मी जोड्याकरितां पैसे मागितले तेव्हांही त्वां नाहीं ह्मटलें. ह्यावरून मनीनें तुला कांहीं दुखविलें असेल असें वाटतें. वाडींत तिनें कां-हीं आपला नाश केला कायगे ? तसें असल्यास तिचे कानास मी खडा लावीन.

भिमाई— नाहीं नाहीं, माझे लाडके, मनीनें मला दुख-विलें नाहीं. पण तिजवर तूं अशी ममता करून तिला सुखी करणार कीं दुःखी, हें सांग बरें ?

सखी— सुखी करणार, ह्यांत संशय काय? परमेश्वर क-रो आणि मला तिजविषयीं विपरीत वासना न्होवो.

भिमाई— मलाही वाटतें कीं, तिनें सुखी असावें. पण, मुली, हें खरेंना, ती सुकी भाकर चावून न्याहारी करीत होती ?

सखी— खरेंच, मी तुशीं खोटें कां बोलेन ?

भिमाई— आणि ती अद्यापि तसले भाकरीवर संतुष्ट आहेना ?

सखी— अगाई हें काय सांगावयाचें. मी दहीं भात ज्या रुचीनें जेवितें, तीहून अधिक रुचीनें ती आप-ली जाडी भाकर खाते.

भिमाई— ह्यावरून मला वाटतें कीं, तिला भूकच चांगली लागते. पण ती अनवाणी चालते हें मला खरें वाट-त नाहीं.

सखी— मी तिला सदा अनवाणी पाहातें. पाहिजे तर

तूं माळ्यास पुसेनास. खरें कीं नाहीं तें.

भिमाई– तर ती खड्यांतून, गवतांतून, जात असेल तेव्हां तिचे पायांस ठेंचा लागून, कांटे रुतून, रक्तें निघत नसतील ?

सखी– तें कांहीं होत नाहीं. ती हरणीसारिखी इकडून तिकडे धांवते, आणि ह्मणते, “देवानें माझे पाय जोड्यासारिखे कठिण केले आहेत; ही गोष्ट किती चांगली केली आहे!”

भिमाई– असेल, तूं कांहीं लबाडी बोलणार नाहींस; पण तूं ह्मणतेस तसें असणें मला कठिण दिसतें. तुलाच जर सुकी भाकर दिली तर ती खातांना तूं वेडीं आणि वांकडीं तोंडें किती करिशील ? एकादा तुकडा माझे समक्ष खातीस तर मी मौज तरी पाहातें.

सखी– तो माझे घांटींतच अडकेल.

भिमाई– आणि तूं अनवाणी कशी चालतेस तें मला एक वेळ पाहावयाचें होतें.

सखी– रागें न भरशील तर सांगतें. कालचे दिवशीं माझ्या मनांत तसें येऊन वाडींत मी जोडा काढून अनवाणी चालूं लागलें, तें मला भारी कठिण पडलें, तशीच चाललें तंव ठेंच लागून पाय दुखावला. तिची मला अशी कळ आलीकीं, काय सांगूं ? मग तशीच हळूहळू मागें जाऊन मी फिरून जोडा घातला, आणि नेम केलाकीं, आतां फिरून कधीं अनवाणी चालणार नाहीं. आणि गरीब बिचारी मनीगे ! ती बा-

राही महिने अनवाणी चालते.

भिमाई– पण हें कसें बरें, तिजसारिखी सुकी भाकर तुझ्यानें खाववत नाहीं. आणि तिजसारखें तुझ्यानें अनवाणी चालवत नाहीं ?

सखी– सवंई नाहीं ह्मणून, मला वाटतें.

भिमाई– तर आतां ऐक, जर त्वां तिला तुझे सारिखी चांगलें चांगलें खावयाची आणि जोडा घालून चालावयाची सवंई लावली, तर मग तिला जाडी भाकर खाणें, आणि अनवाणी चालणें कठिण पडेल. मग तुला वाटेल का, आपण तिचें बरें केलें ?

सखी– पण मी तिला तें जन्मवर पुरवीन.

भिमाई– गोष्ट फार चांगली आहे; पण तुला जे पैसे मिळतात तितक्यांत तूं तिला अशी जन्मवर पोसशील ना ?

सखी– काय अवघड आहे ? आणि थोडकें थोडकें त्वां ही द्यावें.

भिमाई– आपण गरिबांस धर्म करावा हें फार चांगलें आहे; पण तो धर्म करावयास तुला एकटी मनीच आहे काय ?

सखी– नाहीं, मला दुसरींही गरिबें पुष्कळ आढळतात. दोन पोरी तर आपल्या घराजवळच आहेत; ज्यांना बाप नाहीं, आणि आईही नाहीं.

भिमाई– आणि त्यांस दुसऱ्याच्या धर्माची फार गरज आहे नव्हे ?

**सखी**– खरी गोष्ट.

**भिमाई**– तर, जर तूं पक्कान्नें आणि मिठाया सगळ्या मनीसच देशील; आणि दुसरीं उपाशी मरतात त्या गरिबांचा समाचार घेणार नाहींस, तर ती गोष्ट नीट नव्हे. असें जें कोणी करितें त्यास अव्यवस्थित ह्मणतात.

**सखी**– कधीं मधीं मी त्यांसही देईन. पण मनी मला फार आवडते.

**भिमाई**– बरें, पण तिचें चालवीत असतां तूं मेलीस तर ?

**सखी**– तर ती माझे नांवें फार फार रडेल, ह्यांत संशय नाहीं.

**भिमाई**– होय; तें मला ठाऊक आहे; पण फिरून दरिद्रांत पडणार नाहीं काय ? आणि चांगलें खावयाचे आणि नेसावयाचे लालचीनें एकादें दुष्कर्म आचरणार नाहीं ? मग त्याचा दोश कोणाचे माथीं ?

**सखी**– ( अंमळ खिन्न होऊन. तो दोष माझे माथीं येऊं पाहातो, बये. तर असें होतें कीं, मी तिला आजपासून कांहीं देऊं नये, नव्हे ?

**भिमाई**– मी असें केवळ ह्मणत नाहीं. तूं तिला कधीं मधीं गोड पदार्थ देत जा. तिला एकादें पांघरावयाचें वस्त्रही दे.

**सखी**– होय, तें माझे मनांत आलेंच आहे. तूं सांगशील तर मी तिला आपली फडकी देईन.

भिमाई– खरेंच; तुझी बारीक फडकी तिचे फारच उपयोगीं पडेल. तिचीं दुसरीं चिरगुटें खादीचीं, आणि फडकी मात्र– आहाहा! काय चांगली शोभेल!

सखी– खरी गोष्ट; मग तो तिचा विजोड थाट पाहून जो तो तिजकडे बोट दाखवूं लागेल. तर आतां कसें करावें बरें?

भिमाई– मी तर असें ह्मणतें कीं, कांहीं दिवस पर्यंत पैसे सांचवावे, आणि मनीला जें अगत्य पाहिजेच तें सर्व एके खेपेनें घेऊन द्यावें. गरिबांचीं मूलें कापड वापरतात तसल्यास फारसे पैसे पडत नाहींत.

सखीनें आईचा उपदेश ऐकून घेतला; मग पुढें ती मनीस खावयाच्या पदार्थांपेक्षां तिचे उपयोगी असे पदार्थ अधिक देत चालली. कोणे वेळेस ती तिला कांबळी देई; कोणेवेळेस परकर. तिला शिकवावयाकरितां गांवच्या पंतोजीस तिनें कांहीं द्यावें. ते उपकार स्मरून मनीचीही ममता सखीवर फार जडली. ती जेव्हां येई तेव्हां सखीस ह्मणे, मला कांहीं काम सांग, माझे हातून घडे असें कांहीं काम आहे? तिला सखी जेव्हां एकादें काम सांगे, तेव्हां सखीस अधिक संतुष्ट करावें ह्मणून मनी तें मोठे आवडीनें करी. एके दिवशीं वाडीच्या दरवाज्यापाशीं येऊन मनीनें सखीची वाट पाहिली; त्या दिवशीं सखी तेथें आली नाहीं. दुसरे दिवशीं पुनः तेथें गेली; त्या दिवशींही आली नाहीं; अशी चारपांच दिव-

सांत सखीची भेट नाहीं. ह्मणून ती फारच घाबरी झाली; आणि मनांत तर्क करिते. देवा असें तर नसेल, कीं सखीचा लोभ आज मजवरून उणा झाला? मी न समजतां तिला कांहीं दुखविलें तर नसेल? काय तें मला समजेल तर मी तिजपाशीं जाऊन क्षमा मागेन. तिच्या मैत्रीवांचून मी जीवंत राहाणार नाहीं. मग मनी सखीचे घरीं गेली. तों भिमाईची कुळंबीण घरांतून द्वारींआली, तिला ती खोळंबवून पुसते, "आज सखूबाई कोठें आहेत?" तिनें उत्तर केलें, सखूबाईची धडगत दिसत नाहीं, बाई; ती आतां फार दिवस वांचावयाची कठिण, मला, बाई, फार भय वाटतें; कोणजाणे ती ह्याक्षणींच असेल कीं नसेल, ह्याचा भरंवसा देववत नाहीं. तिला देवी आल्या आहेत. तें ऐकून "अरे देवा! मी तिला मरूं देणार नाहीं," असें ह्मणत मनीनें भिमाईचे खोलीकडे धांव घेतली; तेथें जाऊन ह्मणते "बाई, देवासाठीं, माझी सखूबाई कोठें आहे ती दाखवा. मला तिला पाहिलें पाहिजे!" भिमाईनें तिला वारलें असतें, पण ती खोलींत घुसलीच, तेथें तिचा उपाय नाहीं. सखीचे अंगांत ताप मोठा भरला होता; इकडून तिकडे वळावयाचें सामर्थ्य राहिलें नव्हतें. तिच्या सख्यांतून कोणी तिजजवळ उभी राहीना, तें पाहून तिला फारच दुःख झालें. सखीला पाहून मनीच्या डोळ्यांस अश्रुधारा चालल्या; तिनें तिचा हात धरून त्याचा मुका घेतला, आणि ह्मणते, "अगे माझे अन्नदाते! मी तुला

आज असें पाहावें ! माझे गडे, तूं मरूं नको, मी तुझ्या पायां पडतें ! तूं गेलीस तर माझा समाचार कोण बरें घेईल ? मी तुजपाशीं रात्रंदिवस राहून चौकी करीन; तुझी चाकरी करीन, हें तूं मला करूं देशीलना ? " सखीनें नेत्रानें आणि हात आंवळून तिला सुचविलें कीं, " तूं मजजवळ राहाशील तर मला फार समाधान वाटेल. " मग भिमाईच्या विचारानें मनी सखीची चाकरी करावयास राहिली. तिनें आस्थापूर्वक सखीची फारच जतन केली; आपलें अंथरूण तिच्या खाटल्यालगत घातलें, खोलींतून एक क्षणभरही दूर झाली नाहीं. सखी अंमळ कुंथली कीं मनी " काय झालें ? काय पाहिजे ? " ह्मणून विचारावयास जवळ तयारच आहे. वैद्य सांगत तीं औषधें तिनें आपल्या हातीं तयार करून द्यावीं; पथ्यास घालावें; मधले वेळेस कांहीं करंड्या व सांगशा करून अथवा चित्रें काढून, अथवा मंजूळ गाऊन, किंवा जें जें कल्पनेंत येई तें तें करून, सखीस दुखण्याचा विसर पडून जशी कर्मणूक होईल तसें मनीनें करावें. सखीचे डोळे आठ दिवसपर्यंत मिटलेले होते. ते दिवस तिला फारच अवघड गेले. तेवेळेस सखीस जो आवडे तो विषय मनीनें पुस्तक वाचून तिला ऐकवावा. गांवांतल्या गोष्टी काहाण्या सांगाव्या. तिला वेळोवेळीं धीर द्यावा, आणि सांगावें, " तूं भिऊंनको, जशी त्वां मजवर दया केली, तशी ईश्वर तुजवर करील, आणि तुला लवकर आरोग्य दे-

ईल बरें, माझे अन्नदाते, सखूबाई." हे शब्द बोलतांना तिचे डोळ्यांतून अश्रुधारा चालत; तितक्यांत त्या पुसून ती सखीस ह्मणे, "माझे सखूबाई, मी तुझा वेळ जावयाला एकादें गाणें ह्मणूं?" सखी खुणेनें मात्र सांगे. मग मनीनें जितकीं गाणीं आपणास येत तितकीं गावीं. ह्याप्रमाणें सखीस कर्मणूक करून तिचा वेळ ती सुखाचा घालवी. पुढें हळूहळू सखीची प्रकृति स्वस्थ झाली, डोळे उघडूं लागले, ग्लानि गेली, फोड सुकले, खवलें पडलीं, भूक लागूं लागली; तोंडावरचे व्रण मात्र अंमळ ओले होते. असा तिला दिवसानुदिवस उतार पाहून मनीस आनंद वाटला कीं, "ही आतां वांचल्या पंथास लागली; नाहीं तर मला नाहींशी झाली होती." मग सखीचीही तिजवर ममता जडली. ती वारंवार तीस ह्मणे कीं, त्वां मजवर जे उपकार केले आहेत, त्यांची मी कशी उतराई होईन?" तिनें आईस पुसलें कीं, "मनीस काय द्यावें?" आई ह्मणाली, "तें मी देईन, मुली, तुला समाधान होई असेंच देईन. तिचे उपकार तुजवर आणि मजवरही मोठे झाले आहेत." मग भिमाईनें मनीकरितां परकर, चोळ्या, फडक्या, साड्या, बाहुल्या, असें आणावयास सांगितलें. सखी ह्मणाली, "मी तिला तें आपल्या हातीं देईन." मनीस द्यावयाचीं खेळणीं, चिरगुटें, आणिलीं त्यादिवशीं घरच्या सर्वांस आनंद झाला. सखीचीं सोयरीं धायरीं सगळीं आलीं होतीं, तीं सर्व सखीस पाहून खुशाल झालीं. सखीचे मनांत मोठा हर्ष

कीं, "मनीस बक्षीस द्यावयास आणि तिची उतराई व्हावयास देवानें मला सामर्थ्य दिलें आहे!" असा सर्वांस आनंद होऊन तीं वाडींत गेलीं, जेथें सखीची आणि मनीची मुलीं ओळख पडली होती, तेथें सखीनें मनीचा मोठा सन्मान करून तिला बाहुलीं दिलीं, आणि आपले हातीं तिला वस्त्रें नेशिवलीं. मनी-ही पायांपासून डोईपर्यंत तीं सुंदर वस्त्रें आपणास लेव-विलीं पाहून फार संतोष पावली.

---

## लहान जगू

देवराव देशमूख एके दिवशीं आपले वतनवाडीची चौकशी करून गांवाहून परत येत होते. येत असतां त्यांनीं एका स्मशान भूमीच्या भिंतीच्या आंत कोणी विलाप करीत आहे असें ऐकिलें. ते थोर मनुष्य फार दयावंत होते. त्यांनीं विलाप करणाऱ्याचे साहाय्यास जावें ह्याबुद्धीनें घोड्याखालीं उतरून भिंतीवर वळघ केली; आंत पाहातात तंव कोणे मनुष्यास लोक नुकतेच पुरून गेले आहेत, त्या जाग्यावर एक कुळवाड्याचें मुलगें पांचा वर्षांचें रडत बसलें आहे. देवराव त्याजवळ गेले आणि ह्मणतात, "मुला, तूं येथें काय करीत आ-हेस?"

मुलगें— मी आपल्या आईस बोलावितों आहें. लोकांनीं

तिला काल येथें निजविलें, ती अझून उठत नाहीं.

देवराव– लेंकरा, ती मेली; ती आतां उठणार नाहीं.

मुलगें– होय, ते असेंच ह्मणतात कीं, ती मेली, ह्मणून तिला मला भेटायास काय चिंता आहे? परवां ती मला सोसाऊजवळ ठेवून गेली; तेव्हां तिनें मला सांगितलें कीं, मी तुला न्यावयास येईन; पण ती आली नाहीं. माझा बाबा देखील कोठें गेला. माझे धाकट्या भावासही कोणीं नेलें. आतां गांगांवचीं मुलें मला जवळ येऊं देत नाहींत.

देवराव– जवळ येऊं देत नाहींत, कां बरें?

मुलगें– तें मला कळत नाहीं; पण मी त्यांकडे जावयास लागलों ह्मणजे तीं मला घालवून देतात; आणि माझ्या आईबापांस वाईट बोलतात; तें मला फार लागतें. अगे आई! अगे बये! ऊठ, ऊठ, लवकर ऊठ.

देवराव– (देवरावाचे डोळे पाण्यानें भरून येतात.) रे, तुझा बाबा आणि भाऊ कोठें गेले ते तुला ठाऊक नाहींत?

मुलगें– माझा बाबा कोठें गेला मला ठाऊक नाहीं. माझा धाकटा भाऊ कालच दुसरे गांवीं गेला; एक बावा येऊन त्याला घेऊन गेला.

देवराव– आणखी, तूं कोणाजवळ राहात असतोस?

मुलगें– शेजारिणी सोसाऊजवळ. माझी आई परत येई तोंपर्यंत मी तेथें राहावयाचा होतों. लवकर

येतें ह्मणून तिनें मला सांगितलें, आणि नयेतां येथें निजून राहिली. सोसाऊही मला आवडते, पण (त्यांचेकडे हात दाखवितो.) ह्या त्यांचेंत माझी आ-ई आहे ती मला माझे जिवाहून अधिक आवडते. अगे आई! आईगे! तूं अझून कांनिजली आहेस? केव्हांगे उठशील?

देवराव– मुला, तूं उगीच हाका मारितोस. ती आतां उठणार नाहीं.

मुलगें– बरें तर, मीही येथेंच तिचेजवळ निजतों. त्यांनीं ती ताटीवर निजविली होती तेव्हां मी पाहि-ली, ती काल्यासारिखी थंड झाली होती! मी येथेंच पडेन आणि तिचे कुशीस निजेन.

देवराव– (ते करुणा शब्द ऐकून देवरावांच्या डोळ्यां-तील पाणी खळत नाहीं. ते ओणवून मुलास उच-लून उराशीं धरितात, आणि त्याचा मुका घेऊन त्यास विचारितात.) तुझें नांव काय, माझ्या दीन-वाण्या मुला?

मुलगें– मी चांगला मुलगा असलों ह्मणजे मला जगू ह्मणतात, आणि वाईट असलों ह्मणजे जग्या ह्मणतात.

देवराव अश्रु टाकीत आहेस, तथापि तें ऐकून हंस-तात आणि मुलास ह्मणतात, "मुला, तूं मला त्या तुझे सोसाऊजवळ नेशील?" मूल ह्मणाला, "हां, चला," मग तो मुलगा तसाच उठला, आणि त्यानें देवरावांपुढें धांवत धांवत चालून त्यांस सोसाऊचे दारापाशीं नेलें.

ती ओटीवर बसली होती, तिजकडे बोट करून ह्मणतो, "ही माझी दुसरी आई," असें ह्मणून तिचे मांडीवर जाऊन बसला. देवरावांचे अकल्पित येणें पाहून सोसाऊ विस्मित झाला. नंतर देवराव, मुलानें केलेलें सर्व चरित्र सांगून तिला ह्मणतात, "सोसाऊ, ह्याचीं आईबापें कोण आहेत, व त्यांची काय अवस्था आहे तें सांगशील?" सोसाऊ, होय महाराज ह्मणून सांगते, "ह्या मुलाचा बाप साळवी आहे; त्याचें घर हें माझे शेजारीं आहे. तो बहुत भला, निर्व्यसनी, उद्योगी, प्रामाणिक, तीस वर्षांचे आंतच्या वयांत आहे. ह्याची आईही चांगली होती; शरीरानें निरोगी नव्हती, पण सुंदर आणि संसारकामांत मोठी दक्ष होती. त्या उभयतांचें लग्न होऊन वर्षें सात झालीं, तेव्हांपासून मी पाहातें कीं ह्या दोघांची परस्पर मोठी प्रीति. त्याचा धंदा जर चांगला चालला असता तर, मला वाटतें कीं, त्या दोघांसारिखीं सुखी ह्या लोकीं थोडींच निघतीं. नवऱ्याचें नांव जानोजी, आणि बायकोचें मानाऊ. मानाऊचे बापाकडलें कांहीं आलें होतें तें, व कांहीं जानोजीजवळ होतें तें, एकत्र करून त्याचीं भांडीकुंडीं व साळ्याचे धंद्याचें सामान घेऊन तीं संसार करूं लागलीं. मग त्यांचे जवळ कांहीं राहिलें नाहीं, परंतु त्यांनीं कष्ट करून आपले धंद्यावर दोन वर्षें चांगलीं काढिलीं. पुढें मुलें होत चाललीं, तेव्हां त्यांस संकट पडूं लागलें, त्यांतही दुप्पट मेहनत करून त्यांनीं निर्वाह केला असता, पण चिरगुटें

विणून ठेवीत त्यांत तोटे येऊं लागले. मग मानाऊनें कापणीचे दिवसांत शेतांतून कांहीं दाणे मिळवून आणावे तेव्हां त्यांस खावयास मिळावें. त्या मेहनतीनें मानाऊस दुखणें लागलें. तिला औषधास जवळ पैसा नाहीं; त्यानें जानोजी फारच हैराण झाला, तेव्हां त्यानें गांध्याचें कर्ज केलें. पुढें मानाऊ अंमळ बरी झाली तों जानोजीचा धंदा अगदीं बुडाला. गिऱ्हाइकांनीं त्यास सोडिलें; तेव्हां घराचें भाडें व कर्ज झालें होतें त्याचें व्याज, हें देतां त्यांची टेंक पडली. मग त्यांस उपास पडूं लागले. त्यांतही जेव्हां त्यांस अन्न मिळे तेव्हां तें मुलांस वांटून तीं उभयतां आपणांस दैववान् असें मोजीत. (हे शब्द ऐकून जगू कोनांत जाऊन मुसास टाकून रडूं लागतो.) पुढें त्यावर साहा महिन्यांचें घरभाडें चढलें. तेव्हां घरधनी फार निष्ठुर आहे त्यानें जानोजीस धमकावून सांगितलें कीं, मी तुला बंदिशाळेंत घालितों. त्याची मोठी रदबदली केली, तेव्हां त्यानें एक महिन्याची मुदत दिली, आणि ह्मणाला कीं, त्यापुढची मी शपथ वाहतों, कीं, घरचें हांडेंभांडें विकून बाकी राहील त्याकरितां जानोजीस मी अटकेंत घालीन. तो घरधनी मातबर आहे, पण त्याला दया अगदीं नाहीं. ती जानोजीची अवस्था पाहून जो पाषाणहृदय असेल तोही विरघळेल. मी शेजारीण, मला ती त्यांची विपत्ति पाहून दया येई, पण काय करूं? त्यांचें दुःख निवारावयास मला सामर्थ्य नाहीं. एके वेळेस मी स्वतः घरधन्यापाशीं गेलें,

आणि त्याची प्रार्थना केली कीं, त्यांचे दरिद्राकडे लक्ष दे; आणि सांगितलें कीं, मजपाशीं आहे तितकें मी त्यांचे देण्याबद्दल गहाण देतें, असें बहुत प्रकारें विनविलें, परंतु त्यास दया आली नाहीं. त्यानें मला उत्तर केलें कीं, तुझी किती पत आहे ती मला ठाऊक आहे; असें मी करीन तर मग चांगला रोजगार ! (असें ह्मणत असतां सोसाऊचे डोळ्यांतून पाणी चाललें,) अशी त्यानें माझी इज्जत घेतली; तें मी सगळें त्या वेळेस पिऊन गेलें. मनांत ह्मटलें कीं, आतां जर मी कांहीं ह्यास अधिक बोलतें, तर हा हट्टास पेटून जानोजीस अधिक उपद्रव करितो. काय करूं! जातीनें रांड मोमीण, आणि गरीब पडलें. आहा ! आह्मां गरिबांसारखी वासना जर मातबरांस असती तर, त्यांच्या हातून किती धर्मकृत्यें होतीं ! मग मी मानाऊस बुद्धि सांगितली कीं, त्वां शाहापुरास रामचंद्रशेटांचे घरीं मागें प्रामाणिकपणें चाकरी केली आहे, तर अशा वेळेस त्यांकडे जाऊन कांहीं पैसे उसने माग. तिनें मला उत्तर केलें कीं, तें मी नवऱ्यास सांगतें, माझ्यानें करवत नाहीं; कांकीं शेटांचे मनांत येईल कीं, ह्यांनीं कांहीं उधळे चाळे केले ह्मणून हीं अशी दशेस आलीं. आज तीन दिवसांवर नित्याप्रमाणें आपलीं दोन मुलें घेऊन ती मजकडे आली, आणि ह्मणाली कीं, " संध्याकाळपर्यंत ह्यांस संभाळ, मी शेजार गांवीं जाऊन येतें, आणि सूत काढावयाकरितां कांहीं कापूस मिळाला तर पाहातें. मी रामचंद्रशेटांकडेस जातों ह्मणून

माझा नवरा सकाळीं बाहेर निघून गेला आहे" ती प्रार्थना ऐकून मी मुलें स्वाधीन घेतलीं. मानाऊ जाऊं लागली तेवेळीं तिनें त्यांस उराशीं धरिलें, त्यांचे मुके घेतले, जसें कोणी ह्मणेल कीं शेवटचीच भेट घेत आहे; तिचे डोळ्यांत आंसवें लोटलीं, आणि ती वडील मुलास ह्मणाली, "जगू, मी लवकरच येतें, मग मी तुला नेईन, रडूं नको बरें!" ती मला ह्मणाली, "बाई, माझ्या मुलांचा सांभाळ तुह्मी फार करितां; मी तुमची मोठी उपकारी आहें." असें ह्मणून तिनें पुनः मुलांचे मुके घेतले, आणि ती गेली. कांहीं वेळ गेल्यावर तिचे घरांत मी कांहीं गडबड ऐकिली, पण मनांत आणिलें कीं, ती बाहेर गेली आहे, त्यापक्षीं मांजरानें कांहीं पाडलें असेल; असें समजून मी त्याचा शोध ठेविला नाहीं; सांज झाली, काळोख पडला, तरी मुलें न्यावयास कोणी येईना. मग मी ह्मटलें, आपण तरी ह्यांचे घरीं जावें, आणि काय करीत आहेत तें पाहावें. असें ह्मणून गेलें तों दार खिळलेलें नव्हतें, तें ढकलून आंत गेलें आणि पाहातें तंव, मानाऊचें मढें जिन्याचे दाराशीं पडलें आहे. तेंवेळीं मी तटस्थ झालें, काय करावें तें सुचेना. मग तिला सावध करावें ह्मणून मी नाना उपाय केले; पण मेलीच ती, कशी उठते. नंतर जाऊन वैद्यास बलावून आणिलें; त्यानें नाड पाहून माझी निराशा करून सरकारचीं माणसें आणिलीं; त्यांनीं चौकशी करितां ठरविलें कीं, ती तिरमिरी येऊन मरण पावली. मग त्यांनीं प्रेतास मूठ

माती द्यावी ह्मणून हुकूम दिला; आणि तिचा दादला जानोजी ह्याचा शोध करा ह्मणून सांगितलें. मी सरकारांत सांगून दोघेंही मुलें आपल्या स्वाधीन घेतलीं. मनांत आणिलें कीं, मजजवळ कांहीं नाहीं हें भगवान् जाणतो आहे; तोच ह्यांचे पोटाची सोय काढील. नंतर पाहूं लागलें तंव, ह्या मुलाचा धाकटा भाऊ माझे जवळ राहावयास अड करितो; इतक्यांत कालचे दिवशीं मानाऊचे जुने यजमान रामचंद्रशेटही तिला भेटावयास आले; त्यांनीं दार लागलेलें पाहून मजकडे येऊन पुसलें कीं, जानोजी साळवी, व त्याची बायकोही कोणीकडे गेलीं आहेत? मी त्यांस आंत बलावून सर्व वृत्तांत सांगितला; आणि बोलिलें कीं, जानोजी तुह्मांकडे कांहीं साहित्य मागावें ह्मणून गेला आहे. ते ह्मणाले तो मला भेटला नाहीं. मग त्यांनीं दोन्ही मुलें पोटाशीं धरून त्यांचें लालन केलें. त्यांस जगूनें पुसलें, "बाबा, माझी आई फार वेळ निजली आहे तीस तुह्मी उठवाल?" तें ऐकून त्यांचें न्हदय विरून गेलें; आणि ते मला ह्मणाले कीं, हीं दोघेंही मुलें मी आपले घरीं घेऊन जातों; ह्यांचा बाप परत आला, आणि त्यास ह्यांस पोसावयाचें सामर्थ्य असलें, तर मी हीं त्याचे स्वाधीन करीन; तंवपर्यंत मी ह्यांस नेऊन प्रथम विद्याभ्यासास लावितों. हें भाषण मला रुचलें नाहीं; कांकीं पोटच्याप्रमाणें ह्या मुलांवर माझी ममता. मी त्यांस ह्मटलें कीं, माझ्यानें ह्यांस सोडवत नाहीं; मला ह्यांची फार ममता लागली आहे;

आणि ह्यांसही माझी लागली आहे. तें ऐकून ते ह्मणाले, " बरें तर, एक तूं सांभाळ आणि एक मजपाशीं दे. तूं ठेविशील त्याचाही मी सर्व प्रकारें समाचार घेत जाईन. " असें बोलिले तेव्हां माझ्यानें त्यांस नाहीं ह्मणवलें नाहीं. त्यांनीं जगूस पुसलें, " कायरे मजबरोबर चलतोस ? " जगू ह्मणाला, " काय ? माझे आईकडे मला नेत असलां तर चला, मी येतों. " ते ह्मणाले " मुला, आईकडे नाहीं, तुला मी आपले चांगले घरास नेतों. तुला चांगलें खावयास देईन, आणि माझे चांगले बागांत नेईन, " तो ह्मणाला, " नाहीं, नाहीं, मी आपला सोसाऊपाशींच राहाणार. माझी आई आहे तेथें मी येथून नित्य जात जाईन. तुमचे चांगले बागांत जाईन त्यापेक्षां मी आपले चांगले आईकडे जाईन हें बरें. " असें हा मुलगा बोलला, आणि माझे खाटे पलीकडे दडावयास गेला, तें पाहून रामचंद्र शेटांनीं ह्याची गोष्ट सोडिली. मग त्यांनीं मला सांगितलें कीं, लहानगे मुलास न्यावयाकरितां मी मनुष्य पाठवीन, कांकीं, तो तुझे जवळ असला तर तुला अधिक श्रम पडेल. असें बोलून जातांना त्यांनीं मला कांहीं पैसे ह्या मुलाकरितां दिले. ह्याप्रमाणें ह्याचें वर्तमान.

सांप्रत आणखी एक दुःख मला असें झालें आहे कीं, ह्या मुलाचा बाप तर अझून येत नाहीं; आणि गांवांत बोलतात कीं, तो चोरांचे मंडळींत शिरला आहे;

आणि मानाऊनें त्या लाजेनेंच जीव दिला. ह्या गांवांत जिकडे तिकडे मुलांचे तोंडीं देखील ह्याच गोष्टी. आणि हा मुलगा मुलांचे मंडळींत गेला ह्मणजे तीं ह्यास हांकलून देतात, आणि फिरून आलास तर मारूं ह्मणतात. तेणेंकरून हा अगदीं वेडावला आहे; बाहेर पाऊल घालीत नाहीं; गेला तर आईस पुरलें आहे तेथें मात्र जातो.

देवराव तें सर्व वर्तमान ऐकून बहुत क्लेश पावले. जगू जाऊन सोसाऊचे अंगाशीं लगटला; तो तिजकडे काकळूतवाणें तोंड करून पाही, आणि तिला आई आई ह्मणून ह्मणे. तेसमयीं देवराव ह्मणाले, "सोसाऊ, तूं फार भली बायको आहेस; त्वां उदारबुद्धीनें ह्या अनाथ कुटुंबाचा चांगला समाचार घेतला, ईश्वर तुला ह्याचें फळ चांगलें देईल.

**सोसाऊ**– मी ह्या गोष्टींत मला जें योग्य त्याहून कांहीं अधिक केलें असें नाहीं. एकमेकांस साहित्य करावें ह्मणून आपणांस ईश्वरें ह्या लोकीं पाठविलें आहे. मी आपले मनांत नित्य असें आणितें कीं, आसनीं, शयनीं, भोजनीं, गमनीं, जें मी सुख अनुभवितें त्याविषयीं मी सर्व प्रकारें भगवंताची ऋणी आहें; तर आपणापासून होईल तितका परोपकार करावा ह्यासारिखें दुसरें कोणतेंही त्या भगवंतास संतोष देणारें कर्म नाहीं. आहा मजपासून ह्याहून अधिक घडलें असतें तर किती बरें होतें! पण मी काय करूं?

मजपाशीं ही एक झोंपडी आणि एक लहानसा मळा आहे, त्यांत खपतें त्यानें पोट मात्र भरतें. मी रांडावून आठ वर्षें झालीं, पण आजपर्यंत मी अबरूनें दिवस काढिले. ह्या पुढेंही भगवान् माझा असाच परिणाम लावो, ह्मणजे झालें.

देवराव– पण त्वां हा मुलगा आपलेपाशीं बाळगिला असतां, हा जाणता होईपर्यंत तुला ह्याचे खर्चाविचाविषयीं मोठी अडचण सोसावयाची पडेल नाहीं?

सोसाऊ– ह्याचें उणें मी कधीं पडूं देणार नाहीं. मी घांसभर उणें खाईन, पण ह्याचीं पोटभर करीन.

देवराव– ह्यास पोटास घालशील, पण वस्त्रें कोठून पुरविशील?

सोसाऊ– तें मी त्या देवावर टाकीन, जो भुईस तृणाचें वस्त्र पांघुरवितो, आणि झाडांस पानांचें; त्यानें मला सूत कांतावयास आणि शिवावयास बोटें दिलीं आहेत, तीं ह्याचे वस्त्राकरितां श्रम करितील. जो देवास भजेल, आणि सामर्थ्याप्रमाणें उद्योग करील, त्यास तोटा पडणार नाहीं.

देवराव– तर ह्या मुलास बाळगावें असा तुझा निश्चय आहे?

सोसाऊ– असा माझा दृढ निश्चय आहे. ह्या अनाथास वेगळें करून माझा प्राण वांचणार नाहीं.

देवराव– मला वाटतें कीं, ह्याची तूं कोणी सोयरी असावीस?

सोसाऊ– सोईरगत इतकीच कीं, आह्मी एका देवाचीं लेंकरें.

देवराव– तर मीही त्या देवाचें लेंकरूं, ह्मणून ह्या मुलाचें बरें करण्याचें सर्व पुण्य तुला एकटीला घेऊं देणार नाहीं; कांकीं ईश्वरें तुजपेक्षां मला पुष्कळ सामर्थ्य दिलें आहे. तर ह्याचे विद्याभ्यासाची तरी सोय मी करीन. ह्या मुलाची भक्ति आईकडे पाहून जसा ह्या माझे प्रीतीस पात्र आहे, तशीच तुझी भक्ति ह्यावर पाहून तुजवरही मी संतुष्ट आहें. ह्यासाठीं मी तुह्मां उभयतांस माझे घरीं नेतों, तूं आपलें झोंपडें आणि मळा विकून माझे घरीं येऊन राहा. तेथें तुला अन्न वस्त्र व जागा ह्यांचा, जीवंत आहेस तोंपर्यंत, तोटा पडणार नाहीं.

सोसाऊ– ( त्याकडे ममतेनें पाहून, ) महाराज, आपणास राग येऊंनये. भगवान् तुमचें कल्याण करो ! पण माझ्यानें तुह्मी ह्मणतां त्यास रुकार देववत नाहीं.

देवराव– कां ?

सोसाऊ– एक तर, जेथें मी फार दिवस काढिले त्या माझे जन्मभूमीची ममता मला सुटत नाहीं; आणखी, श्रीमंतांचे घरीं लोकांचे गडबडींत मला राहतां येणार नाहीं. एकटी राहाण्याचा अभ्यास त्यामुळें तुमचे घरीं मनुष्यांचा सहवास मला अडचण करील. चांगलें खाणें, निरुद्योग राहाणें, ह्यांची सवई मला नाहीं.

काम नाहीं केलें तर, किंवा नित्य खातें त्याहून चांगलें खाल्लें तर, मी तत्काळ दुखण्यांस पडेन. ह्यासाठीं महाराजांपाशीं मी मागून घेतें कीं, मला ह्या मुलासहवर्तमान माझे झोंपडींतच राहूंद्या. तुमचे मर्जीस आलें तर कधीं कधीं कांहीं पैसे पाठवून द्या; ते ह्याचे शिकण्याचे, व हा जो धंदा करील त्याचे, उपयोगीं पडतील. ह्यास द्याल त्याचे शंभरपट तो कृपाळू ईश्वर तुह्मांस देईल, आणि तुह्मांस द्यावें अशी हा मूल आणि मी नित्य देवाची प्रार्थना करूं. मला मुलगें नाहीं, हा मला पोटच्याचे ठिकाणीं आहे. जेव्हां मला आपले जवळ बोलवावें असें ईश्वराचे इच्छेस येईल तेसमयीं माझे जवळ जें थोडें बहुत आहे तें ह्याचेंच आहे.

देवराव– बरें तर, तसें कां होईना. मी तुमचें बरें ह्मणून करणार, ज्यापासून तुह्मी असुखी व्हाल तें मी इच्छीत नाहीं. जगू तुजपाशीं असो, आणि तुह्मी दोघें सुखी असा. तूं ह्यापाशीं माझी गोष्ट सदा काढीत जा. ह्यास सांगत जा कीं, देवराव तुला बापाचे जागीं आहेत, आणि जी करितां तूं इतका दुःखी आहेस त्या आईचे ठिकाणीं मी तुला आहें; तुह्मांस पोटास लागेल तें मी दरमहिन्यास पाठवीत जाईन आणि मीही स्वतां येऊन तुमचा समाचार घेईन. असें समज कीं, माझें येणें जितकें ह्या मुलाकरितां, तितकेंच तुजकरितां होईल.

सोसाऊनें वर देवाकडे डोळे करून देवरावाचा दुवा मागितला. नंतर ती मुलास बोलिली, " जगू, इकडे ये; आणि ह्यांचे पायां पड! आणि आशीर्वाद माग. आजपासून तुला हे बापाचे ठिकाणीं आहेत." जगूनें तसें केलें, पण सोसाऊस पुशिलें कीं, " हा माझा बाबा कसा होईल? ह्याचा नेसावयाचा पंचा कोठें आहे " देवरावांनीं तो प्रश्न ऐकून कौतुक केलें, आणि जवळ रुपयांची पिशवी होती ती सोसाऊचे झोंपडींत ओतून ते तिला ह्मणाले, " भले सोसाऊ, आतां मी निरोप घेतों!" मुलास ह्मणाले " माझे लाहानग्या, मी येतों!" असें बोलून ते घोड्यावर बसले, आणि जगूचा धाकटा भाऊ रामचंद्र शेटानें नेला होता, ह्मणून त्याचे घराकडून गांवीं जावयास निघाले. रामचंद्रशेट घरींच होता, त्याची त्यांची भेट होऊन परस्पर आगत स्वागत झाल्यावर देवरावांनीं आपले येण्याचें प्रयोजन रामचंद्र शेटास सांगून पुसलें कीं, ह्या अनाथ मुलाचे बापाचा ठिकाणा कोठें लागला आहे? त्यानें उत्तर केलें कीं, नुकती अर्धघटिका झाली, त्याचें पत्र मला आलें तें हें माझे हातीं आहे; ह्यांत त्यानें आपले बायकोस पत्र लिहून भिडलें आहे, त्याबरोबर लहानशी हुंडीही पाठविली आहे, तें पत्र तीस देऊन मी तिचें समाधान करावें अशी मला विनंती लिहिली आहे. ती वारली ह्मणून तिचें पत्र मी उघडिलें, तें हें कृपा करून आपण वाचावें.

देवरावांनीं उत्कंठेनें तें हातीं घेऊन वाचिलें. येणें प्रमाणें.

" माझे परमप्रिये स्त्रिये "

" माझे विरहेंकरून तूं फार दुःख पावत असशील हें मनांत येऊन मला फार व्यथा होते. आतां माझें वर्तमान ऐक. मी रामचंद्रशेट ह्यांजकडे जावयास निघालों, तों वाटेंत ह्या गोष्टी माझे मनांत आल्या, " मी असा पैसे मागावयास जाऊन काय फळ ? त्यांत इतकें मात्र होईल कीं, एक कर्जकरी वारून दुसरा केला; तरी कर्जाची चिंता आहे ती आहेच. जो मी आज तरणा आणि काम करावयास बळकट आहें, त्या म्यां जाऊन इतके पैसे दीनवाणेपणें मागावे ह्यांत शोभा आहे ? मला ते आळश्यांत किंवा व्यसन्यांत नाहीं गणणार ? रामचंद्रशेट ह्यांनीं आमचें लग्न केलें खरें, आणि ते मला पुत्राप्रमाणें चाहतात हेंही खरें, पण जर त्यांचे मनांत वांकडें आलें, आणि त्यांनीं मला नाहीं ह्मटलें, किंवा आमचें संकट परिहारावयास त्यांस सामर्थ्य नसलें तर ? बरें, कधीं त्यांपासून वर्षाचे बोलीनें मला पैसे मिळाले, तर ते मी वर्षाच्या आंत फेडीनच अशी तरी मला खातरी आहे ? आणि जर मीं फेडले नाहींत, तर चोरामध्यें आणि मजमध्यें हरण करण्याविषयीं अंतर काय ? " असा मी विचार केला आणि योजूं लागलों कीं, चांगले मार्गानें मी ह्या संकटांतून मोकळा होईन असा उपाय कोणता करावा ? तेसमयीं माझे डो-

ळ्यांत वारंवार पाणी आलें, आणि मी वर भगवंताकडे दृष्टि केली; तों अकस्मात् माझे मनांत आलें, आणि मी आपणाशीं बोलूं लागलों "अरे तूं अझून तरुण आहेस, आणि शरिरानें दृढ आहेस; थोडीं वर्षें देशांतरीं गेलास तर काय चिंता आहे? तुला लिहितां वाचतां येतें, व हिशेब चांगला ठेवितां येतो. दैववशात् कोठें चांगला रोजगार लागला तर तूं आपल्या बायको मुलांस सुखी करूं शकशील; बरें हें नाहीं झालें तर आपलें कर्ज तरी वारशील. विचार कर कीं, तेथें तुझें दैव उघडलें तर एकादा मोठा लाभ होऊं शकेल. असा एक घटिकापर्यंत विचार करीत होतों, इतक्यांत कोणी लोक माझे मागून येत आहेत असें मी पाहिलें. ते मजजवळ आले; तेव्हां त्यांनीं मला पुसलें, "तूं कोण आहेस? कोठें काय उद्देशानें चालला आहेस? आह्मांबरोबर लश्करांत येशील?" मी प्रथम अनाकानी केली, तेव्हां त्यांनीं पुनः मला पन्नास रुपये इनाम देऊं करून बोलाविलें. मी त्यांस सांगितलें कीं, "इतक्यावर तर मी लढाई संपेपर्यंत चाकरी करीन." ते ह्मणाले, "बरें तर, तुझें आमचें ठरलें; आतां चल तूं आह्मांबरोबर पुढचें आह्मी तुझें सगळें नीट करूं." मग त्यांनीं मला आपले सरदारापाशीं नेलें; त्यानें मला कांहीं प्रश्न केले; त्यांचीं उत्तरें देऊन मी त्याचे खातरेस उतरलों, तेव्हां त्यानें मला तत्काळ पन्नास रुपये दिले. माझे प्रिये, त्यां कर्जा वेगळें व्हावें ह्मणून असा मी चाकरींत गुंतला गेलों. मी

त्या पन्नास रुपयांची हुंडी तुजकडे पाठविली आहे, त्यांतील एक दमडी ठेविली नाहीं. तर हे घेऊन वीस रुपये कर्ज आहे तें पहिल्यानें फेड; बाकीच्यांचें तुझे मनास येईल तें कर, तूं नीटपणें राहा; आपली शरीरप्रकृति सांभाळ; मुलांस चिरगुटें कर, त्यांस शाळेंत पाठवित जा. त्वां जपून खर्च केला तरी इतके पैसे फार दिवस पुरणार नाहींत हें मी जाणतों; पण धीरधर माझी तैनात महिना पांच रुपये आहे, त्यांतलें कांहीं मागें पाडून कांहींका महिन्यांनीं तुला आजखी मी पाठवीन. लष्कराबरोबर परत येईन तेव्हां धांवत आधीं मी तुझे भेटीस येईन. माझे साध्वी स्त्रिये, तूं दुःख करूं नको. भगवंतावर विश्वास ठेव; तो लवकरच आपणांस सुखी करील. मुलांस चांगला मार्ग लाव; त्यांना बाहेर उनाडमुलांकडे जाऊं देऊं नको. तूं स्वतां उद्योग करीत ऐस. मुलांसहवर्तमान देवास भजत जा. त्यांस सुमार्ग शिकीव, जेणें करून तीं भलीं होतील. तूं हें सर्व करावयास योग्य आहेस, ह्या विषयीं मला संदेह नाहीं. ईश्वरास भीत जा. त्याकडे तूं मजविषयीं प्रार्थना कर, आणि मी तुजविषयीं करीन. पत्राचें उत्तर लवकर पाठीव. तूं रामचंद्रशेट ह्यांजकडे पत्र आणून दे, ते मी असेन तेथें पाठवितील. दोघांमुलांस माझा आशीर्वाद सांग; जगूस सांग कीं, तूं चांगला चालशील तर मी येतेसमयीं कांहीं तुजकरितां आणीन.

ईश्वर तुझें कल्याण करो. मजवर तुझी आहे तशी प्रीति असो.

सही जानोजी.

पत्र वाचतांना देवरावांचे डोळे भरून पाणी वाहूं लागलें. वाचणें झाल्यानंतर तो ह्मणाला, हा पुरुष चांगला भ्रतार, चांगला बाप, आणि सज्जन मनुष्य आहे असें ह्मणावें. अशा मनुष्यास सुखी केल्यांत वास्तविक समाधान आहे. तर आतां जानोजीचें कर्ज मी फेडीन, आणि त्यास पुनः चांगले रोजगारास लावीन. मुलें कर्ती होत तों पैसे आले आहेत हे तुह्मांजवळ असूं द्या, ह्यांचें व्याज मी प्रतिवर्षी तुह्मांस देईन; तें तुह्मी मुद्दलांत मिळवीत जा. तें ऐकून रामचंद्रशेटाचा गळा भरून आला, तेणेंकरून त्याच्यानें देवरावांस उत्तर करवलें नाहीं. देवरावही त्याचें मुकाट्यां राहण्याचें कारण जाणून त्यास नमन करून निघाले. नंतर देवरावांनीं जानोजीविषयीं जें मनांत योजिलें होतें तें सर्व सिद्धीस नेलें. त्यांनीं जानोजीस लश्करांतून आणवून त्यास रोजगारास लाविलें, आणि सर्व प्रकारें सुखी केलें, तसा तो पूर्वीं कधीं नव्हता. त्याची तेवढी बायको जीवंत असती तर त्याच्या सुखास जोडा नव्हता. तो सोसाऊ संगातीं मानाऊचे गुणांच्या गोष्टी करी, आणि समाधान पावे. ती थोर बायको सोसाऊही, त्याशीं बहिणीप्रमाणें वागली, आणि मातेप्रमाणें तिनें त्याचे मुलांचें संरक्षण केलें. जगू नित्य स्मशानांत जाऊन आईचे जाग्याचें

दर्शन घेई. देवरावांनीं त्याविषयीं जो खर्च केला त्याचें त्यानें विद्याभ्यास करून यथास्थित सार्थक केलें; त्यास योग्य पाहून देवरावांचे मनांत आलें कीं, ह्यास कांहीं मोठें काम सांगावें. जगूचे धाकटे भावाचाही देवरावांनीं तसाच समाचार घेतला. तोही मुलगा चांगला गुणी निपजला. देवराव जेव्हां जेव्हां घोड्यावर बसून फिरावयास जात, तेव्हां तेव्हां त्यांस ह्या धर्मकृत्याचें स्मरण होऊन समाधान वाटे. जेव्हां जेव्हां त्यांस दुःख होई, तेव्हां तेव्हां ते आपण सुखी केलेल्या माणसांकडे जाऊन पाहून श्रम परिहार करीत. आणि घरास स्वस्थ होऊन येत.

---

# गवंडी व मजूर.

कोणे एके दिवशीं द्वारकानाथभट्ट, आपला मुलगा हरी ह्यास घेऊन, बाजारचे रस्त्यानें चालले होते, तेथें एक मोठी हवेली बांधण्याचें काम चाललें होतें, तें कौतुक पाहावयास तें अंमळ तेथें उभे राहिले. तें काम दुसरे मजल्यापर्यंत चढलें होतें. हरीनें पाहिलें कीं, त्यास परांच्या केल्या आहेत; त्यांवर शिड्या लाविल्या आहेत; त्या शिड्यांवरून एकावर एक अशीं माणसें आहेत; तीं अनुक्रमानें खालवर हात नाचवीत आहेत. तें पाहून हरि बापास पुसतो, “ बाबा, हीं माणसें कसचा

खेळ खेळताहेत? आपण अंमळ शिडीजवळ जाऊं, येतां?

मग त्यांनीं अंमळ जवळ जाऊन पाहिलें कीं, एक मनुष्यानें राशींतून एक दगड उचलून शिडीचे तळपायरीवरचे मनुष्याचे हातीं दिला; त्यानें तो घेऊन हात वर केले, तों तो त्याचे वरच्यानें घेतला; त्यानें हात वर करून तिसऱ्याचे हातीं दिला; त्यानें तसेंच करून चौथ्याचे हातीं दिला. असा एकाचे हातून दुसऱ्याचे हातीं जात जात तो दगड क्षणांत परांचीवर गेला, तेथें गवंडी होते त्यांनीं तो तत्काळ कामीं लाविला.

द्वारकानाथ– मुला, हें पाहून तुला असें वाटतें कीं नाहीं, कीं इतकीं माणसें ह्या घरावर कशास लाविलीं आहेत? ह्याहून असें केलें तर चांगलें, कीं ह्या सर्वांस निरोप देऊन हें घर ज्याचें त्यानें जातीनिशीं बांधावें, आणि असेंच ज्यानें त्यानें करावें?

हरि– खरी गोष्ट, बाबा, असें होईल तर आतां आहेत त्यांपेक्षां घरेंही पुष्कळ होतील.

द्वारका०– मुला, तूं काय ह्मणतोस ह्याचा चांगला विचार केला? असें एक घर बांधावयास किती प्रकारचे कसबी आणि किती प्रकारचे उद्मी लागतात, तें तुला ठाऊक आहे? जो एकटा घर बांधूं लागेल, त्यास तीं सर्व कसबें आलीं पाहिजेत; तीं पुरतीं यावयास सगळें आयुष्य पुरणार नाहीं; मग घरास आरंभ कोठला? बरें, जरीं घर बांधावयापुरत्या सर्व

विद्या त्यास थोडके दिवसांत आल्या, तरी पाहा कीं त्यानें जातीनिशीं प्रथम उनांत खपावें; पायाकरितां भुई खणावी; नंतर दगडाची खाण काढावी; तेथें सुरंग्या, बेलदार, व्हावें; चुनखडे मेळवावे; ते भाजावयाकरितां लांकडें तोडून आणावीं; त्याचा चुना झाला म्हणजे कुटावा; नंतर गवंडी व्हावें; पाया भरावा; लांकुडतोड्या होऊन लांकडें तोडून आणावीं; सुतार होऊन तीं तासावीं; अरकशी होऊन अरकसावीं; तीं उभीं करावीं; आंबाडी पेरून तिचे दोर करावे; दगडांतून लोखंड गाळावें, लोहार होऊन तें घडावें; सुतार गवंडी इत्यादिकांचे कामाकरितां हातेरें करावीं, पुढें तांब्याची गरज लागेल तेव्हां त्याची खाण काढण्याकरितां देशांतरीं जावें; रंगमसाले पाहिजेत त्यांसाठीं द्वीपांतरीं जावयास नाव बांधावी; कोष्टी होऊन कापड विणावें; त्याचीं अवजारें करावीं; दर्यावर्दी होऊन नाव वाहावी; घर बांधीत असतां एकट्यानेंच मेजमाप घ्यावें; शिड्या लावाव्या; पारांच्या बांधाव्या. ह्याप्रमाणें सगळीं कामें एकटाच करूं लागला तर तो किती दिवसांत घर पुरतें करील बरें?

हरि– ओहोहो! बाबा, मला वाटतें कीं, अशा प्रकारानें घर कधींही पुरतें होणार नाहीं.

द्वारका०– खरेंना? तर तूं सर्व व्यवहार असाच पाहा.

जर कोणी ह्मणेल कीं, मला कोणाची गरज नाहीं; मला जें व्हावें तें मी एकटा करीन; मला कोणी सहाय होऊं नये, आणि मी कोणास होणार नाहीं; तर असें होईल कीं, त्याच्या शक्ति लवकर क्षीण होतील, आणि तो जें काम घेईल तें त्याला अपुरतें टाकून द्यावयाचें पडेल. मनुष्यें जर एकमेकांस सहाय झालीं तर कसेंही कठिण, कसेंही अडचणीचें काम असलें, तरी थोडके वेळांत पार पाडतील; तेंच जर एकटा करूं ह्मणेल तर, त्यास जन्मवरही होणार नाहीं. अशींच ह्या लोकांचीं सगळीं सुखें, जो ह्मणेल कीं, माझीं मी एकटाच भोगीन, त्याला तीं थोडींच प्राप्त होतील. आणि जर एकमेकांनीं एकमेकांस सुख दिलें तर सर्वांचे सुखांत एकमेकांचें सुख सहज आहे. आपण आपलीं आईबापें, भाऊबंद, स्त्रीपुत्र, इष्ट ओळखी, चाकर कुळंबिणी, गांवकरी व सर्व लोकं, ह्यांस आपले शक्तीप्रमाणें सुख दिलें, तर तीं सर्व मिळून आपणास सुख देतील; तितकें आपले एकट्याचे प्रयत्नानें होणार नाहीं. मुला, तुला पुढें लौकिकांत यावयाचा प्रसंग आहे, ह्मणून ह्या कामकऱ्यांचा दृष्टांत आपले मनांत पक्का ठसवून ठेव; तेणेंकरून तूं सुखी होशील. तूं पाहा, ते एकमेकांचे श्रमाचें ओझें किती हलकें करिताहेत तें! आपण आणखी कांहींका दिवसांनीं इकडे येऊं तेव्हां तूं हें घर पुरतें झालेलें पाहाशील. ह्यासाठीं

जर तूं इच्छितोस कीं मजकरितां लोकांनीं श्रम घ्यावे; माझें बरें करावें; मला सहाय व्हावें; तर तुलाही लोकांकरितां तसें करणें आवश्यक आहे.

---

## तरवार.

### नाटक एक अंकी.

### पात्रें.

| | |
|---|---|
| संभाजीरावघोरपडे. | कोणी मोठा गृहस्थ. |
| गणपतराव. | त्यांचा मुलगा. |
| रेवाबाई. | त्यांची मुलगी. |
| रावजीसांवत.<br>राणूसांवत.<br>दामूपोंवार.<br>दिनकरपोंवार. | गणपतरावाचे मित्र. |
| केरोजी. | संभाजीरावांचा खिजमतगार. |

### स्थळ.

गणपतरावाची खोली.

### प्रवेश १,

गणपतराव.

आहा ! आज माझा वाढदिवस ! बरें झालें त्यांनीं मला सांगितलें; नाहीं तर मला सई झाली नसती. आ-

ज मला बाबाकडून कांहीं भेट लाभेल. बरें, पाहूंया तो मला काय देतो. केरोजी नुकताच कांहीं बगलेंत मारून इकडून गेला. अंमळ मी त्याचे गळीं पडलों असतों तर तो मला पाहूं देता काय तें. पण अंः! काय आहे तें आतां मजकडे येईल. हा माझा बाबा आला.

---

## प्रवेश २.

### संभाजीराव आणि गणपतराव.

संभाजी०— (हातांत तरवार घेऊन) गणपतराव, तुह्मी एथें आहां काय? आज तुमचा वाढदिवस ह्मणून तुह्मांला मी खुशाली द्यावयास आलों आहें. पण मला वाटतें कीं, कोरडे खुशालीपेक्षां तुह्मांस आणखी कांहीं असावें, नाहीं बरें?

गण०— पण बाबा, तें तुझे हातांत काय आहे?

संभा०— आहे तें तुला शोभणार नाहींसें मला वाटतें. ही तरवार आहे, पाहा.

गण०— काय! ही मजकरितां आणिली आहे? दे तर, दे तर, लवकर दे तर माझ्या बाबा. आजपासून तूं पाहा कीं, मी चांगला चालेन.

संभा०— पण तूं जाणतोस? तरवार मुलास योग्य नाहीं. ती मोठ्या पुरुषानेंच बाळगावी. हिचे बाळगणारानें मोठे चौकशीनें आणि थोरपणानें असलें पाहिजे; सारांश तरवारीचे योगानें मनुष्यास शोभा असूनये;

मनुष्याचे योगानें तरवारीस शोभा असावी.

गण०— तूं त्याची कांहीं काळजी करूं नको, बाबा, मी भाष देतों, घे ही, कीं, माझीस मी शोभवीन. मग मी त्या हलके लोकांशीं बोलणार नाहीं.

संभा०— आं, आं, तूं हलके लोक कोणास ह्मणतोस ?

गण०— मी हलके लोक त्यांस ह्मणतो, ज्यांना आपले सारिखा तरवार बाळगावयाचा अधिकार नाहीं.

संभा०— माझे मतें तर, जे अचिंत्य चिंतितात; जे अकार्य करितात; जे आईबापांची अवज्ञा करितात; लोकांशीं विनयानें, थोरपणानें, चालत नाहींत; ते हलके लोक होत. तर असले हलके मनुष्य श्रीमंत लोकांमध्येंही फार दृष्टीस पडतात; आणि ज्यांत हे दुर्गुण नाहींत असले थोर मनुष्य गरिबांमध्येंही बहुत आढळतात.

गण०— तर माझेंही मत तसेंच, बाबा.

संभा०— तर नुकताच तूं काय बोललास ? रे असल्या फिशाऱ्यांत थोरपणाचें लक्षण आहे असें तुला वाटतें ?

गण०— नाहीं नाहीं, बाबा, तुह्मी सांगतां तेंच खरें. पण मी तरवार बाळगिली असतां मला दूषण तर नाहीं ?

संभा०— नाहीं, मी इतकेंच ह्मणतों कीं, त्वां चांगले गुण करून तरवार धरण्यास योग्य असावें. आतां घे ही, पण आठवण धर हो.

गण०— होय बाबा, होय बाबा, तूं पाहा बरें. ( तो तरवार पडद्ळांत घालून गळ्यांत अडकावितो. )

संभा०— तर मी आतां येतों, बोललों आहें त्याची आठवण धर बरें. येतों, तुला कुशल असो. ( तो जाऊन मागें फिरतो. ) मी विसरून गेलों, आज तुशीं खेळावयास मी नुकतेंच तुझे सवंगड्यांना बोलावणें धाडिलें आहे; त्यां संगतीं तूं नीट चाल हो.

गण०— होय, बाबा, चालेन.

---

## प्रवेश २,

### गणपतराव.

( इकडून तिकडे जातो येतो; मागें तरवार लटकत आहे कीं नाहीं ती वरचेवर पाहातो. ) वाः, हें खासें काम आहे ! ही घातल्यापासून मजवर मोठेपणा दिसतो खरा ! कोणाही गांवकऱ्यांस ह्मणावें, आतां तुह्मी माझे समोर या पाहूं. जर त्यांजजवळ तरवार नसेल तर, ते मजशीं सलगी करावयास अतःपर योग्य नाहींत, हें मी त्यांस परिच्छिन्न सांगेन; आणि जर त्यांनीं गडबड केली तर, हूं भोसकून टाकीन. पण थांब, हिचें पान कसें आहे तें पाहूं! (तरवार म्यानांतून उपसतो, आणि डोळे वटारून रागानें पाहातो. ) काय ? तूं बनियां माझी अमर्यादा करितोस ? ( तरवारीचे झटके मारितो. ) एक ! दोन ! तीन ! तुह्मी मजसमोर उभे राहाणार; होय ? मरा

शिनळीच्यांनो आतां; पडा दांत वासून.

---

## प्रवेश ४,

### रेवाबाई आणि गणपतराव.

रेवा०— ( हे शेवटचे शब्द ऐकून किंकाळी फोडीतच येते. ) काय गणपतराव, हें तूं काय बोलत आहेस? तुला चळ तर लागला नाहीं?

गण०— कोण? ताई, तूं आहेस काय?

रेवा०— होय, पाहाशील तर मीच आहें. ( तरवारीकडे बोट करून. ) पण हें शस्त्र घेऊन तूं पुढें काय करणार?

गण०— काय करणार? थोर मनुष्यें करतात तें.

रेवा०— ज्यांस त्वां मरा असें ह्मणून नुकतेंच परलोकास पाठविलें, ते दैववान् कोण होते बरें?

गण०— अं:, तें उगीच; पण ताई, मी तुला खरेंच सांगतों, जो ह्या माझे भिंतीच्या आंत येईल त्याचें, होमी कंदनच काढीन.

रेवा०— तर आज पुष्कळांचे प्राण संकटांत आहेत. मला वाटतें कीं, पहिले तडाक्यास तर मीच सांपडलें आहें.

गण०— तूं? तसें होणार नाहीं, पण मी आतां समशेर बाहादर झालों, समजलीस? बाबानें मला ही तरवार नुकतीच बक्षीस केली आहे.

रेवा०— लोकांस मारावयाला वाटतें ?

गण०— काय मी आतां बाहादर नाहीं झालों ? आतां लोकांनीं माझी मर्यादा ठेवावी; नाहीं तर, पाहातांच प्रथम फाडकन तोंडांत मारीन. त्यावर जर त्यांनीं उत्तर केलें, तर मग, ह्या तरवारीचा फटका पाहिला हा ? ( तो तरवार बाहेर काढावयास लागतो. )

रेवा०— भाऊ, माझें ऐकशील तर ती एकीकडे ठेव, आणि मजपाशीं सांगून ठेव कीं तुझी मर्यादा ती कशी ठेवावी. न जाणों एकादे वेळेस चुकून तशी गोष्ट व्हावयाची; ह्मणून समजून घेतलें असावें.

गण०— तें तुला आतां लवकरच समजेल. बाबानें माझे संवगड्यांस बलावूं पाठविलें आहे. जर तीं पोरें मर्यादेनें मशीं वर्तलीं तर बरें, नाहीं तर मग पाहा मी कसें करीन तें.

रेवा०— बरें पण, तुझी मर्यादा कशी राखावी तें तर सांगशील ?

गण०— प्रथम तर मला नमावें; फार लवून नमावें.

रेवा०— (त्यास फार लवून नमते.) समशेर बाहादर महाराज, बडेज्याव, मी तुमची दासी आहें, मजवर नजर रख्ये. कां ? हें ठीक उतरलें ना ?

गण०— रेवा, मस्करी नको करूं, नाहीं तर—

रेवा०— मस्करी नव्हे, हें वास्तविक पुसतें. कांकीं, थोर मनुष्यांशीं कसें वागावें हें समजलें पाहिजे, आणि तुझे बाळमित्र येतील त्यांसही पूर्वींच सुचविलें अ-

सतां वरें पडेल.

गण०— मी त्या पोरांचा अंमळ तमाशा करणार आहें. एकाला ओढीन, एकाला विचकुरे घेईन, एकाला टपलेबाजी करीन; अशा अशा त्यांच्या मस्कऱ्या करीन.

रेवा०— असल्या गोष्टी कराव्या ही समशेर बाहादर लोकांची रीति आहे वाटतें? पण त्या पोरांस तो तमाशा आवडला नाहीं, आणि त्यांनीं समशेर बाहादरांची उलटी पूजा केली तर?

गण०— काय! त्या मुर्कुटांनीं! नीचांनीं! अरे जारे, त्या गरिबांनीं काय करावयाचें आहे? त्यांना छाती आणि तरवार दोन्ही नाहींत.

रेवा०— खरेंच, बाबानें तुला आज मोठे उपयोगी वस्तूची भेट दिली. त्याला वाटलें कीं, लेंकाचे रूपानें आपले पोटीं कोणी हा महावीर जन्मला आहे; ह्याचे गुण प्रगट व्हावयास ह्यास एक तरवार मात्र उणी आहे.

गण०— ऐक ताई, आज माझा जन्मदिवस; कांहीं करमणूक तर केली पाहिजे. असो, तूं ह्यांतलें कांहीं बाबापाशीं बोलूं नको हो.

रेवा०— कां नको? तुजपासून असले पराक्रम व्हावे ह्मणूनच त्यानें तुला तरवार बक्षीस केली असेल, आणि असा तुला त्याचा उपदेशही असेल.

गण०— ह्यांत काय संशय,— तो मला सर्वदा असेंच

सांगत असतो.

रेवा०— कसें सांगत असतो?

गण०— कोण जाणें, मला आतां चांगलें स्मरत नाहीं; मला वाटतें कीं हें असावें. "तरवारीला आपण शोभवावें, तरवारीनें आपणास शोभवूं नये."

रेवा०— ह्याचा अर्थही तूं चांगलाच समजला असशील कीं, तरवारीस शोभवावें ह्मणजे तिचा उपयोग करावयास जाणावें; तो तूं नीट जाणतोस?

गण०— तुला सगळी मस्करीच वाटते. पण बाईसाहेब, तुह्मी जाणा कीं—

रेवा०— ओ हो! तूं सांगणार तें मला आधींच ठाऊक आहे; पण तुझ्या ह्या तरवारीस मुख्य भूषण तें अझून पाहिजेच, हें तूं जाणतोस?

गण०— तें काय? (तरवार पडदळांतून काढून निरखून पाहातो.) हींत कांहीं उणें आहेसें मला दिसत नाहीं.

रेवा०— खरेंच! तर तूं मोठा शाहाणा तरवार धरणारा आहेस. हिला आतां एक गोंडा नको? तो असल्यावर किती छानदार दिसेल!

गण०— खरी कल्पना काढली. ऐकतेस, तर गडे, तुझे पेटींत कलाबतू व रेशीम पुष्कळ आहे त्यांतलें—

रेवा०— तेंच मी लक्षांत आणिलें आहे. पण जर तूं मजपुढें आपली कवाईत करून दाखविणार नाहींस, आणि तरवारीचें पान माझे अंगावर ठेवून

उपकार फेडणार नाहींस तर.

गण०— वेड सगळें! हाघे हा तावर हात; झालें? आतां तुला कांहीं भय नाहीं. पण लवकर, एक छान-दार गोंडा! जरीचा! माझी मंडळी येईल तिनें मला माझे सगळे वैभवांत पाहावें, त्यांत चमत्कार आहे.

रवा० तर तरवार मजकडे दे.

गण०— ( तिजकडे ती देतो. ) ही घे; जलदी कर. काम झालें ह्मणजे हळूच ह्या सत्रंजीवर आणून ठेव-कीं, पाहिजे तेव्हां मला सांपडेल.

रेवा०— त्याविषयीं तूं काळजी करूं नको.

---

## प्रवेश ५,

### गणपतराव, रेवाबाई, आणि केरोजी.

केरोजी— आपले मित्र, दोघे सांवत व दोघे पोंवार खा-लीं आले आहेत.

गण०— मग ? त्यांच्यानें वर येववत नाहीं काय ? त्यां ना आणावयास खालपर्यंत मला आलें पाहिजे ?

केरोजी— आपण खालीं येऊन त्यांस मान द्यावा, अ-सें आईसाहेबांनीं आपणास सांगितलें आहे.

गण०— नाहीं, नाहीं; मी त्यांची वाट येथें पाहीन तें चांगलें.

केरोजी— खरें पण, आईसाहेब सांगतात त्या अर्थीं तु-

ही खालीं जावें. ह्यांत—

गण०— हें खरें? त्यांस इतका सत्कार योग्य आहे? बरें तर मी ह्याच आलों. रेवा, अगे चल लवकर, तिकडे काय करितेस? अशानें तरवारीचा गोंडा होईल काय? चल धांवत; खबरदार गोंडा चांगला झाला, आणि तरवार चांगली दिसली तर बरें आहे; नाहीं तर दाखवीन कसें तें. तरवार माझे खोलींत आणून ठेव. ( बाहेर निघून ) ऐकिलें?

## प्रवेश ६

### रेवाबाई.

( आपणाशीं. ) काय पोर अमर्याद! पाहा तो मला कसा बोलिला! बरें झालें कीं तरवार मजपाशीं आहे. असलें हातेर आणि भांडखोराचे हातांत, मग काय! ( मोठयानें, गणपतरावास ) होय होय, थांब माझें होईपर्यंत; ( फिरून आपणाशीं ) मी तुला ओळखितें तसा बाबा तुला ओळखीत नाहीं. हे तुझे गुण त्याला सांगितले पाहिजेत;— ठीक झालें हा बाबा आला.

## प्रवेश ७

### संभाजीराव आणि रेवाबाई.

रेवा०— बाबा, तूं बरा आलास, मी तुजकडेच येत होतें.

संभा०— असें नाजूक काम काय आहे? — त्वां आपले भावाची तरवार कशाला घेतली?

रेवा०— ही गोंडा लावावयाकरितां ह्मणून म्यां त्यापासून घेतली आहे; पण त्याकडून हें घातक हातेर काढून घ्यावयासाठीं म्यां तें उगेंच मीस केलें. आतां कांहीं कर पण त्याला ही देऊं नको, बाबा.

संभा०— त्याला मी भेट केली ती फिरून कशी घेऊं?

रेवा०— तो चांगला निवळेपर्यंत ही तूं आपणापाशीं ठेव. मी नुकतेंच त्याला पाहिलें, तो एकटाच धाररावासारिखा तरवार परजीत होता, आणि त्याचे संवगडी येणार, त्यांसमोर फेरफटका करण्याच्या गोष्टी बोलत होता.

संभा०— असें काय? कज्जेदलाल पोर! तो प्रथमच असें करील तर त्यांत त्याला आब्रू मिळणार नाहीं, खरेंच सांगतों. दे मजकडे ती, पाहूं!

रेवा०—( त्याकडे तरवार देते. ) ही घे बाबा, आतां तो नुकताच शिडीपाशीं तंडत होता.

संभा०— जा आणि लवकर गोंडा करून मजपाशीं आण (तो बाहेर जातो.)

## प्रवेश ८.

### गणपतराव, वडीलसांवत, धाकटासावत, वडीलपोंवार, आणि धाकटापोंवार.

(गणपतराव) जोडा पायांत असतां त्यांपुढें चालतो, ते मागून जोडे काढून येतात.)

**वडीलसां०**—(वडील पोंवाराकडे वळून हळूच) आज आपणांस हा मोठा विनयाचा सत्कार झाला.

**वडीलपों०**—(वडील सांवताकडे वळून हळूच) आलीकडे सत्काराची ही अशीच नवी रीत निघाली असेल, कीं घरामध्यें जोडे घालून पुढें चालावें.

**गण०**— कायरे, तुह्मीं तिकडे कश्शी कुरकूर लाविली आहे?— आं?

**वडीलसां०**— नाहीं, कांहीं नाहीं रावजी.

**गण०**— मी ऐकूंनये असें कांहीं आहे काय?

**वडीलपों०**— तसेंच कांहीं असावें.

**गण०**— बरें तर, तुह्मी तें ह्याक्षणीं मला सांगा. सांगितलेंच पाहिजे.

**वडीलपों०**— इतका अधिकार तुजकडे येईल तेव्हां तसें करितां येईल.

**वडीलसां०**— (दामूस हळूच) परके घरीं येऊन असें हें योग्य नव्हे.

**वडीलपों०**— तर त्यानें आपले घरीं इतकें दांडगें व्हावें हें तरी त्यास योग्य आहे?

**गण०**— ( गर्वानें ) दांडगा, मी दांडगा! मी तुह्मांपुढें जोडा घालून चाललों ह्मणून ?

**वडीलपों०**— होय, ह्मणूनच. तूं अथवा दुसरा कोणी आमचे घरीं आला असतां आह्मी असें करावयाचे नव्हों.

**गण०**— तुह्मी व्हावें तसें करावें. पण अरे, तुह्मी कायरे मला रीत शिकविणार ?

**वडीलपों०**— तर काय, तूं आह्मांस शिकविणार ?

**गण०**— पण तुह्मी राव आहां काय ?

**वडीलपों०**— ( दोघां सांवतांस आणि आपले भावास ) तुह्मी माझें ऐकाल तर, चला आपण येथून जाऊं, आपला रावपणा घेऊन ह्याला खुशाल बसूं द्या.

**वडीलसां०**— छी, गणपतराव! आह्मी तुझे संगतीस योग्य नव्हों, तर आह्मांस पहिल्यानें बलवावयाचें नव्हतें. आह्मी तुझे गळीं पडलों नव्हतों.

**गण०**— तुह्मांस मी नाहीं बलाविलें, माझे बाबानें बलाविलें.

**वडीलपों०**— असें काय ? तर आह्मी तुझे बाबाकडे जातों, आणि त्यास सांगतों कीं, आपण बलाविलें तेणेंकरून आह्मी मोठे उपकारी झालों, परंतु आमचा सत्कार करण्यांत तुमचे लेंकास भूषण दिसत नाहीं ह्मणून आह्मी जातों. चलारे तिकडे.

**गण०**— ( त्यांस थांबवितो. ) दामू, मस्करीवर इतकें कायरे तापावें ? तुह्मी आलां तेणेंकरून मला मोठें

समाधान झालें. आज माझा वाढदिवस आहे; मला तुह्मी संतोष द्यावा ह्मणून बाबानें तुह्मांस बलाविलें आहे; तर कृपाकरून मजसंगतीं असा.

वडीलपों०— असें ह्मटल्यावर ती गोष्ट वेगळी.— पण अतःपर त्वां अंमळ नम्र असावें. जरी मजपाशीं रावपणा नाहीं, तरी मी कोणाचा अवमान सोसणार नाहीं.

वडीलसां०— पुरे दामू! आतां आपण पुनः गडी करूं.

धाकटासां०— गणपतराव, आज तुझा वाढदिवस आहे काय?

वडीलसां०— मी इच्छितों कीं, तुला सर्व सुखें प्राप्त होवोत.

वडीलपों०— मीही तसेंच इच्छितों. आणखी तुला सर्व संपत्ति प्राप्त होवोत— (एकीकडे) पण तुझे अंगीं अधिक नम्रता येवो.

धाकटापों०— आज तुला चांगल्या चांगल्या भेटी पुष्कळ आल्या असतील नव्हे?

गण०— होय खरेंच.

धाकटासां०— पुष्कळ मिठाई, खडेसाकर, बदाम, आले असावे, ह्यांत संशय नाहीं.

गण०— मला मिठाई! मग खासें काम! अरे, ती तर मी नित्य खातों.

धाकटापों०— तर मी पैज मारितों, पैसे असतील. दोन तीन मोहरा! अँ?

गण०— ( गर्वानें ) त्याहून अधिक चांगली कांहीं वस्त आहे, आणि खरेंच सांगतों, जे आपण येथें सर्व आहों ह्यांमध्यें ती मलाच योग्य आहे.

( वडील पोंवार आणि वडील सांवत एकीकडे बोलतात. )

धाकटापों०— तुझे सारिखें मला मिळालें असतें तर इतका गर्व होताना.

गण०— ( त्यांकडे अवगणनेनें पाहातो. ) गरिबा बिचाऱ्या ! ( दोघां वडलांना ) कायरे ? तिकडे आतां फिरून कायरे फुस फुसतां आहां ? तुह्मी जवळ राहून मला रमवावें हें आज तुमचें काम नव्हे ?

वडीलसां०— तुला रमवावयास आह्मांस प्रयोजन काय तें दाखीव.

वडीलपों०— जो मित्रांस बलावितो त्यानें त्यांस रमवावयाची चिंता वाहावी; रीति तर अशी आहे.

गण०— दामू, तूं बोललास त्याचा कायरे अर्थ ?

वडीलपों०— त्याचा अर्थ उघडा आहे.

---

## प्रवेश ९,

### वडीलपोंवार, धाकटापोंवार, वडीलसांवत, धाकटासांवत, गणपतराव, आणि रेवाबाई.

रेवा०— ( तबक भरून बर्फी पुढें आणिते ) गृहस्थांनो, तुह्मांस खुशाल पाहून मी समाधान पावलें.

वडीलपों०– ( नमून ) बाई, मी तुमचा सेवक आहें.

वडीलसां०– तुह्मांला येथें पाहून आह्मांस बहुत आनंद झाला, बाई.

रेवा०– तुह्मी बहुत योग्य आहां– ( गणपतरावास ) भाऊ, आईनें हें तुझे मित्रांकरितां पाठवून दिलें आहे; दूध तयार होतें आहे तें मागून केरोजी घेऊन येईल; तें तूं आणि मी ह्यांना वाढूं.

वडीलपों०– बाई, हा तुह्मी आह्मांस मोठा मान देत आहां.

गण०– ताई, तूं जा आतां, तुझें येथें कांहीं काम नाहीं! पण माझे तरवारीचा गोंडा कोठें आहे.

रेवा०– तुझी तरवार गोंड्यासुद्धां तुझे खोलींत ठेविली आहे. गृहस्थांनो, मी पुनः येईपर्यंत तुह्मांस कुशल असो. ( ती त्यांस नमते आणि जाते. )

वडीलपों०– तुह्मी लवकरच कृपाकरून यालना, बाई?

रेवा०– मी हींच आईची आज्ञा घेऊन येतें.

---

## प्रवेश १०,

### वडीलपोंवार, धाकटापोंवार, वडीलसांवत, धाकटासांवत, आणि गणपतराव.

गण०– ( आपण आधीं बसून मग त्यांना ह्मणतो ) ह्या लोडाशीं बसा. ( ते एकमेकांकडे पाहतात, आणि न बोलतां बसतात. गणपतराव धाकट्यांस

पुष्कळ बर्फी वाढतो, आणि आपणास घेतो. दोघां वडिलांकरितां कांहीं ठेवीत नाहीं; त्यांस ह्मणतो.) थांबा अंमळ, दुसरी येईल मग मी तुह्मांस देईन.

वडीलपों०— नको, त्याची आह्मांस इच्छा नाहीं.

गण०— बरें तर, नको तर नको.

वडीलसां०— रावलोकांची सत्काररीति अशीच आहे वाटतें ?

गण०— तुह्मां गरिबांस एवढी प्रतिष्ठा कशास पाहिजेरे ? मी तुह्मांस आधींच सांगितलें नाहीं कीं, दुसरी येते आहे तों थांबा ह्मणून ? ती आली ह्मणजे पाहिजे तर घ्या, नाहींतर नका घेऊं, समजलां ?

वडीलपों०— होय, बोललास तें स्पष्टच आहे. असेंच आह्मी आज कोणाचे संगतीस बसलों आहों हेंही आह्मांस स्पष्ट समजलें.

वडीलसां०— अरे तुमचे मनांत पुनः कज्या करावयाचा आहे काय ? गणतराव, दामू. छी गड्यांनो ! (गणपतराव उठतो, दुसरेही उठतात.)

गण०— (वडील पोंवाराजवळ जातो.) गांवढेकराचे पोरा, तूं कोणाचे बरोबर आहेस, ह्याचा कांहीं सुमार ठेवितोस ?

वडीलपों०— आह्मी दांडगा आणि निर्लज्ज अशा एका रावाचे समागमें आहों; जो आपले ठायीं नसता थोरणा आणितो आहे, आणि जो एकमेकांचें आगतस्वागत कसें करावें ह्याविषयीं मूर्ख आहे.

वडीलसां०— खरेंच, तूं ह्मणतोस असेंच आह्मां सर्वांचें बोलणें.

गण०— काय ? मी दांडगा ! मी निर्लज्ज ! मला रावाला आणि तुह्मीं असें ह्मणावें !

वडीलपों०— होय; खरेंच, फेर ह्मणतों कीं, तूं मोठा दांडगा, मोठा निर्लज्ज आहेस. तूं मोठा थोरला प्रधान असतास किंवा राजा असतास तरी मी तुला असेंच ह्मटलें असतें.

गण०— असें काय ? तर तूं कोणाशीं बोलतोस तें मी तुला आतां दाखवितों ! ( त्यावर हात टाकितो; वडील पोंवार त्याला धरतो; तो निसटून खोलींत पळतो, आणि दार लावून घेतो.)

---

## प्रवेश ११,

### वडीलपोंवार, धाकटापोंवार, वडीलसांवत, आणि धाकटासांवत.

वडीलसां०— दामू, हा त्वां काय अनर्थ केला ? आतां तो आपले बापाकडे जाईल, आणि त्यास नानाप्रकारचें समजावील.

वडीलपों०— त्याचा बाप थोर मनुष्य आहे. तो जरी नगेला तरी मी त्याजकडे जाणार, आणि पुसणार, कीं लेंकाकडून आमचा असा पाणउतारा करावयासाठीं तुह्मी आह्मांला येथें बलावून आणिलें काय ?

धाकटापों—० खरेंच, ह्यांत दादाचा कांहीं अन्यायनाहीं; हें सर्व वर्तमान आमचे बाबास सांगितलें असतां, तो ठीक केलें ह्मणून मानवेल; लोकांनीं आमची अप्रतिष्ठा करावी हें त्यास साहाणार नाहीं.

वडीलपों०— चला मजसंगातीं; आपण सगळे जाऊं, आणि संभाजीरावास हें सर्व सांगूं.

धाकटासां०— होय, खरेंच, चला जाऊन सांगूं.

---

## प्रवेश १२,

### वडीलपोंवार, धाकटापोंवार, वडीलसांवत, धाकटासांवत, आणि गणपतराव.

(गणपतराव तरवार घेऊन बाहेर येतो. दोघे धाकटे त्यास पाहून भितात; एक एका कोंपऱ्यास बसतो आणि दुसरा खांबाआड होतो; वडील पोंवार आणि वडील सांवत तेथेंच अवसान धरून उभे राहातात.)

गण—० (वडीलपोंवाराचे अंगावर जातो.) आतां मी तुला शिकवितों, दांडग्या पोरा (तरवार उपसतो तों तरवारीचे पानाचे ठिकाणीं लांब मोराचें पीस पाहून ओशाळा होऊन थबकतो. धाकटीं मुलें मोठ्यानें हांसतात आणि त्याजवळ येतात.)

वडीलपों०— चल ये अमचे अंगावर, तुझे तरवारीचें पाणी कसें आहे तें पाहूं तर खरें !

वडीलसां०— तो लाजला आहे, त्याला आणखी लाजवूं नको.

धाकटापों०— होहो! तुलाच ह्यावयास अधिकार आहे ती हीचका जिनस?

धाकटासां०— ह्या भयंकर शस्त्रानें ह्याच्यानें कोणास उपद्रव करवणार नाहीं, इतकें बरें आहे.

वडीलपों०— काय सांगूं? तुझे दांडगाईस मीं ह्या क्षणीं पारिपत्य केलें असतें; पण अशा समयीं तुजवर पराक्रम करावयास मला लाज वाटते.

वडीलसां०—अत:पर हा आपले सोबतीस योग्य नाहीं. चला आपण निघून जाऊं.

धाकटापों०— मोरपीस परजणारे फांकडे शिपाई बाबा, रामराम, रामराम रावसाहेब, आह्मी आतां येतों.

धाकटासां०— तुमचे हातून तें हातेर कोणी काढून घेईपर्यंत आह्मी येथें येणार नाहीं; कांकीं तुह्मी आह्मांस फार भयंकर दिसतां.

(ते जाताहेत, तों वडील पोंवार त्यांस थांबवितो.)

वडीलपों०— आपण ह्याचे बापास सर्व वृत्तांताचें निवेदन करूं, नाहीं तर अन्याय आपलेकडे दिसेल.

वडीलसां०— तूं खरें ह्मणतोस, आपण त्यांस नपुसतां निघून गेलों तर ते आपणास काय ह्मणतील? अरे पण, तेच इकडे येत आहेत असें वाटतें.

## प्रवेश १२,

### संभाजीराव, गण०, वडीलपों०, धाकटापों०, वडीलसां०, आणि धाकटासां०.

(संभाजीराव आले पाहून सर्व मर्यादेनें उभे राहातात. गणपतरावाची फजीती झाली आहे ह्मणून तो एकीकडे जाऊन रडतो.)

**संभाजी०**— (गणपतरावाकडे क्रोधानें पाहून. ) तुझें ह्यांचें कायरे होत होतें रावजी? गणपतराव फुंदतो, त्याच्यानें एक शब्द बोलवत नाहीं. )

**वडीलपों०**— रावसाहेब, कलह झाला ह्याविषयीं आह्मांवर राग न करावा. आह्मीं कांहीं केलें नाहीं. आले घटकेपासून गणपतरावानें आमचा छळ जो मांडिला होता तो काय सांगावा?

**संभाजी०**— स्वस्थ असा माझ्या मित्रांनो, मी सर्व जाणतों. खोलींतून त्याचें सगळें चरित्र पाहात होतों. सर्व अन्याय त्याचाच आहे. त्यांतही तो मजशीं कबूल झाला होता कीं, मी चांगला चालेन, ह्मणून तो विशेष अन्यायी हा दांडगा हें मला फार दिवस ठाऊक आहे, पण तेंच दांडगेपण कोणते परिणामास जातें हें मला पाहावयाचें होतें. तें लक्षांत येतांच मी तरवारीचें पान काढवून त्याचे ठिकाणीं पीस घालविलें, जें कोणाचे अंगावर पडलें असतां रक्त निघावयाचें अगदीं भय नाहीं. (चौघें मुलें मोठ्यांनीं हांसतात.)

वडीलपों०— पण आह्मी आगळीक करून त्याशीं अंमळ अमर्यादेनें बोलिलों, त्याचें कांहीं आपले मनांत येऊंनये, ही आमची प्रार्थना आहे.

संभाजी०— त्याविषयीं तर मजवर तुमचे उपकार झाले. तुह्मी चांगलीं मुलें आहां, ह्मणून हें तरवारीचें भूषण तुह्मांस साजे. दामू, माझी आठवण राहावी ह्याकरितां मीही तरवार पान घालवून तुला बक्षीस करितों. हिचा त्वां अंगीकार करावा. तुझे सारिख्यास ही योग्य आहे;

वडीलपों०— रावसाहेब, आपला थोरपणा पाहून आह्मी आनंद पावलों. आज्ञा द्याल तर आतां येथून जातों. आमचें येथें असणें गणपतरावजीस आज साहाणार नाहीं.

संभाजी० नाहीं नाहीं, माझे जिवलगांनो, तुह्मीं येथें असावें; मी जवळ असतां माझा मुलगा तुमचे संतोषांत विक्षेप करूं पावणार नाहीं. तुह्मी सर्व येथें खेळा. माझी मुलगी तुह्मांकडे येऊन तुह्मांस जें व्हावें तें पुरवील; चला मजसंगतीं दुसरे दिवाणखान्यांत. ( गणपतरावाकडे पाहून ह्मणतो. ) पोरा, तूं जर येथून हाललास तर खबरदार; येथें एकला राहून आपला वाढदिवस हावा तसा कर, तूं ह्मातारा झालास तरी तुझे अंगीं योग्यता येईपर्यंत, तरवार मिळावयाची नाहीं.

( सर्व निघून जातात. )

# आवडी आणि मोरू

काशीबाई ह्मणून एक विधवा स्त्री होती; तिचीं दोन लेंकरें आवडी आणि मोरू ह्मणून होतीं; तीं दोघेंही तिचे ममतेस योग्य होतीं; परंतु तिची प्रीति मोरूवर फार. आईस मोरू अधिक आवडतो हें लक्षांत येऊन आवडीस दुःख होई, पण हें ती बाहेर दाखवीत नसे. ती रूपानें साधारण पण गुणांनीं फारच उत्कृष्ट होती. तिचा भाऊ तर मदनासारिखा सुरूप; त्याजवर आईचें मन वेधून ती त्याचेच लाड फार करी; प्रीतीनें ती त्याचे मुके वारंवार घेई. चाकर कुळंबिणीही धनिणीची मर्जी पाहून त्याचा संतोष राखीत. आईचे अप्रीतिमुळें आवडीस कोणी गणीत नसत. तिला हवा तो पदार्थ मिळूनये, अन्न वस्त्रादिक, ज्याचें अगत्य त्याविषयीं देखील तिचे हाल होत. ती एकांतीं जाऊन धायेंधायें रडे; परंतु बाहेर कधीं आपले दुःखाचें एक अक्षर बोलत नसे, किंवा असंतोषाचें चिन्ह दाखवीत नसे. आपण सुंदर नाहीं ह्मणून आईची जी नावड आपणावर आहे, ती तिचे मनांतून जावी ह्मणून आवडीनें नाना उपाय केले; वर्तावें तसें वर्तली; संथपणानें चालली; आज्ञेस जपली; परंतु व्यर्थ. जे डोळे बाह्यरंगास भुलले होते त्यांची दृष्टि तिचे आंतले गुणांकडे पोहोंचेना. सांगितलें काम आवडी जीव तोडून करी, पण काशीबाईचे लक्षांत तें येऊंचनये. आवडी

जन्मून लागलाच काशीबाईचा भ्रतार वारला, तेव्हांपासून तिला तिचा वीटच आला. तिनें तिला नित्य गांजावें, आणि जे गुण मोठे बायकांतही विरळा असतात ते तींत नाहींत ह्मणून तीस शब्द लावावा.

अशी ती वाईट आई एके समयीं दुखण्यास पडली, तिची व्यथा पाहून मोरू फार विव्हळ झाला. तिची दीनवाणी मुखचर्या व काकळूतवाणी दृष्टि पाहून आवडीस वाटलें कीं, आईच्या खाष्टी स्वभावांत अंतर पडलें. तें लक्षून तिनें भावापेक्षां शतगुणित अधिक तिची सेवा आरंभिली. तीस जेंजें व्हावें तें मागायास तिला बोलावयाचे श्रम पडतील ह्मणून आवडीनें आपले शाहाणपणानें शोधून काढावें, आणि त्याची तर्तूद ठेवावी. दुखणें भारी होतें तों तिनें तिची खाट सोडिली नाहीं. आईनें तिची विनवणी करावी, शेवटीं धाक दाखवूनही सांगावें, तरी तिनें एक क्षणभर निद्रा घेऊं नये. शेवटीं काशीबाई बरी झाली, ते समयीं आवडी स्वस्थ झाली. असें असतांही आईनें पूर्वीप्रमाणें तिजसंगतीं कठोरपणा चालविला; तो पाहून आवडीस पुनः ती चिंता उत्पन्न झाली.

एकेदिवशीं काशीबाई मुलांसंगतीं आपले दुखण्याच्या गोष्टी करीत बसली होती, आणि ह्मणाली. "मुलांनो, तुह्मीं माझा फार समाचार घेतला, मी तुमची उपकारी झालेंआहें. ह्यासाठीं तुह्मांस आवडेल ती वस्तू माझें सामर्थ्य पाहून मागा, मी देईन." तिनें मोरूस पहिल्यानें

पुसलें, "मोरू, तुला काय पाहिजे?" मोरू ह्मणाला, "एक कंठी आणि चौकडा." ती ह्मणाली, "तुला मी तें उद्यां सकाळीं देईन." "आणि आवडे तुलागे?" आवडी कांपत कांपत उत्तर करिते, "काय, मला! मला! तूं मजवर प्रीत करशील तर मला आणखी कांहीं नको." आई ह्मणाली, "हें उत्तर नव्हे! मी तुला कांहीं बक्षीस देणार, तुला काय पाहिजे तें बोल लवकर."

आवडीस नित्य आईचें कठोर भाषण ऐकावयाची संवय होती, तथापि ते समयीं त्या शब्दांनीं तिला फारच दुःख झालें; तिनें आईचे पाय घट्ट धरून आसवांनीं न्हाणिले. मग पाणी भरलेले डोळ्यांनीं आईचे तोंडाकडे पाहून लागलेंच तिनें दोहीं हातीं आपलें तोंड झांकलें. आणि हळूच हे शब्द बोलली, "माझेदोनमुके मात्र घे, जसे तूं प्रीतीनें मोरूचे घेतेस."

ते शब्द ऐकून आईचें कठोर न्हदय लागलेंच वितुळलें, मग तिला वेंग देऊन उराशीं घेऊन तिनें मुक्यांचा सुकाळ केला. आवडीला तो पहिल्यानेंच लाभ, तिनेंही तेसमयीं आनंदांत निमग्न होऊन आईचे तोंडाचे, गालाचे, डोळ्यांचे, उराचे, हाताचे पुष्कळपणें मुके घेतले.

तें पाहून मोरूसही फार आनंद झाला. तोही आईचे मुके घेऊंलागला. तेदिवशीं आईस असें झालें कीं मी आज स्वर्गसुखच भोगितें आहें काय! अमृतपानच करितें आ[illegible]काय! मुलांस असें वाटलें कीं, ही आई नव्हे, हा आमचा कोणी कल्पवृक्ष आहे. तीं जीं जीं

इच्छा करीत ती ती आई तत्काळ पुरवी. ह्याप्रमाणें तें कुटुंब त्या दिवसापासून फार सुखी झालें. काशीबाईनें आ- आवडीपासून फार दिवस जो प्रेमा आटोपून ठेविला हो- ता तो तिनें तिला सव्याज दिला. आवडीनेंही आईचे ठायीं नित्य नवा प्रेमा करून तिला संतुष्ट केलें. मोरूस- ही त्या गोष्टीचा लवमात्र हेवा आला नाहीं. बहीण सु- खी झाली पाहून तो आनंद पावला. आईनें पूर्वी त्या- चे अतिशयच लाड केले, त्यानें त्याचा मुळींचा चांगला स्वभाव अंमळ बिघडला, आणि तो पुढें कांहीं वाईट गुण करूं लागला; त्यामुळें दोन चार वेळ आईची माया त्यावरून अगदीं उतरावयाचा प्रसंग आला होता, पण आवडीनें त्याविषयीं रदबदली करून त्यास संभाळून घे- तलें. तिनें त्यास वारंवार शाहाणपणाची बुद्धि शिकवीत असावें. तेणेंकरून तो मुलगा मग चांगला झाला. आणि त्या तिघांचेही अनुभवास पक्कें आलें कीं, भावांबहिणीं- ची, मायलेंकरांची, परस्पर ममता असल्यावांचून कुटुंबा- मध्यें वास्तविक सुख वसत नाहीं.

---

## कोंकरूं.

एका गरीब गांवढेकराची मुलगी, लाडी, एके दिव-

शीं सकाळीं रस्त्याचे बाजूस बसली होती, तिचे हातीं दुधाचें भांडें होतें, व त्याबरोबर न्याहारीस कांहीं भाकर होती. तितक्यांत तिकडून एक धनगर गाडे भरून कोंकरें विकावयास नेत होता, तीं कोंकरें पाय बांधून एकावर एक रचिलीं होतीं, व कितीएकांचीं डोकीं खालीं लोंबत होतीं. तीं कोंकरें त्या व्यथेनें ओरडत, तेणेंकरून तो सर्व प्रदेश गाजे. तें ऐकून लार्डीचें त्हृदय फुटलें, पण धनगराचे चित्तास कांहीं द्रव आला नाहीं. त्यानें आपले खांद्यावरही एक कोंकरूं चालविलें होतें.

तो लार्डीचे अंगाजवळ आला तितक्यांत त्यास खांद्यावरील कोंकरूं मेलेंसें वाटून त्यानें तें तिजकडे उडविलें, आणि ह्मणाला, " मुली, घेहें, तुला न्याहारीस दिलें, ह्या रांडेच्यानें मरून मला दोन रुपयांचा चट्टा दिला. " असें ह्मणून तो पुढें चालता झाला.

लार्डी आपली दूधभाकर सोडून देऊन तत्काळ त्या कोंकरास उचलून उराशीं घेऊन दयार्द्र दृष्टीनें त्याकडे निरखिते आणि ह्मणते, " रे कोंकरा, मला तुझी दया कां येते बरें ? आज नाहीं तर उद्यां तरी ते तुझ्या गळ्यांत सुरी भोंसकतेच. तें भय तुला आतां राहिलें नाहीं. " असें ती ह्मणते आहे, इतक्यांत तिचे अंगाची ऊब लागून कोंकरानें अंमळ डोळे उघडिले, आणि हात पाय हालवून बँ असा हळूच शब्द केला, जसें कोणी ह्मणेल तें आईसच बलावितें आहे. तेसमयीं जो लार्डीस आनंद झाला, तो कोण वर्णील ? ती त्या कोंकरास प-

रकरांत झांकिते; त्यावर अंगची चोळी काढून घालिते; त्याला अधिक ऊब यावयास मान मांडीपर्यंत लवविते; मोठे बळानें त्याचे नाकाकानांत फुंका मारिते. नंतर तें हळू हळू हालूं लागलें, तेव्हां तें जसें जसें हाले तसा तसा हिचा ऊर आनंदानें भरून येई. मग तिनें भाकर मोडून दुधांत टाकिली, त्यांतील एक तुकडा घेऊन कोंकराचें तोंड उघडून मोठे प्रयत्नानें आंत घातला. कोंकरूं उपासानेंच मरावयास टेंकलें होतें, त्यास तें अन्न पोहोंचतांच अंमळ शक्ति आली मग तें पाय मोकळे करूंलागलें. घटकेभरें लागलेंच त्याला आपले पायीं उभें राहावयाची शक्ति आली. मग तें आपले आपण लाडीचे दुधाचे भांड्याकडे गेलें, आणि त्यानें त्यांतली सगळी दूधभाकर खाल्ली, तें पाहून लाडी कौतुकानें हंसली. दुसरी एक घटिका गेली नाहीं तों तें लाडीपुढें नानाप्रकारीं नाचूं बागडूं लागलें.

लाडीस आनंद होऊन तिनें त्यास कवळून धरिलें, आणि धांवत घरीं जाऊन आईस दाखविलें. त्यावेळेपासून त्याचें नांव बाबा ठेऊन तिनें सर्व प्रकारें त्या कोंकराचें ममतेनें पाळण केलें. तिला भाकर मिळे तींतली ती त्यास घालीत जाई; पाणी पिववी; कुरवाळी; आपले खाटेवर निजवी. ती ह्मणे, ह्याचे बदल मला कोणीं शंभर मेंढरें दिलीं तरी नकोत. तो बाबाही लाडीचे उपकार जाणून तिजवांचून पाऊल टाकीत नसे. त्यानें यावें आणि तीस चाटावें; तिचे हातावरून खावें,

तिचें भोंवतें बागडावें; कधीं तिला त्यास ननेतां बाहेर जावयाचें पडे, तेव्हां त्यानें ती येईतों करुणा येई असें ओरडत असावें.

ह्याप्रमाणें लाडीनें त्या अनाथ कोंकराचें दयाळूपणें पोषण केलें, त्याचें फळ तिला ईश्वरें लवकरच दिलें. तें कोंकरूं मोठी मेंढी झाली, तेव्हां तिनें लाडीस पुष्कळ जावपें दिलीं. त्यांचाही आणखी विस्तार होत गेला. सारांश थोडके वर्षांत लाडीचे सर्व कुटुंबास प्यावयापुरतें दूध, आणि पांघरावयास लोंकरीचीं पांघुरणें, हीं त्या कोंकराचे संततीपासून भरपूर प्राप्त होत गेलीं.

---

## द्राक्षी खुंट.

अवरंगाबादेमध्यें शिवराव ह्मणून कोणी गृहस्थ होते, ते एके दिवशीं आपला मुलगा अनंत ह्यास घेऊन बागांत फिरत होते. तेथें अनेक प्रकारचे वृक्ष फुलले आहेत; कित्येकांस नुकतीच पालवी फुटली आहे; कित्येक हिरवे चार दिसत आहेत; कित्येकांस पांढरा कित्येकांस तांबडा मोहोर आला आहे, असें त्यांनीं पाहिलें.

ते उभयतां पुढें चालत चालत बागांतील बंगल्या पाशीं येऊन पोहोंचले. तेथें बंगल्याचे समोर एक द्राक्षीचा खुंट होता; त्यास वेडेवांकडे पीळ पडले आहेत; त्यांवर पान नावास नाहीं; त्याचे थोडके ताणे अवयव-

स्थितपणें इकडे तिकडे चालले आहेत. तें पाहून अनंत बापास ह्मणतो, “ बाबा, पाहा हें भिकारी झाड ! ह्याचा तेथें काय बरें उपयोग ? तूं राम्याला सांगून ह्याला सोडवून ह्याचीं फांठीं कां करवीसना ? ”

असें ह्मणून तो त्या झाडास हिसके मारूं लागला; पण त्याचीं मुळें ओंड गेलीं होतीं, तें त्याचे देवास उपटतें ? त्यास शिवराव ह्मणतात, “ मुला, तूं ह्यास दुखवूं नको, मला तें तसेंच ठेविलें पाहिजे; वेळ येईल तेव्हां मी तुला त्याचें कारण सांगेन. ”

अनंत– पण बाबा, त्याजवळ दुसरीं झाडें आहेत तीं पाहा कशीं फळपुष्पांनीं युक्त आहेत; हें तसें असतें तर मग ठेवावें हें नीट होतें. ह्या दुसऱ्या शोभिवंत झाडांत हें फार ओंगळ दिसतें, मी राम्यास सांगून तें उपडून टाकवितों परतें.

शिवराव– नको, माझ्या लाडक्या, मी तुला सांगतों कीं, हें असेंच असूंदे, आणखी तीन महिने पर्यंत तरी असूंदे. पाहिजे तर मग उपडून टाक.

अनंत आग्रह करी कीं तें उपडून टाकावें; बाप त्यास दुसऱ्या गोष्टींचा नाद लावी; असें होतां होतां अनंतास विसर पडून ती गोष्ट ते दिवशीं तशीच राहिली. एके दिवशीं शिवरावांस कांहीं कामामुळें दूर गांवीं जावयाचें पडलें, ते चैत्रमासपर्यंत घरीं आले नाहींत. नंतर आले तेव्हां प्रथम ते मुलास समागमें घेऊन बागांत गेले.

ते दिवशीं उकाडा फार होत होता, ह्मणून ते दोघे बंगल्याचे छायेस जाऊन बसले. तेसमयीं अनंत ह्मणतो, "अहो बाबा! काय ही छाया थंड आहे! काय हीं झाडें शोभा देतात! बरी आठवण झाली; आपण त्या दिवसचा तो खुंट आज उपडून टाकूं या; आणि त्या ठिकाणीं हें झाड सुंदर दिसतें आहे हें लावूं. ह्याचीं फळें काय रम्य दिसतात! कांहीं जांबळीं, कांहीं अगदीं काळीं, इतक्या सगळ्या बागांत ह्यासारिखें देखणें झाड मला दुसरें दिसत नाहीं. दुसरे झाडांवर आतां फळें दिसत नाहींत, पण हें पहा कसें सर्वांगीं झांकलेलें आहे! त्या पानामागें घड कसा चांगला दिसतो आहे! ह्याचीं फळें सुंदर दिसतात तशींच गोड आहेत कीं नाहीं, हें मला पाहावयाचें आहे.

शिवरावांनीं त्यास त्यांतून एक द्राक्ष तोडून दिलें, तें चाखून त्यास अधिकच आनंद झाला; मग जेव्हां त्याचे बापानें त्यास सांगितलें कीं, ते दिवशीं तूं उपटून टाकावयास उभा राहिला होतास त्या ओंगळ खुंटाचीं हीं फळें, ह्यांस द्राक्षें ह्मणतात, तेव्हां त्यास बहुतच आश्चर्य झालें. त्यास बाप ह्मणाला, "मुला, आतां तुझी इच्छा असली तर मी राम्याला बलावून ह्याचीं जाळावयास फांटीं करवितों."

**अनंत**– नाहीं, बाबा, नाहीं, असें करूं नको. हावीं तर त्यानें दुसरीं सगळीं झाडें तोडावीं, पण हें तोडूं नये, हीं द्राक्षें मला फारच आवडतात.

शिवराव— तर आतां पाहा, कीं तूं सांगत होतास तें मीं ऐकिलें नाहीं ह्मणून चांगलें झालें. तुला तें झाड पाहून जसें वाटलें तसेंच लोकांस वाटत असतें.

कोणी मुलगा वस्त्रहीन, बाहेरून दिसण्यांत ओंगळ, असा आपण पाहिला, ह्मणजे त्याची आपण अवगणना करितों, आणि त्याचे अवस्थेशीं आपली अवस्था लावून आपण मोठे मनुष्य असें मानून गर्वानें फुगतों; कोणे वेळेस आपण त्यास कठोर वचनेंही बोलावयास सोडीत नाहीं. तर, मुला, असें जेथें दृष्टीस पडेल, तेथें उतावीळ होऊन एकाएकीं निश्चय करूं नको; कोणजाणे तें ओंगळ शरीर थोरा जिवाचें बिऱ्हाड असेल, कीं जो जीव आपले सदाचरणानें, पुरुषार्थानें, एकादे दिवशीं विश्वाला आश्चर्य करावयास लावील, किंवा आपले ज्ञानानें लोकांचें अज्ञान दूर करील. जो सांप्रत वांकडा खुंट आहे तो पुढें उत्तम फळांनीं युक्त होईल.

---

## खोत

एके दिवशीं प्रात:काळीं दौलतराव आपले खोलींत मोठे कामांत होते, तों चाकर सांगत आला कीं महादजीखोत बाहेर दरवाज्याशीं आला आहे, तो भेटावयास इच्छितो. दौलतरावांनीं सांगितलें कीं त्यास प्रार्थून अंमळ दिवाणखान्यांत बशीव; पत्र पुरतें करून मी हाच आलों.

चाकरानें खोतास दिवाणखान्यांत आणिलें; तेवेळेस रामराव, कृष्णराव, व सावित्रीबाई, हीं दौलतरावाचीं मुलें तेथें होतीं. तो आंत जातांच त्यानें त्यांस पृथक् पृथक् मुजरा केला, परंतु कुळंब्याचें नमणें ह्मणजे आडाणीपणाचें; त्यास उभें कसें राहावें, कोणते रीतीनें हात वर करावा, कीं मस्तक कसा खालवावा, हें सुशिक्षितपणें ठाऊक नसतें. ते दोघे मुलगे त्याची थट्टा करून एकमेकांकडे पाहून हातानें तोंड झांकून हसूं लागले. ते त्याजवळ आले, त्याचा पोशाग नीट निहाळून पाहूं लागले; नंतर एकमेकांचे कानाशीं लागून मोठ्यानीं हंसले. कुळंब्यास ती मोठी लाज झाली. शेवटीं रामरावानें चेष्टेची पराकाष्ठा एथवर केली कीं, तो महादजीचे सभोंवताला फिरला, आणि नाक धरून आपले भावास विचारितो, "येथें खाताची घाण येते असें तुला वाटत नाहीं ?" मग त्यानें निखारे घालून धुपाटणें आणिलें, त्यावर ऊद टाकून ती घाण घालवावयास दिवाणखानाभर फिरला. नंतर पोऱ्यास हाक मारून सांगितलें कीं, तो मनुष्य आला आहे, त्याचे पायांची धूळ सत्रंजीस लागली आहे ती झाडून काढ. ती भावाची चेष्टा पाहून इकडे कृष्णराव कुशीस वळून खदखदां हंसला.

सावित्रीबाई त्यांची बहीण उगीच होती; तीस तें रुचलें नाहीं; तिनें भावांस शब्द लाविला; आणि खोतास राग येऊंनये ह्मणून ती त्याची समजाविशी करूं लागली. तिनें त्याला खालीं बसविलें, आपले हातीं पान-

सुपारी दिली, चांगला मिरजी तमाखू पुढें ठेविला, त्याची काठी बाहेर राहिली होती ती आपण स्वतां आणून त्याचे जवळ ठेविली. इतक्यांत दौलतराव आंतून आले. त्यांनीं त्यापाशीं येऊन मित्राप्रमाणें त्याला हातीं धरून आपले जवळ लोडाशीं बसविलें. त्याचे मुलां माणसांचा समाचार पुसून येण्याचें कारण विचारिलें. त्यानें उत्तर केलें, "माझा सामाशी हप्ता भरावयासाठीं मी आलों आहें." तेथेंच त्यानें मोहरांनीं भरलेला कमरेचा कसा काढिला, आणि दौलतरावासमोर ओतून रिकामा केला; आणि ह्मणाला, "मुदतीवर चार दिवस अधिक गेले ह्मणून रावजींस राग येऊंनये. परवां पाऊस मोठा पडला त्यामुळें गाडेवाट चार दिवस पडली होती, ह्याकरितां दाणा बाजारास ओपून टाकावयास माझ्यानें नेववला नाहीं."

दौलतराव ह्मणाले, "खोतजी, तुह्मांविषयीं माझे मनांत कधीं वांकडें यावयाचें नाहीं; तुह्मी प्रामाणिक मनुष्य आहां हें मी जाणतों; मुदत भरली ह्मणून तुह्मांकडे शिपाई पाठवावयाचें काम नाहीं." दौलतराव त्या मोहरा गालीच्यावर मोजितात, त्यांची चकचकी पाहून रामराव खोतजीचे तोंडाकडे पाहातो, आणि मनांत आणितो हा कोणी मोठा मनुष्य आहे.

मोहरा मोजणें झाल्यावर खोतजीनें मुलांकरितां खाऊ ह्मणून कांबळींतून पुडी काढिली, तींत कांहीं सुकेळीं, फणसपोळी, आंबेपोळी व सुकविलेले अंजीर, असें होतें.

ती दौलतरावाचे पुढें ठेवून तो ह्मणूं लागला, "रावजी, माझी एक इच्छा आहे, ती कृपाकरून पुरवावी, कीं एके दिवशीं आपण मुलांसहवर्तमान माझे गांवीं येऊन मला आनंद करावा. मी आपली गाडी घेऊन स्वतां तुह्मांस न्यावयास येईन."

दौलतरावांनीं बरें ह्मटलें, आणि त्यास जेवावयास राहाण्याविषयीं फार आग्रह केला. खोत ह्मणाला, "क्षमा करा, मला शहरांत लोकांशीं पुष्कळ सारीं मा-रावयाचीं आहेत, आणि घरीं लवकर गेलें पाहिजे." दौलतरावांनीं खोतजींचे मुलांकरितां मनुका, बदाम, ख-डेसाकर, ह्यांचा पुडा करून दिला. नंतर ते खोतजीस स-त्कारपूर्वक दरवाज्यापर्यंत पोहोंचवून त्याचा निरोप घे-ऊन मागें परतले.

खोतजी गेल्यानंतर सावित्रीबाईनें भावांचे तोंडावर त्यांनीं खोताचा आपमान केला तो बापास सांगितला. दौलतरावांनीं तें ऐकून त्यांवर फार राग केला, आणि सावित्रीस शाबासकी दिली. तिला उचलून तिचा मुका घेऊन ह्मणाले, "भले माणसाशीं कसें चालावें हें मा-झ्या बेटा, तूं चांगलें जाणतेस."

नंतर खोतानें दिलेली पुडी त्यांनीं उघडिली. तींतले कां-हीं अंजीर व सुकेळीं मुलगी व आपण मिळून त्यांनीं खाल्लीं; रामराव कृष्णराव जवळ होते पण त्यांस दिलीं नाहींत. ते पदार्थ पाहून त्यांचे जिभेस पाणी सुटलें; ते मिटक्या

मारूं लागले; पण तें दौलतरावांनीं लक्षांत आणिलें नाहीं. त्यानीं पुनः साविर्त्रीची प्रशंसा केली, आणि तिला उपदेश केला कीं, "वाईट वस्त्रावरून कोणास हंसावें हें हलके मनुष्याचें काम. जर आपण उंच वस्त्रांवरून कोणास मोठा मनुष्य मानिलें तर तो मान वस्त्रांस दिला असें होतें, त्यांत त्यांचे वापरणाऱ्यास कांहीं नाहीं. जे साधीं चिरगुटें घेतात, ते प्रायशः प्रामाणिक पुरुष असतात; ह्यास दृष्टांत त्या खोतजीचाच. तो मेहनत करून आपले बायको लेंकरांचें पोट भरितो; वेळचेवेळेस कराराप्रमाणें हप्ता भरावयास कधीं चुकत नाहीं; असें मी आज सतत पांच वर्षें पाहातों. मुली, हा जर असा प्रामाणिक नसता तर तुझा आणि तुझे भावांचा खर्च माझ्यानें चालवताना, कांकीं ह्यापासून जो पैसा येतो त्यानें तुमचें अन्नवस्त्र आणि शिकणें होतें.

असें भाषण करून राहिलेला खाऊ दौलतरावांनीं फडताळांत कुलूप लावून ठेविला; रामराव आणि कृष्णराव त्याचे मागून मागून आशें भरलेले गेले, त्यांस बाप ह्मणाला, "तुह्मी समजत असाल कीं, बरें आतां नाहीं तर संध्याकाळीं तरीं ह्यांतलें कांहीं आह्मांस मिळेल, तर मी निक्षून सांगतों. तुह्मी ह्याची आशा अगदीं सोडा. तुमचे भलेपणाविषयीं खोतजीची खात्री झाली ह्मणजे तोच तुह्मांस कांहीं पाठवून देईल."

रामराव– पण बाबा, त्याचे अंगास घाण येत असली तर त्यांत काय माझा अन्याय ?

दौलतराव– त्याचे अंगास कसची घाण येत होती?
रामराव– उकिरड्याची. इश्शरे, ती सोसवेना मला.
दौलत०– त्यानें ती घाण कोठून आणिली आसावी बरें ?
रामराव– मला वाटतें कीं तो शेण भरीत असतो.
दौलत०– असें काय ? तर शेण भरल्यावांचून त्यानें कसें करावें?
रामराव– त्यानें– त्यानें– त्यानें–
दौलत०– मला वाटतें कीं त्यानें भुईस खत अगदींच घालूंनये !
रामराव– तोच एक उपाय दिसतो.
दौलत०–जर खत नाहीं घातलें तर पीक चांगलें कसें येईल? पीक वाईट आलें तर त्याच्यानें मला स्वामित्व कसें देववेल?

रामराव पुढें कांहीं बोलता, पण बापानें जे डोळे केले त्यांत त्यास बापाचा राग स्पष्ट दिसून आला ह्मणून तो उगाच राहिला. त्यावर आठ दिवस गेल्यावर महादजी खोत पुनः आला; त्यानें दौलतरावास मोठी भीड घातली कीं आज आपले पाय माझे घरीं लागावे.

दौलतरावांनीं त्याचे आवडीकरितां बोलावणें घेतलें, तेवेळीं रामराव कृष्णराव ह्यांनीं बापाची मोठी काकळूत केली कीं, आह्मांस बरोबर न्यावें; आह्मी तेथें मोठे विनयानें चालूं. मग दौलतराव त्यांची प्रार्थना ऐकून त्यांसहवर्तमान खोतजीचे गाडींत बसले. खोतजीनें गाडी हांकलून हां हां

ह्मणतां त्यांना आपले घरीं नेलें, तें त्यांस समजलें देखी-ल नाहीं. गाडीचा शब्द ऐकून खोताची बायको सो-नुबाई लवकर बाहेर आली, आणि तिनें आंगण्याचा दरवाजा उघडिला. त्यावेळेस तिला आनंद झाला तो कोण वर्णील! तिनें मुलांस गाडींतून खालीं घेतलें, ए-केकास आलिंगन दिलें, मुके घेतले, आणि त्यांस घरांत घेऊन गेली, तेथें तिचीं मुलेंही सजून ह्यांची वाट पाहात बसलीं होतीं. त्यांनीं मोठे प्रीतीनें, मोठे नम्रतेनें ह्यांचें आगत-स्वागत केलें. मग खोतजीनें दौलतरावांस माडीवर नेलें. तेथें द्राक्षें, निंबें, चकोत्रे, अननस, डाळिंबें, केळीं, अं-जीर, पेरू; अशीं नानाप्रकारचीं फळें; व गुलाब, मोगरा, जाई, कुंद, शेंवती, चांपा, ह्यांचीं फुलें आधींच आणून ठेविलीं होतीं. पाणी स्फटिकासारिखें निर्मळ व अमृ-तासारिखें गोड, खडेसाखर, बदाम, पिस्ते, निंबाचे सरबत, हीं होतीं. दौलतरावांनीं अंमळ स्वस्थ होऊन मुलांसह-वर्तमान त्यांतलें कांहीं खाल्लें, आणि ते समाधान पावले. खोतजीचीं भांडीं सोन्यारुप्याचीं नव्हतीं, तांब्या पितळे-चींच होतीं, पण स्वच्छ लकलकीत होतीं. ज्यांवर प-दार्थ वाढले होते तीं ताटें नव्हतीं; केळीच्या आगोतल्या होत्या; तें पाहून रामराव कुशीस होऊन कृष्णरावाकडे पाहून गालीं गालीं हंसतो; कृष्णरावही त्याकडे पाहून हळूच हंसतो. तें खोतजीचे लक्षांत येऊन तो ह्मणाला, "रावजी, तुह्मी आपले घरीं रुप्याच्या ताटांत पदार्थ भाक्षितां तसें येथें नाहीं खरें, पण, आह्मीं गरिबांनीं भ

क्तीनें तुह्मांस अर्पिलें आहे, ह्मांत गोड करून घ्यावें.

मग फळाहार झाल्यावर अंमळ वाडींत इकडे तिकडे फिरले, तों जेवणाची वेळा झाली. जेवणही साधेंच होतें पण स्वच्छ आणि मिष्ट होतें. ते पदार्थ भक्षून मुलांस वाटलें कीं, आह्मी असे रुचीनें कधींच जेवलों नव्हतों. दिवस उष्णकाळचे होते; वायु मंद सुगंध शीतळ वाहत होता; त्याच्या योगानें दौलतरावांस डुलकी आली; मग अंमळ वामकुक्षी करून ते खोतजी आणि आपण वाड्या, शेतें, डोंगर, सर्व ठिकाणीं फिरावयास गेले; तेथें बहुत आनंद पावून पुनः बिऱ्हाडीं आले. इकडे सोनुबाईनें जेवणानंतर आपले व दौलतरावांचे मुलांस संगती घेऊन त्यांस सर्व घर दाखविलें; गुरांचा वाडा, घोड्यांची शाळा, बकरीं, मेंढरें, हरणें, अशीं दाखवून एक चिमणें कोंकरूं त्यांस खेळावयास दिलें. पुढें खबूतरें दाखविलीं, तेथें पिलांस त्यांच्या आया चारा घालीत, तीं चाऱ्याकारितां किलबिल किलबिल करीत. पुढें नेऊन दाहावीस मधींचीं पोळीं दाखविलीं, त्यांतल्या माशा बाहेर जाऊन मध घेऊन येऊन त्यांत ठेवीत आहेत, असा उद्योग चालला होता तो सर्व तिनें त्यांचे दृष्टीस पाडिला. तें दाखविल्यावर आणखीही दुसरे गांवचे पदार्थ तिनें त्यांस पुष्कळ दाखविले.

त्यांतले बहुतेक चमत्कार दौलतरावांचे मुलांनीं पूर्वीं कधीं पाहिले नव्हते, ह्मणून त्यांस फार आनंद वाटला. तीं ह्मणूं लागलीं कीं फिरून एक वेळ फेरी करून

येऊं. इतक्यांत घरांतून निरोप आला कीं, मुलांचें जेवण सिद्ध झालें आहे, तो येतांच सोनूबाईनें त्यांस नेऊन पुन: यथेष्ट जेऊं घातलें.

नंतर खोतजीनें आणि त्यांचे वडील मुलानें विणा सारंगी लावून अंमळ गायन केलें. धाकट्यांनींही कांहीं पदें ह्मटलीं. तें ऐकून दौलतराव फार प्रसन्न झाले.

खोतजी वाद्यें गवसणींत घालीत आहेत तों दौलतराव आपले मुलांस ह्मणतात, "रामराव, कृष्णराव, अंमळ तुह्मीही गावें." असें ह्मणतांच ते गोंधळले, तें पाहून सर्व माणसें हसूं लागलीं.

नंतर दौलतरावांनीं गाडी तयार करावयास सांगितलें. खोतजीनें ती रात्र राहाण्याविषयीं दौलतरावांस फारच आग्रह केला; त्यांनीं, क्षमा करा, माझ्यानें राहावत नाहीं, असें ह्मणून जावयाचाच निश्चय केला. नंतर गाडींत बसून चालले आहेत तों मार्गांत दौलतराव पुसतो, "कां रामराव, आज तुह्मांस कसें वाटलें?"

रामराव– फार बरें, बाबा, तीं माणसें फार भलीं आहेत. त्यांनीं आह्मांस फार आनंदी केलें.

दौलत०– तुह्मांस आनंद वाटला, ह्यांत मी समाधान पावलों. पण जर खोतजीनें आपले सत्कारास इतका श्रम नसता घेतला; जर त्यानें तुह्मांस अगदींच कांहीं खावयास नसतें दिलें, तर तुह्मांस असा आनंद होता?

रामराव– न होता, ह्यांत काय संशय?

दौलत०— मग तो मनुष्य तुला कसा वाटला असता ?
रामराव— वाईट गव्हार वाटला असता.
दौलत०— असें ? तर तो मनुष्य ते दिवशीं आपले घरीं आला होता, तेवेळेस त्वां त्याला खावयास कांहीं दिलें नाहीं, तें नाहीं तर नाहीं, पण उलटा त्याचा खेळ केला, तर आतां सुजन कोण, तूं कीं तो ?
रामराव— ( लज्जा पावून ) आमचा सत्कार करावा हा त्याचा धर्म होय, कांकीं त्यास आमच्या जमिनीपासून मिळतें.
दौलत०— मिळतें कसें ?
रामराव— आमचे जमिनींत दाणा, कडबा, फळफळावळ, जें उत्पन्न होतें तें सगळें तो घेतो.
दौलत०— खरें सांगतोस. खोतास ह्या सर्वांचा उपयोग होतो, पण तो सगळे दाण्याचें काय करितो ?
रामराव— त्यानें तो आपलें, आपले बायकोचें, आणि मुलांचें, पोट भरितो.
दौलत०— आणि कडब्याचें ?
रामराव— तो तो आपले बैलांस खावयास घालतो.
दौलत०— आणि बैलांचा तो काय उपयोग करितो ?
रामराव— त्यांस तो नांगरास लावितो.
दौलत०— बरें तर, हें इतकें उत्पन्न जमिनीचें जमिनीकडेस लागलें; पण तुला खरें वाटतें कीं, बाकीचें राहिलें तितकें सगळें त्याचे कुटुंबास आणि बैलांस लागतें ?

रामराव– त्यांतला विभाग कांहीं गाई ह्मशींसही मिळतो.

कृष्णराव– कांहीं मेंढ्यांसही.

दौलत– तें खरें, पण जितकें उत्पन्न होतें तितकें सगळें तीं खातात काय?

रामराव– नाहीं, त्यांतील कांहीं भाग विकून पैका करितो, असें तो ह्मणत होता.

दौलत०– आणि त्या पैक्याचें तो काय करितो?

रामराव– मी थोडके दिवसांवर पाहिलें कीं, त्यानें एक पिशवी भरून पैका आणून तुला दिला.

दौलत०– ह्यावरून पाहा कीं, माझे जमिनीचे उत्पन्नांतून मला अधिक मिळतें कीं खोतास; कडबा बैलांकडे जातो हें खरें, पण तो खर्च गुरें जमीन खेटून परत करितात. गाई, ह्मशी, मेंढरें, ह्यांचे शेणाचें, लेंड्यांचें खत होतें, तेणेंकरून पीक अधिक होतें. त्याचीं बायका पोरें जें खातात तितकें शेतांत काम करून तीं फेडतात. तीं बेणतात, पेरतात, कापतात, झोडतात, व मळणी काढितात.

आणि ही सगळी मजूरी माझे नफ्यास पडते. बाकी राहिलें तें तो मला पैसे द्यावयाकरितां बाजारांत नेऊन विकतो. आतां त्यास कांहीं त्यांतून राहात असेल असें ह्मटलें तर, तो इतकी मेहनत करितो त्यास कांहीं नको? ह्यासाठीं एक वेळ आणखी तूं मला सांग कीं, आह्मां दोघांतून अधिक उत्पन्न कोणास भोगतें?

रामराव– आतां मी उघड समजलों; तुला अधिक भोगतें.

दौलत०– तर, हा खोत नसता तर मला नफा होता ?

रामराव– कां ? हा एकच खोत गांवांत आहे काय ?

दौलत०– खरें ह्मणतोस. पुष्कळ आहेत, पण ह्यासारिखे भले नाहींत. मागें मी दुसऱ्या एकास खोती दिली होती, त्यानें जमीन खराब्यास आणिली; झाडें तोडिलीं; घर बंगला पडावयास झाला, सामाशी हमा त्यापासून मला पोहोंचूं नये, त्याविषयीं त्यास बोललों तर तो चोख हिशेब दाखवी कीं त्याचीं सर्व आवतें विकलीं तरीं माझा फडशा होऊंनये.

रामराव– तो लुच्चा, असें करी ना ?

दौलत०– तर हाही मनुष्य त्याच प्रकारचा असता तर मग मला नफा होता ?

रामराव– न होता ?

दौलत०– ह्यासाठीं मला जें मिळतें तेणेंकरून मी उपकारी कोणाचा होतों ?

रामराव– ह्या भले खोताचा.

दौलत०– तर असा जो मनुष्य आपले उपयोगास पडतो, त्याचा आदरसत्कार आपण चांगलेपणें करावा हें आपणांस योग्य नव्हे ?

रामराव– बाबा, त्वां माझी चूक मला स्पष्ट दाखविली. (इतकें ह्मणून कांहीं पळें ते उगे राहतात. नंतर दौलतराव पुनः बोलणें आदरितात.)

दौलत०— तुह्मीं तेथें सारंगी कां वाजविली नाहीं?
रामराव— ती मला वाजवावयास येत नाहीं.
दौलत०— तर खोताचे मुलांस असें कांहीं येतें आहे कीं जें तुह्मांस येत नाहीं.
रामराव— तें खरेंच. पण मला संस्कृत येतें तें त्यांस कोठें येतें?
दौलत०— आणि तुला शेत नांगरावयास कोठें येतें? तुला दाणा पेरतां येतो? झाडांचीं कलमें करितां येतात?
रामराव— तें शिकावयाचें मला काम नाहीं. मला कांहीं कुळंबावा करावयाचा नाहीं.
दौलत०— जर पृथ्वीवर सगळीं मनुष्यें संस्कृत शिकलीं तर पुढें कसें होईल?
रामराव— वाईट. मग आपणांला दाणा शाकभाजी हीं मिळणार नाहींत.
दौलत०— कोणी एक संस्कृत शिकलें नाहीं तर त्यावांचून चालेल कीं नाहीं?
रामराव— मला वाटतें चालेल.
दौलत०— तर आतां जो आपला संवाद झाला ह्याची जन्मवर आठवण ठेव, कीं हा खोत, ज्याचा पोशाग जाडा आहे, आणि ज्यानें तुला अनाडी रीतीनें नमन केलें, हा तुझेपेक्षां अधिक चांगला, तुझेपेक्षां अधिक जाणता, आणि मातक्यानें अधिक उपयोगी गोष्टींचा जाणता. ह्यावरून तूं पाहा कीं जाडे चिर-

गुटांवरून किंवा साधे भोळे रीतींवरून कोणाची अ-
वगणना करणें हा किती अन्याय आहे !

---

# बापांची समजी,

## नाटक एक अंकी.

### पात्रें.

नारायणराव. . . . . . . . . . . . . . कोणी गृहस्थ.
चिंतोबा. . . . . . . . . . . . . . . त्याचा मुलगा.
भागीरथी. . . . . . . . . . . . . . त्याची मुलगी.
शिवराम . . . . . . . . . . . . . . गांवचेवाण्याचा मुलगा.
गहिना. . . . . . . . . . . . . . . त्याची बहीण.

### स्थळ,

नारायण रावाची वाडी.

### प्रवेश १,

नारायणराव, भागीरथी, आणि चिंतोबा.

भागीरथी— काय बाबा, काय आज्ञा?

नाराय०— मी तुला फिरून एक वेळ सांगतों कीं, तुह्मी
कोणीं आजपासून त्या वाण्याचे मुलांशीं संबंध ठेवि-

ला तर मी फार रागें भरेन.

भागी०–विठ्ठल शेटीवर इतका तुझा राग कां बरें ?

नाराय०– तें तुला विचारावयास अधिकार नाहीं.

चिंतोबा– नाहीं खराच. तें तुला आह्मीं विचारूं नये,( भागीरथीस ) अगे, माझा बाबा तुला आज्ञा करील तीं निमूट पणें ऐक; त्यास कां ह्मणून उलटून पुसूं नको.

नाराय०– हाच माझा अभिप्राय, कांकीं विठ्ठल शेट मोठा दांडगा, अनुपकारी, कृतघ्न आहे. म्यां ह्या गांवचे धन्यानें त्याजपाशीं एक गोष्ट मागितली असतां त्यानें नाहीं ह्मणावें ! जो आज माझे गांवीं राहून सुखी झाला आहे त्यानें !

चिंतोबा– हें फार वाईट बाबा. तर असल्याचे मुलांशीं आह्मीं आजपर्यंत मैत्री केली हें ठीक नाहीं केलें; खरेंच. शिवरामासारिखा संवगडी दुसरा एकच मुलगा जर मला ह्या गांवांत असता, तर शिवरामापाशीं एक शब्द बोलिलों नसतों.

भागी०– बाबा, तूं ऐकतोसना भाऊ काय ह्मणतो तें ? शिवराम आणि गाहिना फार चांगलीं मुलें आहेत. आहा ! त्यां सारिखीं आह्मी असतों तर काय पाहिजे होतें !

नारा०– तीं बरीं असोत किंवा वाईट असोत, त्यांचें मला काय ? मी तुह्मांला आणखी एकवेळ सांगतों कीं त्यांशीं तुह्मी चकारशब्द बोलूं नका. बोललां तर

तुह्मांस घरांत अडकावून ठेवीन.

चिंतोबा– शिवरामास ह्या वाडीचे दरवज्याशीं तर येऊं-दे! मग मीं त्याला सांगेन काय आहेतें!

नाराय०– तूं त्याला काय करशील? त्याचा अपमान करूं नकोहो, किंवा त्यास वाईट बोलूं नकोहो.

चिंतोबा– ( अंमळ गोंधळतो ) माझा तसाच अभिप्राय. पण मी त्यास आपले वाडीचे आसपास शंभर हातांत येऊं देणार नाहीं.

भागी०– बाबा, विठ्ठलशेट असा मनुष्य असतां तूं त्याशीं इतकी मैत्री बाळगीत होतास! तूं त्यास प्रामाणिक, जाणता, भला ह्मणून मोजीत होतास; हें कसें? त्वां पंतोजी ठेविल्याचे अगोदर फुकटावारी त्यानें भाऊस मोडीचें अक्षर शिकाविलें, हें तुला स्मरत असेलच; आणि मलाहीं मूळाक्षरांपासून त्याचीच शिक्षा.

नारा०–तें सर्व असेल, पण आतां ह्या प्रकरणीं तूं त्यासंबधीं एक शब्द काढूं नको. मीं त्याशीं बोलणें वर्ज केलें, तसें तुह्मीं त्याचे मुलांशीं करावें. काय, तुला रडें आलें? आसवें पूस पाहूं तीं. माझें सांगितलें करावयास तुला इतकें अवघड पडतें नाहीं?

भागी०– तसें नाहीं बाबा, त्यांचा माझा फार दिवसाचा स्नेह ह्मणून अवघड वाटलें, त्याची तूं क्षमा कर. एऱ्हवीं तुझी आज्ञा ऐकण्यांत मी भाऊस हारीं जाणार नाहीं.

चिंतोबा—पाहूंया आतां कोण हटतें तें.

भागी०— बाबा, तूं ह्मणशील मीं त्यांचा द्वेष करावा, तर तें माझे हातीं नाहीं; माझे मनांत तसें येणारच नाहीं.

नारा०— त्यांचा द्वेष करूंनको, आणि त्यांस उपद्रवही करूंनको. माझी आज्ञा इतकीच कीं त्यांचा संबंध तोडून टाक.

भागी—० तुझे मर्जीप्रमाणें मी करीन. पण मला एक गोष्ट मागावयाची आहे.

नारा०— काय ती ?

भागी०— कीं, तुझी आज्ञा मला त्यास सांगितली पाहिजे, ह्यासाठीं त्यांशीं एकवेळ बोलावयाचें पडेल तें मला बोलूंदे.

चिंतोबा— कशास? आतां त्यांशीं आपणांस काय करावयाचें आहे ?

नारा०—खरें ह्मणालीस, तूं त्यांना वर हेंही सांग कीं, जर तुमचे बापानें तीन दिवसां आंत पैसे दिले नाहीं तर तो मग पस्तावेल.

भागी०— विठ्ठल शेटीनें तुझें कांहीं देणें आहे काय ?

नारा०—तुला वाटतें कीं देणें नसतां मी असें बोलतों? पण तें तुला मनास आणावयाचें कांहीं प्रयोजन नाहीं. सांगितली आहे ती आज्ञा ऐक. ( तो बाहेर जातो.)

## प्रवेश २,

### भागीरथी आणि चिंतोबा.

भागी०– भाऊ, शिवरामाशीं आणि गहिनेशीं तुझी मैत्री अशीचना ?

चिंतोबा– ताई, तूं बाबाची आज्ञा अशीच पाळतेसना ?

भागी०– त्वां आज्ञा पाळणाऱ्याचा डौल मात्र घातला आहे. आंत तुझें सगळें कृत्रिम आहे. तूं आर्जव संपादून बाबापासून कांहीं पैसे काढावयास पाहात आहेस. पैशांवांचून तुला दुसरें कांहीं आवडत नसतें.

चिंतोबा– मी कधीं मधीं बाबाची आज्ञा मोडीत असतों, ह्मणून काय इतकी निक्षून मनाई झाली असतांही मीं त्या पोरांकडे जावें, अशी तुझी इच्छा आहे ?

भागी०– त्याची मैत्री तोडावयास तुला कांहींच अवघड वाटत नाहीं, तर तीस तूं योग्यच नव्हेस. दुसऱ्यापासून तुला कांहीं मिळावयाची आशा सरली ह्मणजे तुझी ममता लागलीच उडते.

चिंबोता– आतां तसले भिकारी पोरांनीं मला फार द्यावयाचें होतें; खरेंच.

भागी०– तर नुकते आठ दिवस झाले गहिनीपासून त्वां मोतशिंपीची डबी कशास घेतली ? आणि शिवरामापासून कालचे दिवशींच त्वां मोठे युक्तीनें सुरीकातर क-

शास काढिली ? शेंकडो वेळ तुला त्यांपासून खारी-
क खाऊ मिळाला असेल आणि आतां—

चिंतोबा— आणि आतां मी बाबाची आज्ञा ऐकणार. प-
ण खरेंच, गडे, वाण्याचीं मुलें सोबतीस चांगलीं
होतीं !

भागी०— समजलें बाबा, लांब कशाला, आजच सं-
ध्याकाळ झाला नाहीं तंव तुझें कोणे तरी गांवचे हें-
द्रे मुलाशीं जुगलें ह्मण.

चिंतोबा— खरेंच, त्यांची मैत्री तुटली ह्मणून त्यांत माझा
काय तोठा व्हावयाचा आहे ?

भागी०—त्यांचा तरी काय तोटा व्हावयाचा आहे ?

चिंतोबा— जागे, मी त्यांची परवा करीत नाहीं, पण
हा शिवराम येतो आहे असें वाटतें. त्यास तूं सांग
कीं माझे जवळ येऊंनको.

भागी०— तूं त्याला पाहावयास इच्छीत नसलास तर येथू-
न जासना कां ?

चिंतोबा— मी त्यास पाहूंही इच्छीत नाहीं, आणि मी
येथून जाणारही नाहीं.

---

## प्रवेश ३,

### भागीरथी, चिंतोबा, आणि शिवराम.

( हातांत एक निळ्यारंगाचे गलेफानें झांकलेला पिं-
जरा घेऊन. )

शिवराम– ( भागीरथीस ) आहा ! काय आनंद झाला आहे मला तुला पाहून !

चिंतोबा– गड्या शिवरामा, त्या लहानगे पिंजऱ्यांत का-यरे आहे तें ?

शिवराम– तें मला भिवजीनें काल नजर केलें.

चिंतोबा– आणि त्वां तें मला नजर करावयास आणि-लें आहे वाटतें ?

भागी०– ( एकीकडे ) काय भगल भावार्थी !

शिवराम– मीं तें भागीरथीसाठीं आणिलें आहे.

भागी०– मला! नको नको, मला नको. तुला नजर केलें आहे तें मी घेणार नाहीं. पण तें आहे काय ?

चिंतोबा– ( धट्टाईनें ) आण इकडे काय आहे तें मी पाहातों. ( शिवरामाचे हातांतून पिंजरा ओढितो, तो गच्च धरून ठेवितो. ) एकादें ओंगळवाणें पाखरूं असावें.

शिवराम– तुझ्यानें सांगवलें नाहीं. तूं जिंक, भागीर-थी. पण मी तुह्मांस भ्रांतींत टेवीत नाहीं. ह्यांत चंडो-ल आहे. आहा ! काय खासापक्षी ! ( तो पडदा उघडून तीस दाखवितो, आणि पिंजरा तिचे हातांत देतो. )

चिंतोबा– ( वाईट वाटून. ) इश्शरे ! काय भेट आणि-ली आहे ! ह्याचे अंगास खंडीभर तर घाण येते आहे.

भागी०– आहा ! काय चांगला पक्षी ! कसा सुंदर दि-

सतो !

शिवराम— दुसरा मिळाला तर तो मी तुला देईन, चिंतोबा. भागीरथी, तुझी त्याला संवई लागली ह्मणजे तो नानाप्रकारच्या चेष्टा करील आणि तुला हंसवील.

भागी०— ह्मणूनच मी तो तुजपासून घेणार नाहीं. ( चंडोलास ) रे लबाडा, जा तूं आपले धन्याकडे. शिवरामा, हा तुझा तूं परत घे. ( ती त्यास देऊं लागते, तो घेत नाहीं, मग ती पिंजरा तेथें एकीकडे ठेविते. )

चिंतोबा— कायरे, तूं ऐकत नाहींस? नाहीं, तुला तो परत नेलाच पाहिजे.

शिवराम— तो आतां माझा नव्हे. भागीरथी, तूं मला विरस करूंनको, आणि तूं करणार नाहींस ही माझी खातरी आहे. ( तो असें ह्मणून शेंपन्नास पावलें दूर जातो. )

चिंतोबा— ( भागीरथीस ) तूं त्याला हात तर लाव, मग पाहा बाबा तुझी काय अवस्था करील ती.

भागी०— तूं मला एवढें भय दाखवितोस, तर मी तो घेणारच. माझे बावानें मीं चंडोल घेऊं नये ह्मणून मला मनाई केली नाहीं. मला इतकीच खंत वाटते कीं ह्यावेळेस ह्याचे बद्दल शिवरामास द्यावयास मजपाशीं कांहीं नाहीं, “ तूं अतःपर मजकडे येऊं नको ” ह्या दुःखाचे शब्दांवांचून—

चिंतोबा— तर तें काम मला कां सांगसना. मी त्याची आणि त्याचे चंडोलाचीही बिदाई करितों.

भागी०— नको, नको तूं एवढा श्रम घेऊं. (ती शिवरामास मागें बलाविते; तो येतो, ती त्यास ह्मणते.) माझ्या मित्रा, माझ्यानें ही तुझी नजर घेववत नाहीं. तुला कांहीं वर्तमान सांगावयाचें आहे तें असें वाईट आहे कीं,—

चिंतोबा— खरेंच, खरेंच, शिवरामा, तूं जर इतःपर आमचे वाडीचे आसपास आलास किंवा आमचे घराकडे त्वां पाहिलें तर—

शिवराम— काय? मला मनाई करावयाला तुझे ठायीं इतका निष्ठूरपणा आहे? मला वाटलें होतें कीं तूं माझा जिवलग मित्र आहेस.

चिंतोबा— तर मी सांगतों कीं तुमची आमची मैत्री आजपासून तुटली. तुला ह्याचें वाईट वाटूं नये.

भागी०— नाहींरे शिवरामा, त्याला बोलतां येत नाहीं, ह्मणून तूं मनांत वांकडें आणूं नको— तुला ठाऊक असेलच कीं, तुझे बाबाचा आमचे बाबाशीं कज्जा झाला आहे.

शिवराम— मला ठाऊक आहे. आणि मी त्यासाठीं मोठा चिंतेंत आहें, पण आपली मैत्री तुटावी इतके पल्ल्यास गोष्ट आली आहे असें मला वाटलें नव्हतें. त्यांतूनही चिंतोबा कडून इतका निष्ठूरपणा होईल हें माझे स्वप्नींही नाहीं.

चिंतोबा– ताई, तूं ह्यास लावून देतेस, कीं मी बाबाला जाऊन सांगूं ?

शिवराम– भागीरथी, तुह्मांस मजकरितां कांहीं उपद्रव होईल असें असल्यास–

भागी०– भिऊं नको, माझे मित्रा, तूं अंमळ असलास तरी माझे बाबास वांकडें वाटणार नाहीं.

चिंतोबा– मी त्यास जाऊन सांगतों, मग कसें आहे तें समजेल. ( तो बाहेर जातो, पण कांहीं वेळानें मागें येऊन नकळत पिंजऱ्याचें दार उघडून चंडोलास उडवितो. )

---

## प्रवेश ४,

### भागीरथी आणि शिवराम.

शिवराम– देवासाठीं, भागीरथी, सांग वरें. मीं तुझे भावाचा काय आन्याय केला आहे तो ?

भागी०– त्वां चंडोल मला दिला तो एक त्याला जळ आला आहे; दुसरें, त्याला वाटतें कीं असें केलें ह्मणजे आपण बाबाचा आवडता होईन. आमचे बाबास तुमचे बाबाचा फार राग आला आहे; मला समजत नाहीं कांतो.

शिवराम– मलाही समजलें नाहीं. माझा बाबा एकटा इकडून तिकडे फिरत होता तेव्हां त्यास मी आपणाशीं इतकें बोलतांना ऐकिलें, कीं " नारायणराव

मजशीं असें करील हें मला वाटलें नव्हतें." मग तो माझे आईकडे गेला; तेथें माझी बहीण होती, तिला काय तें समजलें असावें.

भागी०— तें कांहीं असो, पण ह्याचें कसें करावें.— माझे बाबाने आह्मांस तुमचें दर्शन घेण्याची किंवा तुह्मांशीं बोलण्याची मनाई केली आहे.

शिवराम— काय, तुझी माझी ही शेवटची भेट? तुह्मीं आह्मांशीं अतःपर बोलूंनये? हा! आतां तुला माझ्यानें कसें सोडवेल! माझी ताई, जीस तुजवांचून क्षणभर सुखास पडत नाहीं, ती आतां कसें करील! हाय हाय, आतां आमची गत कशी होईल!

भागी०— अवसान सोडूं नको, माझे जिवलगा गड्या; असें झालें आहे तरी आपले मैत्रीस धोका नाहीं. आपण एकमेकांस प्रत्यक्ष भेटलों नाहीं तरी एकमेकांची आठवण करावयास आपणांस कोणाच्यानें मना करवत नाहीं. अशी कीं, त्वां मला चंडोल दिला आहे, त्याला मी तुझ्या नावानें क्षणक्षणां हाक मारीन. आहा! तो मला मग किती आवडेल;

शिवराम— तूं मला हें सांगून किती आनंद करीत आहेस! आतां मी दुःख करावें असें मला वाटत नाहीं. ओहो! ठीक झालें, ही माझी ताई आली,— मला ती खिन्न दिसत आहे.

## प्रवेश ५,

### भागीरथी, शिवराम, आणि गाहिना.

भागी०— ( गहिनेस भेटावयास धांवते. ) माझे गडे गहिना !

गहिना— माझे जिवलगे भागीरथीबाई ! ( चिंतू बापास घेऊन आला आहे; ते उभयतां आड राहून हळूच ऐकताहेत. )

शिवराम— ( गहिनेस ) तूं आतां येथें कांहीं वाईट वर्तमान ऐकशील, ताई.

गहिना— मींही कांहीं बरें आणिलें नाहीं. आपला बाबा आणि आई अशीं चिंतेंत पडलीं आहेत कीं—

शिवराम— ( भागीरथीस ) पाहा मीं तुला सांगितलें नव्हतें ? ( गहिनेस ) बरें काय आहे तें सांग.

गहिना— ( भागीरथीस ) तुमचा बाबा आमचे बाबावर रागें भरला आहे; पण मला वाटतें कीं तुमचे बाबाचें मागणें अंमळ गैरवाजवी आहे.

भागी०— गैरवाजवी ! असें होणार नाहीं. जर अशी गोष्ट आहे तर मी त्यास चार गोष्टी सांगून-वळवीन. बरें, काय आहे तें मला सांग तर खरें.

गहिना— त्या डोंगरी जवळची आमची राई तुला ठाऊकच आहे.

भागी०— होय, वसंतऋतूंत आपण तिकडे कोकिळांचें गाणें ऐकावयास जात असतों. काय रम्य जागा

आहे ती!

गहिना— ती राई आमचे बाबास विश्वास रावांनीं दिली आहे.

भागी०— बरें, मग?

गहिना— ती तुझे बाबाचे मनांत घ्यावयाची आहे.

भागी०— काय! माझे बाबाचे मनांत घ्यावयाची आहे?

शिवराम— काय! आमची राई तो घेणार?

गहिना— माझे बाबानें त्यास सांगितलें कीं "तुमचेपासून मजवर आणि माझे कुटुंबावर फार उपकार झाले आहेत, ते स्मरून मी ह्या गोष्टींत तुमचा संतोष करावयास अनमान करितोंना, परंतु ज्यानें मला राई दिली आहे त्यानें प्राण जातेवेळेस माझें वचन घेतलें कीं, मीं ती विकूंनये. तिचा उपभोग घ्यावा, कीं जेणें करून मला त्याचें स्मरण राहील.

भागी०— येऱ्हवीं माझा बाबा मला सर्व गोष्टींनीं पूज्य आहे, पण अशी गोष्ट जर आहे तर तो अन्याय करितो हें ह्मणणें मला प्राप्त आहे. पण मला वाटतें कीं तो फुकट मागत नसेल. तो असें कधीं मनांत आणणार देखील नाहीं.

गहिना— नाहीं नाहीं, तसें नाहीं. तो माझे बाबास किंमत देणार. ती तीस घटे तिजपेक्षां अधिक ही द्यावयास सिद्ध आहे.

शिवराम— तो राई घेऊन काय करणार? तो कांहीं योजून ही मागत असेल.

गहिना– तो ती घेऊन तींतलीं सगळीं झाडें कापून टाकणार.

भागी० आणि शिवराम– कापून टाकणार ?

गहिना– राई तोडिली ह्मणजे मैदान होईल आणि मागचा डोंगर चांगला दिसेल.

भागी०– होयरे होय! आतां माझे लक्षांत आलें. त्यानें परवां शहरांतून मेस्त्री बलाविला होता, तो त्याशीं मोडतोडीच्या गोष्टी बोलत होता खरा. माझे बाबास असले छंद फार; त्याचे हातीं एक नकाशा नेहमीं असतो. तो दिवसांतून शंभर वेळां मोडतोडीच्या गोष्टी करीत असतो, मशीं देखील; तें ऐकून मलाही बरें वाटतें; पण आतां मी तिकडे चित्त देणार नाहीं. तुझे बाबानें आपली राई कदापि देऊंनये, हें माझें मत आहे.

शिवराम– सगळीं झाडें तोडून टाकल्यावर, जे बिचारे पक्षी त्यांवर बसून सुंदर गायन करीत असतात, त्यांनीं कोठें जावें? कोठीं कोठें करावीं ? आणि मग आपण दाणा तेथें कोणास घेऊन जावें?

गहिना– मग उन्हाळ्यामध्यें आपण उष्म्यापासून थंड कोठें व्हावें ?

भागी०– आपण तेथें गातों तेव्हां डोंगराकडून प्रतिशब्द येतो तो मग कोण ऐकेल ?

गहिना– मला वाटतें कीं पालवलेलीं झाडें डोंगरापेक्षां सुंदर दिसतात.

त०— असें असतां मैदान करून माझे बाबास काय नफा वाटतो तें कोण जाणे. दुसरीं चोहोंकडे मैदानें आहेत तीं थोडीं आहेत?

शिवराम— जर झाडें तोडिलीं तर कुऱ्हाडीचे प्रत्येक घायास माझा कोणी हात पाय तोडून नेत आहे असें मला होईल.

भागी०— नाहीं, नाहीं, तुझे बाबाकडून ती राई कोणाच्यानें घेववत नाहीं.

गहिना— कोणाच्यानें घेववत नाहीं! पण आतां त्याच्यानें ती ठेववत नाहीं.

भागी०— कां? मला वाटतें कीं माझे बाबाच्यानें त्यावर जुलूम करवणार नाहीं. इतकी सत्ता त्याजकडे नाहीं.

शिवराम— पण जर तो आह्मांशीं असाच राग ठेवील, आणि तुह्मी आह्मांस भेटूं बोलूंनये असें करील, तर जळोरे मेली ती राई. तसल्या दाहा राया द्यावयाच्या पडल्या तरी मी देईन.

गहिना— आणि मलाही तसेंच वाटतें. भागीरथी, तुजवांचून मी काय करावें बरें? तुला बरोबर घेतल्यावांचून त्या राईंत जावयाची मला इच्छा देखील होणार नाहीं.

भागी०— गडे गहिना, आपण त्या राईंत काय काय मौजा केल्या आहेत! नाहीं बरें? संध्याळीं आपण

तेथें गेलों ह्मणजे सगळे दिवसाचें वर्तमान एंककापून सांगावें आणि सुख दुःखाच्या गोष्टी कराव्या !

गहिना— आणि तेथें आपण जाऊन कामही करावें. त्वां शिवावें; म्यां कशीदा काढावा; शिवरामानें फुलें आणिलीं ह्मणजे काम सोडून आपण हार गुंफावयास लागावें; माझे हार म्यां तुला द्यावे, तुझे त्वां मला द्यावे. असे असे नाना प्रकार आपण तेथें करावे.

शिवराम— हायरे ! आतां तें सगळें संपलें ! तसा दिवस पुनः यावा नलगे.

भागी०— खरेंच, तसे आनंदाचे दिवस कधीं यावयाचे नाहींत. पण तुमचे वियोगीं मला दुखणें येईल; मग माझा बाबा खंती होईल; मग मी त्यास सांगेन कीं मी वांचावें अशी तुझी इच्छा असली तर माझे मैत्रांना माझे पाशीं येऊं दे. ( तीं तिघें एकमेकांस आलिंगितात आणि डोळ्यांतून आसवें काढितात. )

गहिना— पण तोंपर्यंत राई कापून जाईल.

भागी०— कां ?

गहिना— हाय हाय ! मी तुला सगळी कथा सांगितली नाहीं. वर्षें दाहा झालीं, तुझे बाबानें माझे बाबास रुपये पांचशें कर्ज दिले होते उदीम करावयास. ते अझून माझे बाबानें फेडिले नाहींत.

भागी०— ( एकीकडे ) माझा बाबा पैसे देणें, पैसे देणें, ह्मणत होता तें हें.

शिवराम— ह्मणून, जर आह्मीं राई दिली नाहीं, तर

तुझा बाबा आह्मांपासून रुपये पांचशें ठोकून घेतो; ते आज आह्मांला कोणी देईल असें नाहीं. तुझे बाबाशिवाय आह्मांस दुसरा कोणी ओळखीत नाहीं; आणि तोच पैसे मागणार, मग काय!

भागी०— इतकेंच जर आहे तर तें माझे हातीं आहे.

गहिना— तुझे हातीं आहे! हें कसें?

शिवराम— काय? ह्मणतेस काय, भागीरथी?

भागी०— (हंसत मुख करून.) तुह्मी वचन द्याल, कीं कोणापाशीं सांगणार नाहीं?

गहिना— तुझी गोष्ट— आणि आह्मी फोडूं!

शिवराम— तुझे मनांत आह्मांविषयीं संशय!

भागी०— बरें तर ऐका! पण त्या गोष्टीचें स्मरण झालें ह्मणजे मला अझून उभड येतो. काय माझे आईची मजवर ममता होती! आहाहा! माझी आई शेवटीं दुखण्यांत पडली तेवेळीं एके दिवशीं खोलींत एकटी पाहून तिनें मला बाजेजवळ बोलाविलें, आणि डोळ्यांतून आसवें काढून माझा मुका घेतला, आणि उशाखालून एक मोहरांची पिशवी काढून मजपाशीं दिली. देतेसमयीं बोलली, "माझे लाडके मुली, घे हीं. कोणास सांगूं नको. हे पैसे तसेंच काम पडेल तेव्हांच खरच. तुझें मन दयाळू आहे, तूं शाहाणी आहेस." (आणखी असें ह्मणाली.) "तूंच हे पैसे चांगले कारणीं खरचशील. तुझा बाप मनाचा थोर आहे, पण अंमळ हट्टी आणि डंखी आहे. आपला

खटला मोठा आहे; त्यांत कितीएक गरीबगुरीब कुळें ज्यांस तोटे आले आहेत, आणि ज्यांस तुझा बाबा तर दमडी सोडीत नाहीं, असें आढळेल, तेथें तूं गरिबांस आंतून सहाय होऊन त्यांचें काम कर. तुजवर कोणी उपकार करील त्यासही तूं ह्यांतून देतजा; बापापाशीं मागूं नको. आज दोनवर्षें मीं तुझे हातून असलीं कामें घेतलीं आहेत. त्यावरून मी कोणते प्रकारचे माणसावर दया करीत होतें, तें तुझे लक्षांत असेलच. सारांश, पैसे मी तुजवर विश्वासितें; तूं भलें मनुष्य संकटांत पडलें आहे पाहून, त्यास त्यांतून काढ. तूं बरें करिशील तें मी समजेन कीं मींच केलें, आणि तुलाही माझें वारंवार स्मरण होईल." इतकें बोलली, तों पुढें तिच्यानें बोलवेना; पण हें तिचें संभाषण माझे ह्रदयांत लिहिलें आहे, तें मी कधीं विसरणार नाहीं.

गहीना— ( डोळे पुसते ) भागिरथी, तूं धन्य आहेस! आणि तूझी आईही धन्य !

शिवराम— माझे बाबास आणि माझे आईस जेव्हां जेव्हां तिची आठवण होते, तेव्हां तेव्हां त्यांचे डोळ्यांतून पाणी आल्याशिवाय राहात नाहीं.

भागी०— माझी आई पण तुमचे आईबापांवर फार ममता ठेवीत असे. मरतेवेळेस तिनें मला सांगितलें कीं, विट्ठल शेटीस तूं आपला मित्र ह्मणून मान; आ-

णि त्याचा उपदेश ऐकत जा. तुमचे उपकार मजवर पुष्कळ आहेत. तर ह्या गोष्टींत मी किती धन्य होईन तें पाहा;- एक तर माझे आईची इच्छा पुरवीन; दुसरें, तुमचे बाबाची उतराई होईन; माझे बाबास अन्याय कर्मापासून संरक्षीन; त्यास मागून पश्चात्ताप होईल, तो होऊं देणार नाहीं; सगळ्यांचा बचाव होईल; आपली सुंदर राई कापली जाणार नाहीं; तुमची आमची मैत्री राहील; पुनः आपण एकमेकांस पूर्ववत् भेटूं, बोलूं, आणि आनंद करूं.

गहिना- (तिचे गळ्यांत हात घालिते.) अगे माझे गडे भागीरथी!

शिवराम- (तिचा हात धरून) माझा बाबा तुला मनापासूच आशीर्वाद देईल; पण तुझे पैसे घेणार नाहीं.

भागी०- कां? मी त्यास विनंती करीन. त्याविषयीं निर्भय असा; ह्यांतलें कोणास कांहीं समजणार नाहीं. थांबा येथें अंमळ, मी हीच पैसे घेऊन आलें.

शिवराम- मी ते आपलेपाशीं घेणार नाहीं.

भागी०- गहिने, तूं तरी एवढे घे. आणि शिवरामा, जर तूं तिला मनाई करशील तर संभाळ; मी तुझा चंडोल घेणार नाहीं. मग मी आपले बाबाची आज्ञा निक्षूणपणें मानीन. तुह्मांकडे फिरून पाहाणार नाहीं. ह्यानंतर कधीं मी तुमचे घरीं येणार नाहीं, कीं तुमचे राईत जाणार नाहीं.

गहिना-तूं असें ह्मणतेस पण मग-

भागी०—( तोंडावर बोट ठेवून तिला दबाविते. ) चुप्. तुला बोलावयास समजत नाहीं. मी तुझें कांहीं ऐकणार नाहीं. थांब एथें अंमळ मी येईतों. मला सवड झाली तर तुमचे बाबास मी दोन ओळीही लिहीन. माझ्यानें लवकर येववलें नाहीं तर मी पिशवी आणून ह्या बंगल्याचे कोंपऱ्यास ठेवीन, त्या धोंड्याखालीं. त्या जागेची खूण आतांच चांगली धरून ठेव. ऐकतेस ?

गहिना— माझी खातरी आहे, माझा बाबा तुझे पैसे परत देऊन मला पाठवील.

भागी०— त्याचा त्यानें दूरवर विचार करावा. तसें केलें असतां मग मी तुह्मांस भेटावयास कोठची ? मग तुमचीं माझी ही शेवटची भेट. ह्यापुढें तुह्मांशीं बोलावयास मला बाबाची आज्ञा नाहीं. त्यास रुपये न पोंहोंचले असतां असें दैवीं आलेंच.

गहिना— काय कठोर शब्द काढितेस !

भागी— मला बाबाची आज्ञा मान्य करणें प्राप्त आहे. पण आपण शेजारीं आहों त्या अर्थी एकमेकांकडे पाहावयास कांहीं चिंता नाहीं. लोकांची दृष्टि चुकवून समयीं—

गहिना— मी तर आपले डोळे तुझे डोळ्यांकडे लावून ठेवीन, आणि त्यांना सांगेन कीं, तुह्मी मला मनापासून आवडतां, मी तुह्मांस मरेपर्यंत विसरणार नाहीं.

शिवराम— तूं फिरावयास बाहेर पडशील तेव्हां आह्मी

रस्त्यावर उभेराहून तुजकडे पाहिलें तर आह्मांस मना कोण करणार आहे; आणि मग—

भागी०— तूं खरें ह्मणतोस—मग एकादें हसूं, एकादें वांकडे दृष्टीनें पाहाणें झालें तर तें कोणाचे लक्षांत येणार नाहीं; तर धीर सोडूं नका, कांहीं चिंता नाहीं, सर्व नीट चालेल. पण आपला चंडोल कोठें आहे तो? मी आपल्या खोलींत जातें. मी त्याला घेऊन जाईन.

शिवराम— थांब अंमळ, मी त्याचा पिंजरा आणितों, आणि तुझे खोलीचे दरवाज्यापर्यंत घेऊन येतों. (तो पिंजरा ठेविला होता तिकडे जातो.)

भागी०— मी येतें बरें, गहिना!

गहिना— हें येणें अक्षयी नसावें.

शिवराम— (भयभीत होऊन पिंजरा रिकामा घेऊन येतो.) आतां काय करूं! चंडोल आंत नाहीं!

भागी०— काय माझा चंडोल गेला? माझ्या जिवलगा शिवरामा!

शिवराम— कोणीं ह्याचें दार उघडून तो घालिवला. मला पुरती आठवण आहे मीं दार लावलें होतें.

भागी०— हें माझे भावावांचून दुसऱ्याचें काम नव्हे. त्वां तो मला दिला तेव्हांपासून त्यास वाईट वाटलें होतें. आणि आपण येथें बोलत असतां आपली दृष्टि चुकवून त्यानें हें कृत्य केलें, ह्यांत कांहीं संशय नाहीं.

शिवराम— त्यानें अंमळ खेळावयास नेला असला

तरी बरें.

भागी०— मी त्यास तुझेपेक्षां चांगलें ओळखितें. त्यानें त्याला उडविलेंच असावें.

शिवराम— बरें तर, थांब तो इतक्यांत लांब गेला नसेल. जर कोठें झाडावर असला तर त्यास दाणा दाखविला ह्मणजे लागलाच खालीं येईल. मी सगळें रान त्यासाठीं फिरेन.

भागी०— ( शिवरामास ) तुला यश येवो माझ्या मित्रा, ( गहिनेस ) विचारा शिवराम ! मला त्याची काकळूत येते ! त्यानें काय हौसेनें मला तो दिला होता !

गहिना— खरेंच, तुला तो देईपर्यंत त्यास चैन पडलें नाहीं.

भागी०— बरें तर, मी जातें गहिना. मी अशी मागचे वाटेनें जातें, आणि तूं तशी वईकडून हळूच माझे खिडकीखालीं ये; ह्मणजे मी वरून पिशवी आणि पत्र टाकीन. माझा बाबा मध्यें कोठें नसला तर मी तुला तें स्वतां खालीं येऊन देईन.

गहिना— आहागे माझे मैत्रिणी ! काय दयाळूपणा, काय उदारपणा हा ! तुझी उतराई आह्मी कशीं होऊं !

( तीं दोघें दोहों वाटांनीं जातात. )

---

## प्रवेश ६,

### नारायणराव आणि चिंतोबा.

चिंतोबा— कां बाबा, म्यां खोटें सांगितलें; त्वां पाहिलें-

ना? तुझे आज्ञेप्रमाणें चालावयास ताईस किती अवघड पडलें आहे तें?

नारायण०— बरें ही चंडोलाची गोष्ट काय रे आहे?

चिंतोबा— आपण लपून होतों ह्मणून मी तुला तें सांगितलें नाहीं, कांकीं तीं ऐकतील; ती गोष्ट अशी आहे कीं, जिवलग शिवराम ह्यांनीं जिवलग मैत्रीण भागीरथी बाई ह्यांस चंडोल भेट केला; जिवलग मैत्रीण भागीरथीबाई तें हिडशें पांखरूं घेऊन अशीं खुशाललीं कीं त्यांनीं त्यास आपले जिवलग मित्र शिवराम ह्यांचें नांव ठेविलें. पण मी असें केलें आहे कीं तिचें त्या पक्ष्याशीं अतःपर खेळणेंच होईना.

नारायण०— तें कसें?

चिंतोबा— त्यांनीं चंडोलाचा पिंजरा त्या तिकडे ठेविला होता. तेथें मीं नकळत जाऊन, दार उघडून, परतें त्यास उडविलें. तो उडतांच झाडाचे खांदीवर जाऊन बसला; नंतर तो ह्या डाहाळीवरून त्या डाहाळीवर त्या डाहाळीवरून त्या डाहाळीवर, असा उडत होता. तीं आतां त्यास जर धरतील तर मी पक्कीं ह्मणून समजेन; पण तें काय होतें?

नारायण०— तर त्वां हें मोठें लुच्चाईचें काम केलें. विठ्ठलशेटीचे मुलांस दुखवूं नको ह्मणून तुला माझी आज्ञा होती, नव्हे? ह्या गोष्टींत तुझे बहिणीसही किती दुःख झालें असेल बरें?

चिंतोबा— तिनें आज्ञामोडिली त्याचें तिला पारिपत्यनको?

नारायण०— तिचें परिपत्य करावयाचा तुजकडे अधिकार नाहीं. धांव लवकर; माळ्याला किंवा दुसरे माणसांना जाऊन सांग कीं चंडोल धरा, आणि तसाच मजपाशीं आणा.

चिंतोबा— पण बाबा, त्वां ताईस मनाई केली होती, कीं विठ्ठलशेटीचे मुलांशीं अगदीं बोलूं चालूं नये; असें असतां त्यांनीं भेट केली, ती तूं तिला घेऊं देशील?

नारायण०— शिवरामानें चंडोल आणिला तेवेळेस त्याला माझी आज्ञा ठाऊक होती?

चिंतोबा— त्याला नव्हती, पण ताईस तर ठाऊक होती; असें असतां तिनें तुझी अवज्ञा कशी करावी?

नारायण०— त्याचा विचार मीं केला असता, तुला गरज नव्हती. तिनें मला तो चंडोल दाखविला असता; आणि मला तसेंच दिसतें तर मीं तो परत करविला असता. ह्मणून मी तुला आणिखी एकदा सांगतों कीं, धांव लवकर, आणि चंडोल सांपडेल असें कर; नाहीं तर तुला काय आहे तें कळेल.

चिंतोबा— पण बाबा, ती बोलली तें त्वां स्पष्ट ऐकिलें ना? तिजपाशीं तुला नकळून असे कांहीं पैसे आहेत; आणि ती ते विठ्ठलशेटीस देणार, तुझें देणें वारावयाकरितां. होरे हो! भली गोष्ट सुचली! बाबा, मी गाहिनेचे वाटेवर टपत बसतों; आणि ती पैसे नेत असतां तिला पकडून तुझे जवळ आणितों.

नारायण०— करून तर पाहा तसें. मी तुला आतां काय सांगितलें? त्याप्रमाणें करतो सकीं नाहीं?

चिंतोबा— (कुरकुरतो) मी तीस पकडतों तर भली मौज होती!—

(तो बाहेर जातो.)

---

## प्रवेश ७,

## नारायणराव.

(आपणाशीं विचार करितो.)

पाहा, मी जाणता असून इतका घसरलों; आणि हीं मुलें होत्सातीं त्यांनीं इतकी मैत्री, कृतज्ञता, आणि उदारपणा दाखविला! मी भागीरथीस मना केलें होतें खरें; पण मी तें नीट केलें काय? ज्या म्यां तिला सद्गुण शिकविले, तोच मी ते तिचेठायीं निंदूं काय? ह्या संसार अरण्यांत जें एकच सुख, जी मनुष्याची एकच विश्रांति, अशी जी गुणी आणि समवयी मित्रांची संगति, तिचें सुख मी तिजपासून कसें हिरून घेऊं? ज्याचा तोटा, माझी सगळी संपत्ति खर्चली असतां भरून देऊं शकणार नाहीं. हें इतकें मी कां करितों असें पाहिलें असतां, माझे मनामध्यें गोष्ट भरली ती झाली पाहिजे, इतकेंच ह्याचें कारण. माझे लाडके मुली, माझे सगळे बाग, सगळे बंगले, व दुसरे मजकडील सगळे चांगले चांगले पदार्थ जे आहेत, तितके सर्वही तुला प्राप्त झा-

ले असते, तरी ते तुला राईची आठवण विसरवितेना ज्या राईंत तुझे मित्रांची गांठ पडून तुला आनंद होत आहे. आहा! भली मलाही शिक्षा लागली! तूं नसतीस तर आज मलाही विठ्ठलशेटीसारिखा अमोलिक अंतरता; तें सुख त्वां माझें राखिलें; त्वां अन्याय कमापासून आणि पश्चात्तापापासून माझें रक्षण केलें. तुझें उदार चरित पाहून तुझे भावाचा नीचपणा माझे त्हृद यास फार व्यथा करितो. द्वाड पोऱ्या! किती नीचपण तुझेठायीं आहे रे हा! असो, आतां मला पाहिलें पाहिजे कीं, विठ्ठलशेटी आपले मुलांप्रमाणें चित्ताचा थो आहे कीं नाहीं. ह्या प्रसंगीं तो वर्तेल त्याप्रमाणें मा; पुढील मित्रसुखाची आशा होईल.— एक तर आज अ होईल कीं, मी अयोग्य मित्रापासून सुटेन; अथवा ग- योग्य मित्राचा लाभ होईल. (तिकडून भागीरथी चालली आहे तिला पाहून तो बलावितो; आणि ह्मणतो भागीरथी! (ती ऐकिलें न ऐकिलें करून तशीच जा आहे. तिला तो दुसऱ्यानें बोलावितो.) भागीरथी, कडे ये.

---

## प्रवेश ८,

## नारायणराव आणि भागीरथी.

नारायण०— तूं कोठें चालली होतीस? तूं मला चुकवीत कां होतीस?

भागी०— ( अंमळ गोंधळते ) ह्यासाठीं— कीं तुला उपद्रव करूंनये.

नारायण०— मला वाटतें कीं, तुला शिवरामानें चंडोल भेट दिला होता, त्याचे शोधास जात आहेस.

भागी०— होय, बाबा, त्यानें मला एक दिला खरा. मला वाटतें चिनूनें तुला सांगितलें असावें.

नारायण०— मग तो त्वां घेतला नसेल.

भागी०— मी! नाहीं नाहीं. हो, घेतला तो आतां नाहीं कसा ह्मणूं? भला बिचारा शिवराम! त्याला तो मला देतांना किती आनंद झाला आहे!

नारायण०— तुला तो परत दिला पाहिजे.

भागी०— होय बाबा, मजकडे असता तर; पण तो पउडाला.

नारायण०— हें खरें?

भागी०— होय, बाबा, मी खरेंच सांगतें. पाहिजे असेल तर मी तुला त्याचा रिकामा पिंजरा दाखवितें.

नारायण०— त्याला बाहेर कोणीं सोडिलें असेल बरें? हें चितूचें कृत्य असावें.

भागी०— नाहीं बाबा, तूं भाऊला असें ह्मणूं नको. पिंजऱ्याचें दार चांगलें लागलें नसेल, ह्मणून बंदिवानू पळाला. शिवराम त्याचे शोधास गेला आहे. त्यास सांपडला असतां तो मजकडे आणील.

नारायण०— एकूण तूं त्याशीं दुसऱ्यानें बोलणार? बरें,

तूं त्यास काय ह्मणशील? त्वां त्यास माझी आज्ञा अजून सांगितली आहे कीं नाहीं? आणि त्याचा शेवटला निरोप घेतला कीं नाहीं?

भागी०— नाहीं बाबा, तें मला मोठें अवघड पडलें आहे. तसें एक वेळ झालें ह्मणजे मग मला काळ कंठणें फार कठिण आहे.

नारायण०— माझी आज्ञा मानावयास तुला मोठी अडचण पडते तर?

भागी०— ह्मणून नव्हे; असें तूं मनांत आणूं नको, बाबा; पण मीं अशी निष्ठुरता केली असतां मला वाटतें कीं तूं मजवर ममता करणार नाहींस; तूं मला आपलें लेंकरूं ह्मणणार नाहींस. पाहा बरें मला कांहीं खेद झाल्यावांचून मी अकस्मात् त्यांची गडी तोडिली तर, तूंच मला आपले मनांत काय ह्मणशील? माझीं मित्रें मला काय ह्मणतील?

नारायण०— पण त्यांचे बापानें माझा अन्याय केला असला तर तुझ्यानें थंड राहावेल? तुला माझा अभिमान पडणार नाहीं?

भागी०— नाहीं असें कसें होईल? मला अभिमान पडेल; आणि तुझें समाधान होण्याबद्दल मी सर्वस्व देईन.

नारायण०— मी त्यापाशीं काय मागतों, आणि तो मला काय देत नाहीं, हें तूं जाणतेस?

भागी०— मी जाणतें, होय मी जाणतें, बाबा, तूं मला हें कां पुसतोस?

नारायण०— ह्या साठीं कीं मला समजलें पाहिजे कीं विठ्ठलशेटीच्या मुलांस तें ठाऊक आहे कीं नाहीं, आणि त्यांनीं तें तुला सांगितलें आहे कीं नाहीं?

भागी०— होय, त्यांनीं मला सांगितलें; त्यांनीं सगळें मला सांगितलें. तूं आपणास राग नको येऊं देऊं, बाबा.

नारायण०— बरें तुला कसें वाटतें? मी कांहीं गैरवाजवी चाललों कीं नीट? विठ्ठलशेटीवर माझे इतके उपकार असतां त्यानें माझी लहानशी गोष्ट ऐकूनये? आणि जें मी मागतों, त्याचें मजपासून त्यास शतगुणित मोल प्राप्त होणार, असें असतां?

भागी०— बाबा, मी लहान मूल, तुमचे मोठ्यांचे खटल्यांत काय समजें.

नारायण०— तूं आपले मनाशीं विचार कर, आणि तें काय ह्मणतें तें मला सांग.

भागी०— बाबा, मला क्षमा असावी. माझें मन कांहीं एकादी अशी गोष्ट सांगेल कीं ती तुला आवडणार नाहीं.

नारायण०— मी समजलों. मी अन्याय करितों असें तें ह्मणेल, ह्यांत भ्रांत नाहीं.

भागी०— मला वाटतें कीं तुला आतां राग येईल.

नारायण०— नाहीं, भिऊं नको, बोल तूं.

भागी०— कांहीं होवो, तुला वाईट वाटे असें मी कधीं बोलणार नाहीं.

नारायण०— त्याची कांहीं चिंता नाहीं. तुला काय दिसतें तें साफ बोल, माझी आज्ञा आहे.

भागी०— बरें तर, मला वाटतें कीं तुझा अन्याय नाहीं, आणि विठ्ठलशेटीचाही नाहीं.

नारायण०— अगे खुशामते पोरी! आह्मीं दोघेही खरे? असें कसें होईल? आह्मांतून एक खरा आणि एक खोटा असावा.

भागी०— बाबा, मला क्षमा कर. मला दिसलें तसें मी बोललें, तुझे विठ्ठलशेटीवर फार उपकार, ह्मणून तूं मागतोस तें त्यानें द्यावें, हें खरें; आणि विठ्ठलशेटीस न देण्याचें कारण आहे ह्मणून तो ह्मणतो तेंही खरें.

नारायण०— तें कसेंही असो पण तो ह्मणतो तें तुला नीट दिसतेंना?

भागी०— तें मी काय सांगूं? मला वाटतें कीं त्यानें तुझे उपकार जाणून आपली राई तुला द्यावी, हा त्याचा धर्म होय; तसेंच ज्यानें त्यास ती राई दिली, त्याचा करार जाणून तुला ती देऊं नये, हाही त्याचा धर्म होय. मैदान करावें ह्मणून तूं ती कापणार, आणि आपले मुलांस विश्रांतिस्थळासाठीं तो ती राखणार. तूं गांवचा धनी, तुझे हातांत सत्ता आहे, ह्मणून तूं ती कापूं शकशील; तुझी प्रार्थना करून तुजकडे मुलें माणसें घेऊन येऊन रडून तो ती राखूंही शकेल. अशी गोष्ट आहे.

नारायण०— पुरे आतां, तुझी बुद्धि ऐकेल तो फसेल. बरें तर, आतां त्यानें माझे पांचशें रुपये द्यावे, आणि आपली राई ठेवावी.

भागी०— तर हा तुजकडून बलात्कार त्यावर—

नारायण०— त्यांत मग समजेल. खरा कोण आणि खोटा कोण तो, औं.—

भागी०— नाहीं बाबा, रागें भरूं नको, मला तसें वाटलें मात्र; काय ह्मणावें तें सुचेना ह्मणून आलें तोंडास तें बोललें. पण बाबा, पांचशें रुपये त्यानें आज कोठून आणावे?

नारायण०— कोठून आणावे हें जर तुला ठाऊक नाहीं, तर मलाही ठाऊक नाहीं. पण जर तो तुजपाशीं मागूं लागला तर मग?

भागी०— (बापास वेंग मारते) बाबा, मी आतां तें तुजपासून कसें लिकवूं? त्वां मला मारलें तरी पुरवेल, आणि तें मला साजेल; मी तसेंच केलें आहे—

नारायण०— सोड, सोड, मुली, मला जाऊं दे! पण हें काय तें समजलों नाहीं?

---

## प्रवेश ९,

### नारायणराव, भागीरथी, गहिना, आणि चिंतोबा.

(चिंतोबा गहिनेस ओढीत आणितो.)

चिंतोबा— बाबा, ही भली सांपडली! हिजपाशीं ला-

खोटा आहे. मला वाटतें कीं तो भागीरथीचे नांवाचा असावा. चलगे, काढ तो लवकर. नाहीं तर मी तुझे सर्वांगाचा झाडा घेईन. बाबा, ही वईकडून पळत होती तेव्हां हिचे हातांत मी तो प्रत्यक्ष पाहिला.

नारायण०— चिंतू, बळात्कार करूं नको. (गहिनेस) मुली, तुला येथें कोणाशीं काम आहे ?

गहिना— (गोंधळती) नाहीं— होय, मी— ह्यास पाहात होतें.

नारायण०— तूं भिऊं नको मुली, तूं कोणास पाहातेस ?

गहिना— भागीरथीस.

चिंतोबा— पण गहिने, आह्मीं तुह्मांशीं बोलूं नये ह्मणून बाबानें मनाई केली आहे, तें तुला ठाऊक आहेना ?

नारायण०— (चिंतूस) मी तुला सांगतों, उगा ऐस. (गहिनेस) मुली, ह्या लाखोट्याची गोष्ट काय आहे ती मला सांग.

गहिना— तें कांहीं नाहीं. (सचिंत भागीरथीकडे पाहाते.) भागीरथी, आतां कसें करावें ?

भागी०— माझे गडिणी, आपणांस आतां बाबापासून कांहीं लिकवावयाचें नाहीं.

चिंतोबा— (नारायणरावास) पाहा बाबा, त्या तुझे समक्ष एकमेकांशीं कशीं निर्भीडपणें बोलताहेत. हें तुझे आज्ञेचें उल्लंघन नव्हे ?

नारायण०— तूं उगाच राहा. गहिना, काय तें मला

कळविशील ?

गहिना– बरें तर; तुह्मांस कळवावयाचेंच त्या अर्थी सांगतें. माझे बाबानें भागीरथीस लाखोटा दिला आहे. ( भागीरथीचे हातांत लाखोटा देऊं लागली तंव चिंतूनें तो तिचे हातांतून ओढिला. )

चिंतोबा– पाहिलें बाबा! ह्यांत पैसे भरले आहेत; ( भागीरथीस ) थांब पोरी, आतां बाबा तुझी चांगली पूजा करील.

( तो लाखोटा बापाचे स्वाधीन करितो. )

( नारायणराव लाखोटा उघडतो आणि वाचतो. )

" परम थोर मुली, त्वां आपले बापाचे न कळत मला पैसे पाठवून दिले, ते मी घेऊन तुझे बापास भरावे आणि कदाचित् ही गोष्ट उघडी झाली असतां, तुला टपक्यांत आणावें, हें मला योग्य नाहीं. असें माझे हातून घडलें असतां तूंच आपले मनांत मला काय ह्मणशील ? तर मी तसें करणार नाहीं; मी कर्जकरी आहें तसाच राहीन, जंवपर्यंत मी तें आपले कष्टानें मिळवलेल्या द्रव्यानें फेडीन. तुझे बापाचे मर्जीप्रमाणें माझ्या हातून होत नाहीं ह्मणून मला वाईट वाटतें, पण काय करूं ? माझा उपाय नाहीं. नारायणरावांनीं सत्तेचे बळानें इच्छेस येईल तें, मला न कळत केलें असतें तर मी कोठें बोलावयास आलों असतों ? तसें झालें असतें तर मला मनांत इतकें आणावयास जागा होती कीं, मी आपले मित्राशीं बोली केली होती ती मी मोडिली नाहीं.

मला ह्या लोकीं तुमचे बापाची व तुमची मैत्री अमोल आहे. तूं जशी मजशीं आणि माझे मुलांशीं आजपर्यंत उदार भावानें चाललीस तसेंच पुढें चालावें ही माझी प्रार्थना आहे."

सही विठलशेटी.

( नारायणराव भागीरथीकडे पाहातो. )

भागी०– ( त्याजकडे जाते ) आतां बाबा, हे पैसे मजपाशीं कसे आले ते मी तुला सांगतें. आजपर्यंत सांगितलें नाहीं, त्याची मला क्षमा कर.

नारायण०– ( तिचा मुका घेतो. ) तें मी जाणतों, मुली; तुमचें भाषण होत होतें तें मी आडून सर्व ऐकिलें. तुमचा थोरपणा पाहून मला परम आनंद झाला. मी लाज सोडून ह्मणतों कीं, तूं नसतीस तर मी आज असें अकर्म केलें असतें कीं तें माझे मनास जन्मवर खातें, आणि मी असुखी होतों. हे तूं आपले पैसे घे, आणि तुझे आईनें जसें सांगितलें आहे तसें ह्याचें सार्थक कर. हे धर्मा करितां वेंचतील ह्मणून भिऊं नको. माझ्या लेंकरांनो, तुमची आवडती राई अक्षय राहो, आणि तुमची मैत्री उत्तरोत्तर वाढून दृढ होवो.

भागी०– ( त्याचा एक हात धरिते. ) बाबा, आज त्वां मला नवा जन्म दिला असें वाटलें!

गहिना– ( त्याचा दुसरा धरिते. ) रावसाहेब, काय भलेपणा हा! माझा बाबा– ( तिचा कंठ दाटतो, बोल-

वत नाहीं. )

नारायण०— ( गहिनेस ) गुणाचे मुली, आपले बापास हें पत्र परत दे, आणि सांग कीं, ह्यांत कांहीं आणिखी लिहावयाचें आहे, तें माझी भेट झाली ह्मणजे बोलेन.

चिंतोबा— हें काय बाबा ! तूं आणि—

नारायण०— चिप्, बोलूं नको, आटोप तुझी ती द्वाड जीभ. आजचे दिवशीं त्वां मला आपले दुष्टपणाची ओळख दिली आहे.

चिंतोबा— कशी ? मी तर तुझी आज्ञा पाळिली. मुलांनीं आपले आईबापांची आज्ञा पाळूं नये तर ह्याप्रमाणें ?

नारायण०— त्यांनीं पाळावी, पण आईबाप जर अन्याय करूं सांगतात, तर मुलांनीं आपणांस उचित आणि ज्यांत ईश्वर राजी, तेंच करावें. मी स्वार्थपर होऊन अन्याय केला हें तुझे अंतरीं जर समजलें नाहीं, तर मला तुझे सद्गुणांची पुढें आशा दिसत नाहीं. पाहा भागीरथी कशी चालली ती.

चिंतोबा— पण बयेनें मजकडे तसे पैसे दिले नव्हते.

नारायण०— त्याचें कारण कीं, तिनें तुझी पूर्वींच परीक्षा केली. पैसे नाहींत तर गोड शब्द नव्हते काय? ज्यांहींकरून त्वां आपले मित्रांचें, आणि ज्यानें तुला प्रथम विद्याभ्यास करविला त्या गुरूचें, समाधान केलें असतें. पण चंडोलाचें काय झालें ? त्वां त्या-

चा शोध करविला कीं नाहीं?
चिंतोबा— बागांत मला कोणी भेटलें नाहीं.

---

## प्रवेश १०,

### नारायणराव, चिंतोबा, भागीरथी, गहिना, आणि शिवराम.

(शिवराम धांवत आला, आणि श्वासोच्छ्वास टाकितो आहे. एके हातीं त्यानें चंडोल धरिला आहे; दुसऱ्या हाताचें रक्त निघालें आहे, ह्मणून सुडक्यानें गुंडाळीत आहे.)

शिवराम— भागीरथी! भागीरथी! ये लवकर, भली झाली गडे! हा बघ तुझा चंडोल आणिला! अरे लबाडा, पळाला होतासना?

(नारायणरावास पाहून तो अंमळ अडखळतो.)

भागी॰— (त्याकडे धांव घेते) माझे गड्या शिवरामा,! (त्याचे हातून चंडोल घेते आणि ह्मणते.) अरे ठका, सांपडलासना? आतां तूं मजपासून जाऊं पावणार नाहींस. जा आतां आपले पिंजऱ्यांत (ती त्यास आंत घालून दार लाविते.)

नारायण॰— माझे प्रियकरा शिवरामा, तुझे हातास तें काय झालें? तुझे सुडक्यास तें रक्त कसचें लागलें आहे?

शिवराम– ( आश्चर्य करून आणि आनंद पावून ) माझे प्रियकरा शिवरामा ! भागीरथी, ऐकतेसना ?

भागी०– होय, शिवरामा, सर्व गोष्टी सोईच्या झाल्या आहेत.

गहिना– आतां आपले मैत्रीस विघड नाहीं. ( शिवराम आनंदानें नाचतो. नारायणरावास मोठे विनयानें नमतो. गहिना त्याचा हात धरून कष्टी होते. ) तुला फार दुःख झालें, दादा ! मला हात तरी पाहूंदे.

भागी०– अरेरे ! मजकरितां तूं इतकें दुःख पावलासना ?

शिवराम– अंः, तें कांहीं नाहीं. चंडोलामागें झाडावरून धांवतांना हातास अंमळ लागलें आहे. माझा हात मोडून पडला असता तरी मी चंडोलास घेतल्याशिवाय तुजपाशीं येतोंना.

भागी०– आहा ! मजवर ह्याची किती ममता आहे ! बाबा, आतां लवकर ह्याला कांहीं उपाय केला पाहिजे, सखाऊपाशीं चांगलें औषध आहे.

नारायण०– तिला सांगून तो उपाय आधीं करीव. आतां चला मजबरोबर; मुलांनो, आज आनंदाचा दिवस; तुह्मांस मीं मेजवानी केली आहे. तुमचे आईबापांसही बलाविलें आहे. आज तुह्मी मला गुरु झालां. आणि तुमचें चरित पाहून मला वाटलें कीं,

तुह्मांसारिखे गुणी मुलांपासून आईबापांनींही शिक्षा घ्यावी, हें योग्य आहे.

( सर्व निघून जातात. )

---

## धाकटी मुलगी जी कुळंबिणीनें ठकविली.

### बाळाबाई, दुर्गा, आणि नानी.

दुर्गा– बये, आज सांजचीं मी हरीकडे जाऊन येऊं ?
बाळा०– नाहीं, मी आज्ञा देणार नाहीं.
दुर्गा– कां बये, असें कां बरें ह्मणतेस ?
बाळा०– तुला त्याचें कारण सांगावयास मला प्रयोजन नाहीं; मुलांनीं वडील सांगतील तें निमूट ऐकावें, त्यांस उलटा प्रश्न करूंनये. अस्तु तुला समजावें कीं, मी जें सांगतें त्यास कांहीं चांगलें कारण असतें, ह्मणून ह्या वेळेस तुला त्याचें कारण ऐकवितें कीं, हरी मुलगा चांगले गुणांचा नाहीं; तो तुला एकादी वाईट गोष्ट करूं सांगेल; आणि जर तूं त्याकडे नित्य गेलीस, तर तुला त्याचे दुर्गुण लागतील.
दुर्गा– पण बये–
बाळा०– उत्तर ऐकावयाचें नाहीं; मी सांगेन तसें चाललें पाहिजे. ( तें ऐकून दुर्गाचे डोळ्यांस आसवें येतात, तीं आईस कळूंनयेत ह्मणून ती अंमळ एकीकडे जाती. मग आई बाहेर गेल्यानंतर ती एका

कोंपऱ्यांत बसून पुष्कळपणें रडते, तितक्यांत नानी कुळंबीण, नुकतीच बाळाबाईकडे चाकरीस राहिली होती, ती घरांत येते, आणि तीस ह्मणते. )

नानी– दुर्गा, तूं कां रडतेस? तुला काय दुःख आहे तें मला सांगशील?

दुर्गा– नानी, तूं येथून जा. तुझ्यानें माझें दुःख दूर होणार नाहीं.

नानी– नाहीं; कां नाहीं? मी मागें चाकरीस होतें तेथें भागू ह्मणून मुलगी होती, तिला दुःख होई, तेव्हां ती मजकडे येई, आणि ह्मणे, "माझे गडे नानी, पाहा मला काय संकट पडलें आहे! आतां मी कोणता उपाय करूं?" असें मला बोले, आणि मी तिला बरी बुद्धि देत असें.

दुर्गा– मला तुझी बुद्धि नको. मी तुला सांगतें, मजविषयीं तुझ्यानें कांहीं व्हावयाचें नाहीं.

नानी– मला इतकी तरी आज्ञा दे कीं, मी तुझे आईकडे जाईन! ती तरी तुझे दुःख दूर करूं शकेल; कांकीं तुझे सारिखी चांगली मुलगी कष्टी पाहून मला बरें वाटत नाहीं.

दुर्गा– आहा! बयेना? खरेंच. तीच तर माझे दुःखास कारण आहे.

नानी– तर तुला काय बयेपासून दुःख झालें? मी असें कधीं मानणार नाहीं.

दुर्गा– तर कोणापासून झालें तें तुला ठाऊक आहे?

नानी– खरेंचना? हें मला अगोधर खरें वाटलें नाहीं. तूं शाहाणी मुलगी आहेस ह्मणून तुझें ह्मटलेलें बया सदा ऐकत असेल असें मी समजलें होतें. आहा! तुझेसारिखी गुणांची मुलगी मला असती तर मी तिला तिचे मर्जीस येतें तें करूं देतें. पण तुझे आईस तुजवर सत्ताच करावीशी वाटते. तिला लहर आली ह्मणजे तुझी चांगलीही गोष्ट ऐकत नाहीं. तुझेसारिखे मुलीशीं तिला असें करवतें तरी कसें! तुला पाहून मला किती दुःख होतें तें सांगवत नाहीं!

दुर्गा– (फिरून रडूं लागते.) माझें ऱ्हदय शतधा फुटतें. माझा प्राण घाबरा होतो.

नानी– खरेंच, कसा घाबरा होणार नाहीं? तुझे डोळे तांबडे आणि सुजलेले दिसतात! आह्मांस तुझी काकळूत येते; तूं आपलें दुःख मला न सांगून आपले जिवास उगीच क्लेश मात्र करितेस. भागूस जेंर तुला झालें ह्याचे अर्धें दुःख होतें, तर ती मला सांगितल्या वांचून राहतीच ना.

दुर्गा– तें तुला सांगायास मला धीर होत नाहीं.

नानी– मी तें जाणावयास इच्छीत नाहीं. पण मला वाटतें कीं तुझी आई बाहेर हिंडावयास जाते, आणि तुला घरांत तिष्ठत ठेविते हें कांहीं असावें.

दुर्गा– तें नाहीं.

नानी– तर दुसरें काय असावें? हें पाहा तुला अ-

धिक रडें कोसळलें! मी हरीस तरी बलावून आणूं? कदाचित् त्याशीं खेळून तुझें दुःख दूर होईल.

दुर्गा– (श्वास टाकिते) त्याशीं खेळावयाचें सुख मला आतां कोठचें?

नानी– तें तुला मिळावयास कांहीं कठिण नाहीं. तुझे सारिखे धाकटे मुलीस खेळावयास सोबती पाहिजे.

दुर्गा– त्यास भेटावयाविषयीं मला आईची आज्ञा नाहीं.

नानी– त्यास भेटूंनये! तुझे बयेची काय समजूत आहे ती मला कळत नाहीं! भागूची आई अशीच होती, ती तिला सोनूची मैत्री करूंदेईना; पण आह्मीं तिला कसा धूर दिला आहे!

दुर्गा– तें तुह्मीं कसें केलें?

नानी– ती बाहेर बसावयास जाई, तेव्हां आह्मी जपूं; मग भागू सोनूकडे जाई, अथवा सोनू भागूकडे येई.

दुर्गा– आणि तिचे बयेस तें कळत नसे?

नानी– तें मी सांभाळीं.

दुर्गा– तशी मी जर हरीकडे गेलें आणि बयेनें तुला पुसलें, कीं दुर्गा कोठें आहे, तर?

नानी– मी तिला सांगेन कीं, ती वाडींत गेली आहे; किंवा बाहेरून येऊन माझे खोलींत निजली आहे, अशी अनेक प्रकारांनीं बतावणी करीन.

दुर्गा– अये! पण मी कसें समजावें कीं माझी लबाडी बयेस कळली नाहीं?

नानी– तेवढ्याविषयीं तूं मजवर विश्वास ठेव; तिला

शंका देखील येऊं देणार नाहीं. तूं माझें सांगितलें ऐकशील तर आजच हरीकडे जा; आणि रात्रीं व्हावें तर राहा; पुढची काळजी कांहीं करूं नको.

दुर्गा— एक वेळ तसें करावें अशी माझीही इच्छा आहे, पण तूं मला वचन दे, कीं बयेस सांभाळीन.

नानी— जा भिऊं नको.

मग खेळावयाचे लोभानें दुर्गा सांजची हरीकडे गेली. तिची आई बाहेरून आली, तिनें नानीस पुसलें, दुर्गा कोठें आहे ? नानीनें सांगितलें, ती सगळा दिवस बसून बसून कंटाळली, मग जेवून नीज येऊं लागली, ती माझे खोलींत निजली आहे.

ह्याप्रमाणें दुर्गानें आपले भोळे आईस पुष्कळ वेळ ठकविलें. वास्तविक पाहातां तिनें आईस ठकविलें नाहीं, आपणास ठकविलें. अगोधर तिचे वृत्तीस संतोष असे; आईचे जवळ येऊन तिला समाधान वाटे; आई बाहेरून आली असतां आनंदानें जाऊन ती तिचे गळ्यांत मिठी घाली; ही सगळी सुखोत्पत्ति तिला नाहींशी झाली. रात्रंदिवस ती आपले मनांत शंके, आणि ह्मणे, "अगाई, मी हरीकडेस जातें हें माझे आईस समजलें तर कसें होईल ?" आईचा शब्द ऐकून तिला कांप सुटावा; कीं कोण जाणे तिचे तोंडांतून काय अक्षरें निघतील. ती जेव्हां जेव्हां आईची मुद्रा रागीट किंवा व्यग्र पाही, तेव्हां तेव्हां तिला वाटे कीं, मी अवज्ञा केली हें हिला समजलें तर नसेल ! दुर्गाची चिंता इतक्यांतच सरली

नाहीं. नानी तिला सदा सांगे कीं, भागू मजशीं फार उदारपणानें वागे; आणि ह्मणे कीं बहुतवेळ तिनें मला खडेसाखर, बदाम, दूध, असें दिलें; फडताळें पेट्या ह्यांच्या चाव्या तिनें मजवर विश्वासाव्या. तें ऐकून दुर्गेचेही मनांत आलें कीं, औदार्याविषयीं आणि विश्वास ठेवण्याविषयीं नानीनें आपणास भागूपेक्षां अधिक चांगलें ह्मणावें. मग तिनें खडेसाखर, बदाम, व आणखी खावयाच्या वस्ता, नानीकरितां चोराव्या; किल्लयांचा घोंस आईचे न कळत घेऊन तिजपाशीं आणून द्यावा. ती असें करी, पण तिचें मन तिला खाई. ती मनांत ह्मणे कीं, "मी अन्यायकर्म करितें आहें, हें कधीं तरी उघडें पडेल; आणि बयेचे ममतेस मी मुकेन." एके दिवशीं निश्चय करून तिनें नानीस सांगितलें कीं, आजपासून मी तुला कांहीं देणार नाहीं. नानी ह्मणाली, "बरें मुलीं, तुझी मर्जी; पण पाहा पस्तावशील! थांब तर, तुझे आईस बाहेरून येऊंदे, मग तूं तिची आज्ञा कशी ऐकत असतेस तें मी तिला सर्व सांगेन." दुर्गा घाबरी झाली, आणि भिऊन नानीनें सांगितलें तसें तिनें ऐकिलें. पूर्वीं, दुर्गाची आज्ञा नानी ऐकत असे; आतां, नानीचा हुकूम दुर्गा ऐकूं लागली. नानीनें तीस शिव्या गाळी द्याव्या, धमकवावें, हेळणा करावी; दुर्गानें तें सगळें सोसून चुप राहावें. तिची फिर्याद सांगतां येईना. ती द्वाड कुळंबीण एके दिवशीं दुर्गापाशीं आली, आणि तीस ह्मणते, "दुर्गा, तुझे आईनें जिलब्या करून कुलपांत ठेविल्या आहेत,

त्यांतल्या कांहीं मला पाहिजेत; आणून दे; दुसरें, चार मांडे आणि वाटीभर दूधही आण; तूं जा, आणि लवकर किल्ल्यांचा शोध कर."

दुर्गा— पण गडे नानी—

नानी— गडे नानीचें येथें कांहीं काम नाहीं; सांगितलें तें आणतेस कीं नाहीं ?

दुर्गा— असें कां वरें ह्मणतेस. बयेस कळलें तर मग कसें होईल ? आणि बयेस नाहीं कळलें तरी ईश्वर तर पाहातो आहे ?

नानी— तूं इतके दिवस हरीचे घरीं जातेस तें ईश्वर पाहात नाहीं काय ? त्याविषयीं त्यानें तुझें पारिपत्य केलें ?

दुर्गास आईनें भक्तिमार्ग चांगला शिकविला होता तेणेंकरून तिची पक्की समजूत पडली होती, कीं ईश्वराची दृष्टि सर्वत्र आहे. तो आपले बरे वाईट कर्माचें फळ देतो. त्यानें आपणास वाईट कर्म करूं नये ह्मणून सांगितलें आहे, कांकीं तें आपणास दुःख दायक आहे. असें असतां ती अविचारानें एक वेळ आईची आज्ञा मोडून हरीकडे गेली; मग एक अन्याय केला तो छपवावयास तिला दुसरा करावयाचा पडला; दुसरा छपवावयास तिसरा करावयाचा पडला. ह्याप्रमाणें मनुष्य घसरत जातें. तिला भय, कीं नानी आपली गोष्ट उघडी पाडील, ह्मणून नानी सांगे तें तें तिला ऐकणें प्राप्त होई.

ह्यावरून पाहाकीं दुर्गास किती व्यथा झाली असेल ! एकेदिवशीं ती आपले खोलींत गेली आणि कडी लावून पुष्कळपणें रडली. ती ह्मणाली, "जें मूल आई बापांची अज्ञा मोडितें तें किती तरी हीनभाग्य ह्मणावें ! मजसारिखें दुःखी कोणी नसेल. पाहा मी माझे दासीची दासी झालें आहें ! आतां मला सुमार्गानें चालवत नाहीं. ती द्वाड जी आज्ञा करील ती मानणें प्राप्त होतें. मी लबाड, चोर, आणि ठक झालें ! हे भगवान् मजवर दया कर." असें ह्मणून तिनें दोनी हात तोंडावर दिले, आणि उसासून पुष्कळपणें रडून देवास करुणा भाकिली. मग विचार करूं लागली कीं, पूढें कशी गत करावी. तों अकस्मात् उठली आणि ह्मणाली, "मी आतां निश्चय केला, बयेनें मला एक महिनापर्यंत जरी जवळ बोलाविलें नाहीं; जरी तिनें माझा प्राण घेतला— पण नाहीं; ती असें करणार नाहीं; ती मजवर कृपाळू होईल. ती मला एकवेळ, माझे दुर्गा ! असें ह्मणेल. तिचें त्दृदय सदय आहे ! आहा ! पण हें आतां मला किती अवघड पडलें आहे तें पाहा ! ती रागानें मजकडे पाहील आणि मला शिव्या देईल तें मला कसें साहावेल ? असो, कांहीं चिंता नाहीं. मी तिजपाशीं आपले सगळे अन्याय सांगेन, सांगेनच. मी अतःपर ह्या रांडे कुळंबिणीचे जाच सोसणार नाहीं. हा मीं त्रिवार निश्चय केला." मग ती लागलीच खोलींतून निघाली, आणि आईस एकटें मागील दारीं गांठून, तिचे गळ्यास मिठी

मारून, तिनें तीस असवांनीं न्हाण केलें. तिला दुःखाचें भरतें आलें; काय बोलावें तें सुचेना. तिची जिव्हा बंद झाली.

बाळा०— माझे लाडके मुली, तुला काय झालें ?

दुर्गा— बये, काय सांगूं ?

बाळा०— हे अश्रुपात कां इतके मुली ! माझे गुणाचे मुली !

दुर्गा— माझे जिवलगे बये !

बाळा०— बोल ! बोल माझे बेटा ! तुजवर असें तें काय जड पडलें आहे ?

दुर्गा— होय ! तूं जर क्षमा करशील तर सांगतें.

बाळा०— तुझा खरा पश्चात्ताप पाहून मीं क्षमा केली, बोल तूं आतां मोकळेपणें.

दुर्गा— माझे बये, मजपासून तुझी अवज्ञा झाली. मी पुष्कळवेळ हरीकडे गेलें, तूं मनाई केली असतां.

बाळा०— माझे लाडके दुर्गे ! तुजपासून अशी गोष्ट झाली ? जी तूं मला किंचित् राग येईल ह्मणून कितीं भीत असेस !

दुर्गा— जर तुला सगळें समजेल, तर मग मी लाडकी दुर्गा कोठची !

बाळा०— दुर्गे , तूं मला धास्ती घालितेस. चिंता नाहीं; यत्किंतू सगळें मजमाशीं सांग. तुला कोणीं तरी ठकविलें असावें. त्वां कधीं आजपर्यंत असें केलें नाहीं.

दुर्गा– होय बये, मला ठकविलें खरें; नानीनें मला ठकविलें.

बाळा०–काय! त्या रांडे कुळंबिणीनें?

दुर्गा– होय बये, आणि तें तिनें तुला कळवूंनये ह्मणून, मी तिला तुझे पेंटाऱ्यांच्या किल्ल्या पुष्कळ वेळ दिल्या. तिजकरितां खडेसाखर, बदाम, आणि दुसऱ्या वस्ता, मीं कोणजाणे किती चोरल्या असतील.

बाळा०– केवढी पातकी! हें काय मी माझे लेंकीचें अकर्म ऐकतें? द्वाडपोरी, सोड मला आतां. तोंड काळें कर एथून. तुझे बापाशीं मला विचार केला पाहिजे कीं, अतःपर तुशीं आह्मीं कसें वर्तावें.

दुर्गा– नाहीं बये, मी तुला सोडणार नाहीं. तूं अगोदर माझें पारिपत्य कर, पण वचन दे कीं, पुढें मी मागचे प्रमाणें तुझी ममता करीन.

बाळा०– हतभाग्ये मुली! तुझें पारिपत्य चांगलें होईल.

बाळाबाई असें बोलून दुर्गास टाकून गेली. मग दुर्गाचा बाप आणि आई उभयतां येऊन त्यांनीं नानीस बलावून आणिलें; आणि तिला पुष्कळ रागें भरून लागलेंच घरांतून हांकून दिलें. तिनें फार फार काकळूत केली कीं, माझे पाठीवर मारा पण पोटावर मारूंनका, मी असें अतःपर करणार नाहीं. पण त्यांनीं तें ऐकिलें नाहीं. दुर्गाचे बापाचा तर मोठा निग्रह पडला. तो तिला ह्मणाला," नानी, मी तुशीं कसा चांगले पणानें वागलों! तुझे किती अन्याय

ऱ्यां क्षमा केले आहेत ! मला वाटलें होतें कीं, मी तुजवर कृपा ठेवितों ह्यावरून तूं माझे मुलीस बरे गुणांची शिक्षा लावशील; त्याच त्वां तिजकडून अवज्ञा आणि चोरी करविली. ह्यावरून तूं मनुष्य नव्हेस. राक्षशी आहेस ! माझे जवळून नीघ लवकर; आणि तुझी इच्छा असेल कीं नरकाचे यातनेंत पडूं नये, तर पुढें चांगले पण धर ."

मग दुर्गावर पाळी आली. ती दिवाण्यासारिखी हात जोडून बापासमोर उभी राहिली; रडून रडून तिचे डोळे सुजले; तिचें तोंड उतरलें; तिचे गाल पांढरे झाझाले; आणि तिचें सर्वांग उडूं लागलें; कोणी ह्मणेल कीं तिला प्राणांताची व्यथा होत आहे. तोंडावाटें एक शब्द फुटेना. ती उगीच खालचे मानेनें वाट पाहात होती कीं, बाप काय पारिपत्य बोलतो तें ऐकावें. तों तो तिला कठोर वाणीनें बोलला.—" पोरी, त्वां आपले आईबापांस ठकविलें; त्वां त्यांचा महान् अन्याय केला. जी तुला जिवापलिकडे लेखते, आणि त्वां सुखी असावें असें जी निरंतर इच्छिते, अशे आईचें ऐकूंनये, आणि त्या दुष्ट कुळंबिणीचें ऐकावें, अशी तुझी वासना कशी झाली ! आतां तुला योग्य तसें तुझें पारिपत्य करून जर त्या कुळंबिणी सारिखें तुलाही माझे दृष्टीवेगळें केलें, तर माझा अन्याय कोण काढील ? "

दुर्गा— तूं मजविषयीं कधीं वांकडें करणार नाहींस बाबा; आतां मला योग्य तसें माझें पारिपत्य कर, मी तें

सगळें साहीन; पण पुनः एक वेळ माझा अंगीकार कर; एक वेळ मला आपली ह्मण.

बाप— मी इतक्यांत तुझा अंगीकार करणार नाहीं. तूं अन्यायाला कबूल झालीस ह्मणून तुझें पारिपत्य करीत नाहीं; पण तुझा पश्चात्ताप फार दिवस पाहिल्याशिवाय मी तुला, माझे दुर्गे, असें ह्मणणार नाहीं. तूं अतःपर नीट जपून चाल; अन्यायामागें पारिपत्य चालून येतेंच; ह्मणून मी तुझें वेगळें पारिपत्य करीत नाहीं; तुझी तूंच आपलें पारिपत्य करशील.

बापाचे ह्या शेवटचे शब्दांचा अर्थ दुर्गास चांगला समजला नाहीं. तिला आपण बापापासून अशी सुटेन अशी आशा नव्हती. मग ती आईचे आणि बापाचे पायांपाशीं नाक घांसून त्यांस ह्मणाली, "मी अतःपर तुमचे आज्ञेचे तिळप्राय वांकडी जाणार नाहीं." पुढें ती त्या बोलण्याप्रमाणें चालली, पण बापानें सांगितलें होतें त्याप्रमाणें तिचें पारिपत्य होणें चुकलें नाहीं. त्या द्वाड नानीनें जिकडे तिकडे तिजविषयीं वांकड्या गोष्टी सांगितल्या. तिच्या आणि आपल्या ज्या ज्या गोष्टी झाल्या तितक्या तिनें लोकांकडे सांगून अंगच्या आणिखी लबाड्या लाविल्या. ती ह्मणाली, दुर्गानें फार दिवस माझी काकळूत करून करून मला नानाप्रकारच्या वस्ता चोरून आणून देऊन शेवटीं माझी बुद्धि फिरविली; आणि मी लांच घेऊन हरीची तिची भेट केली. नंतर तो रोज सांजचा येई, आणि तीं दोघें रात्रीचीं फार वेळ

एकांतांत असत. असें सांगितल्यावरून लोकांचे मनांत दुर्गाविषयीं वांकडी कल्पना आली. तें ऐकून दुर्गास रात्रंदिवस ऱ्हद्रोग लागला. ती आपले बरोबरचे मुलींचे मंडळींत जाई, आणि पाही तों जिकडे तिकडे त्या एकमेकींचे कानांस लागत, आणि कुचकुचत; आणि तिजकडे तिरस्कारानें पाहात; आणि लावून बोलून हांसत. जर ती अंमळ अधिक बसली, तर त्या ह्मणत, "ती एथें बसून संकेताचे वेळेची वाट पाहात आहे." ती नवें वस्त्र किंवा लेणें अंगावर ल्याली, तर त्यांनीं ह्मणावें, "जिला आईच्या किल्ल्या मिळतात, तिला चांगल्या वस्तांचा काय तोटा?" कोणाशीं तिशीं अंमळ बोलाचाली झाली तर त्यांनीं ह्मणावें, "दुर्गा, तुझें चित्त हरीकडे गेलें वाटतें, ह्मणून तूं चावळत बोलतेस." असे हे तुक्के तिचे काळजांत बाण जसे लागत. जेव्हां तिला दुःखाचा वेग साहवेनसा होई, तेव्हां ती आईचे गळ्यास मिठी मारून रडे. आई तिला ह्मणे, "मुली, हें त्वां आपले हातीं आपणावर आणिलें. तर धीर करून सोस, भगवंतापाशीं आपले अपराधांची क्षमा माग; तें तुला पुढें जन्मवर उपयोगीं पडेल, आणि तुझें हित करील. मुलांस ईश्वराची आज्ञा आहे कीं, "मुलांनो, तुह्मी आपले आईबापांस माना, आणि तीं सांगतील तसें वर्ता." अशी आज्ञा आहे ती देवानें त्यांस सुख व्हावें ह्मणूनच केली आहे. बापड्यांनो, तुह्मांस अझून ह्या विश्वांत कसें वागावें हें ठाऊक नाहीं. तुह्मी एकादें कर्म करित

त्यापासून पुढें काय उत्पन्न होईल हें तुमचे लक्षांत येत नाहीं. ईश्वरें तुह्मांस आईबापांचे स्वाधीन केलें आहे. जीं आईबापें तुह्मांस आपले जिवाप्रमाणें लेखितात; तुमचें संरक्षण करण्याविषयीं त्यांचें ज्ञान तुमच्यापेक्षां अधिक आहे, हें तुह्मांस पहिल्यानें खरें वाटलें नाहीं, पण आतां अनुभव आला कीं नाहीं तो पाहा. मुली, तुजवर संकट पडलें आहे ह्यापासून तूं गुण घे कीं दुसऱ्या जितक्या ईश्वराच्या आज्ञा आहेत त्या अशाच आहेत. त्यानें ज्यांत आपलें हित होईल तेंच सांगितलें आहे! ज्यांत आपलें अनहित तेंच निषेधिलें आहे. तें आपण केलें असतां आपण आपल्या हातीं आपणास उपद्रव करून घेतों, असें होतें. सदाचरणानें हितच होईल, असा प्रथम निश्चय होत नाहीं; भ्रम पडून उलटें सुलटें दिसतें, परंतु शेवटीं भ्रांत फिटते. जसें तुलाच आतां झालें. पाहा तूं, कीं एके अपराधानें तूं किती फेऱ्यांत आलीस! तर ह्याचा दाखला घेऊन अतःपर जपून चाल, आणि इतकी एक गोष्ट मनांत दृढ धर कीं, जें कर्म सदाचरणास वांकडें तें तुझे सुखास वांकडें.

दुर्गा आपले आईचे उपदेशाप्रमाणें वागत गेली. जंव जंव तिची निंदा लोकांनीं करावी, तंव तंव तिनें ती सोसून सदाचरणानें वागावें. असें होतां होतां कांहींका दिवसांनीं तिजविषयीं लोकांचे तोंडची निंदा सहज बंद झाली; मग “ निर्दोष दुर्गाबाई ” असें विषशेण-

युक्त नांव तिला सर्वांचे मुखानें प्राप्त झालें.

---

# ह्यातारा भिकारी

आन्याबा (चाकरास.)

आन्याबा– ह्या ह्यातान्यास त्वां आंत कां येऊं दिलें नाहीं?

ह्यातारा– महाराज, त्यानें मला मना केलें नाहीं, परंतु मीच आलों नाहीं.

आन्याबा– कां बरें?

ह्यातारा– मला सांगतां लाज वाटते. मी कधीं केलें नाहीं तें कर्म करितों आहें. मी भीक मागावयास आलों आहें.

आन्याबा– तूं भला मनुष्य दिसतोस; गरीब झालास ह्मणून तुला लाज कां वाटते? कितीएक माझेही मित्र गरीब आहेत, त्यांमध्यें मी तुला लेखीन. ये बैस मजपाशीं.

ह्यातारा– क्षमा करा महाराज, मला आतां वेळ नाहीं.

आन्याबा– असे निकडीचें तुला तें काय काम आहे?

ह्यातारा– ह्या सृष्टींत जें मुख्य काम करावयाचें, त्याचे तजविजींत मी आहें. आपण येथें एकटेच आहों, मी तुह्मांस खरेंच सांगतों कीं, माझे आयुष्याचे आठ दिवस बाकी आहेत.

आन्याबा— तें तुला कसें समजलें ?

ज्ञातारा— मला कसें समजलें तें माझ्यानें तुह्मांस सांगवत नाहीं, पण मी जाणतों; कांतर असें मला वाटतें; आणि तसें घडून येईलच. बरें आहे कीं माझे मरणानें कोणास तोटा होणार नाहीं. माझे जांवयानें आणि मुलीनें मला आज दोन वर्षें पोसिलें.

आन्याबा— तो त्यांचा स्वधर्म होय, त्यांत त्यांनीं नवल काय केलें ?

ज्ञातारा— आजपर्यंत मजकडे पैका होता, तेणेंकरून मी कोणाचे अंगावर पडेन असें नव्हतें; तो मी एके गृहस्थाकडे ठेविला होता; त्यानें तो ख्यालीखुशालींत उडवून आपणास आणि मलाही गरीब केलें. महाराज, क्षमा करावी, आपणही गृहस्थच आहां; परंतु मी खरें आहे तें बोललों.

आन्याबा— ही गोष्ट माझीच प्रत्यक्ष असती, तरी मी संतोषानें ऐकतों. मला राग येताना.

ज्ञातारा— मला शेवटपर्यंत काम करवतें तर चांगलें होतें ! पण आतां मी आगदीं खंगलों, आणि निस्तेज झालों. मला वाटतें कीं, मी आतां यातनेंतून सुटावें ह्मणून ईश्वरें माझे हातपाय निर्बळ केले. मी कधीं काम केल्यावांचून राहिलों नव्हतों. महाराज, मी ज्वान होतों तेव्हां काम करीं तेणेंकरून माझें शरीर दृढ राहिलें होतें; मला कधीं वैद्य ठाऊक नाहीं. पण जें काम ज्वानपणास बळकटी आणीत होतें,

तेंच म्हातारपणास श्रम देऊं लागलें. मग माझ्यानें काम होत नाहींसें झालें; तितक्यांत जवळ वित्त होतें तेंही गेलें. मला काम करावयाची मनापासून आवड; पण काय करूं? हात पाय राहिले; हें आठवून माझे डोळ्यांत अश्रु येतात, ह्याची क्षमा असावी. मी आपणास दुर्बळ पाहून फार कष्टी होतों.

आन्याबा– तुझीं मुलें तुला पोशीत नाहींत?

म्हातारा– मला एक कन्या मात्र आहे; तिचे भ्रतारानें पुत्राहून अधिक माझा समाचार घेतला. त्यांनीं मला असते पदार्थांत कांहीं वाण केली नाहीं. ईश्वर त्यांचें कल्याण करो.

आन्याबा– तर काय तीं तुझा आतां समाचार घेत नाहींत?

म्हातारा– तींच गरीब झालीं, तीं माझा समाचार काय घेतात? नदीस रेळ आली तिनें त्यांचें घर वाहावलें; त्यांचें सर्वस्व धुपून गेलें; गुरें ढोरें मेलीं. त्यांनीं मला पोसावयाकरितां कर्ज काढिलें आहे; इतकी एकच गोष्ट त्यांनीं माझे आज्ञेवांचून केली; तें मला फार वाईट वाटलें. आतां माझे उत्तरक्रियेचा तरी त्यांजवर भार पडूं नये, म्हणून मी भीक मागतों आहे. मी जुना मनुष्य परंतु नवा भिकारी आहें, महाराज.

आन्याबा– आणि तूं राहातोस कोठें?

म्हातारा– तें मी सांगत नाहीं. माझें किंवा माझे मुलांचें बिऱ्हाड तुम्हींहीं पुसूंनये.

आन्याबा— क्षमा करा ह्मातारे बाबा, मीं सहज पुसलें.

ह्मातारा— होय मीही जाणतों. आठां दिवसांनीं तुह्मीं स्वर्गाकडे पाहा; तेथें माझें घर झांकलें राहाणार नाहीं.

आन्याबा— (त्यास मूठ भरुन रुपये देतो.) ह्मातार्‍या, हे घे, ईश्वर तुला फार दिवस वांचवो !

ह्मातारा— इतके सगळे? नाहीं; इतके मी इच्छिले नव्हते. मला पांच मात्र पाहिजेत; त्यांहून अधिक माझे उपयोगीं नाहींत. स्वर्गी कोणतेही गोष्टीची वाण नाहीं.

आन्याबा— तूं बाकीचे आपले मुलांस दे.

ह्मातारा— त्यांस काम करावयाचें सामर्थ्य आहे; त्यांस धर्माचें कशास पाहिजे?

आन्याबा— जा माझे भले ह्मातार्‍या ! जा आणि स्वस्थ ऐस.

ह्मातारा— (पांच ठेवून बाकीचे रुपये परत करितो.) महाराज, हे आपले आपण घ्यावे.

आन्याबा— माझे मित्रा, तूं मला लाजवितोस.

ह्मातारा— मलाही लाज वाटते. पांच रुपये तरी मला घ्यावयाला संकट वाटतें. तर हे बाकीचे ठेवावे; कोणी दुसरे भिकारी येतील त्यांस द्यावयास उपयोगीं पडतील.

आन्याबा— तुझी अवस्था पाहून मला दया येते.

ह्मातारा— आतां ईश्वरास माझी दया यावी, आणि तु-

मचे औदार्याचें फळ त्यानें तुह्मांस शतगुणित द्यावें.

आन्याबा— तूं कांहीं अन्न घेशील ?

ह्मातारा— मी सकाळीं खाऊन बाहेर पडलों आहें.

आन्याबा— तर कांहीं बरोबर तरी घेऊन जा.

ह्मातारा— नाहीं महाराज, तें ईश्वरास आवडणार नाहीं. तुमची आवडच आहे तर एक सुपारीचें खांड द्या, आणि इवला तंबाखू.

आन्याबा— तुला हवी तितकी सुपारी घे; बैस आणि तंबाखू पान यथेष्ट खा, आणि मग जा.

ह्मातारा— नको, मला इवलेंसें पुरे, अधिक सोसत नाहीं. ( आन्याबा आपली बटवी त्यापुढें करितो, तो देवाकडे हात करून ह्मणतो. "हे भगवान्, ह्या गृहस्थाचें कल्याण कर !" ते दोघे पान तंबाखू खातात. )

आन्याबा— ह्मातार्‍या, आज रात्रीचा तूं आमचे घरीं राहीनास ? तुला कोणीं पाहूंनये असें तुझे मनांत असल्यास, मी तुला तशीच जागा देईन.

ह्मातारा— नाहीं, महाराज, माझ्यानें राहावत नाहीं. माझा अमोलिक वेळ मोडतो.

आन्याबा— मला आणखी तरी कांहीं सेवा सांग.

ह्मातारा— तुमचे आवडीकरितां मी कांहीं मागावें तर, मला इहलोकीं अपेक्षा राहिली नाहीं. एक सखलादीचा तुकडा ह्या हाताला गुंडाळावयाकरितां असला तर द्यावा. ( हाताकडे पाहातो ) हा हात माझा अगदीं राहिला आहे.

आन्याबा– ( दोन तुकडे देतो. ) घे हे, दोहों हातांस दोन, माझे मित्रा.

म्हातारा– दुसरा तो ठेवा; मला एक पुरे. माझा उजवा हात बरा आहे; तो उघडा ठेवितां येईल. डावा मात्र शक्तिहीन झाला आहे. हा तुमचा उपकार मी विसरणार नाहीं.

आन्याबा– आणि माझे मित्रा, मी पण तुला विसरणार नाहीं. माझे मस्तकीं तुझा पुण्यवान् हात एक वेळ ठेव बरें.

म्हातारा– ( त्याच्या मस्तकावर हात ठेवितो. ) भगवान् तुला सुखी राखो, आणि स्वर्ग सुख देवो.

( तो जातो. )

---

## समागम सुख.

माधव नामें मुलगा प्रकृतीनें घुम्या होता. सगळा दिवस त्यानें विचारांत असावें, कोणाशीं फारसें बोलूनये. तो आपले चुलत्यासंगतीं बाहेर जाई, तेव्हां वाटेंत जें जें पाही तें तें घरीं आला म्हणजे एकटाच मनांत घोळी. त्याचे चुलत्याचीं मुलें होतीं, त्यांस ती त्याची प्रकृति अगदीं आवडत नसे. एके दिवशीं त्यांनीं माधवाची आपले बापापाशीं फिर्याद केली. ती म्हणालीं, "बाबा, हा आमचे मंडळींत असला म्हणजे ह्यापासून आमच्या उ-

त्साहाचा भंग होतो." पुढें तीं बापस ह्मणणार होतीं कीं, त्याला आपले घरांतून लावून दे; इतक्यांत त्यांस दुसरी सौम्ययुक्ति सुचली, कीं तो जसें करितो, तसेंच त्याशीं आपणही कांहीं दिवस करावें.

मग दुसरे दिवशीं त्यांतील एकजण किल्ला पाहावयास गेला; एकजण बंदूकखाना; एकजण गोदी, व धुराचें यंत्र, व तारवें; एकजण कुलाब्याची दीपमाळा; व एकजण घारापुरीचें पांडवलेणें. तीं सर्व संध्याकाळीं घरीं आलीं; तेव्हां रोज गोष्टीमाता सांगत, तसें ते दिवशीं त्यांनीं माधवास कांहींच सांगितलें नाहीं. तीं नित्य एकामेकांशीं थट्टा मस्करीच्या गोष्टी करून आनंदांत काळ घालवीत; ते दिवशीं जिकडे तिकडे घुमीं, उदासीन, विरस झालीं. माधवास तें लागून मोठा पश्चात्ताप झाला; त्याला वाटलें कीं माझा स्वभाव रंजक नव्हे, तें पाहून हीं मुलें माझेशीं तशीच वर्तणूक करूं लागलीं. मग त्या दिवसापासून तो ती प्रकृति सोडून त्यांशीं मन मोकळेंकरून बोलूं लागला. तेव्हांपासून त्याचें त्यांचें मन मिळून तीं परस्पर आनंद पावलीं. नंतर तो मैत्रीचें सुख अनुभवूं लागला. त्यास समजे तें तो त्यांस सांगे; त्यांचे तोंडून आपण ऐके; तेणेंकरून तो सर्वांस आवडूं लागला.

# थोरांचें हृदय,

## नाटक एक अंकी.

### पात्रें.

पांडुरंगराव................कोणी गृहस्थ.
अंबा ..................त्याची मुलगी.
आत्माराम................त्याचा भाचा.
सावित्री.................त्याची भार्या.
चाकर...................
गणोजी...................गाडीवान्.

स्थळ, पांडुरंगरावाचें घर.

### प्रवेश १,

पांडुरंगराव.

दुसऱ्याचीं मुलें आपले घरीं आणन असें होतें. हाच आत्माराम, ह्यावर माझा किती लोभ! तो माझे मुलांपेक्षां मला अधिक आवडत होता; आणि तोच आतां किती द्वाड निपजला तो पाहा! मला आश्चर्य वाटतें, लाहानपणीं त्याची चर्या चांगली दिसत होती, तें सगळें उलटें कसें झालें? त्याची भलाई किती! त्याचें धैर्य किती! संतोषवृत्ति काय! ज्याचा सिंहासारिखा पराक्रम, मेंढरासारिखी गरीबी! हे गुण पाहून त्याजवर

कोणाचा लोभ जडणार नाहीं? असो, आतां त्यानें माझे दृष्टीसमोर येऊं नये; मी त्याचें नांव ऐकावयासही राजी नाहीं. अरे, कोण आहे तेथें? सावित्रीस बोलावून आण.

---

## प्रवेश २,

## पांडुरंगराव आणि सावित्री.

सावित्री– मामा, त्वां मला बोलाविलें? काय आज्ञा आहे?

पांडुरंग०– तुझ्या सोद्या भावाचें तुला कांहीं शुभ वर्तमान सांगावयाचें आहे.

सावित्री– ( फिक्की पडते ) कोणाचें? आत्मारामाचें?

पांडुरंग०– हें घे, हें वासुदेवाचें पत्र आलें आहे, हें वाच; नाहीं तर मी तरी तुला वाचून दाखवितों. ( तो वाचतो )

( वासुदेव पांडुरंगरावाचा लेंक, व आत्माराम त्याचा भाचा. ह्या उभयतांस उमरगांवीं पढावयास ठेविलें होतें; तेथून वासुदेव आपले बापास पत्र लिहितो. )

" माझे परम प्रिया बाबा, "

" तुला एकादें अनिष्ट वर्तमान लिहावयास मला खेद वाटतो, परंतु लिहिल्यावांचून परिणाम नाहीं; तें तूं दुसऱ्यापासून ऐकशील त्याजपेक्षां मजपासून ऐकलें तें चांगलें. मला आपले आत्मारामाचे ढंग चांगले दिसत

नाहींत. त्यानें आपलें घड्याळ विकलें; व पोथ्या पढा-वयाच्या त्याही बहुत करून विकल्या. मी तुला सांग-तों मला कसें समजलें तें. माझी हितोपदेशाची पोथी चोळवटून जर्जर झाली, ह्मणून मीं पोथीविक्याकडे एक नवी घ्यावयास गेलों होतों, त्यानें मला एक दाखविली, ती मीं आत्मारामाची ह्मणून तत्काळ ओ-ळखिली. ती त्याचीच अशी माझी खातरी कशावरून झाली, कीं त्याचें नांव तिजवर लिहिलें होतें. मग मीं ती चार रुपयांस विकत घेतली; आणि कोणापाशीं बो-ललों नाहीं; कांकीं शाळेंतील मुलें त्याचा तिरस्कार क-रतील ह्मणून; गुरुजीस मात्र एकांतीं वर्तमान सांगितलें; त्यांनीं पोथीविक्यास बलावून आणून चौकशी केली तों तो कबूल झाला कीं, मीं आत्मारामापासून विकत घेतली खरी. नंतर त्यांनीं आत्मारामास विचारिलें; तो-ही कबूल झाला कीं, मला पैशांची गरज लागली ह्म-णून मीं विकली; आणि मला दुसरी घ्यावयास पैसे मि-ळत तोंपर्यंत माझे मित्राजवळ दोन होत्या त्यांतून मी एक उसणी घेतली आहे. पैसे काय केले ह्मणून गुरु-जीनें पुशिलें, तेव्हां त्यानें त्यावर कांहीं निमित्त सांगि-तलें; पण मला तें सगळें तर्कट दिसलें. मग मला घड्या-ळाचा संशय आला, ह्मणून मीं त्यास विचारिलें कीं, किती घटिका दिवस आला आहे? तो अंमळ गोंधळून ह्मणाला, मीं घड्याळ नीट करावयास दिलें आहे. मी घड्याळजीचे दुकानीं लागलाच गेलों आणि विचारिलें

तों सगळा तोतया, मग मीं त्यास आपला भाऊ जाणून फजीत केलें. त्यानें मला उत्तर केलें कीं, तुला माझे कारभारांत पडावयाचें कांहीं काम नाहीं. मला घड्याळाची गरज नाहीं, ह्मणून विकलें;"

पांडुरंग०— सावित्री, ऐकलेंना ? आतां तूं काय ह्मणतेस ?

सावित्री— मामा, तुला वाईट वाटलें असेंच ऐकून मलाहीं वाईट वाटलें; तरी—

पांडुरंग०— धीर धर अंमळ; इतक्यांत झालें नाहीं. ह्याहून चांगल्या गोष्टी पुढेंच आहेत.

( तो वाचतो ) नंतर त्यानें काय केलें तें ऐक. परवांचे दिवशीं तिसरे प्रहरीं गुरुजीस नपुसतां तो बाहेर गेला, तो संध्याकाळ झाला तरी घरीं आला नाहीं; जेवणाचा वेळ झाला तरी दिसला नाहीं; सगळी रात्र बाहेर होता, तो सकाळीं आला. मग त्याची फजीती झाली आहे ती काय सांगूं ? त्यास पुसलें कीं कोठें होतास ? तेव्हां त्यानें पूर्वींच गोष्ट रचून ठेविली होती ती सांगितली. आणि ती जरी खरी असली तरी आज संध्याकाळीं त्याचा न्याय गुरुजी समक्ष होणार आहे; तो नीट झाला आसतां मला वाटतें कीं, त्याची अप्रतिष्ठा करून त्याला येथून हांकून देतील; किंवा घरीं तरी परत पाठवितील. तूं इतका लोभ करीत असतां, त्याची कृतघ्नता पाहून, व आपला दुर्लौकिक, व असले गुणानें त्याचें अकल्याण पाहुन, मला बहुत

खेद होतो. रात्रीस जेथें होता तें ठिकाण त्यानें मला सांगितलें, पण तें मला अगदीं खरें दिसलें नाहीं. त्या ठिकाणाचें नांव तुला लिहीत नाहीं, कारण कीं तूं त्यावर अधिक रागें भरशील, तो आतां मला धाक दाखवितो कीं, मी पळून घरीं जाईन. ”

पांडुरंग०— त्याला येऊं तर दे; त्याला माझे उंबऱ्याचे आंत पाय तर घालूंदे; मग समजेल. तो रात्रीं जेथें जात असेल तेथेंच राहो. सावित्री, तूं मला त्याविषयीं एक शब्द बोलूं नको. गुरूनें त्यास अडकवून ठेविलें; किंवा फर्जीती करुन हांकून दिलें; तरी तें मला सारिखेंच. मी त्याची चिंता अतःपर करणार नाहीं. त्याला हावें असलें तर त्यानें देशांतरीं जावें; पाहिजे तर कोणाची गुलामगिरी करावी. मी फार दिवस त्याला आपल्या मुलाप्रमाणें वागविलें.

सावित्री— खरें मामा, आमचा त्वां बापाहून अधिक प्रतिपाळ केला.

पांडुरंग०— मीं तो आपले संतोषानें केला. मी देशांतरीं असतां तुमचे आईनें माझीं मुलें सांभाळिलीं होतीं, तसा मी तुमचा सांभाळ केला त्यांत नवल नाहीं. पण—

सावित्री— आत्माराम अंमळ हूड आहे, ह्मणून त्यापासून एकादा अन्याय झाला असेल. एरवीं तो हाडीं कसा आहे तें तुझे लक्षांत असेलच. त्याकडून ए-

काही अन्याय झाला असला तर त्यास त्याचे चौपट खंत होत असते.

पांडुरंग०— मींही त्याला पुष्कळ अन्याय माफ केले असतील. त्यानें दारू जाळतांना केंस भाजून घेतले तें; आपले दिवाणखान्यांतला आरसा फोडिला तें; किनखापाचा अंगरखा चिखलांत खराब केला तें; गाडी मोडिली तें. हे सर्व अपराध मीं त्याला माफ नाहीं केले ? मीं ह्मटलें, असो, पोरपणा आहे; ह्यांत कांहीं दुर्गुण नाहीं. पण घड्याळ विकणें! पोच्याविकणें! शाळा सोडून नविचारितां बाहेर जाणें! रात्रीस बाहेर निजणें! गुरूपासून पळून जाईन ह्मणून ह्मणणें! आणि मजकडे येऊन हें सगळें साजरें करून दाखवीन ह्मणून मनांत आणणें! ह्या गोष्टी फार वाईट आहेत.

सावित्री— माझ्या मामा, तूं प्रथम तो आपली अंगसुटका कशी करितो तें ऐक, मग तुला करणें असेल तें कर.

पांडुरंग०— आतां मी त्याचें ऐकूं ? भगवान् करो आणि अतःपर त्याचें दर्शन मला नहोवो. माझे सर्व कुळांस व घरांतील माणसांस मी सांगून ठेवितों कीं, तो गांवाच्या आंत आला असतां काठ्यांनीं झोडा.

सावित्री— आहा मामा, असें करूनको !— तूं इतका कठोर त्यावर होऊं नको. मी तुझी भाची. मी तुला आपले बापासारिखें मानितें, एक वेळ माझी प्रार्थना

ऐक.

पांडुरंग– बरें पाहा तूं, मी तसें करितों कीं नाहीं तें.

सावित्री– तर त्वां तसें केलें असतां मला असें वाटेल कीं, तूं माझे बयेस विसरलास, आणि तुझा लोभ मजवरून उणा झाला.

पांडुरंग०– काय तुजवरून? तुजकडे काय अन्याय आहे? तुझ्या भावाचे अन्यायाकरितां माझी तुजवर अनावड कधीं होणार नाहीं. पण तूं मला अतःपर भावाविषयीं भीड घालूं नको. माझी प्रीति संपादून तूं स्वस्थ ऐस.

सावित्री– माझे भावावर तुझी अवकृपा पाहून मला सुख कसें होईल?

पांडुरंग०– त्याला तें साजे. त्यानें पैशांचें काय केलें? व रात्रीस बाहेर कोठें गेला होता तें त्यानें कां सांगितलें नाहीं?

सावित्री– पत्रावरून मला असें दिसलें कीं, तो त्या दोन्ही गोष्टींस कबूल झाला; वासुदेवास मात्र तें खरें वाटलें नाहीं. ( ती पांडुरंगरावाकडे डोळ्यांत आसवें आणून पाहाते. ) माझे मामा, तूं कठोर होऊं नको.

पांडुरंग०– ( अंमळ थंड झाला ) बरें तर पाहूं या, त्याचा गुरु काय ह्मणतो, तोंपर्यंत मी त्यास अवकाश देतों.

## प्रवेश ३,

### पांडुरंगराव, सावित्री, आणि, चाकर.

पांडुरंग०— तुला काय पाहिजे ?

चाकर— खालीं कोणी माणूस आला आहे, तो आप-आपणास इच्छितो.

पांडुरंग०— तो काय घेऊन आला आहे ?

चाकर— शाळेंतून पत्र आणिलें आहे, हें घ्यावें.

पांडुरंग०— ( लाखोट्यावरील नांवाकडे पाहातो. ) ठीक! मी ह्याचीच वाट पाहात होतों. हें गुरूचे हातचें खरें. मी त्याचें अक्षर ओळखितों. तो माणूस कोठें आहे ? त्याला ह्मणावें थांब; मी उत्तर देतों.

चाकर— त्यास वरतीं बलावूं ?

पांडुरंग०— मी खालीं येतों. मी त्याचे तोंडून सर्व वर्तमान ऐकणार. ( तो खालीं जातो. सावित्री त्यामागून जाते. चाकर तीस खूण करून खोळंबवितो. )

---

## प्रवेश ४,

### चाकर आणि सावित्री.

चाकर— सावित्रीबाई, इकडे या !

सावित्री— कां ? काय ह्मणतोस ?

चाकर— आत्माराम येथें आला आहे.

सावित्री— काय, माझा भाऊ ?

चाकर– जरी येऊन पोहोंचला नसला तरी आतां येऊन पोहोंचेल. गांवाजवळ आला आहे.

सावित्री– तुला हें कोणीं सांगितलें?

चाकर– माणूस आला आहे त्यानेंच सांगितलें. त्यास तो वाटेंत भेटला. आहा बये! त्यानें काय बरें असें केलें?

सावित्री– त्यानें कांहीं अनुचित केलें नसावें. तो तसें कधीं करणार नाहीं, हें तूं खरें मान.

चाकर– तो असें करील असें मलाही कधीं वाटलें नव्हतें. आह्मां सर्वांस तो आवडतो, हें देवास ठाऊक आहे. आह्मी त्यासाठीं प्राण देऊं. त्याची इवली चाकरी केली तर त्यानें तो उपकार कधीं ठेवूंनये. तुमच्या मामानें जेव्हां जेव्हां आह्मांवर रागें भरावें, तेव्हां तेव्हां त्यानें आमची रदबदली करावी. शेजारीपाजारी गरीब लोक आहेत तितके त्याचें बरें इच्छितात. मला आश्चर्य वाटतें, गुरुजींनीं त्याजवर कसा राग केला? त्यानें कांहीं खोडी केली असेल, ह्मणून ते त्यास शिक्षा लावावयास गेले असतील; तो अंमळ मानी आहे; तें पाहून त्यास वाटलें असेल कीं आपली अप्रतिष्ठा होऊंनये, ह्मणून तेथून निघाला असेल.

सावित्री– माणसाची त्याची गांठ कोठें पडली?

चाकर– येथून एके मजलेवर. तो नदीचे कांठीं एका झाडाखालीं निजला होता.

सावित्री– आहा! गरीब बापडा!

चाकर– तो उठे तों माणूस तेथें खोळंबला होता. त्यास पाहून तो किती चमकला असेल तें पाहा! त्याला वाटलें कीं हा मनुष्य आपणास परत न्यावयाकरितां आला आहे; त्यानें माणसास सांगितलें कीं माझे तुकडे तुकडे केले तरी मी तुझे बरोबर येणार नाहीं.

सावित्री– खरेंच, मी त्याचा धीट स्वभाव जाणतें.

चाकर– तेव्हां माणसानें त्यास सांगितलें कीं, तूं मला इतका आवडतोस कीं, मला मार जरी बसला, किंवा माझी चाकरी जरी गेली, तरी तुला दुःख होईल तें मी कधीं करणार नाहीं.

सावित्री– तर आत्मारामानें आतां काय करावयाचें योजिलें आहे?

चाकर– तो थकला होता तरी हळू हळू माणसाबरोबर चालत आला. ते दोघे शिवेपर्यंत बरोबर आले. तेथें तो आमराईंत लपून राहिला आहे. त्यानें माणसास सांगितलें किमामा पत्र वाचून काय ह्मणतो तें परत येऊन मला कळीव.

सावित्री– आहा! माझें त्याजशीं भाषण होतें तर बरें होतें!

चाकर– तोही हेंच इच्छीत असेल.

सावित्री– आमचा मामा आमराई कडून नित्य फिरावयास जात असतो, तो रागांत आहे, आणि पहिल्यानेंच तेथें ह्याची त्याची गांठ पडली तर अनर्थ होई-

ल! कृपा करून तूं धांवत जा, आणि त्यास सांग कीं, आपले कोठाराकडे ये. आणि त्यामागें लिकून राहा; किंवा कोठें पेंढ्यांत लपून बैस. मामा बाहर गेला ह्मणजे मी तुला भेटेन .

चाकर– भिऊं नका बाईसाहेब, मी स्वतां त्याला तेथें आणितों, आणि लिकवितों. ( तो जातो )

---

## प्रवेश ५,

सावित्री ( एकली )

हा भाऊ मला किती तरी श्रम देतो! तरी मला यावर प्रीति केल्यावांचून राहावत नाहीं.

---

## प्रवेश ६,

### सावित्री आणि अंबा.

सावित्री– ताई! मी तुजशीं बोलावयाकरितां वाट पाहात होतें! बोलून तुला कांहीं वाईट वर्तमान कळवावें हें माझे दैवीं आलें आहे.

अंबा– मला तें सगळें आधींच समजलें. नुकतेंच बाबानें माझे भावाचें पत्र मजकडून वाचिवलें; त्यावर गुरूचें पत्र आलें, त्यानें तर त्याचा राग दुणावला.

सावित्री– आतां माझे भावाचे दोषाचा मीं कसा परिहार, करावा, हें मला सुचत नाहीं.

अंबा– मी पैज मारितें कीं तो निर्दोष आहे. तुला वा-

सूचें कृत्रिम ठाऊक नाहीं १ तो आपण अन्याय करितो आणि ते लोकांवर घालितो. तुझे भावाविषयीं माझे बापाचे मनांत त्यानें आजच वांकडे आणिलें असें नाहीं; ह्या मागें दाहा वीस वेळ त्यानें त्यास बाहेर घालवून द्यावयाचें केलें होतें; पण शोध करून पाहातां शेवटीं सगळा अन्याय वासूचा. मला त्याचे पत्रावरूनच दिसतें कीं कांहीं त्याचेंच कवटाळ आहे; आत्मारामानें कांहीं मूर्खपणा मात्र केला असावा.

सावित्री– आहा ! काय त्वां मला धीर दिला ! माझा भाऊ रीतीनें चांगला, मनानें मोकळा, आचरणानें स्वच्छ, स्वभावानें उदार, प्रकृतीनें निःशंक आहे; पण तसा अंमळ उतावळा, धट्ट, आणि आग्रही आहे; त्यानें एक वेळ निश्चय केला तो कदापि सोडीत नाहीं, आणि त्याचे ह्मटल्याप्रमाणें जे चालत नाहींत त्यांची तो मर्यादा ठेवीत नाहीं.

अंबा– आणि माझा भाऊ, मत्सरी, कृत्रिमी, दंभी, पोटांत शिरून गळ घालणारा, असा आहे. जसें मांजर प्रथम मखमलीसारिखीं मऊ पावलें करून अंगावर ठेवितें, नंतर आपणास भरंवसा देऊन तिख्या सारिखे नखांनीं फाडितें. तुझ्या भावास आणि ह्यास किती अंतर ! माझा भाऊ घेऊन तुझे भावासारिखा भाऊ मला कोणी देईल तर मी तत्क्षणीं घेईन. ह्यावेळेस गोष्ट वाईट इतकीच आहे कीं, आत्माराम येथें

नाहीं.

सावित्री– आणि जर तो येथें असला तर?

अंबा– आं! कोठें आहे तर तो? सांग कीं मीही त्यापाशीं धांवलें; मला तो केव्हां दृष्टीस पडेल असें झालें आहे.

सावित्री– तो आपले कोठाराशीं आहे, पण चुप्! चुप्! माझा मामा एकटाच आपणाशीं कांहीं बोलतो आहे असें माझे कानीं पडतें.

अंबा– बरें, तूं आत्मारामाची बहीण, ह्मणून त्वां त्यास प्रथम भेटावें हें नीट आहे. मी बाबाजवळ येथें असतें, आणि तो अंमळ थंड होईल तर पाहातें. तूं धांव, जा त्यापाशीं, आणि त्याला धीर दे.

सावित्री– होय, आणि चांगली शिक्षाही करीन. त्याला घटे हें सगळें.

( ती बाहेर जाते. )

---

## प्रवेश ७,

### पांडुरंगराव आणि अंबा.

पांडुरंग०– ह्या पोरानें माझें पित्त असें खवळविलें आहे, कीं खालीं माणूस वाट पाहातो आहे त्याला पत्राचें उत्तर द्यावयास माझ्यानें एक अक्षर लिहवत नाहीं. असो, तो उद्यां जाईल; माझें चित्त अंमळ स्वस्थ झालें पाहिजे.

अंबा— असें कां बाबा, तूं काय अझून त्या बिचाऱ्या मुलावर रागांतच आहेस? त्याचा अन्याय काय इतका मोठा आहे?

पांडुरंग०— खरेंच तुह्मां पोरींना तो मोठा दिसत नाहीं. कांकीं तुह्मीही तशाच आहां; मला वाटतें कीं, त्याजपेक्षांही वाईट आहां, तुह्मांपुढें गुणी मुलगा शिक्षा घ्यावयास असतां ही.—

अंबा— बाबा, कोण तो?

पांडुरंग०— माझा गुणांचा वासुदेव.

अंबा— आहा! होय, आपला वासू फार प्रामाणिक बहुत थोर, शिक्षा घ्यावयास योग्य.

पांडुरंग०— मी जाणतों, सावित्रीला आणि तुला तो आवडत नाहीं. तुमचे लापटणिकेवरून त्याविषयीं माझे मनांतही आणिकशी गोष्ट आली होती; पण गुरूनें त्याची आज मोठी तारीफ लिहिली, त्यावरून माझा संशय गेला.

अंबा— त्या सगळे गुरूंनीं उपगुरूंनीं त्यास वाणून वाणून तुला कंटाळा आणिला नाहीं काय? ते त्याचे बापाची मातबरी जाणतात. धूर्त आहेत ते; बापाजवळून पैका काढावयाचा असला ह्मणजे त्याचे लेंकाचे गुण वर्णून काढीत असतात.

पांडुरंग०— लोक तसें करितात हें मीही जाणतों, पण वासूची मला अझून एक वाईट चेष्टा आढळली नाहीं; आणि आत्मारामानें नाहीं तरी सहस्रावधि के-

त्या असतील.

अंबा– त्याच्या चेष्टांपासून कोणास उपद्रव झाला नसेल, त्याचा त्यासच झाला असेल.

पांडुरंग०– तुह्मी एकाद्याला वेडें कराल. त्यानें माझा रथ मोडिला त्यांत काय माझा तोटा झाला नाहीं? रथ सोनेरी रंगाचा, नुकता नवा केलेला, ज्याचे दोन हजार रुपये मला पडले!

अंबा– ती गोष्ट अवघित झाली; अज्ञान पणानें झाली; त्याचें वय पाहून ती त्याकडे दोष ह्मणून लावितां येत नाहीं. गणोजी गाडी जोडून हांकून पाहात होता, तों आत्माराम त्याचे पाठीस लागून त्याजवळ बसला; तितक्यांत हातचा चाबूक खालीं पडला ह्मणून दोऱ्या आत्मारामाचे हातीं देऊन गणोजी खालीं उतरला, घोड्यांनीं दोऱ्यानिर्बळ हातांत पाहून मस्ती केली, आणि ते पळाले. बरें झालें कीं ओढण तुटून घोडे निघून गेले; त्यानें दुसरें कोणी फार दुखावलें नाहीं; गाडीमात्र मोडली.

पांडुरंग०– होय, हें कांहीं फार नाहीं झालें! ह्यांत माझे शिवाय दुसरे कोणाचा तोटा झाला नाहीं.

अंबा– कां? आत्मारामाचे डोक्यास खोंक नाहीं पडली? तें असो; पण बिचाऱ्या गणोजीची चाकरी गेली, तें मला फार वाईट वाटतें.

पांडुरंग०– तें आठवलें ह्मणजे अझून माझे पायांचा जाळ मस्तकीं जातो. त्या कृत्यानें माझा आठशें

रुपयांचा नाश झाला !

अंबा— आहा बाबा ! त्यावेळेस आत्माराम आपले मनांत किती ओशाळला ! गणोजीची आपले करितां बेअबरू झाली, तें त्याच्या मनास वारंवार खाई.

पांडुरंग०— ते दोघेही लबाड बेटे. दोघांस एकदाच हांकून द्यावें हें घटत होतें. मला हें आश्चर्य वाटतें कीं तुला कैंवार घ्यावयास वाईट माणसेंच कशीं मिळतात. तूं मुलगा झाली असतीस तर आत्मारामास सोबती चांगली साजतीस; मग तुह्मी दोघें मोठमोठाले चमत्कार करितां.

अंबा— नाहीं पण—

पांडुरंग०— चुप्, बोलूं नको ! तूं मला कंटाळा आणितेस. मला बाहेर फिरावयास जावयाचें आहे. जा, आणि सावित्री कोठें आहे तिला घेऊनये. ( तो पागोटें न घालतां बाहेर जातो. )

---

## प्रवेश ८,

### अंबा.

( आपणाशीं ) ह्याला वळवावयाला फार कष्ट लागतील. असो, आशा सोडूंनये; त्याचें तोंड मात्र अंमळ कठिण आहे.

## प्रवेश ९,

## अंबा आणि सावित्री.

सावित्री– ( दाराची फळी किंचित् उघडून डोकावते. ) चुप् चुप् !

अंबा– कां ?

सावित्री– मामा बाहेर गेला ?

अंबा– नुकताच गेला; आत्माराम कोठें आहे ?

सावित्री– तो मागील दाराचे निसणीशीं आहे.

अंबा– त्याला हळूच वर आपले खोलींत आण.

सावित्री– नाहीं, तें ठीक नाहीं ! जानकी तेथें आहे.

अंबा– त्यास येथेंच आणलें तर काय चिंता आहे ? बाबा बाहेर गेला ह्मणजे येथें कोणी येत नाहीं.

सावित्री– खरें ह्मणालीस. आणि समयीं येथून त्यास झुकावयासही चांगलें; तूं येथें ऐस, मी त्याला आणितें.

---

## प्रवेश १०,

## अंबा.

त्यापासून कधीं मी सगळें पुसून घेईनसें मला झालें आहे ! त्याचे भेटीनें मला मोठा आनंद होईल. मला त्यास पाहून एक सगळें वर्ष लोटलें. ओहो, हातो आ-

ला वाटतें ( त्यास भेटावयास सामोरी जाते. )

---

## प्रवेश ११,

## अंबा, सावित्री, आणि आत्माराम.

अंबा— ( त्यास आलिंगिते ) आहारे माझ्या भाऊ !

सावित्री— आपणास ह्यानें इतके संकटांत पाडिलें आहे, त्याअर्थी ह्यास मोठा सत्कार उचित आहे,

अंबा— मी त्याला पाहून सगळें विसरतें.

आत्मा०— अंबाताई, तुझी ममता अझून मजवर तशीच आहे. सावित्रीताईसारखी तूं मजवर कठोर दिसत नाहींस.

सावित्री— असें काय? मी तुझे मामासारिखी असावयाची होतें, मग—

आत्मा०— मला पहिल्यानें सांगा कीं, तो काय ह्मणतो? तो मजवर रागावला आहे हें खरेंच काय?

सावित्री— तुला आह्मीं येथें आणून लपविलें, हें जर त्याचे कानीं गेलें तर मग आह्मांस हें घर सोडून देशांतरीं जावयाचें पडेल.

अंबा— होयगे बाई खरेंच! त्याचे समोर जावयाचें अझून अंमळ नांव घेऊं नका. ह्यावेळेस तो एकादा अनर्थ करील.

आत्मा०— आमचे गुरूनें काय बरें त्याला लिहिलें असावें?

सावित्री– त्यानें तुझे पराक्रमाचें फार वर्णन केलें आहे.

अंबा– काल पत्र आलें त्यांत वासूनें कांहीं तुझें वांकडें लिहिलें आहे.

आत्मा०– काय! वासूनें लिहिलें? तर आतां मला दुसरा परिहार नको. त्याला सगळी गोष्ट ठाऊक आहे, आणि मी त्याला यत्किंचित् सर्व सांगितलें आहे.

अंबा– त्याचें पत्र वाचलें असतां तुजकडे काडीमात्र अन्याय दिसत नाहीं.

आत्मा०– ह्यांत जर माझा तिळप्राय अन्याय आहे तर चोराचे हाल ते माझे हाल.

सावित्री– असो, तें बोलून फळ नाहीं. तूं दोहोंतून एक कोणी तरी असावास, भला किंवा लबाड.

आत्मा०– तुला मी अन्यायी वाटतों? माझा अन्याय काय? घड्याळ विकलें, हा ना?

सावित्री– आणखी कांहीं नाहीं? त्वां शेला पागोटें विकलें नसेल ह्मणून कोणीं ह्मणावें?

आत्मा०– खरेंच! मला आणखी पैशांची गरज लागली असती तर सगळें विकलें असतें.

सावित्री– आहा, काय चांगलें उत्तर! आणि नित्य रात्रीस बाहेर निजावें!

आत्मा०– एक रात्र मात्र बाहेर होतों गे ताई.

सावित्री– आणि त्यासाठीं गुरु योग्य शिक्षा करितील

ह्मणून पळावें !

आत्मा०— योग्य शिक्षा नव्हे जुलूम करितील असें कां ह्मणेनास? मी अन्याय करीन तर शिक्षा करावी, उगीच शिक्षा ह्मणजे? जर मी ती शिक्षा घेतली असती तर मग मी आपणावर काळिमा आणिली असती, आणि त्यांनीं मला अप्रतिष्ठाकरून शाळेंतून काढून दिलें असतें, तर मग मला येथें तुह्मांजवळ यावयास तोंड नव्हतें.

अंबा— पण भाऊ. तूं ह्याचा परिहार कसा करितोस तें सांग; आह्मांला कळलें पाहिजे; आह्मी बापापाशीं तुझी सफाई करूं.

आत्मा०— तर वास्तविक गोष्ट अशी आहे. कांहीं दिवस झाले, जवळचे गांवीं यात्रा भरणार ह्मणून आमचे शाळेंत बोलूं लागले. तेव्हां आह्मीं मौज पाहावी, आणि हौस पुरवावी ह्मणून गुरूनें आह्मां कितीएकांस यात्रेस जावयास आज्ञा दिली.

सावित्री— असें काय? तर मला वाटतें घड्याळाचे आणि हितोपदेशाचे रुपये आले तितके सगळे डाळिबें, पेरू, बरफी, पेढे, घ्यावयास खर्च झाले असतील; कांहीं दरवेशांचे आस्वल माकडांचा तमाशा पाहावयासही खर्चले असतील.

आत्मा०— (अंबास) मला वाटतें माझे ताईला असल्या वस्ता फार प्रिय आहेत, त्यांकरितां कोणी जें मागेल तें ती देईल. मी तसें नाहीं केलें, ऐक. मला

ताहान लागून माझे अंगाचा दाह झाला, ह्मणून एका गुजराथी ब्राह्मणाचें भांगेचें दुकान होतें तेथें गेलों, निर्मळसें पाणी घ्यावें ह्मणून.

सावित्री– हें तर त्याहून वाईट. कसें असो पण तें भांगवाल्याचें दुकान तर खरें.

आत्मा०– ताई, तुझा स्वभाव फार कठिण गडे, माझें सगळें ऐकून तर घेशील. तेथें आह्मी बसलों असतां–

अंबा– ( दाराकडे कान देऊन ऐकते. ) घात झाला, माझे बापाचे शब्द ऐकूं येतात!

सावित्री– पळ! पळ ! पळ लवकर !

आत्मा०– नाहीं, मी मामापुढें जाऊन त्याचे पायांपडेन, आणि त्याचें सांत्वन करीन.

अंबा– आये! नको भाऊ, तसें करूं नको. तो ह्या वेळेस तुझें ऐकणार नाहीं. माझेसाठीं, इतकें तूं करूं नको.

आत्मा०– तर तुझें ऐकूं ?

अंबा– हो हो ! तें सगळें तुझे वांटचें मी करीन. ( ती त्याला खांद्यानें मागले दाराकडे लोटिते, आणि बाहेर लावून देऊन दिवाणखान्याचे दार लाविते. )

## प्रवेश १२,

## पांडुरंगराव, अंबा, आणि सावित्री.

अंबा– आहा बाबा, मला वाटतें तूं फिरून आलास बाहेरून.

पांडुरंग०– माझें पागोटें कोठें आहे तें पाहातों. जळो तें कोठें ठेविलें तें स्मरत नाहीं.

सावित्री– ( चोहोंकडे पाहाते ) हें आहे.

पांडुरंग०– तें मजकडे आणावयाचें तुला सुचलें नाहीं?

सावित्री– खरेंच, मला सुचलें नाहीं.

अंबा– सर्वदा चित्ताची स्वस्थता राखणारे असे विरळ.

पांडुरंग०– खरेंच, तुह्मांला कामें पुष्कळ ह्मणून तुमचे चित्त व्यग्र.

अंबा– माझे मनांत नुकतीच आत्मारामाची गोष्ट आली होती.

पांडुरंग०– मीं काय निरंतर त्याचे नांवाचा गिणगिणाट आपल्या कानांशीं ऐकावा?

अंबा– बरें बाबा, आतां त्याची आह्मी गोष्ट बोलणार नाहीं. तूं फिरून येतोसना लवकर?

पांडुरंग०– मी आतां फिरून आज बाहेर जावयाचा नाहीं. ( सावित्री आणि अंबा एकीमेकींचे तोंडांकडे पाहून मान हालवून खूण करितात कीं, मसलत फसते. ) आणि आतां उशीरही झाला आहे, आणि मला कोणीं सांगितलें कीं, माझा जुना गाडीवान

खालीं आला आहे, तो मजशीं बोलावयास इच्छितो आहे.

अंबा व सावित्री– काय गणोजी!

पांडुरंग०– माझें जें नुकसान व्हावयाचें तें होऊन चुकलें, आणि त्याचें त्याला पारिपत्यही पुष्कळ झालें. आतां तो काय ह्मणतो तें मला ऐकिलें पाहिजे.

अंबा– तूं फिरून येईसतों तो हवें असलें तर थांबेल.

पांडुरंग०– नाहीं नाहीं, मी त्याचें ऐकून त्याला लवकर निरोप देणार. ( त्या दोघी ऐकमेकींचे कानांशीं लागतात. ) ( तो अंबास ह्मणतो. ) तुझा बाबा ( सावित्रीस ) आणि तुझा मामा, तुला ह्मणतो तें निमूटपणें त्वां ऐकावें. ( सावित्री हळूच जावयास लागते. ) पोरी, तूं कोठें चाललीस ?

सावित्री– ( गोंधळून ) मला खालीं कांहीं काम आहे.

पांडुरंग०– बरें तर, गणोजीला सांग कीं, वर ये ( सावित्री जाते )

---

## प्रवेश १३,

### पांडुरंगराव आणि अंबा.

पांडुरंग०– मला त्या गरिबाची काकळूत येते. असा चांगला गाडीवान मला मिळाला नव्हता. माझे घोडे असे त्यानें तुळतुळीत ठेविले होते कीं, त्यांचे पाठीवर रूप पाहावें. तो त्यांचे दाणे चोरून कधीं दारू

घ्यावयास गेला नाहीं.

अंबा– त्वां त्याला क्षमा केली असती तर आत्मारामास इतका खेद होताना.

पांडुरंग०– फिरून फिरून त्याची गोष्ट काढितेस ! गणोजीस काढावयास आणि मला गाडीवाना वांचून इतकी अडचण भोगावयास तोच कारण. गणोजी काढल्यानंतर मला कोणीच गाडीवान आवडला नाहीं. त्याचें काम चालवावयास मला दुसरा कोणी तसा मिळावयाचा नाहीं.

---

## प्रवेश १४,

### पांडुरंगराव, अंबा, सावित्री आणि गणोजी.

सावित्री– मामा, हा गणोजी आला.

गणोजी– महाराज, मी क्षमा मागतों. मला वाटतें कीं, आतां मजवरून आपला राग गेला असेल. प्रार्थना करितों कीं मी आपणापाशीं धष्टाईनें आलों, आणि रुस्कत मागतों ह्मणून आपले मनांत वांकडें येऊं नये.

पांडुरंग– मीं तुला तेव्हांच रुस्कत दिली नाहीं काय ?

गणोजी– आपण ह्मटलें कीं, “ हा घे तुझा रोजमुरा, माझे घरून ह्या क्षणीं जा, आणि पुनः माझा उमरा चढू नको. ” तुह्मीं मला संथपणानें बोलावयास किंवा रुस्कत मागावयास अवकाशच दिला नाहीं.

पांडुरंग०— त्वां माझी गाडी मोडिली असतां तुजशीं मीं दुसरें रीतीनें चालावें असें कांहीं राहिलें नव्हतें. त्यावेळेस त्या आत्म्यापोराची मान मोडिली असती तर भलें काम होतें.

गणोजी— त्यावेळेस मग मी आपधाकलों, कांहीं बोललों नाहीं; आणि आह्मां गाडीवानांचें ज्ञान चाबुकापर्यंत; पण तोच, महाराज, माझ्या हातून पडला तेव्हां तशी गोष्ट झाली, पण अतःपर मी जपूनचालेन.

पांडुरंग०— बरें, तें आतां सगळें गतलें. तूं हल्लीं काय करीत असतोस?

गणोजी— महाराज, मी तुह्मांस सोडाल्यापासून विपत्तिच भोगतों आहें. तुमची चाकरी सोडल्यावर मी खंडेराव शिरक्यापाशीं राहिलों. आहा काय धनी तो! त्यानें काठी उगारल्यावांचून चाकरांशीं बोलूंच नये. तो विचारा स्वर्गी स्वस्थ असो!

पांडुरंग०— तो आतां मेला तर?

गणोजी— त्याचे मरणानें त्याचे हाताखलचे लोकांस आनंद झाला. त्यापासून पोटभर दाणेही मिळूंनयेत आणि सदा माराशीं गांठ.

अंबा— गणोजी, अशा धन्यापाशीं तूं कां राहिलास बरें?

गणोजी— तर कोठें जाऊं बये? माझे बायकोस जवळच चाकरी लागली होती, ह्मणून मला त्याकडे राहाणें प्राप्त झालें. ती मेळवी तितक्यांत पोरांचा कांहीं चरितार्थ चाले. खंडेरावासमोर सर्व कांपत

असत. त्याला मृत्यूनें मात्र कांपविलें. सांप्रत मला चाकरी नाहीं, आणि काय करावें तें सुचत नाहीं.

पांडुरंग०— पण तूं जाणतोस कीं मी कोणास विपत्ति इच्छीत नाहीं, आणि जुने चाकरांस तर सर्वथानाहीं.

गणोजी— खरेंच; मलाही तें ठाऊक आहे. पण ते भयंकर शब्द "पुनः माझा उमरा चढूं नको." आझून माझे कनांत गोंगावत आहेत. खंडेरावांनीं मजवर दाहा वेळ काठी उगारिली असती, तरी इतकें भय मला वाटलें नसतें.

अंबा— तर तेव्हां पासून तुला चाकरी नाहीं?

गणोजी— तें पुणें शहर नव्हे. असले गांवढ्यांत पोटाची पंचाईत; तेथें गाड्या घोडीं कोण ठेवितो ? मी शेतावर खपें; माझी बायको हेलमजूरी करी; माझीं पोरें भीक मागत; इतकेंही करून आह्मांस पोट भरणें कठिण पडे. आह्मी भुईचें आंथरूण करूं. आणि आकाशाचें पांघरूण, माझी बायको तर शेवटीं ह्याच दुःखानें मेली. ( तो डोळे पुसतो )

पांडुरंग०— तुला हें सगळें घटे, तूं मजपाशीं कां आला नाहींस ?

अंबा— ( सावित्रीस हळूच ) आतां बाबा निवळलासा दिसतो. आतां आत्मारामाविषयीं कांहीं शुभलक्षण दिसतें .

गणोजी— आहा ! महाराज, काय बायको होती! अशी चांगली बायको झाली नसेल. जेव्हां जेव्हां मी रि-

ते हातीं घरीं येई आणि उपाशी निजावयास जाई, तेव्हां तेव्हां तिनें आपले भाकरींतून मला अर्धी भाकर द्यावी. जेव्हां मला रोग व्हावा, तेव्हां तिनें मला कोमळ वचनांनीं थंडें पाडावें. हाय! आतां ती मेली; ती मला जीवंत करवत नाहीं! ती मेली तेव्हांपासून माझे विपत्तीस आरंभ झाला; आतां शेवट कोठें होईल तो ईश्वर जाणे.

सावित्री— आहा, गरिबा विचाऱ्या! तुझी मला दया येते!

गणोजी— बायको मेल्यानंतर मला कोठें चाकरी मिळावयाची आशा राहिली नाहीं. तेव्हां थोडे दिवसांवर मीं आमला मुलगा मुलगी हातीं घेऊन रात्रीचा गांव सोडिला, तो मध्यरात्रपर्यंत चालत होतों; मग एका झाडाखालीं निजलों. दुसरे दिवशीं प्रातःकाळीं एक गांव आमचे दृष्टीस पडला. प्रारब्धयोगानें त्यादिवशीं तेथली यात्रा होती; तेथें हेल वाहून मीं कांहीं पोटास मिळविलें. तों तेथें मला आत्माराम भेटला; तो केवळ ईश्वरी पुरुष! खरें सांगतों; तो तसाच आहे.

पांडुरंग०— काय तो आत्म्या पोऱ्या! ईश्वरी पुरुष! तें चांडाळ पोर!

अंबा आणि सावित्री— (पुढें होऊन गणोजी कडे आनंदानें पाहातात.) काय? आत्माराम! आमचा आत्माराम!

गणोजी– महाराज; मला पाहिजे ती शिक्षा करा, पण त्यास वाईट ह्मणूं नका. मला पायांखालीं तुडवून मारा व्हावें असलें तर.

सावित्री– गणोजी, चालूंद्या तुमची गोष्ट.

गणोजी– माझी धाकटी चांपी एके भांगवाल्याचे दुकानीं भिक्षा मागावयास गेली होती; तेथें वासुदेव आणि आत्माराम दोघे बसले होते.

पांडुरंग– वाहावा! चांगला धंदा! भांगवाल्याचे दुकानीं!

सावित्री– नाहीं मामा, तें ब्राह्मणाचें दुकान असावें; एरवीं माझा भाऊ तेथें जावयाचा नाहीं.

पांडुरंग०– पण त्या गांवीं जावयाचें त्याचें काम काय होतें ?

अंबा– त्यांना गुरूनें जावयास रजा दिली असली तर ? आपला गुणाचा वासुदेवही तेथें होता, त्वां ऐकिलें कीं नाहीं ?

गणोजी– त्यानें लागलेंच माझे मुलीस वळखिलें; आणि वासूनें त्यास पुष्कळ वारिलें तें न ऐकून तो तेथून उठला, आणि त्यानें पहिल्यानें माझे मुलीस कांहीं मिठाई आणून खावयास दिली; नंतर तिला हातीं धरून चालला, आणि तिजपासून सर्व वर्तमान ऐकून घेतलें. मग तो तिला घेऊन मजपाशीं आला; मी सगळे दिवसाचे मजूरीनें शोषून तेथें एकीकडे ओंजळीनें पाणी पीत होतों, तों त्याला पाहून मी हर्षानें वेडा झालों. माझे अंगावर चिंध्या

होत्या, जिकडे तिकडे मळ लागला होता, तसेंच मी त्याला उराशीं धरिलें, आणि कवळून कडकडां भेटलों; इतका कीं जवळ लोक होते त्यांस वाटलें कीं, त्या कोंवळे मुलास मी चिरडून टाकतों आहें काय! तोही मला पाहून मोठा हर्षित झाला. मग तेथें लोकांची दाटी होती ह्मणून त्यानें माझा हात धरून मला एकीकडे नेलें.

अंबा– बाबा, मी आतां हावी असली तर पैज मारीन कीं, –

पांडुरंग०– उगी ऐस पोरी! बरें, मग गणोजी?

गणोजी– मग आपणास सांगितलें असें त्याला मीं आपलें सविस्तर वर्तमान सांगितलें. तें ऐकून त्याला रडें कोसळलें, तें कांहीं केल्यानें आटोपेना. तो ह्मणाला, गणोजी, मला क्षमा करा. ह्या सर्व विपत्ति तुह्मांस मजमुळें भोगावयाच्या पडल्या; तर आतां मी प्रतिज्ञा करितों कीं, तुमचें दुःख दूर करीन तरच निद्रा घेईन. मग तो खिसा चांपून त्यांतून लाहानशी पिशवी काढून, मला ह्मणाला, हे घ्या कांहीं पैसे, मजपाशीं सध्यां इतकेच आहेत. मी ते घेत नाहीं ह्मटलें ह्मणून त्याला मोठा राग आला; तेव्हां मीं त्याला ह्मटलें, रावजी, तुह्मांला हे खाऊसाठीं दिले असतील, ते मी कसे घ्यावे? मला कष्ट करावयाची सवे आहे; कसेंही करून मी पोट भरितोंच

आहें. असें ह्मणतांच त्याला मोठा क्रोध येऊन त्यानें हातपाय आपटले, आणि मला वाटतें कीं, मी पैसे घेतोंना तर, तो मला त्यावेळेस मारता.

पांडुरंग०— पिशवींत किती पैसे होते?

गणोजी— सरासरी चार रुपयांचा ऐवज. त्यानें त्यांतील दोन आण्याचा खुर्दा मात्र ठेविला. तो ह्मणाला, तुह्मी माझे मामाचे जुने आणि प्रामाणिक चाकर; तुह्मीं कांहीं चोरी लबाडी केली नाहीं; असें असतां मुलांसहवर्तमान ह्या वयांत तुह्मीं भीक मागावी; आणि तुह्मांस राहावयास ठिकाण नसावें; तुह्मीं क्षुधेतृषेनें तळतळावें, आणि तें आह्मीं पाहावें; धिक् आमचें जिणें! तर तुह्मी आतां असें करा कीं, कोठें लाहानशी खोली घ्या. तीन दिवसां आंत मी आपले मामास लिहून उत्तर आणिवतों, आणि तुमची कांहीं सोय काढितों. मामास आपण दोघांनींही राग आणिला खरा; पण तो दयाळु आहे, तो उदार आहे, तो तुमची विपत्ति ऐकून कळवळेल, आणि वळेलच.

पांडुरंग०— तो असें बोलला? वास्तविक?

गणोजी— महाराज, मी शपथ करितों हावी तर.

अंबा— नको नको, तूं खोटें बोलणार नाहींस, आमची खातरी आहे; सांग पुढें सगळी गोष्ट.

गणोजी— नंतर त्यानें माझे बेंडूस आपले मांडीवर बसविलें; आणि मला पुसतो, तुमचीं मुलें काय करीत

असतात? मीं ह्मटलें काय करितील? कोठें झाडाखालीं जाऊन फुलें जमा करून आणितात, आणि त्यांचे तुरे करून विकतात; नाहीं त्यावेळेस काटक्या जमा करितात, तें नाहीं त्यावेळेस भीक मागतात. तो ह्मणाला छी, छी, छी; हें ठीक नाहीं. अशांत कांहीं जीव नाहीं. ह्यांत तीं आळशी आणि स्वच्छंद मात्र होतील. तुह्मीं मुलास कांहीं तरी एकादा धंदा शिकवावा; आणि मुलीस कोठें चाकरीस ठेवावें.

अंबा– बाबा, आत्मारामानें ह्याला नीट सांगितलें नव्हे?

गणोजी– मी ह्मटलें, खरेंच, पण ह्या असल्या चिंध्या अंगावर असतां ह्यांस मी कोणापाशीं नेऊं? माझे जवळ एक पंनास रुपये असते तर मीं ह्यांस सोईस लाविलें असतें. येथें जवळच एक खत्री आहे, तो पोरें चाकरीस ठेवीत असतो; त्यास मी वीस रुपये नजर दिले असतां तो बेंडूस घेईल, व एक रंगारीण आहे ती माझे चांपीस ठेवील; तिला अंमळ चिरगुटें पांघरुणें करून सजिवलें असतां, मग माझें एकट्याचेंच राहिलें; त्याचा भार नाहीं. मी कोठेंही कोणाची चाकरी करून पोट भरीन; असा रिकामटवळ्या सारिखा इकडे तिकडे फिरणार नाहीं.

पांडुरंग०– आणि ह्यावर आत्मारामानें काय ह्मटलें?

गणोजी– त्यानें तें ऐकून मात्र घेतलें, आणि गेला, तो चौथे दिवशीं आला, आणि मला ह्मणाला, तो खत्री

कोठें राहातो? त्याकडे मला न्या. मी त्यास त्याकडे नेलें; तो तो एकांतीं काय बोलले तें मला त्यानें सांगितलें नाहीं; मग मला ह्मणाला कीं रंगारिणी-कडे चला. मी तिजकडे त्यास नेलें; तेथें त्यानें मला दरवाज्याशीं ठेवून तो आंत गेला, आणि तिला कांहीं बोलला, तेंही मला त्यानें सांगितलें नाहीं. मग आह्मी दोघे परत आलों. पांच पनास पावलें चालून तो उभा राहिला, आणि माझा हात धरून ह्मणाला; माझ्या मित्रा, आतां तूं मुलांची कांहीं काळजी करूं नको; मीं त्यांची सोय केली. पुढें त्यानें मला एक दुकान दाखविलें; त्या दुकानदारास त्यानें अगोदर-च पैसे देऊन ठेविले होते; तेथून त्यानें मला हा अंगरखा, पागोटें, आणि सखलाद, अशीं देवविलीं; तीं हीं आतां माझे अंगावर प्रत्यक्ष आहेत; त्यांनीं मी मोठा मनुष्य दिसतों नाहीं बरें?

अंबा– ( गहिंवरून ) अगा माझ्या गुणाच्या, माझ्या भल्या आत्मारामा!

पांडुरंग०– ( डोळे पुसतो ) आतां मी समजलों घड्याळ कोठें गेलें तें.

गणोजी– इतकेंच नाहीं महाराज, तो माझे खिशांत, माझे नकळत, पैसे घालीत होता, तो मीं धरिला, आणि ह्मणालों तुझे उपकार मजवर पर्वताएवढे झाले आहेत, आतां मला आणखी पैसे नकोत. मग त्यास जो राग आला आहे, असा कधीं आला नसेल. तो

मला ह्मणाला, माझे मामानें तुजकरितां पैसे धाडले ते तूं घेत नाहींस, हें मामास कळलें तर तो काय ह्मणेल ? मग मी ते घेऊन तुह्मांकडे येऊं लागलों, तें पाहून तो मला ह्मणाला; मामाची आज्ञा अशी आहे कीं, ह्यांतलें त्वां कांहीं कोणाला सांगूंनये; ह्यासाठीं हें तूं मामापाशीं जर बोललास तर तो फार रागावेल. मग मीं आपले मनांत ह्मटलें; आहाहा! पांडुरंगराव असे धर्मात्मा आहेत नव्हे! तर ह्याव-रून मला दिसतें कीं, मी त्यांकडे गेलों असतां, ते मला माझे अपराध क्षमा करून पुनः चाकरीस ठेवि-तील. असें मीं मनांत आणिलें, पण तुह्मांपाशीं ये-ऊंनये ह्याविषयीं त्यानें माझे पोटांत भय घातलें.

पांडुरंग०— आहारे माझ्या आत्मारामा! माझ्या जि-वलगा आत्मारामा! तुझ्या ठायीं लहानपणापासून थोरपणा आणि उदारपणा मी पाहात आलों, ते अझून तसेच आहेत.

अंबा— तर शेवटीं तूं काय योजून येथें आलास ?

गणोजी— मी आलों एवढ्यासाठीं; येथले लोकांचें मला एक पत्र पाहिजे कीं, मी ह्या गांवचा खरा; आ-णि बेंडू हा माझा मुलगा खरा. असें पत्र दाखविल्या-वांचून तो खत्री ह्मणतो कीं, मी तुझे मुलास आपले स्वाधीन घेणार नाहीं; ह्मणून मला येथें येणें पडलें. गांवांत शिरलों तों मला कोणीं सांगितलें कीं यशवं-तरावास एक गाडीवान पाहिजे; तें ऐकून मला असें

वाटलें कीं आत्मारामाचे योगानें मला आतां प्रारब्ध ही अनुकूळ आहे. तो तसाच मी यशवंतरावाकडे गेलों, तों त्यांणीं सांगितलें कीं, तूं मागें कोणाजवळ होतास, त्यांचे हातचें आबरूपत्र आणिलें तर तुला ठेवीन. पाहिलें तों खंडेराव तर परलोकीं गेले, तेथें माझ्यानें जाववत नाहीं; ह्मणून भीतभीत तुह्मांपाशीं आलों. मनांत कीं कदाचित् तुह्मी मला आबरूपत्र दिलें नाहीं तरी, तुह्मी आत्मारामाचे हातानें जे मजवर उपकार केले त्याविषयीं तुह्मांस बरें मागावें, आणि परत जावें.

पांडुरंग— नाहीं, माझ्या भल्या गणोजी, तसें होणार नाहीं, आत्मारामानें जे तुजवर उपकार केले, त्यांत माझा अगदीं संबंध नाहीं. त्यानें आपणास उघडें करून तुला झाकलें; त्यानें आपण उपाशीं राहून तुला तृप्त केलें. हें त्यानें पुण्यकर्म केलें, त्याचा वांटा मी कसा घेऊं ? तुझे योगानें तो ही माझ्या कृपेस पात्र झाला; हा त्यावर तुझाही मोठा उपकार झाला. त्यास त्वां आज केवढे संकटांतून काढिलें! होय, आज जर तूं येथें आला नसतास, तर मीं त्याला अक्षयीं आपल्या दृष्टीवेगळें केलें असतें.

गणोजी— महाराज, आपण असें ह्मणतां! तर माझे सारिखा भाग्यवान् आज ह्या सृष्टींत कोणी नाहीं! काय ! आत्मारामास मी संकटांतून बाहेर काढिलें; आह्मी परस्पर परस्परांस असे कामास आलों !

आहा! काय आनंदाचा दिवस आज!

पांडुरंग०— त्या घातक्या वाशानें माझें अंतःकरण त्याविषयीं क्षोभविलें होतें. त्या लुच्चानें मला असें फार वेळ ठकविलें. अतःपर मी त्याचा विश्वास कसा धरूं? धरणार नाहीं. पण मला शालागुरूचें नवल वाटतें.

अंबा— कां बाबा? त्यालाही त्यानें असेंच ठकविलें नसेल कशावरून?

पांडुरंग०— पण तो मला लिहितो कीं, आत्माराम पळाला आहे! त्यानें निराश होऊन आपले जिवास एकादें कांहीं केलें, किंवा तो एकादे संकटांत पडला तर कसें होईल?

गणोजी— घोडा! घोडा! एक घोडा मात्र द्यावा; मी त्यास परत आणितों. तो द्वीपांतरीं गेला असला तरी तेथून आणीन.

सावित्री— (मामाचा हात धरिते) माझे मामा, तूं त्याला क्षमा करिशील? तूं त्याला एक वेळ आपले पोटाशीं धरिशील?

पांडुरंग०— जरी त्यानें आपलें सगळें विकलें असलें तरी; जरी तो जन्मला तसा नागवा मजपाशीं आला तरी, मी त्यास आतां अंतर देणार नाहीं. (सावित्री अंबास खूण करिते, आणि आपण धांवत बाहेर जाते.)

अंबा— बाबा, जर तो येथेंच कोठें असला तर?

पांडुरंग०— काय येथें? त्याला कोणीं पाहिलें? कोठें आहे तो? कोठें आहे तो?

गणोजी— आहा! येथें जर तो आहे! येथें जर तो आहे, तर मग काय! मग मी आनंदानें उडेंन.

अंबा— बरें बाबा, तर तो तुझे दृष्टीस पडेल.

---

## प्रवेश १५,

## पांडुरंगराव, आत्माराम, अंबा, सावित्री, आणि गणोजी.

( आत्माराम दिवाणखान्यांत प्रवेश करून मामास साष्टांग नमस्कार घालितो. गणोजीचे पोटांत आनंद मावत नाहीं. सावित्री आणि अंबा आनंदाश्रु टाकितात. )

आत्माराम— ( हात जोडून उभा राहून ) आहा मामा! माझ्या पूज्या मामा! तूं माझे अपराध क्षमा करिशील?

पांडुरंग०— क्षमा करीन. मला आतां सहस्र वांच्यांनीं अधिक आवडतोस. तुला क्षमा योग्य आहे. तूं मला अतःपर सोडून जाऊं नको.

आत्माराम— नाहीं मामा! कधीं जाणार नाहीं. ( वळून गणोजीस पाहातो, आणि त्याचा हात धरितो. ) आहा! मामा जर त्वां ह्या गरिबाचे आणि ह्याचे मुलांचे हाल पाहिले असते! आणि जर ते सगळे तुजमुळें झाले असते! जसे मजमुळें झाले, तर

तुला किती खेद होता !

गणोजी— नाहीं आत्मारामा, माझे हालांस मीच कारण. मीं तुला गाडीवर कां घ्यावें ? मीं तुझे हातांत तापट घोड्यांच्या दोऱ्या कां द्याव्या ? पण तुझे सारिखे मुलास नाहीं कोण ह्मणेल ? जरी ती गाडी माझे अंगावरून आरपार जाती, तरी माझ्यानें तुला नाहीं असें ह्मणवतेंना. तर आत्मारामा, आतां ह्याची खूण धर; आणि आजपासून मजकडे नाहीं ती आळ घेऊं नको. त्वां घेतली तर मी तुला नाहीं ह्मणणार नाहीं. पण मग मी आपला प्राण ठेवणार नाहीं.

पांडुरंग०— आत्मारामा, त्वां आपलें घड्याळ, पुस्तकें, आणि मला वाटतें, चिरगुटेंही विकलीं, हें मला कां लिहिलें नाहीं ? तुला ह्या वस्तांचा उपयोग समजत नाहीं. इतका तुजकडे वेडेपणा नव्हे ?

आत्माराम— होय मामा, तें खरें; पण गणोजीचे कुटुंबास एक क्षणभर ही मीं कष्टांत पाहावें तें मला महापातक दिसलें. आणिखी त्वां रागावून गणोजीस हांकून दिलें होतें, ह्मणून मला भय वाटलें कीं, त्यास सहाय होण्याविषयीं तूं मला मना करिशील; आणि जर मी तुझी आज्ञा मोडितों, तर मोठ्या टपक्यांत येतों.

पांडुरंग०— काय ? तर त्वां माझी आज्ञा मोडिली असती ?

आत्माराम— होय मामा; पण इतक्याविषयींच मात्र.

पांडुरंग०— माझे शूरा मुला, मला तुझा मुका घेऊं दे ! असो;

पण मला पत्र आलें आहे, त्यांतील एके गोष्टीविषयीं मला अझून संशय आहे, तितका माझा फेड. तूं रात्रीस बाहेर होतास तो कोठें होतास?

आत्माराम– मीं गणोजीकरितां पैसे घेऊन गेलों होतों. आमचा गुरु त्या रात्रीस कोठें बाहेर गेला होता, ह्मणून लवकरच दरवाजा लागेल, हें मला ठाऊक होतें. त्यासाठीं मी लवकर घरीं यावयास निघालों, तो आंधारांत वाट चुकलों.

सावित्री– आहारे भाऊ, तर मग तुझी अवस्था काय झाली; आणि तूं कोठें निजलास?

आत्माराम– मला वाटेंत एक खोंपट आढळलें, तेथें दारीं एक फळ्याचा तुकडा होता, त्यावर निजलों; तशी निद्रा मला कधीं आली नव्हती. गणोजीस सुखी करून माझे जिवास मोठें समाधान झालें होतें.

अंबा– आये ! काय दुष्ट वासू तरी ! त्याला हें सगळें ठाऊक, पण त्यानें आह्मांस कळविलें नाहीं.

पांडुरंग०– ह्या क्षणापासून मीं त्यास पाणी सोडिलें; आतां तूं माझा.–

आत्माराम– नाहीं मामा, असें करूं नको. दुसऱ्यास दुःखांत पाडून मी सुखी कसा होईन? आणि मातक्यान तुझे पोटचे मुलास.

सावित्री– (त्याचा हात धरिते) असले भावास मी किती वाणूं? किती जिवाशीं धरूं?

पांडुरंग०–बरें तर; तो शाळेंत असेल; आणि तूं मज-

पाशीं ऐस. मी तुला माझे न्हृदयांत सतत ठेवीन. तुला शिकवावयास गुरु पाहिजेत, ते शंभर कोसांवरून आणावयाचे झाले तरी आणीन.

गणोजी– ( नमतो ) माझे चांगले धन्या, तुझी वृत्ति मीं सदा सारिखी पाहिली.

पांडुरंग०– ( त्याची पाठ थापटतो ) गणोजी, तूं यशवंतरावापाशीं वचनानें गुंतला आहेस काय ?

गणोजी– मी कसा गुंतूं ? मला तुह्मांपासून रुस्कत कोठें मिळाली आहे अझून ?

पांडुरंग०– तुला रुस्कत मिळणार नाहीं. माझी इच्छा आहे कीं, त्वां आणि आत्मारामानें एका ठिकाणीं असावें, आणि एकांमेकांस सुखी करावें. पण त्यास पुनः गादीवर येऊं देऊं नकोहो. मी तुझे मुलांचाही सांभाळ करीन.

गणोजी– ( आनंदाचा उभड येऊन डोळ्यांतून आसवें टाकितो आहे. ) माझे धन्या ! तूं खरेंच ह्मणतोस ? मी हें स्वप्न तर पाहात नाहीं ? आहा ! तर प्रथम मला घोडशाळेंत जाऊन माझे जुने मैत्रांस भेटूं दे.

( सर्व निघून जातात. )

# जुना चाकर.

## मुकुंदशेट आणि विठू.

विठू— बाबा, तूं रामजीला काढशील तेव्हां त्याचे जागेवर ठेवावयाला मीं एक चांगला चाकर पाहिला आहे.

मुकुंद०— तुला ती कामगिरी कोणीं सांगितली बरें? मी त्यास काढणार हें कशावरून?

विठू— तर काय, तूं सदा त्या ह्यातारड्यासच ठेवणार? त्यापेक्षां मला वाटतें कीं तरणा चाकर मोठ्या उपयोगीं पडेल.

मुकुंद०— चांगले चाकरास कंटाळावें ही गोष्ट फार अनुचित! तूं त्यास ह्यातारडा ह्मणतां तुझे चित्तांत खाल्लें कसें नाहीं! तो माझे चाकरींत ह्यातारा झाला, तुला त्यानें लाहानाचें मोठें केलें; तुला दुखणें येई तेव्हां तो तुझी फार काळजी वाही; तेणेंकरूनच तो लवकर ह्यातारा झाला असें नाहीं कशावरून? ह्यावरून तूं पाहा कीं, त्वां त्याचे ह्यातारपणाची थट्टा करावी ही किती कृतघ्नता! आणिखी हा तरी तुझा खचित निश्चय होतो कीं, तरणा चाकर ह्यापेक्षां अधिक उपयोगीं पडेल? तर ह्याविषयीं एकादा निश्चय करावयास अझून तूं फार लाहान आहेस; हें तुझ्याहून जाणत्याचें काम आहे. एकादे दिवशीं मी तुझे अनुभवास आणून देईन कीं, आस्थापूर्वक चा-

करी करण्याविषयीं, व धन्याचें हित पाहाण्याविषयीं, तरण्यापेक्षां ह्मातारे चाकर फार उपयोगी असतात.

विठू— तूं ह्मणतोस त्याअर्थी मी तें खरेंच मानितों. पण त्याचे केंस झडले आहेत, त्याला पाहिलें ह्मणजे मला चिन्हच वाटतें, आणि हांसूं येतें.

मुकुंद०— हें तुझेठायीं कांहीं प्रतिष्ठित लक्षण नव्हे, मुला! मला वाटलें नव्हतें, कीं तूं असा अधम आहेस. तुला ठाऊक नाहीं, त्याला फार दिवस दुखणें लागून त्याचे केंस गेले तें? त्याची थट्टा करावी ती ईश्वराची थट्टा, ज्यानें तो रोग मुळींच उत्पन्न केला.

विठू— पण तो नित्य कुरकुरतो, आणि दुर्मुखलेला असतो; दुसरे चाकरांसारिखा मौजी नव्हे.

मुकुंद०— वयामुळें त्याचेठायीं ती प्रौढता आहे. पण तो कुरकुरेल कशाला? तो अठरा वीस वर्षांचे पोऱ्यासारिखा चपळ नाहीं ह्मणून काय तो तुला आवडूं नये? अगा मुला, असें मनांत आणतांना तुझे अंगास शाहारा यावा! ईश्वरें मला फार दिवस आयुष्य दिलें असतां, ह्याप्रमाणें तूं माझाही कंटाळा करशील नव्हे?

विठू— काय तुझा! नाहीं बाबा, मी असा द्वाड नाहीं.

मुकुंद०— तर रामजीचा कंटाळा करावा हा द्वाडपणा नव्हे? कांकीं तो ह्मातारपणामुळें मागलेसारिखा च-

पळ नाहीं ह्मणून ?

विठू– बाबा, मी चुकलों, मला क्षमा करा. मला आतां फार खेद झाला कीं मी–

मुकुंद०– तूं उगीच कां राहिलास ? तुला खेद कां झाला तें सांग.

विठू– तो माझा अन्याय जर मीं तुला सांगितला, तर तूं मजवर फार रागें भरशील, आणि मला मारशील.

मुकुंद०– मुला, तूं जाणतोस, मला मारावयाची हौस नाहीं; मी तो उपाय तसेंच कारण पाहून एकादे वेळेस करितों. अन्याय झाला असतां मोठे ममतेनें, आणि चांगला उपदेश करून, मी तुला आणि तुझे बहिणीस मार्गावर आणितों. त्वां अन्याय केला आहे तो मला ठाऊक नाहीं, ह्मणून तुझें मी पारिपत्य करणार नाहीं हें माझ्यानें निक्षूण कबूल करवत नाहीं. तूं काय अशी बोली सोडवून कबूल होणार ? छी, हें चांगलें नव्हे. तुजवर माझी ममता किती आहे, हें तुला ठाऊकच आहे; तर तीवर विश्वास धरून, त्वां मजपाशीं कबूल व्हावें.

विठू– बरें बाबा, तर मी कबूल होतों, कीं मीं रामजीस " चोरटे ह्मातान्या " असें ह्मटलें.

मुकुंद०– काय ? तुजपासून अशी गोष्ट झाली ? त्याभले मनुष्यासंगतीं कसें वागावें तें तूं इतकें विसरलास ? आणि ते शब्द रामजीनें ऐकीले ?

विठू– होय बाबा, ह्मणूनच मला पश्चाताप होतो.

मुकुंद०— पश्चाताप व्हावा हें चांगलें मुला, पण तोंडावर कोणास वाईट ह्मटलें त्याचाच पश्चाताप व्हावा आणि पाठीमागें ह्मटलें त्याचा होऊं नये, असें तुला वाटेल तर, वास्तविक पाहतांदोन्ही अन्याय समान आहेत.

विठू—खरें बाबा, तोंडावर किंवा मागें मीं रामजीस असें ह्मणूंनये, पण मीं तोंडावर ह्मटलें ह्मणून मला फारच खंती होते, कांकीं—

मुकुंद०— तूं मजपुढें मन मोकळें करून कांहीं पुढें सांगावयास इच्छितोस, असें मला वाटतें; चालूंदे; गोष्ट संपीव.

विठू— होय बाबा, जेव्हां मीं रामजीस वाईट ह्मटलें, तेव्हां त्यानें डोळ्यांतून आंसवें टाकिलीं; आणि ह्मणाला, मीं एक तर ह्मातारपणाचे क्लेशानें पीडिलों आहें, त्यावर आणखी मला मुलांनीं त्रास द्यावे; काय प्रारब्ध !

मुकुंद०— गरीब बिचारा रामजी! मला वाटतें कीं, ती गोष्ट त्याचे जिव्हारीं लागली असावी. ह्या वयांत त्याला पोरांनीं चाळवावें तें साहाणें फार कठिण आहे. पण ज्या मुलास त्यानें बाळपणापासून ममतेनें वागविलें, असें कीं, ते त्याचे उपकार कधीं फेडितां येणार नाहींत, त्या मुलानें त्यास असें दुखवावें, हें त्यास अति दुःसह झालें असेल !

विठू— आहा बाबा, मी किती निंद्य ह्मणावा ! मी त्या-

पाशीं क्षमा मागेन. आणखी मी शपथ घेतों कीं, माझे कुडींत प्राण आहे, तोंपर्यंत मी त्यास पुनः कधीं दुखविणार नाहीं.

मुकुंद०— बरें मुला, ह्मटल्याप्रमाणें वागलास तरच तुला आजचा अपराध देव क्षमा करील; आणि मीही क्षमा करीन. आपण सगळे परस्वाधीन प्राणी आहों; कामक्रोधादिकांस वश होऊन एकादे वेळेस अनुचित कर्म करितों; पण त्यांचें वारें निघून गेल्यावर आपणांस पश्चाताप व्हावा, आणि गर्व सोडून झालेल्या अपराधाची आपण स्वच्छता करावी; आणि पुनः आपणापासून तसा न होऊंदेण्याविषयीं आग्रह धरावा. पण तूं मला सांग कीं, तुला रामजीस असें ह्मणावयास कारण काय झालें? त्यानें तुझा कांहीं अन्याय केला होता?

विठू— होय बाबा, त्यानें आपले कडून जरी नसला केला तरी मला तसें वाटलें. मी आपला तीरकमठा घेऊन खेळत होतों, तों त्याचे तोंडावर तीळ पाहून मी त्यावर नेम धरिलें; त्यावरून त्यानें मला ह्मटलें "खबरदार विठू; नाहीं तर मी तुझे बाबास जाऊन सांगेन." त्यानें मला असें धमकाविलें त्यावरून मला फार राग आला, आणि मीं त्याला शिवी दिली.

मुकुंद०— तर त्वां आपलेकडून त्याला दाखून दुखविलें.

विठू— तें मी नाहीं कसें ह्मणूं?

मुकुंद०— तर तूं विशेष अपराधी. ह्मणूनच त्याचे डो-

ळ्यांस पाणी आलें !

विठू– बरें तर बाबा, तूं आज्ञा देशील तर मी ह्याक्षणीं त्याकडे जाऊन क्षमा मागतों, तो ती देईपर्यंत मला चैन पडणार नाहीं.

मुकुंद०– होय मुला, असले कामास एकक्षण जाऊंदेऊंनये. जा, जाऊनये, मी येथें आहें. ( विठू जातो आणि समाधान पावून परत येतो. )

विठू– बाबा, आतां माझें अंतःकरण मला स्वस्थता देतें. कांकीं, रामजीनें मला मनापासून क्षमा केली. आणि मला वाटतें कीं, मी अतःपर असा अन्याय करणार नाहीं.

मुकुंद०– ईश्वर तसें तुजकडून करवो; त्याचे कृपेवांचून तुझा कोणताही निश्चय पार पडणार नाहीं.

विठू– त्याची कृपा व्हावयास काय उपाय करावा ?

मुकुंद०– तिजविषयीं तूं त्याची प्रार्थना कर, तो तुला ती नाहीं देणार असें होणार नाहीं.

विठू– मी ती मनापासून मागेन. पण बाबा, मी दुसरें एक तुझे आज्ञेवांचून काम केलें आहे; कदाचित् तुला त्याचा राग येईल.

मुकुंद०– काय तें, मुला ?

विठू– त्वां मला कोरा रुपाया दिला होता, तो मी रामजीस दिला.

मुकुंद०– त्यासाठीं मी रागें कां भरेन ? त्वां असलें काम स्वबुद्धीनें करावें; त्यांत मला समाधान आहे. तुला

मी पैसे देतों, तितके तूं हावे असले तर खर्च; ते तुझे. ते त्वां धर्ममार्गास खर्चले तर त्याहून दुसरें अधिक चांगलें कृत्य काय आहे ? सांगितलें आहे कीं, आपण लाहानपणापासून धर्मकृत्याचा अभ्यास ठेवावा; पण तें धर्मकृत्य आपलें सामर्थ्य पाहून व्यवस्थेनें करावें; नाहीं तर धर्म तोच अधर्म होतो. पण रामजीचें आतां समाधान झालेंना ?

विठू— त्याचे डोळ्यांतून आनंदाश्रु आले, ते मी पाहिले.

मुकुंद०— मी तुला त्याविषयीं शाबासकी देतों, माझे मुला. चांगले अंतःकरणाचे आहेत ते कोणासही व्यथा देत नाहींत. सर्वही सत्कर्मे आपले अंतःकरणांत समाधान उत्पन्न करितात, पण परोपकार करण्यांत फारच समाधान आहे.

विठू— आहा ! जर ईश्वरें कधीं मला सामर्थ्य दिलें, तर मी आपले आसपासचे गरीब लोकांचे क्लेश दूर करीन.

मुकुंद०— मी भगवंतापाशीं मागतों, कीं तो हा गुण तुजमध्यें दृढ करो; आणि तो आचरावयास तुला सामर्थ्य देवो.

विठू— तर मग मी सदा आजचे सारिखाच समाधान पावेन ?

मुकुंद०— हा इतकाच एकच आनंद कधीं विटत नाहीं. प्रथम तूं हा आपले घरचे मनुष्यांवर उपकार करून भोग. जर तुझे चाकर भले मनुष्य आहेत, तर तूं

त्यांशीं बरेपणानें वागून त्यांची ममता आपणावर लावून घे. त्यांस कधीं मधीं देणगीही दे; जर तूं त्यांस घटे तेव्हां आणि प्रसन्न चित्तानें ती देशील तर ते तुझे दृढ मैत्र होतील.

विठू– पण बाबा, त्यांस रोजमुरा मिळतो नव्हे ?

मुकुंद०– तो त्यांचे चाकरीचा, त्यांत आपण कांहीं त्यांस अधिक केलें असें नाहीं. पण त्याशिवाय त्यांस कांहीं इनाम दिलें असतां, त्यांची ममता आपणावर जडते, आणि ते अधिक कामावर पडतात.

विठू– हें कसें तें मी चांगलें समजलों नाहीं.

मुकुंद०– ह्या रामजीचाच दृष्टांत देतों. ह्याचे चाकरीचें मी ह्यास अन्नवस्त्र रोजमुरा देतों. तें घेऊन त्यानें बोली केली आहे तितकी चाकरी केली ह्मणजे तें फिटलें नव्हे ? आतां तूं पाहा कीं तो घरांतले सर्व वस्तांची खबरदारी ठेवितो, दुसरे चाकरांची देखरेख करितो, तेणेंकरून माझा फार नफा होतो; हें तो माझे ममतेनें सर्व करितो, कांकीं मी त्याला वेतनाशिवाय आणखी देणगी देतों. तूं मोठा होशील तेव्हां, तूं ज्याचे त्याचे तोंडानें चाकरांची कागाळी ऐकशील, तर मी तुला खरेंच सांगतों कीं, हा अन्याय धनीलोकांचा आहे; ते त्यांस भय दाखवून वागवूं पाहातात; प्रीतीनें वागवीत नाहींत.

विठू– आतां मी पक्कें समजलों, आणि माझे अंगावर पडेल तेव्हां तूं सांगतोस तसेंच मी करीन, आणि

तुझे उपदेशाप्रमाणें वागेन.

मुकुंद०— तसें केलें तर तुला त्यापासून संताप होणार नाहीं; माझे बापानें मला ह्याविषयीं एक गोष्ट सांगितली होती, ती मी नित्य स्मरत असतों.

विठू— आहा बाबा, जर तुला श्रम होणार नाहीं, तर मी ती ऐकावयास इछितों.

मुकुंद०— तूं मजकडे आपल्या अन्यायास कबूल झालास, आणि त्वां रामजीविषयीं उदारपणा दाखविला, हा तुझा भलेपणा पाहून मी संतोषानें ती गोष्ट तुला ऐकवितों. "दमाजीराव ह्मणून कोणी सरदार होता, तो सरकार चाकरींत ह्मातारा झाला, तेव्हां तो आपले इनाम गांवावर येऊन राहिला. त्याची बायको मोठी पतिव्रता होती; व पांच मुलें, तीं आपले आई-बापांचे आज्ञेत तत्पर होतीं. त्याचा थोरपणा, त्याचा मधुर स्वभाव, त्याचे घरांतील स्थीतरीत पाहून त्या गांवचे सर्व लोक, व त्याचे ओळखीदेखी त्यास मानीत. असें तें सुखी कुटुंब जो पाही त्याचा आत्मा समाधान पावे. उमेदवार माणसें त्याचे चाकरींत राहावयाची इच्छा करीत. त्याचा कोणी चाकर मेला असतां, किंवा गेला असतां, त्याचे जागेवर राहावयास उड्या पडत. ज्याचे चाकरांचे तोंडावर सर्वदा आनंदवृत्ति दिसावी, जसें कोणी ह्मणेल कीं हीं त्याचीं लेंकरें आहेत, चाकर नव्हत. त्यानें आज्ञा कराव्या त्या नीतियुक्त जशा ज्याचे शक्तीस योग्य

नशा कराव्या, तेणेंकरून कोणाचे मतांत कधीं त्याची अवज्ञा करावी अशी कल्पना आलीच नाहीं. त्याचे घरीं चाकरांत परस्पर भावांप्रमाणें गोडी होती. कधीं त्यांमध्यें बोलाचाली झाली, तर धन्याची चाकरी अधिक कोण बजावतो, आणि त्याचे हितास अधिक कोण जपतो, ह्याविषयीं मात्र व्हावी. जाधवराव शिंदे दमाजीचे जुने मित्र, तेही दमाजीसारिखे चाकरी सोडून आपले इनाम गांवीं राहात होते; ते एके दिवशीं त्यांचे घरीं आले होते; तेव्हां गोष्टीवरून गोष्ट निघतां, जाधवरावांनीं गोष्ट काढिली कीं, "मी दुसरे सर्व गोष्टींत सुखी आहें, परंतु चाकरांविषयीं बेजार आहें; मला त्यांविषयीं जपतांना पुरें झालें. जो चाकर पाहावा तो आळशी, बेअदबी, आणि चाकरी चोर, आढळतो." दमाजी त्यांस ह्मणाला, "तेवढ्याविषयीं मी सुखी आहें; आज दाहा वर्षें झालीं, मला असें स्मरत नाहीं कीं, मला कोणीं रंजीस केलें. मी त्यांविषयीं समाधान पावतों; आणि तेही मजविषयीं समाधान पावतात." जाधवराव ह्मणाले, "असेल; पण असें विरळा आढळतें. त्यांस चांगलें ठेवण्याविषयीं, किंवा चांगलें करण्याविषयीं, तुह्मांस कांहीं युक्ति ठाऊक असावी." दमाजी ह्मणाला "युक्ति सोपी आहे, ती पाहा तुह्मांस दाखवितों." असें ह्मणून त्यानें एके पेटीकडे बोट केलें. त्यास जाधवराव ह्मणाले. "मी समजलों नाहीं."

त्यावर त्यानें कांहीं उत्तर नकरितां पेटी उघडून दाखविली; तींत साहा खण होते. एक एकावर हें लिहिलें होतें,—" अधिकोत्तर खर्च,"—" माझा खासगत खर्च;"—" माझे बायकोचा;"—" माझे मुलांचा;"—" चाकरांचा."—" देणगीचा." दमाजी ह्मणाला, " मी आपले कुळांपासून एक वर्षाचे रुपये आगाऊ वसूल करितों; त्यांचे साहा वांटे करितों. पहिले खणांत वांटा घालतों तो अकल्पित खर्चास ठेवितों; त्यास तसें प्रयोजन पडतें तेव्हांच हात लावितों. दुसऱ्यांत जो घालितों तितक्यांत माझा जातीचा खर्च ठेवितों; तिसऱ्यांत कुटुंबाचे पोटाचा खर्च; चवथ्यांत माझे मुलांचा विद्याभ्यास इत्यादिकांचा खर्च; पांचव्यांत चाकरांचा मुशारा; साहाव्यांत त्यांस किंवा दुसरे कोणास देणगी, धर्मादाय, इत्यादिक खर्च. ह्या शेवटले खणामुळें मला चाकरांपासून सुख आहे. मुशाऱ्यांत ते बोलीप्रमाणें चाकरी करितात; पण ज्यांची बोली केली नाहीं अशीं कामें आहेत तीं ते देणगीचे लोभानें जीव लावून, आणि माझे आज्ञेपेक्षांही अधिक, करितात."

---

## परशुराम आणि कृष्णी.

उन्हाळ्यांत एके दिवशीं, गोपाळराव ह्यांनीं आपलीं दोन मुलें, परशुराम आणि कृष्णी, ह्यांस कबूल के-

लें होतें कीं, मी तुह्मांस, आज संध्याकाळीं आपले बरोबर एक चांगला बाग गांवाबाहेर जवळच आहे तो पाहावयास नेईन. मग संध्याकाळ झाला तेव्हां तो माडीवर पोशाग करावयास गेला; मुलें खालीं होतीं. परशुरामास आतां आपले दृष्टीस मोठी मौज पडेल ह्मणून जो आनंद झाला, तो पोटांत मावेना. तो नाचूं उडूं लागला; इकडून तिकडे आणि तिकडून इकडे धूम खेपा घालितो आहे, आणि मोठे तयारींत आहे, इतक्यांत बापानें तेथें एक फुलझाडाची कुंडी आणून ठेविली होती, त्या झाडाचे फुलास त्याचे शेल्याचा झपाटा लागून, तें डांगळीपासून मोडून पडलें. तें हातांत घेऊन कृष्णी त्यास ह्मणते, अगा भाऊ! हें त्वां काय केलें? तिचे हातांत फूल होतें इतक्यांत गोपाळराव वरून खालीं आले, त्यांनीं रागें भरून कृष्णीस ह्मटलें, मुली, मीं इतकें जपून हें फूल राखून ठेविलें होतें, कीं त्यापासून बीं प्राप्त व्हावें, तें त्वां असें तोडावेंना? ती कांपत कांपत ह्मणाली, माझ्या बाबा, कृपा करून तूं मजवर रागाऊंनको! गोपाळराव अंमळ थंड होऊन ह्मणाले, मुली, मी रागें नाहीं भरलों, पण आतां आपण दुसऱ्याचे बागांत जाणार, तेथेंही तुला फुलें तोडावयाची अशीच इच्छा होईल, ह्मणून मी तुला बाहेर नेत नाहीं; ह्याविषयीं तुला वांकडें वाटूं नये.

कृष्णी अधोमुख पाहूं लागली, आणि स्तब्ध उभी राहिली. तें पाहून परशुरामाच्यानें उगीच राहवलें ना-

हीं. तो डोळ्यांत आसवें आणून बापापाशीं गेला, आणि ह्मणतो, "बाबा, तो माझे ताईचा अन्याय नव्हे, तें फूल मीं मोडलें, ह्मणून मला घरीं ठेव; आणि ताईस बरोबर ने."

तीं मुलें अशीं नीतिवंत पाहून, आणि त्यांची परस्परांविषयीं ममता पाहून, गोपाळरावांस दया आली; त्यांनीं त्यांस पोटाशीं धरिलें, आणि ते ह्मणाले, "तुह्मीं दोघेंही माझीं आवडतीं; दोघेंही मजबरोबर चला."

मग परशुरामास आणि कृष्णीस जो आनंद झाला तो काय सांगावा! तीं बापाबरोबर त्या बागांत गेलीं; त्यांत त्यांनीं नानाप्रकारचीं झाडें पाहिलीं. तेथें कृष्णी आणि परशुराम आपआपलीं चिरगुटें आटोपून बागांतून चालताहेत, हें पाहून गोपाळरावांस समाधान वाटलें. त्याचें जें फूल त्यानीं नासलें तें असतें तर त्यापासून त्याला संतोष झाला असता खरा, परंतु त्याप्रसंगीं त्या बहिण भावांडांमध्यें परस्पर प्रीति, व त्यांचें शाहाणपण पाहून त्यास त्याहून सहस्रगुणित आनंद झाला.

---

# हट्टी मुलगी.

अगा मुलांनो! ज्या तुह्मां कोणांस वाईट गुणाचे खोड लागली असेल, त्या तुमचे सुखासाठीं मी ही पुढची गोष्ट सांगतों; तिजवरून तुमचे लक्षांत येईल कीं, ए-

क वेळ जर मनाचा दृढ निश्चय केला तर, भलती लागलेली खोड टाकावयाचें अवघड पडत नाहीं.

चंद्री ह्मणून एक मुलगी होती, ती सात वर्षेंपर्यंत आपले आई बापांचा केवळ आनंद होती. त्या वयास आपल्या ज्ञानाचा उदय होऊं लागतो; आणि आपणांस बरें वाईट समजूं लागतें; पण चंद्रीचेठायीं तें उलटें झालें. तिला जी एक द्वाड खोड लागली, तीस दृष्टांत एके कुत्र्यावांचून दुसरा कोणता मला दिसत नाहीं. जसें एकादें पिसाळलेलें कुत्रें घुरघुरतें, आणि ज्याचे त्याचे अंगावर पडून चावेच घ्यावयास जातें. कोणी चुकतांना तिचे खेळण्यास हात लावला, तर तिनें त्याकडे वळून डोळे वाटारून पाहावें, आणि एक घटिकापर्यंत दांत ओंठ खावे. एकादे अन्यायासाठीं तिला कोणीं हळूच जर धमकाविलें, तर तिनें लागलेंच उसळावें; हातपाय आपटावे; आणि रागानें आसपासचे पदार्थ भुईवर झोंकावे. तिचा बाप, तिची आई, व घरचीं सगळीं माणसें, तिला कंटाळलीं. कोणी आपणास जवळ उभें करीत नाहीं, आईबापही आपला तिरस्कार करितात, ह्मणून तिला एकादे वेळेस पश्चात्ताप होई, आणि ती डोळ्यांतून आसवेंही गाळी; पण संवय पडतां पडतां मग तिला तो खेद होईनासा झाला; आणि तिचा द्वाड स्वभाव दिवसानुदिवस दृढ होत गेला. दिवाळीचे एके दिवशीं तिनें आपले आईस एक भरलेली टोपली पदराखालीं झांकून खोली-

त नेतांना पाहिलें; तेव्हां ती तिचे मागून खोलींत घुसूं लागली; तों तिचे आईनें तिला ढकलून मागें सारिलें. तेसमयीं तिला ओफरें येऊन जो तिनें अनर्थ केला, आणि रागानें दाराची फळी जी आपटली, त्यानें सगळें घर दणदणलें. मग एक घटिका जाऊं देऊन तिचे आईनें तिला बलावून नेलें. तेसमयीं खोलींत जाऊन तिला फार विस्मय झाला! जिकडे तिकडे दिवे उजळले आहेत; आणि नाना प्रकारचीं चांगलीं चांगलीं खेळणीं खोलीभर मांडून ठेविलीं आहेत. असें पाहून ती चकित झाली; आनंदानें तिचे तोंडावाटे एक शब्द निघेना. तिची आई तीस ह्मणाली, "चंद्रू, इकडे ये, आणि ह्या चिठ्ठीवर काय लिहिलें आहे हें वाच." त्या खेळण्यांत एक चिठ्ठी होती, ती चंद्रीनें हातीं घेऊन वाचली, तों तींत मोठमोठाल्या अक्षरांनीं हें लिहिलें होतें, "हीं खेळणीं जी मुलगी चांगले गुण करिते तिजकरितां आहेत."

चंद्री लाजून खालीं पाहूं लागली; एक शब्द बोलेना. तिला तिचे आईनें विचारिलें, "कां मुली, हीं कोणासाठीं आहेत बरें?" ती डोळ्यांत आसवें आणून ह्मणाली, "हीं माझेसाठीं नव्हत बये."

बरें तर, ती दुसरी चिठ्ठी आहे, पाहा, तींत कांहीं तुझें आहे का?

चंद्रीनें ती हातीं घेऊन वाचिली. "हीं त्या हट्टेले मुलीकारितां आहेत. जिचे बुद्धीस आपले द्वाड गुण आले

आहेत, आणि जी दुसरी दिवाळी येईपर्यंत ते नीट करण्यास इच्छिते." ती वाचून चंद्रीस रडें कोसळलें; तिनें आईचे गळ्यास मिठी मारिली; आणि ह्मणते; "आहा बये, ही मी! ही मी!" तेवेळीं आनंदीबाईसही गहिंवर आला, कांहीं मुलीचे द्वाड गुण स्मरून व कांहीं तिचा पश्चात्ताप पाहून, कांहीं पळें जाऊं देऊन ती चंद्रीस ह्मणते, "घे मुली, हीं तूं. त्वां बरे गुण धरण्याविषयीं निश्चय केला तो तुझा ईश्वर पार पाडो!"

चंद्री ह्मणाली, "नाहीं बये, ह्या वेळेस हीं सगळीं पहिले चिठ्ठींतले मुलीचीं आहेत. तर आतां हीं असूंदे; जंवपर्यंत मी तशी होईन." हें उत्तर ऐकून आनंदीबाईस बहुत समाधान वाटलें. तिनें तीं सगळीं खेळणीं एका पेटींत घालून, तीस किल्ली करून, चंद्रीस ह्मणाली, "मुली, घे ही किल्ली आपले स्वाधीन; आणि तुला जेव्हां वाटेल कीं आतां मी हीं घ्यावयास योग्य आहें, तेव्हां पेटी उघड."

ह्या गोष्टीस दोन महिने लोटले तोंपर्यंत चंद्रीस कधीं ओफरें आलें नाहीं. एके दिवशीं तिनें आईचे गळ्यांत हात घालून पुसलें, "बये, आतां ही पेटी उघडूं?" आनंदीबाईस प्रेमाश्रु येऊन ती तीस ह्मणाली, "होय, माझे जिवा, उघड आतां. पण मला आधीं सांग कीं, त्वां आपला स्वभाव नीट करावयास काय उपाय केला बरें?" चंद्री ह्मणाली, "त्याविषयीं मला मोठे प्रयास पडले; मी नित्य आपले मनांत ती गोष्ट घोकीं, पण

सकाळीं संध्याकाळीं देवाची प्रार्थना करीं कीं, हे देवा, माझा निश्चय चळूं देऊं नको." तें ऐकून आनंदीबाईस किती आनंद झाला तो वर्णवत नाहीं. मग चंद्री त्या सर्व खेळण्यांची धनीण झाली, आणि आपले आईचा प्रेमा तिनें आपलेकडे संपूर्ण ओढून घेतला.

एके दिवशीं आनंदीबाईकडे एक मुलगी आली होती, ती अशीच हट्टी होती; तिला समक्ष आनंदीबाईनें चंद्रीची गोष्ट सांगितली, ती ऐकून त्यामुलीस पश्चात्ताप झाला, तेणेंकरून तिनें ही चंद्रीप्रमाणें आपले द्वाड गुण सोडावयाचा, आणि तीप्रमाणें सर्वांस आवडती व्हावयाचा निश्चय केला. तिलाही तसेंच फळ प्राप्त झालें. ह्याप्रमाणें आपले आचरणानें चंद्रीनें दुसऱ्यांस बरे गुण लावले, तेणेंकरून ती अधिक सुखी झाली.

---

## आशाभंग.

एके दिवशीं, प्रातःकाळीं, अमृतराव बापाबरोबर माहिमास मौज मारावयासाठीं जावयास सजून तयार झाला होता. तेथें जावयाचें तें पूर्वीं पंधरा दिवस त्याचे मनांत सर्वदा घोळत होतें. तो नित्यांत लवकर निजून उठत नसे, तो त्यादिवशीं कोंबडे आरवणीं उठला, घरचे सगळ्या माणसांस उठविलें; गाडीवानास ताकीद केली, आणि आपण आंघोळ करून तयारींत आहे; इत-

क्यांत अकस्मात आकाश काळें झालें, अभ्रें दाट आलीं, मोठा वारा सुटला, त्यानें सर्व झाडें डोलूं लागलीं, आणि चोहींकडे धुळीनें दिशा धुंद झाल्या. अमृतराव क्षणक्षणां अंगण्यांत जाऊन आकाशाकडे पाही; फिरून माडीवर जाई: तो तीन तीन पायऱ्या उडे; आणि सोकाजी जो त्याचा बाप ह्यास आशा देई कीं, बाबा, कांहीं चिंता नाहीं. हें आतां सगळें जिकडे तिकडे जिरेल. आणि दिशा निर्मळ होतील. मला वाटतें कीं आपण निघालों तरी चिंता नाहीं.

सोकाजीनें मुलाचीं भविष्यें ऐकून तसें केलें नाहीं. तो ह्मणाला, बाबा, अंमळ वाट पाहिली पाहिजे; इतकें ह्मणतो आहे तों विजा कडकडूं लागल्या; आणि मोठा पाऊस कोसळला. तेव्हां अमृतरावास जो पस्तावा झाला तो सांगतां येईना. तो ह्मणाला, जळो हा, आजच कशाला लागला! संध्याकाळचा प्रहर दिवसपर्यंत पाऊस पडून मग जिकडे तिकडे निरभ्र झालें, आणि ऊन पडलें; झाडें पानें सगळीं टवटवीत दिसूं लागलीं. मग अमृतराव बहुत दिक्क होऊन राहिला होता तो अंमळ हुशारींत आलासा पाहून, बापानें त्यास महालक्ष्मीपर्यंत बाहेर फिरावयास नेलें. तेव्हां हवेची स्वच्छता पाहून, पक्ष्यांचे शब्द ऐकून, जिकडून तिकडून सुगंध येतो आहे तो घेऊन, त्याचा ह्रदयास समाधान झालें. त्यास सोकाजी ह्मणतो, पाऊस पडल्यानें सर्वत्र काय फेरफार झाला, तो त्वां पाहिलाना? कालच जिकडे तिकडे धुंद

कसें दिसत होतें? ऊष्मा काय होत होता? सर्व व्याकुळ कसें झालें होतें? आतां इतकी जिकडे तिकडे टवटवी दिसावयास काय प्रयोजन बरें? अमृतराव ह्मणाला, "आजचा पाऊस."

पाऊस भरून आला ह्मणून सकाळीं तो चडफडत होता, त्यास ते शब्द उच्चारतां बहुत जाचले; तो लज्जित झाला. तेवेळेस बापाचे लक्षांत आलें कीं, ह्यास ही गोष्ट समजली कीं, जींत बहुतांचें कल्याण ती गोष्ट आपले अकल्याण होऊन ही झाली तरी चांगली. ती करावयाची आपले वांट्यास जर आली तर मोठे हौसेनें करावी, चडफडूं नये.

---

# अंतिक*,

## नाटक एक अंकी.

### पात्रें,

| | |
|---|---|
| श्रीपतरावराजा ........ | विजयी होऊन आपले राजधानीस आला आहे. |
| सगुणाबाईशिरकी ......... | सरपाग्याचीस्त्री. |
| हरबाजी.. गाड्यांचानाईक— | हा तिचा वडील मुलगा. |
| शामराव.. अंतिक—...... | तिचा धाकटा मुलगा. |

* अंतिक ह्मणजे जवळचा चाकर.

दलपतराव ...... सरशिलेदार — तिचा भाऊ.

विद्याधरपंडित ............... राजगुरु.

संताजी ........ ......... खिजमतगार.

स्थळ, राजाचा वाडा.

## प्रवेश १,

## राजा आणि अंतिक.

(राजा आपले माहालांत पलंगावर निजला आहे; त्याचे बाहेरचे खोलींत अंतिक एके बांकावर निजला आहे.)

राजा— (पाहटेस उठतो.) आहा! आज मला निद्राशी वाटली. हिला स्वस्थपणाचें सुख ह्मणावें. येथें बांके नौबती ह्यांचा उपद्रव नाहीं. (तो घड्याळ पाहातो) काय वीसच घटिका रात्र गेली? नाहीं, अधिक असावी. मला वाटतें कीं मी बारा प्रहरांवर निजलों. अंतिका! अरे अंतिका!

अंतिक— (अर्धा जागा उसळून बसतो. आणि पुनः पडतो.) आँ! कोण हाक मारितें? येतों.

राजा— तिकडे कोणी आहे कीं नाहींरे? काय, कोणी बोलत नाहीं?

अंतिक— (कुशीस वळतो आणि जांभई देतो) आहा! काय झोंप लागली होती!

राजा— कोणी बोलताहेसें मी ऐकतों. कोण आहे तें ? ( तो दिवा फिरवितो आणि पुढें जाऊन अंतिकास पाहातो. ) काय ! हें मुल येथें एकटेंच ! ह्यानें माझी चौकी करावी कीं मीं ह्याची ? ह्या खिजमतगारांचे ज्ञानास काय ह्मणावें ?

अंतिक— ( अर्धा जागा उठतो आणि डोळे चोळतो ) महाराज !

राजा— ऊठऊठ, मुला, तुझे घड्याळांत किती वाजले आहेत ते सांग; माझें बंद झालें.

अंतिक—( बांकास धरून उभा राहातो, अर्धा निजेंतच आहे. ) आँ ! काय महाराज ?

राजा— ( हंसतो ) तूं अझून निजेंत आहेस ? आहा ! काय ध्यान ! असें चित्र काढलें तर चमत्कारिक दिसेल. मुला, तुझे घड्याळांत किती वाजले ते सांगशील ?

अंतिक— ( डोळे चोळतो ) घड्याळ, महाराज ? मला क्षमा करावी; तें मजजवळ नाहीं.

राजा— तूं निजेंत बोलतोस, कीं तुझे जवळ खरेंच घड्याळ नाहीं ?

अंतिक— माझे जवळ घड्याळ कधींही नव्हतें.

राजा— नव्हतें ? तुझे बापानें तुला येथें घड्याळावांचून पाठविलें ? तुझ्यासारिख्याजवळ तर घड्याळ जरूर असावें.

अंतिक— माझा बाबा, आहा ! जर तो जीवंत असता—

राजा– तुला बाप नाहीं तर ?

अंतिक– मी जन्मास आल्याचे आधींच तो मेला. मी त्यास पाहिलें देखील नाहीं.

राजा– बाप नाहीं तर आणखी कोणी तुला वडील असावें, त्यानें किंवा तुझे आईनें तुला घड्याळ द्यावें.

अंतिक– माझी आई महाराज ? आहा ! ती तुह्मांस ठाऊक नाहीं ! ती फार दरिद्रानें पिडली आहे; तिजजवळचें सगळें तिनें मजकरितां खर्च केलें; घड्याळ घ्यावयास तिजकडे पैसे नाहींत.

राजा– आणखी कोणी तुझें वडील आहे कीं नाहीं ?

अंतिक– माझा मामा आहे, महाराज.

राजा– ( हंसतो ) विश्वांत फार मामे आहेत. पण तुझे मामाचें नांव काय ?

अंतिक– तो आपले हुजुरपागेवर असतो.

राजा– खरें, मला स्मरलें; त्यानेंच तुला मजपाशीं आणिलें होतें. आतां माझे मुला, तूं ही मेणबत्ती घे, आणि समोरचे खोलींत जा; तेथें दोन घड्याळें टांगलेलीं आहेत, आरशाचे दोहों बाजूंस; त्यांतून उजवे कडचें आण. खबरदार हो, मेणबत्तीची जोत कशास लावून घर पेटविशील नाहीं तर.– जलदी कर !

अंतिक– होय महाराज, ( तो घड्याळ आणावयास जातो. )

## प्रवेश २,

### राजा.

काय चांगलें मुलगें आहे! काय त्याचा सरळपणा! असा एकादे थोर मनुष्यांत असता, आणि तो मनुष्य जर माझा मित्र असता, तर काय पाहिजे होतें! पण हा लाहान फार; मला ह्याचा उपयोग नाहीं, मी ह्याला ह्याचे आईपाशीं पाठवितों.

---

## प्रवेश ३,

### राजा आणि अंतिक.

अंतिक– (एके हातांत मेणवत्ती आणि दुसरे हातांत घड्याळ घेऊन.) महाराज तीन घटिका रात्र आहे.

राजा– तर! माझा तर्क खोटा नव्हे; आतां लवकरच उजाडेल. (अंतिकाकडून घड्याळ हातीं घेऊन.) पण, मी तुला आणावयास सांगितलें तें हें नव्हे; हेंच उजवेकडे होतें?

अंतिक– उजवेकडे हेंच होतें, महाराज.

राजा– बरें तर, हेंच जरी होतें तरी, जर तुला आपलें हित समजतें, तर दुसरें आणितास; कां कीं हें हिरेजडित आहे, तुझेसारिखे मुलास बाळगावयास योग्य नाहीं; पण हें तूं लोभानें आणिलें असशील; अथवा जे अधिक आशा करून सगळेंच गमावितात,

त्यांसारिखें करावयास गेला असशील; मला खरेंच सांग.

अंतिक— महाराज काय बोलतात तें मी समजलों नाहीं.

राजा— तर मी समजावितों. डावें उजवें काय तें तुला समजतें?

अंतिक— ( फिरफिरून एके हाताकडे पाहून दुसरे हाताकडे पाहातो. ) डावें आणि उजवें, महाराज?

राजा ( त्याची पाठ थापटतो. ) बरें मुला, तें असो; जा, धांव, पहिल्यानें आपले मामास येथें बलावून आण.

---

## प्रवेश ४,

### राजा.

काय भलें! काय मनोहर मूल आहे हें! हेंही मला दुसरें कारण होतें कीं, ह्यास ह्याचे कुटुंबांत पाठवावें; कांकीं राजदरबार हें बुद्धिभ्रष्ट व्हावयाची जागा; येथें राहून ह्यानें बिघडूंनये. खरेंच, मी ह्यास ह्याचे घरीं पाठवीन हें चांगलें. पण जर ह्याची आई फार दुर्बळ आहे, ह्याचे संरक्षण करावयास समर्थ नाहीं, तर ह्यानें कोठें जावें? मी प्रथम ह्या गोष्टीचा शोध करितों; बरें, दलपतराव मला सर्व सांगतील.

---

## प्रवेश ५,

### राजा आणि अंतिक

अंतिक— ( येऊन सांगतो ) माझा मामा येतो आहे

महाराजांपाशीं.

राजा— तूं असा कां? तूं गुंगलेला दिसतोस. तुला काय झोंप येते, मुला?

अंतिक— होय महाराज येते आहे खरी अंमळ.

राजा— तर जा मातक्यानें, आपले बांकावर नीज. मी तुझे सारिखा मुलगा होतों, ते वेळेस मला नीज किती गोड लागत होती, तें मला ठाऊक आहे. जा, स्वथ नीज; मी तुला आज्ञा देतों. ( अंतिक जाऊन बांकावर निजतो. )

---

## प्रवेश ६,

राजा, दलपतराव, आणि अंतिक.

( अंतिक निजला आहे. )

दलपत०— महाराज, आपला सेवक आला आहे.

राजा— आंत या दलपतराव; कां मीं तुह्मांकडे धाकटा बलावणे करी पाठविला होता तो कसा आहे? तो माझे हुजूर चाकरीस उपयोगी आहेना?

दलपत०— ( गाल खाजवितो ) खरें महाराज, तो अंमळ लाहान खरा.

राजा— अथवा घोड्यावर स्वार होऊन माझे कामगिरीस जावयास?

दलपत०— मग तो परत येईल कशास.

राजा०— अथवा मजजवळ येथें रात्रीस चौकी करा-

वयास ?

दलपत०— ( किंचित् हांसून ) होय, जर महाराज जागें असणार नाहींत तर.

राजा— तर पाहाकीं, मीं ह्या मुलास घेऊन काय करावें? कांहीं नाहीं; हें स्पष्ट दिसतें. तर अशा मुलास जें तुह्मीं मजपाशीं आणिलें, तें त्यानें माझी चाकरी करावी, ह्या अर्थावर आणिलें नाहीं; मीं त्याचा भाग्योदय करावा ह्यासाठीं आणिलें मला वाटतें. तुह्मीं सांगितलें कीं, ह्याचे आईच्यानें ह्यास पाळवत नाहीं; ती काय इतकी दरिद्रानें पिडिली आहे? खरेंच सांगा.

दलपत०— (छातीवर हात देऊन) होय महाराज, ह्यांत असत्याचा लेश नाहीं.

राजा— कोणत्या कारणामुळें बरें?

दलपत०— ह्या मागचे लढाईमुळें. ह्या लढाईत कितीएक भाग्यवान झाले; कितीएक धुळीस मिळाले. ह्याचे आईचें काय जें होतें त्यांतलें कांहींच राहिलें नाहीं, लुटून, जाळून, पोळून, फोडून तोडून सर्व गेलें. त्यावर आणखी तिला पंचाइती भांडावयाच्या लागल्या. कांतर लढाईच्या मागून त्या येतातच, जशी दुष्काळामागें जरीमरी. पण इतके गोष्टीनें मात्र ती दैववान आहे कीं तिचीं मुलें सोईस लागलीं आहेत. धाकटा हा, आपला अंतिक आहे; व मोठ्याची गाड्यांत असामी आहे. आतां ती आपले कसेही दिवस काढील.

राजा— महाविपत्तीनें काढील ह्यांत आंत नाहीं.

दलपत०— खरें महाराज (अंमळ उदासीनपणानें) ती एका गांवढ्यांत जाऊन राहिली आहे; तेथें एकटीच असते. मी तिजकडे जात नाहीं. मी तिचा भाऊ, तिची विपत्ति माझ्यानें पाहावत नाहीं.

राजा— तुह्मी तिचे भाऊ प्रत्यक्ष?

दलपत०— होय महाराज, भाऊपणा दैवीं आला आहे खरा.

राजा— (त्यास धिक्कारून) दैवीं आला आहे! आणि तुह्मी तिला भेटावयास जात नाहीं? मी समजलों रावजी. तिची विपत्ति पाहून तुह्मांस लाज वाटेल, आणि कदाचित् तुमचे मनास वाईट वाटलें तर, तुह्मांवर कांहीं खर्च पडेल. (दलपतराव घाबरतात.) तुमचे बहिणीचें नांव काय?

दलपत०— सगुणाबाई शिरकी, महाराज.

राजा— (विचार करितो.) सगुणाबाई शिरकी! रणधीरराव शिरके आपले लश्करचे सरपागे होते नव्हे?

दलपत०— होय महाराज.

राजा— ते पहिले लढाईतच पडले नव्हे?

दलपत०— खरें. ते ह्या मुलाचे बाप महाराज. बहुत सचवटीचे मनुष्य; आणि मोठे शिपाई होते, ते हल्ल्यास गेले तेव्हां जसें कोणी ह्मणेल कीं, मेजवानीस जाताहेत. त्यांस सिंहाची छाती होती.

राजा— मला त्यांचें स्मरण चांगलें आहे; आणि मी इ-

च्छितों कीं—

दलपत०— ( जवळ जातो) महाराज काय इच्छितात?

राजा— त्याचे बायकोशीं बोलावें.

दलपत०— तें आज्ञा झाली तर ह्याक्षणीं करितां येईल. ती प्रस्तुत शहरांत आहे.

राजा— ती येथें आहे? आणवा तिला; लवकर तिला येथें येऊंद्या; मी तिशीं बोलून तिचें मुलगें तिचे स्वाधीन करणार.

दलपत०— महाराज—

राजा— तुह्मी तें मला सांगूं नका; जा लवकर.

दलपत०— आज्ञा, महाराज ( तो बाहेर जातो. )

---

## प्रवेश ७,

### राजा आणि अंतिक.

( अंतिक निजलेला )

राजा— काय! तिची अशी दशा झाली! केवढा अनर्थ हा! ह्या लढाईमुळें किती लोक विपत्तींत पडले असतील! इतकें बरें आहे कीं, मीं होऊन लढाई उद्भविली नाहीं. गत्यंतर नाहीं ह्मणून मला तरवार धरणें प्राप्त झालें. ( तो उठतो आणि इकडून तिकडे फिरून अंतिकाचे बांकाकडे उभा राहातो. ) तोषकर मुलगें! कसें स्वस्थ निजलें आहे! जसें कोणी ह्म-

णेल, निद्रेस समाधि लागली आहे. हा आपले मनांत समजत असेल कीं, मी आपले आमाचे घरीं आहें; मला येथें कोणाची अडचण नाहीं. आहा! केवळ सरळ भाव तो हा! ( पुनःफिरतो ) ह्याची आई! ती जर दलपत रावासारिखी असली तर मला तिचें कांहीं मनास आणावयास कारण नाहीं. पण प्रथम तिचें स्वरूप ओळखावयास मी तिला आधीं कसून पाहीन; आणखी मग मला काय कर्तव्य तें करीन. ( तो बांकाशीं ओणवून मुलाकडे न्याहाळून पाहातो, तों त्याचे खिशांतून किंचित् बाहेर निघालेलें एक पत्र त्याचे दृष्टीस पडतें. ) पण हें काय आहे? तो पत्र घेऊन उघडतो, आणि लिहिणाराचें नांव वाचतो, तों सगुणाबाईची सही पाहून ह्मणतो,) हें ह्याचे आईनें पाठविलें आहे. मी वाचूं हें। कांकीं मी तिचें स्वरुप जाणावयास इच्छितों. ती आपले लेंकराशीं कृत्रिम करणार नाहीं; बरें, पाहूं या. ( तो वाचतो )

" माझे परमप्रिया मुला "

" तुझे सारिखे मुलास एरवीं पत्र लिहिणें अवघड, परंतु त्वां मला पत्र लिहावयास आळस केला नाहीं; आणि तेंही चांगलें लांब लिहिलें आहे. ही तुझी मजविषयीं आस्था पाहून माझे प्रत्ययास आलें कीं, मजवर तुझी भक्ति आहे; ती पाहून मी तुझी उपकारी आहें. तूं मला लिहितोस कीं, तुझे मामानें तुला राजे साहेबां-

कडे प्रविष्ट केलें आहे; ते तुजवर लोभ करितात, ते बहुत थोर, बहुत शांत आहेत, आणि तुझेंही मन त्यांवर फार लोभवतें." ( तो मुलाकडे पाहातो. ) काय, माझे गड्या,! त्वां असें आपले आईस लिहिलें होतें? तर तूं मजवर लोभ करितोस ह्मणून मी तुजवर करितों, ह्यांत कांहीं मी विशेष करीत नाहीं. " माझे मुला, तूं त्यांची कृपा संपादितोस, ही गोष्ट चांगली करितोस, कांकीं त्यांचे साहित्यावांचून तुला ह्या लोकीं अन्यगति नाहीं. तुला बाप नाहीं, आणि जरी आई आहे, तरी त्यासाठीं तुझी उणी कींव करावी असें नाहीं. मीं तुझें संगोपन करावें हें देवानें माझे हातीं ठेविलें नाहीं. तें मला रात्रंदिवस बहुत व्यथा करितें. माझे सर्वां विपत्तीमध्यें ही माझी विपत्ति मोठी आहे. जेव्हां मी आपले एकटीकडे पाहातें, तेव्हां मला फार संकट वाटत नाहीं; पण जेव्हां तूं माझे मनांत येतोस, तेव्हां माझें ऱ्हदय फुटतें आणि आसवें खळत नाहींत." येथें बहुत कोमळपणा आणि चित्ताचा बहुत आर्द्रपणा दिसतो; ही चांगली आई आहे; अशीच जर चांगली बायको असली— पण ती कां नसावी? आहेच ह्यांत मला संशय नाहीं. "माझ्या लाडक्या, काय करूं; माझे इच्छेप्रमाणें तुला मी भाग्यास मिळावयाचे मार्गास लावावयास शकत नाहीं. मी निरुपाय होऊन येथें एकांत वासीं पडलें आहें. पण इतकें करीन कीं, मी तुला ममतेनें आणि माझे मनापासून, वारंवार चांगला उपदेश करावयास चुकणार ना-

हीं; आणि जंव माझे शब्द तुजकडे पोहोंचतील, तंव ते तुला सन्मार्गच दाखवितील. तूं आजपर्यंत माझे मनाप्रमाणें वागलास, तर ह्याची ही खूण, तूं हें माझें पत्र आपले बरोबर नित्य बाळगीत जा, दुसरें मी तुला काय देऊं?" (अंतिकाकडे पाहातो.) हा आईचे आज्ञेंत वागतो हें ह्यावरून सिद्ध होतें.—"तूं मजकडून जाऊं लागलास, ते वेळेस मीं तुला आपल्या आसवांनीं नाहणून जो उपदेश केला होता, त्यास व तुझे स्वधर्मास त्वां चुकावें असा जेव्हां प्रसंग तुजवर पडेल, तेव्हां तूं हें पत्र स्मर; हें उघड; हें वाच; आणि मनांत आण कीं, माझी आई आहे, तिनें माझे आशेवर मात्र जीव धरिला आहे, आणि एकांतवासीं काळ काढीत आहे." तिनें माझे आशेवर मात्र काय? ह्याला दुसरा भाऊ नाहीं? "आणि विचार कर कीं, मी कुमार्गीं गेलों असतां ती दुःखानें प्राण सोडील; मग असें होईल कीं, जें त्द्दय इह लोकींचे सगळे पदार्थांपेक्षां मला अधिक चाहात होतें, त्यास मीं कटारीनें खोंचलें." ती खरें ह्मणते, मूल द्वाड निघालें ह्मणजे आईबापांस असेंच होतें.—ह्यानें विघडावें असें हें स्थळ खरें. असें असतां तिनें ह्यास येथें कां पाठवावें बरें? "तुजविषयीं मला कोणतेही गोष्टीची शंका येऊन, किंवा तुजवर माझा अविश्वास होऊन, मी असें ह्मणतें असें नाहीं. तुझें आचरण पाहून माझी खातरी होते कीं, तुजपासून वांकडी गोष्ट कदापि व्हावयाची नाहीं. पण तुझे भावाचे गुणांनीं मला फार रड-

विलें; मला वाटतें कीं, तूं माझी काकळूत जाणून तसा माझे दुःखास कारण होणार नाहींस." असें आहे काय? ह्याचा वडील भाऊ? गाडदी? त्याविषयीं मला आणखी चांगलें समजून घेतलें पाहिजे. "त्वां सदा माझी मर्यादा ठेविली; तुझें चरित पाहून मला आनंदाश्रु येतात, हें मी तुला खरेंच सांगतें; तर मुला, त्वां असेंच चालावें; भलें व्हावें; मग तुझी आई कशाही दारिद्रांत असो, कशीही दुःखी असो, सर्व विपत्ति विसरेल." ही बायको थोर दिसते; असें नसतें तर, विपत्तींत हिची बुद्धि नीच झाली असती; पण ती उंचावली आहे. ही साध्वी आहे. "तुझे पत्राचे शेवटीं तूं मला लिहितोस कीं, माझे बरोबरीच्या सर्वांस घड्याळें आहेत. ह्यावरून मी जाणलें कीं, तुलाही एक असावें; पण तूं तितकेंच लिहून उगा राहिलास, हा तुझा संकोच पाहून मी आनंद पावलें. मी दैवहीन ह्मणून तुला एक पाठवावयास शकत नाहीं, मी दरिद्री हें तुला सर्व ठाऊक आहे, ह्मणून मला क्षमा कर. कांहीं कामामुळें मला राजधानीस यावयाचें पडतें; माझेजवळ थोडके पैसे आहेत ते वाटखर्चास पाहिजेत; तो खर्च अगत्याचा नंकारितां सुटका नाहीं. पण माझें वचन घे कीं, माझें चालेपर्यंत मी तुझी इच्छा पुरवीन; आणि जर तुला जें व्हावें तें द्यावयास मला सामर्थ्य नसलें तर मी तुला बरी बुद्धि देण्यास कधीं अंतर करणार नाहीं. पुनः त्वां लवकरच माझे दृष्टीस पडावें अशी इच्छा करितें, हे आशीर्वाद." ह्या बा-

यकोनें विपत्तींत असें असूंनये. मी हें पत्र घेऊन आपले बायकोस दाखवितों. पण नाहीं; हें ह्या मुलाचें धन; मी ह्याचें कसें हरण करूं? ( तो पुनः तें पत्र त्याचे आंगरख्याचे खिशांत घालितो. ) काय स्वस्थपणानें हा अझून निजला आहे! ( मुलास हातीं धरितो. ) मुला! ऊठऊठ. ( अंतिक उठतो आणि कांहीं वेळ त्यांकडे पाहातो. ) माझे जिवाची आण; हा मुलगा मनोहर आहे! चल माझे गड्या, आतां ऊठ, दारीं दिवस फार आला, ऊठ.

अंतिक– ( हळूच उठतो. ) होय महाराज.

राजा– तूं अझून निजेंतच आहेस? चल, माझे खोलींत जा; ( तो जातो. ) दिवे मालीव, आणि दार लावून घे– झालें? आतां जेथून घड्याळ आणिलें तेथें जा; इकडून, ह्या वाटेनें, लवकर; नीट जा, आणि तिकडून परत ये. कां आतां पुरता जागा झालासना?

अंतिक– होय, महाराज.

राजा– आतां सांग मला, तुला पत्र लिहितां येतें कीं?

अंतिक– होय महाराज, लिहावयास बसलों असतां लिहितों. मीं दोन लांब लांब पत्रें लिहिलीं आहेत.

राजा– आपले आईस लिहिलीं वाटतें?

अंतिक– ( संतोषानें ) होय महाराज. माझे आईस.

राजा– मी तिची गोष्ट बोलतों, तेव्हां तुझे डोळ्यांत आनंदाची टवटवी दिसते, मुला; ( एकीकडे दरिद्रदशेंत असतांही, काय ह्यांची एकमेकांवर प्रीति! )

पण तुझी आई चांगली आहे रे ?

अंतिक— आहा ! महाराज ! जर तुह्मी तिला ओळखीत असतां !

राजा— मी तिजशीं ओळख करीन; पण ती तुला कशी वाटते तें सांग.

अंतिक— ती अशी भली आहे, आणि अशी माझी माया करिते—

राजा— तर तिचे मुलगेही तिजसारिखे चांगले असावे. मी ऐकतों कीं, तुझा वडील भाऊ चांगला नाहीं. पण तूं—

अंतिक— ( मान हालवितो ) माझा भाऊ हरबाजी ?

राजा— होय, मी ऐकतों कीं तो तुझे आईस फार कष्टी करितो; हें खरें ?

अंतिक— आहा महाराज; मला तें बोलतां येत नाहीं. जर जमातदारांचे कानावर गोष्ट गेली तर, ते मोठे तिखट आहेत.—

राजा— मी तुला वचन देतों, त्याला ह्यांतलें कांहीं समजूं देणार नाहीं. बोल तूं सर्व; काय आहे तें. तुझे भावानें काय केलें ?

अंतिक— त्यानें पुष्कळ वाईट चाळे केले. ते सगळे मला ठाऊक नाहींत; पण माझी आई त्यावर फार रागावली होती, तें मला ठाऊक आहे; त्याची आबरू झांकावी ह्मणून ती फार खरावींत आली. ( तो राजाजवळ जातो आणि हळूच बोलतो. ) ती ह्मणा-

ली कीं, तितक्याकरितां नसतें, तर तो केव्हांच चाकरींतून हांकून दिला असता.

राजा– हांकून दिला असता? कशाकरितां?

अंतिक– आहा, महाराज, माझ्यानें तें सांगवत नाहीं.

राजा– काय मला?

अंतिक– तिनें मला देखील समजूं दिलें नाहीं.

राजा– (हंसतो) तें तिनें नीट केलें. पण त्वां आपणाकरितां कधीं घड्याळाविषयीं आईस लिहिलें होतें?

अंतिक– एकच वेळ.

राजा– तेव्हां ती तुजवर रागें भरली नव्हे?

अंतिक– नाहीं, नाहीं, महाराज, तिनें मला उलटें लिहिलें कीं, मी कसेंही करून माझें सामर्थ्य चालेपर्यंत, तुजकरितां एक विकत घेईन. तिला मी लिहिलें ह्मणून त्याची मला खंती होते आतां; कांकीं तिचें पोट भरावयाची भ्रांत आहे. तिची अवस्था पाहून मी फार दुःखी आहें.

राजा– त्वां दुःखी असावेंच. चांगले लेंकानें आईवर खर्च घालूं नये. त्यानें तिला साहित्य करावें; हा त्याचा स्वधर्म होय. घड्याळाचीच गोष्ट आहे तर तुला तें कोणीही देईल. (तो पैशांची पिशवी बाहेर काढितो.) धर, घे, ह्या बारा मोहरा; ह्या मीं तुला इनाम केल्या, तुझा हात कर पुढें.

अंतिक– (हात पुढें करितो, राजा त्याजवर मोहरा मोजून घालितो.) महाराज, ह्या काय मला?

राजा— होय तुलाच, पण खरें सांग, तूं ह्यांचें काय करशील ?

अंतिक— इतक्यांचें घड्याळ येईल नव्हे ?

राजा— येईल पण चांगलें. पण तुला घड्याळाचें अगत्यच नाहीं; येथें तीं पुष्कळ आहेत. (अंतिक आशाभरित त्याकडे पाहातो.) मी तुझे जागीं असतों तर ह्या पैशांचा मी कांहीं चांगला उपयोग करितों. असो, तुझे मर्जीस येईल तें तूं कर. मी जातों नित्यकृत्यास. पण परत येईंतों तूं येथेंच ऐस. (राजा चालूं लागतो.)

अंतिक— (त्यास हाक मारितो.) महाराज!

राजा— कां ? तुला काय पाहिजे ?

अंतिक— माझी आई शहरांत आली असावी. ती आज सकाळीं येणार होती. मी तिला भेटून येऊं ? (फुसलावितो) महाराज मला रजा देतील ?

राजा— नाहीं मुला, कांहीं प्रयोजन नाहीं; तुझी आई तुजकडे येईल; तुला ती येथेंच भेटेल; अंमळ धीर धर (तो जातो.)

---

## प्रवेश ८.

### अंतिक.

ती येथें येईल? ती मला येथेंच भेटेल? ह्याचें कारण काय बरें असेल ? असो काय असेल तें; मला भेटीशीं

कारण. एक, दोन, तीन, चार, ( मोहरा मोजतो. ) बारा मोहरा! घड्याळ घ्यावयास! काय मी दैववान्! मला वाटतें कीं, तें ह्यावेळेस माझे हातांत आहे; टुण टुण वाजतें तें मला ऐकूं येतें; मी त्यास किल्ली फिरवितों आहें; पण राजानें सांगितलें कीं, मी तुझे जागीं असतों तर ह्या पैशांचा कांहीं चांगला उपयोग करितों, ह्याचा काय बरें अर्थ असेल? तो काय करता? होय! त्याकडे घड्याळांची वाण नाहीं, ह्मणून त्याला त्याची नवाई वाटत नाहीं. बरें, पण त्यानें मला आणखीही सांगितलें कीं, चांगले लेंकानें आईस साहित्य करावें. निभ्रांत, त्यानें हें आमचे प्रकरणींच ह्मटलें. इतक्या मोहरा माझे आईकडे असल्या तर, तिला फार उपयोगीं पडतील न्हवे? ( तो दोहों हातांत चेपून मोहरा उराशीं नेतो. ) घड्याळ घेऊं कीं आईस देऊं? नाहीं, घड्याळच घ्यावें; तर आईकडेही पाहावें! आणि अशा ममताळू आईकडे तर, अगत्यानें! तिनें काल पत्र पाठविलें त्यांत ती लिहिते कीं, मोठे विपत्तींत आहें. तिला हे पैसे दिले असतां काय आनंद होईल! एकदाच तिचें संकट दूर होईल! तर काय मी हे तिजकरितां आपणास नाहींसे करूं? ( निश्चय करितो.) होय, त्वां करावेच. पण ती आतां लवकर आली तर बरें; नाहीं तर माझी बुद्धि एकादी फिरेल. मला घड्याळाचाही घ्यास आहे! चुप् चुप्, कोणी येतें आहे.

## प्रवेश ९,

### सगुणाबाई, दलपतराव, आणि अंतिक.

अंतिक— ( आईस भेटावयास धांवतो. ) काय! तूं माझे बये!

सगु०— ( मुलाकडे लक्ष न देतां संभ्रांत आसपास पाहाते. ) मला समजत नाहीं; पण मी मोठी चिंतेंत आहें, भाऊ. राजेसाहेबांनीं मला कां बोलाविलें असेल बरें?

दलपत०— हा मुलगा पाहा; ह्यास ते तुझे स्वाधीन करणार. ( ती साश्चर्य सचिंत मुलाकडे पाहाते, तो आनंदानें तिच्या गळ्यास झोंबतो. ) पाहिल्या अर्थी ह्याला येथें आणणें हा वेडेपणा; राजांनीं ह्यास काय करावें? दुसरीं मुलें वाढतील आणि रोजगारास चढतील; पण हें ( अनादरानें ) असें खुजट पोर आहे कीं, कोणतेही उपयोगीं पडावें नलगे. हा तुझें दुःखाचें दूध प्याला आहे, ह्मणून असा झाला मला वाटतें. हें झाड मुळासच रोगटलें; ह्याला शक्ति यावी नलगे, हा वाढावा नलगे.

सगु०— ( खेद पावून ) आहा, भाऊ! दैव माझें!

दलप०— तर, राजेसाहेबांकडे तूं ह्या विषयीं प्रार्थना करूं नकोहो; करून फळ नाहीं. वडिलाकरितां ह्यावें तर कांहीं बोल, तो कांहीं तरी मनुष्यसा दिसतो.

सगु०— वडिलाविषयीं ?

दलप०— होय, त्यालाही बलावूं पाठविलें आहे.

सगु०— भाऊ, तूं मला भय घालितोस. त्याचे गुण राजेसाहेबांस समजले ?

दलप०— ( अनास्थेनें ) असतील, कां नसमजावे ? ( नाक मुरडतो, आणि उदासीनपणा दाखवितो. ) त्यानें लोकांची उचापत फार काढिली आहे; आणि त्यास कांहीं दिवशीं लश्करांतून पळून जावें लागेल, किंवा बंदीखान्यांत बसावें लागेल. हें राजास समजलें तर कसें होईल ? आणि हें सगळें येणार मजवर— ( तापून. ) तूं पाहा कीं, माझी भलाईच मला नडते आहे; आणि मला वाटतें कीं, त्याकरितां मला पाहाऱ्यांत जावयाचें पडेल. मी तुझे पोरांचे खटल्यांत पडलों नसतों तर बरें होतें. असो, पण अतःपर पडणार नाहीं. ( तो चडफडत चडफडत पुढें जातो मागें येतो. ) नाहीं, माझे कुडींत प्राण आहेपर्यंत मी अतःपर तुझे पोरांचें नांव घेणार नाहीं.

( तो जातो. )

---

## प्रवेश १०,

## सगुणाबाई आणि अंतिक.

अंतिक— ( तिला चिंतेंत पाहून ) मामाचा सदा तापट स्वभाव, बोलूंदे त्याला बये; तूं कांहीं चिंता करूंनको.

सगु०— तूं उगीच ऐस मुला; तुला समजत नाहीं.

अंतिक— ओहो! मला मामापेक्षां अधिक समजतें. तो ह्मणतो तसे राजेसाहेब नाहींत; ते कोणास उपद्रव करावयाचे नाहींत. ह्याचा दाखला हा पाहा; पाहा लागलाच. ( हातांतल्या बारा मोहरा दाखवितो. ) पाहा ह्या सगळ्या त्यांनीं मला दिल्या.

सगु०— ( आश्चर्य पावून, ) राजेसाहेबांनीं? असें कसें होईल?

अंतिक— त्यांनीं एका मोठ्या पिशवींतून काढिल्या. ती सगळी मोहरांनीं भरली होती; आणि तूं यावयाचे अगोदर नुकत्याच मला दिल्या. आई,जर त्यांची इच्छा झाली, जर त्यांची कृपादृष्टि झाली, तर मग काय! ते मातबर आहेत; आपणांस अमर करून सोडतील.

सगु०— पण हें कसें झालें? मला समजत नाहीं. त्यांनीं कांहीं योजून दिल्या असतील.

अंतिक— ह्यांत भ्रांत काय? त्यांचें घड्याळ बंद झालें होतें; ते काल सगळा दिवस शिकारीस गेले होते; ते त्यास किल्ली द्यावयास विसरले, आणि आज प्रातःकाळीं ( तो खोलीकडे जातो आणि दार उघडितो. ) ती बघे, ती जागा. राजेसाहेबांची निजावयाची; त्यांनीं मला तेथें बोलाविलें, आणि ह्मटलें, "मुला, तुझे घड्याळांत किती रात्र राहिली आहे तें पाहा," माझे जवळ घड्याळ नव्हतें.—

सगु०— ह्मणून त्यांनीं तुला हे पैसे दिले?

अंतिक— होय, त्यांनीं घड्याळ विकत घ्यावयास दिले. (फिरून मोहरा दाखवितो.) ह्या बग बारा मोहरा.

सगु०— मजकडे पाहातोस काय? मी तुझें खरें मानणार नाहीं.

अंतिक— कां? पण मला घड्याळाची उतावीळ नाहीं; तें मीं कधींही घेतलें तरी कामास येईल. (आईचा हात घेतो.) तूं घे ह्या बये, आपले जवळ ठेव.

सगु०— (हुंदका येऊन) काय? माझ्या जिवा, असें आहे!

अंतिक— बये, तूं सदा रडतेस, तें मला वाईट वाटतें. आहा! मजपाशीं पुष्कळ पैसे असते तर बरें होतें! मग मी तुला कधीं रडूं देतोंना. सगळे, होय, दमडीनदमडी मी तुझे स्वाधीन करितों.

सगु०— (त्यावर झेंपते.) काय तूं तसें करितास? खरेंच?

अंतिक— तुला संतोषांत पाहून मला फार आनंद होतो.

सगु०— (त्याचा मुका घेते.) तुझी वासना पाहून, मुला, मी सुखी झालें. राजेसाहेबांनीं आपली सगळी दौलत जरी मला दिली, तरी ह्यावेळचे आनंदाचें मोल होणार नाहीं.— मुला, तुला अनुभव नाहीं; मजसारिखी हीनभाग्याची आई आहे तिला, मुलाची आपले विषयीं करुणा पाहून, किती समाधान होतें तें!

अंतिक– ( तो तिचा हात फिरून धरितो. ) तूं हे पैसे घे, पण मी तुला विनंती करितों कीं, नाहीं ह्मणूं नको.–

सगु०– होय मुला, मी घेतें. आणि तूं येथें असतां तुला गरज आहे, ह्मणून मी तुला ह्यांचें–

अंतिक– मला काय तूं ह्यांचें घड्याळ घेणार?

सगु०– तूं राजेसाहेबांपाशीं आहेस; तुजजवळ एक असावें.

अंतिक– मला त्याची कांहीं गरज नाहीं. राजेसाहेबांचे दर खोलींत घड्याळें आहेत. त्यांनीं मला स्वतां सांगितलें कीं, घड्याळावांचून तुझें कांहीं अडणार नाहीं.

सगु०– पण त्यांनीं तुला घड्याळाकरितां पैसे दिले नव्हते?

अंतिक– असें ते बोलले, इतकेंच.

सगु०– तर मला दिसतें, तूं मला ठकवितोस; तूं माझे ममतेमुळें एकादी लबाडी करीत असशील.

अंतिक– लबाडी! तर तुला माझें खरें वाटत नाहीं? ह्यावेळेस येथें राजेसाहेब असते, तर तुला समजलें असतें. आहा! ते लवकर येतील तर बरें. ( मागें फिरून पाहातो. ) हे, तेच स्वतां आले. आतां पाहा बरें. –

## प्रवेश ११.

## राजा, सगुणाबाई, आणि अंतिक.

अंतिक– ( राजाचे समोर जातो. ) बरें, हें खरें कीं नाहीं, महाराज ? तुह्मीं मला बारा मोहरा दिल्या ? पहिल्यानें घड्याळ घ्यावयास ?

राजा– होय, माझे लहाने माणसा.

अंतिक– आणि मग तुला घड्याळावांचून अडचण नाहीं, हेंही तुह्मीं नाहीं सांगितलें ?

राजा– तेंही खरेंच.

अंतिक– ( लागलाच आईकडेफिरून. ) पाहा बये, आतां कसें ?

सगु॰– ( घाबरी होऊन ) महाराज, हें मुलगें अज्ञान; सरळभावानें बोलतें; मर्यादा कशी ठेवावी तें ह्यास समजत नाहीं, ह्याची क्षमा असावी.

राजा– क्षमा ! बाई, मला सरळपणा फार आवडतो; असा सर्वांस असता तर काय नव्हतें. वास्तविक असेच सर्व असावे. मुला, मला वाटतें तुझे आईस तुझें खरें वाटलें नाहीं !

अंतिक– ( अंमळ सचिंत ) नाहीं, महाराज, पहिल्यानें तिला खरें वाटलें नाहीं; मी तिला मोहरा देत असतां ती घेईना.

राजा– ती घेईना, हें त्वां काय ह्मटलें ? तर काय तुझे दृष्टीस माझें बक्षीस हलकें दिसलें, ह्मणून तूं दुसऱ्या-

स देऊं लागलास? असें होणार नाहीं.

अंतिक– ( काचावतो. ) महाराज.–

राजा– मला जर असें आधीं समजतें तर मी तुला देतोंना. खरेंच सांग, त्वां तसें केलें काय?

अंतिक– ( आईकडे बोट करितो. ) आहा, महाराज; माझी आई फार गरीब आहे!

राजा– ( त्याची हनुवटी धरितो. ) भले बाळा! तर त्वां आपले गरीब आईची कींव जाणून घड्याळाची आशा सोडिली? तिला साहित्य करून घड्याळ गमावणें, हें तुला फार अवघड पडलें असेल नव्हे? ( तो अपलें घड्याळ बाहेर काढितो. ) हें घे; ह्यावेळेस हें एकच जरी मजकडे असतें, तरी मीं तुला दिलें असतें.

अंतिक– ( आनंदानें घेतो. ) आहा! महाराज! पण हें चालतें आहेना?

राजा– भिऊंनको, चांगलें चालतें. ( अंतिक आईकडे धांवतो तें दाखवावयास. ) शाबास मुला, मी तुला दिलें होतें त्याचें त्वां चांगलें सार्थक्य केलें. ( त्यास मोहरांची पिशवी देतो. ) ही घे, हींत शंभर मोहरा आहेत; ह्या मीं तुला बक्षीस केल्या.

अंतिक– ( त्यांकडे साश्चर्य पाहातो. ) महाराज, हें काय!

राजा– तूं अनमान करितोस? घे ह्या.

अंतिक– काय, सगळी पिशवी! ( परत द्यावयास क-

रितो. ) महाराज, हें फार आहे.

राजा– होय, तुला फार खरेंच. पण मी ह्यासाठीं देतों कीं, त्वां ह्यांचा चांगला उपयोग करावा. बरें ह्याचा बहुत उपयोग कोणास आहे ?

अंतिक– बहुत उपयोग कोणास आहे ? ( तो राजाकडे आणि आईकडे पाळींपाळीनें पाहातो. ) ह्या घे आई, तुला.

सगु०– ( राजापुढें येते. ) महाराजांचा मजवर फार–

राजा– उपकार मानावयाचें कांहीं कारण नाहीं, हें मीं थोडें दिलें, मला वाटतें कीं, इतक्यांत तुमचें संकट दूर होणार नाहीं. पण, बाई ( मुलाकडे हात करितो. ) हा मुलगा माझे चाकरीस फार लहान आहे, माझे उपयोगीं नाहीं, ह्मणून मी ह्यास परत करितों, ह्याचें तुह्मांला वाईट वाटूंनये. कां, तुह्मी बोलत नाहीं ?

सगु०– महाराजांनीं क्षमा करावी.–

राजा– काय ?

सगु०– माझें दरिद्र पाहून मला लज्जा होते; ह्याला मी परत नेऊन काय करूं ? मला ह्याचें पोषण कसें होईल ? मी ह्यावर आशा फार धरिली होती. आतां मी पुनः भवजालांत पडलें. मी आतां प्राणधारण कसें करीन ? ( रडें आटोपते. ) हा फार लाहान; ह्यास बाप नाहीं; पुढें ह्याचा परिणाम कसा होईल ? महाराज, मी अल्पबुद्धि; बोललें ह्याची क्षमा असावी.

अंतिक– ( रंजीस होऊन राजाचा हात धरितो. ) महाराज, बयें रडते.

राजा– तूं आपले आईपाशीं राहातोसना ?

अंतिक– ( आर्जवानें. ) महाराज, तर आपण मला घरीं लावून देतां ?

राजा– तूं जावयास राजी नाहींस ? बरें तर, बाई, असूंद्या ह्याला मजकडे. पण येथें राहून ह्याचें कसें होईल ? हा कदाचित् बिघडेल; असो; पण ह्याचें मला भय वाटत नाहीं.

सगु०– हा बिघडेल ! ( मुलाकडे डोळे लाविते. ) हा बिघढेल, आपण ह्मणतां महाराज !

राजा– नाहीं ? हा बिघडणार नाहीं ?

सगु०– ( सभय ) महाराज, मी आपला अभिप्राय चांगला समजलें नाहीं, ह्मणून माझे निर्भीडतेची क्षमा असावी.

राजा– माझा अभिप्राय असा कीं, माझे दुसरे अंतिक आहेत, त्यांचे गुण चांगले नाहींत; हा त्यांचे सोबतीनें बिघडूं शके. पण अनुभवून पाहूंया–

सगु०– ( मुलाचा हात धरिते. ) नाहीं महाराज; हा तसा नाहीं.

राजा– पण पाहा; ह्याचा दूरवर विचार करा–

सगु– त्याविषयीं मला भ्रांतच नाहीं. ह्याला कोठें ही असूंद्या.

राजा– पण विद्याभ्यासावांचून ह्याचें कसें होईल ?

सगु०— भगवान् काय करील तें खरें, त्याला शरण आहें. जर हा परिश्रम करून उदयास येणार नाहीं, तर मजूरी करील, दरिद्र भोगील, पण ह्यानें दुराचरणी मात्र होऊंनये, इतकी माझी इच्छा आहे.

राजा— बाई, तुमचा थोरपणा पाहून मला संतोष झाला. तुह्मांस सर्व गोष्टींचें साहित्य करावें, हें मला योग्य आहे. ( मोठे आवडीनें ) तुमची काय इच्छा आहे? कोणत्या गोष्टीनें मी तुमचें प्रिय करीन? मोकळें मन करून बोला. मी तुमचा मित्र आहें, शंकूं नका.

सगु०— ( सद्गदित होऊन. ) मी तुमची कशी उतराई होईन?

राजा— तुमची अवस्था काय आहे? तुमची मालमत्ता काय आहे तें मला सर्व सांगा.

सगु०— माझी मालमत्ता जी आहे ती आतां माझी नव्हे.

राजा— तर मला वाटतें तुह्मांवर फार कर्ज आहे. सरकारांत तुमची कांहीं पंचाईत चालली आहे, असें मी ऐकतों; त्याचें कसें काय आहे?

सगु०— महाराज, एक कज्जा माझे इनाम गांवाचा आहे, तो केव्हांच चुकावा, पण मजकडे पैका नाहीं; मला कोणाचा आश्रय नाहीं; तो घरांत समजावा ह्मणून मी आलें होतें, पण तसें होत नाहीं.

राजा— बरें तर तें कांहीं वाईट झालें नाहीं, तुमचा इनसाफ आतां वाजवी होईल; माझें वचन घ्या. आणखी मी तुह्मांस एक हजार रुपयांचें स्वास्थ्य करून

देतों. मला वाटतें कीं, मग तुमच्या सर्व अडचणी दूर होतील.

सगु०– ( लोटांगण घालिते. ) मज हतभाग्येवर इतकी कृपा !

राजा– ( तिला उठवितो. ) काय तुह्मी करितां हें बाई; मी तुह्मांस प्रार्थितों कीं उठा. तुमचे भ्रतारानें जी सरकारचाकरी बाजविली होती ती पाहिली असतां मी हें करितों हें फार थोडें आहे. सांगा मला आतां, तुह्मी मुलास परत न्याल कीं नाहीं ?

सगु०– महाराज, हे उपकार जन्मोजन्मीं विसरणार नाहीं.

राजा– आणि मुला, तूं आतां आईपाशीं जाशील कीं नाहीं ?

अंतिक– (घड्याळाशीं खेळतो.) आईपाशीं ? होय महाराज.

राजा– तूं मजकडे राहात नाहींस तर ?

अंतिक– बरें तर, जशी महाराजांची मर्जी.

राजा– तर; जर मीं आतां तुला आईकडे लाविलें, तर तूं मजपाशीं नाहींसा होशील नव्हे ? आणि तुझी तर इच्छा आहे कीं, मजपाशीं असावें; आणि तुझे आईचीही तशीच इच्छा आहे. असो, मला कांहीं दुसरा प्रकार केला पाहिजे. बाई, तुह्मी येथें असा, मी हाच आलों.

## प्रवेश १२

### सगुणाबाई आणि अंतिक

सगु०– ( बांकावर बसते. ) आहा! काय सुदीन हा! काय अकल्पित सुख हें!

अंतिक– कां आई? कां? तूं आतां खुशालशीसना?

सगु०– (त्यास जवळ घेते.) अगा माझे जिवलगा, माझे परमप्रिया मुला!

अंतिक– पण तुला फार हर्ष झाला असें मला दिसत नाहीं. तुला फार आनंद व्हावा असें मी इच्छितों.

सगु०– बाळा, मला आतां मोठी लज्जा होते, कांकीं, मी भगवंतास शब्द लावीत होतें. तूं झालास तसेंच तुझे बापाचें वर्तमान आलें; तेव्हां मी तुला कंटाळलें, आणि तूं कशास जन्मलास ह्मणून तुला शब्द ठेविला; ( ती त्याला आलिंगिते आणि त्याचा मुका घेते. ) आणि त्याच तुझे हातून मी आज सर्व संकटांतून मोकळी झालें! त्वां आज माझीं आसवें आटिलीं! हे भगवान्, आतां मी आणखी कसची वांच्छा करूं? मी परिपूर्ण झालें. मला कांहीं अपेक्षा राहिली नाहीं. पण एक तेवढें तुझे भावाचें सुखमात्र मला उणें आहे, मग माझें सर्व नीट झालें.

अंतिक– माझे भावाचें, कां? त्याचें काय आहे?

सगु०– जर राजेसाहेबांस त्याचे गुण समजले तर–

अंतिक– त्यांना समजले तरी त्याचें काय होणार आ-

हे? त्वां पाहिलें नाहीं; ते काय कृपाळू, काय थोर आहेत ते!

सगु०— खरें, पण आपणावर, कांकीं आपण त्यांचा कांहीं अपराध केला नाहीं.

अंतिक— पण त्यांनीं मला वचन दिलें आहे कीं, मी कोणापाशीं सांगणार नाहीं.

सगु०— (भ्याली) काय! त्यांनीं तुला वचन दिलें आहे! कसचें?

अंतिक— होय खरेंच, ह्मणून तूं भिऊं नको.

सगु०— मी थरकतें, त्वां त्यांस सांगितलें तर?

अंतिक— नाहीं; सांगितलें ह्मणशील तर कांहीं सांगितलें; मला ठाऊक होतें तितकें मात्र सांगितलें. मग त्यांनीं मला त्याचें आचरण पुसलें; तें मी काय उगीच खोटें सांगूं? तुला ठाऊक आहे कीं, त्वां मला खोटें सांगावयाची मनाई केली आहे.

सगु०— पण, मुला हें काय केलें!

अंतिक— कां बये, तूं चिंता कां करितेस?

सगु०— अरे, चिंता कां करितेस, ह्मणून आणखी पुसतोस! जर राजांनीं आणखी चौकशी केली, आणि जर त्यांस तें समजलें, तर मग तुझे आईची आणि तुझे भावाची धडगत नाहीं.

अंतिक— (तो रडूं लागतो.) धडगत नाहीं!

सगु०— चुप् कोणी येतें आहे. (ती त्याचें चुंबन करि-

ते आणि त्यास अवसान देते.) एक शब्द बोलूं-नको, डोळे पूस. तुला रडतां पाहिलें तर एकादा घात होईल, चिंता करूं नको.

---

## प्रवेश १३,

## सगुणाबाई, अंतिक, राजा, दलपतराव, आणि हरबाजीराव.

राजा— याराव, आंत यावें. (हरबाजीरावास.) रणधीररावांचे पुत्र हरबाजी नाईक गाडदी ते आपणच काय?

हर०— (फार लवून.) होय, महाराज.

राजा— योग्य, तुमचे तीर्थरूप बहुत सज्जन, आणि मोठे शूर होते. माझी खातरी आहे कीं, तुह्मीं ही त्यांची चाल धरिली असेल. आणि जेणेंकरून तुह्मी त्यांचे पुत्र साजां असें करीत असाल.

हर०— महाराज, तसें म्यां करावें, हें मला योग्य आहे.

राजा— खरेंच, तुह्मी योग्य आहां त्यापक्षीं योग्य असेल तेंच कराल. ही पाहा तुमची आई, हिचे गुण आणि ह्या मुलाचें शुभलक्षण पाहून तुमचें कुटुंबच थोर आहे, असें माझे बुद्धीस आलें, आणि मला वाटलें कीं, तुह्मा सर्वांस एके ठिकाणीं पाहावें; ह्मणून येथें पाचारून आणिलें आहे.

हर–० ( आणखी लवतो अंमळ डौलानें ) महाराजांनीं ही आज मला मोठी आबरू दिली !

राजा– तुह्मांस योग्य आहे, त्यापेक्षां मीं कांहीं अधिक केलें नाहीं.

हर०– महाराज मला आपलें कृपापात्र करितात.

राजा– खरेंच, तुह्मांस भाग्यास चढवावें, अशी माझी फार इच्छा आहे; परंतु तुमचें स्वरूप माझे बुद्धीस आलें आहे, तसेंच वास्तविक आहे, अशी माझी खातरी झाली पाहिजे; कांकीं, तुमजे निस्पृहपणाचे बोलण्याचा, व तुमचे प्रौढीचा डौल पाहून.–

हर०– आहा ! महाराज, धन्य मी !

राजा– ह्यावरून मला वाटतें कीं, एक तर तुह्मी बहुत थोर असाल, किंवा बहुत वाईट मनुष्य असाल; पण अशा आईबापांच्या पोटीं आणीकसा पुत्र होणार नाहीं; नाहींच, बरें तर ह्यासमयीं मीं तुमची काय सेवा करावी; तुह्मांस एक पायरीवर चढविलें तर त्यानें तुमची योग्यता फार वाढेल असें कांहीं दिसत नाहीं. बरें तुह्मांस कसें वाटतें ?

हर०– ( अंमळ विचार करून. ) खरें, महाराज.

राजा– बरें एक पायरी टाकून दुसरे पायरीस चढविलें असतां तुह्मी जमातदार मात्र व्हाल; शंभर मनुष्यांवर सर ! त्यांतही कांहीं विशेष नाहीं. पण प्रथम, (. दलपतरावांकडे फिरतो. ) राव, तुमचे भाच्याचे योग्यतेविषयीं तुमचें काय मत आहे ?

दलप०– ( अंमळ गोंधळून. ) माझें महाराज ? माझें मत ?

राजा– ह्या भाषणावरून विपरीत असावेंसा भास होतो.

दलप०– नाहीं महाराज, फार सुपरीत आहे; मला वाटतें कीं, हा हिंमती आहे; आणि पुढें शूर निपजेल.

राजा– ( हरवाजीस तोषितासारिखा पाहातो. ) काय हो ? हें खरें ?

दलप०– आणखी हा स्वरूपानेंही फांकडा दिसतो.

राजा– होय, हा चांगला जवान आहे हें मला प्रत्यक्ष दिसतें. पण ह्याचें आचरण, ह्याची रीति कशी ? तुह्मांला असल्या हलक्या गोष्टी विचारावयास मला लाज वाटते, पण मुख्यत्वें करून हा कोणते प्रकारचा मनुष्य आहे तें मला समजलें पाहिजे.

दलप०– ( हंसून. ) अंमळसा रंगिला; कोणे समयीं अंमळसा धट्टही. पण महाराज, हीं शिपायास दूषणें नव्हत.

राजा– खरेंच ? मला हें आजपर्यंत समजलें नव्हतें. आतां, बाई, मला तुमची साक्ष मात्र पाहिजे. तुह्मी ह्याविषयीं काय ह्मणतां ?– ( अंमळ विसांवून ) कांहीं नाहीं मला वाटतें.

सगु०– मीं त्याविषयीं काय सांगावें, महाराज ?

राजा– काय तुह्मांस दिसत असेल तें, खरेंच सांगा.

सगु०— पण महाराज, मला तें सांगवेल? जर मला त्याची प्रशंसा कर्तव्य असली, आणि ती मीं त्याचे समक्ष केली, तर महाराजांस मानेल? अथवा जे त्याचे आचरणाप्रमाणें त्यास फळ तत्काळ देऊं शकतात, अशांजवळ मला त्याची वांकडी गोष्ट बोलवेल?

राजा— ( हंसून ) बाई, तुह्मी मोठ्या सुज्ञ आहां. ह्या उत्तरांत तुह्मीं आईचा कनवाळूपणा राखून, बायकोचा प्रौढपणा दाखविला, तुमची प्रशंसा मी कशी नकरूं? ( हरबाजीस अंमळ गंभीरवाणीनें ) रावजी, एकएकाची चाल निरनिराळी असते; तशी माझी ही आहे. कोणास वाढवावें असें माझे मनांत आलें, ह्मणजे मी पहिल्यानें त्यास पाहाऱ्यांत देत असतों, हें तुह्मांस कसें दिसतें बरें?

हर०—( भिऊन आणि घाबरून. ) महाराज! हँ हँ हँ—

राजा— होय, माझी चाल अशीच आहे. तुझी तरवार दलपतरावांचे स्वाधीन कर, तुझे ठायीं मला अंमळ संकोच आढळला असता तर इतकें होतेंना. पण अहंकार! हा बोलण्यांत धीटपणा! आपण दुर्गुणी आहों, हें आपले मनांत समजून ही जो अशीं भरंवशाचीं बोलणीं बोलतो, त्या मनुष्यापासून कसची आशा धरावी? त्या मनुष्यानें मला राग आणिला असें कोणास वाटेल? त्या मनुष्यानें आंपले महा थोर आईस ह्याप्रमाणें गांजलें असें कोणी मानील? इतकें करून ही पुनः— ( रागानें ) घालाहो ह्याला

एक महिना बंदीखान्यांत. बाई, खरेंच सांगतों, तुह्मांकरितां मीं ह्याचें कांहीं अधिक मनास आणिलें नाहीं. एरवीं ज्या गोष्टी माझे कांनीं आल्या आहेत, त्यांवरून मला दिसून येतें कीं, हा महान अपराधी आहे. ( रोषयुक्त आणि तीव्र वाणीनें. ) दलपतराव, ह्या उपर ह्याचें कांहीं वांकडें आचरण आढळलें असतां, मला तत्काळ कळवा — समजलां? त्याक्षणीं. मी पुढें ह्यास योग्यतेस चढविणार आहें, ह्मणून ( दलपतरावांकडे पाहून. ) दलपतराव, तुह्मीं अथवा ( नम्रवाणीनें ) बाई, तुह्मीं मजकडे ह्यासमयीं ह्याची रदबदली करूंनये. ह्याला कोणतेही मिषानें कांहीं देऊंनये. ह्याला हवा असला तर ह्यानें आपले रोजमुऱ्यांत खर्च चालवावा. ( मोटानें सूचना करितो. ) आतां जावें राव आपले बंदीशाळेंत. ( दलपतराव आणि हरबाजी जातात. )

---

## प्रवेश १४,

### राजा, सगुणाबाई, आणि अंतिक.

राजा— कां बाई, तुह्मी कष्टीश्या दिसतां?

सगु०— महाराज ! मी आई आहे.

राजा— पण तुह्मी इतर अज्ञान आयांसारखी आई नव्हां, ज्या मुलाला अंमळ दुःख होईल ह्मणून त्यास शिक्षा करीत नाहींत.

सगु०— अशी ममता करितात ती खोटी ममता. पण मला चिंता इतकीच कीं, तो आतां जन्मवर महाराजांचे कृपेंतून गेला असें नव्हावें.

राजा— त्याविषयीं तुह्मी काळजी करूनका; माझे मनांत इतकेंच कीं, मी त्यावर जे पुढें उपकार करणार त्यांस त्यानें योग्य व्हावें, आणि त्याचे वयाकडेही कांहीं पाहिलें पाहिजे; ह्मणून मी त्यास झालेले अपराध क्षमा करीन. पण असें सदा करणार नाहीं. पाहूंया, कसें होतें तें. एकाद्यास पश्चात्ताप होऊन तो ठिकाणीं येतो, एकादा उलटा अधिक बिघडतो. पण कसेंही होवो, तुह्मीं स्वस्थ असावें. मला वाटतें आतां तुमचा मुलगा मार्गावर येईल, आणि तो जसजसा सुधारेल तसतसी मी त्याजवर कृपा करीन. ( अंतिकाकडे वळून. ) ह्या मुलाविषयीं तुह्मी जाणतां मीं काय योजिलें आहे तें ?

सगु०— तें जें कांहीं असेल तें त्याचे कल्याणार्थच असेल. महाराज, आपला थोरपणा ऐकून, आपलें कल्याण चिंतन केल्यावांचून माझा एक दिवसही रिकामा गेला नाहीं. पण आपले गुण आज प्रत्यक्ष पाहून मला वाटलें कीं, मीं आपलें स्वरूप कांहींच ओळखिलें नाहीं.

राजा— तुह्मांस ठाऊक आहे ? मी इच्छितों कीं, ह्याला माझे राज्याचा स्तंभ, माझा विश्वासू सेवक, आणि मुलांचा मित्र करून ठेवावें, कीं जो एकादे दिवशीं

प्रसंग पडला असतां, आपले बापाप्रमाणें राज्याचे कल्याणार्थ प्राण खर्च करील.

---

प्रवेश १५,

राजा, सगुणाबाई, अंतिक आणि खिजमतगार.

खिज०– महाराज, विनंती आहे, बाहेर राजशालागुरु आले आहेत.

राजा– त्यांस आंत येऊंदे. बाई, माझे मनांत आहे तें मी आतां तुमचे समक्ष करितों, तुह्मांला तें रुचावें मात्र.

---

प्रवेश १६,

राजा, सगुणाबाई, अंतिक, आणि राजशालागुरु.

गुरु– ( नमतो ) महाराजांची आज्ञा ऐकावयास सिद्ध आहें.

राजा– बहुत संतोष झाला. बलाविलें होतें इतक्याकरितां कीं, राजशाळेंत थोरांचीं मुलें तुह्मांस काय देत असतात?

गुरु– थोरांचीं मुलें महाराज? तें आईबापांचे थोरपणावर आहे.

राजा– असो, पण तुह्मी काय घ्याल तें सांगा.

गुरु– साहाशें रुपये वर्षास. महाराजांची आज्ञा झाल्यास.

राजा– बरें तर, हा मुलगा तुमचे स्वाधीन करावयास

मी इच्छितों. ह्यास बाप नाहीं, म्हणून मी ह्यास बापाचे जागीं झालों आहे, त्या अर्थी ह्यास जें पाहिजे तें सर्व मी पुरवीन. पण प्रथम मला सांगा कीं, मुलांचे चौकशीवर कोण असतो, कांकीं तें मुख्यत्वें पाहिलें पाहिजे.

गुरु– वेगवेगळाले उपगुरु आहेत.

राजा– ते, मला वाटतें कीं, आपआपले कामास योग्यच असतील; पण मी त्यांस ओळखीत नाहीं. माझा सर्व भरंवसा तुह्मांवर आहे. तुह्मी माझे खातरीस उतरलां आहां, ह्मणून कृपा करून तुह्मी स्वतां ह्या मुलाचें सर्व पाहावें.

गुरु– जशी आज्ञा.

राजा– मी आज्ञा ह्मणून नाहीं सांगत; तुह्मीं संतोषानें हें कबूल करावें.

गुरु– महाराजांचा ज्यांत संतोष तें म्यां करावें, ह्यांतच माझें कल्याण.

राजा– मी तुमचा उपकारी होईन. ( अंतिकास हातीं धरून, ) माझे मुला ये, हे गुरु पाहिलेना? हे बहुत शांत आणि सज्जन आहेत; तूं ह्यांच्या संगातीं जाऊन ह्यांकडे राहा, आणि चांगला विद्याभ्यास कर.

अंतिक– ( पळभर गुरूचे तोंडाकडे पाहून, ) होय, महाराज.

राजा– पण हे तुझे धनी, हे तुझे हितकर्ते, असें तूं ह्यांस मान. ह्यांचे वचनावेगळा चालूं नको. ह्यांची

मोठी मर्यादा ठेव. आणि जरका ह्यांनीं तुझी फिर्याद केली–

अंतिक– त्याविषयीं महाराजांनीं निश्चित असावें.

राजा– कांकीं, आतांच तुझे दृष्टीस पडलें कीं, मी जसा गुणवानास चांगला, तसाच दुर्गुण्यास वाईट आहें, तुझा इतला बोभाटा ऐकिला असतां– हो.

अंतिक– ( मोठे नम्रतेनें गुरूस नमतो. ) गुरुजी तुह्मी मजवर रागावाल असें मी कधीं करणार नाहीं.

राजा– हें मुलगें तुह्मांस कसें वाटतें ?

गुरु– महाराज, आपला वरद हस्त ज्याचे माथीं त्यास काय पाहावयाचें आहे ? मी ह्याला आपल्या मुलाप्रमाणें वागवीन.

राजा– बरें तर; ह्याला घेऊन जा. बाई, ह्या गोष्टीचीं तुह्मांस कांहीं अडचण नाहीं मला वाटतें.

सगु०– हे भगवान् ! अडचण, महाराज !

राजा– जा तर, माझे प्रियकरा, आणि कधीं सदाचरण, सत्वर्तीचा मार्ग सोडूं नको. तुला कोणतेही गोष्टीचें मी उणें पडूं देणार नाहीं. पण तूं मला खिन्नसा दिसतोस ?

अंतिक– ( राजाचा हात धरितो. ) ईश्वर तुह्मांस सर्व सुखें देवो.

राजा– (कोमलतेनें ) आणि तुलाही तशींच देवो; आणि तुझें कल्याण करो, माझे मित्रा. आहा ! ह्याचें ऱ्हदय किती दाटलें आहे ! ( गुरूस, ) आतां तुह्मी

शाला घेऊन जावें. आणि बाई, तुह्मी ह्यां बरोबर जावें, आणि तुमचा मुलगा राहाणार तें स्थळ पाहावें.

सगु०– ( साष्टांग नमस्कार घालिते. ) महाराजांचे उपकार! मी काय– ( तिचा गळा दाटला, अश्रूंचे लोट चालले, बोलवत नाहीं.

राजा– तुह्मी काय करितां हें बाई ? हें मला आवडत नाहीं. )

सगु०– मला हे पाय–

राजा– ( तिला बळात्कारानें उठवितो. ) माझे माते, तूं मला इतका थोरपणा देऊं नको. ऊठ, उभी राहा.

सगु०– ( ती उठते ) बरें तर, मी आतां निरोप घेतें. (वर हात करिते. ) मी हे असें नित्य देवाकडे करीत जाईन, आणि तुह्मांसारिखे उदार, दीनदयाळ, ह्यांचे सदा कल्याण असो ह्मणून त्यापाशीं प्रार्थना करीन.

राजा– ( तिला चार पावलें पोहोंचवितो. ) यावें बाई, तुमचें देव बरें करो.

( मग तीं सर्व निघून जातात. )

समाप्त.